# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–३ : इतिहास**

**सत्र ५ : पेपर ११**

# इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह

(History : Theory and Recent Trends)

**सत्र–६ : पेपर–१६**ता. कागल, जि. कोल्हाप

# इतिहास लेखनाचे तंत्र

(Techniques of History Writing)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-57-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष - **प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **प्रोफेसर (डॉ.) चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी अॅण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **प्रोफेसर (डॉ.) निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या पेपर क्रमांक ११ सत्र पाच साठी 'इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह' आणि पेपर क्रमांक १६ सत्र सहा साठी 'इतिहास लेखनाचे तंत्र' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ११ इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह यामध्ये इतिहास : अर्थ स्वरूप व व्याप्ती इतिहासातील नवे प्रवाह, साधने, वस्तुसंग्रहालय : इतिहासाचे साधन तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १३ संशोधन प्रस्ताव, पुराभिलेखागारातील साधनांचा उपयोग, क्षेत्र भेट पद्धती, संशोधन : तंत्र आणि सादरीकरण या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**डॉ. सुवर्णा पाटील**
मिरज महाविद्यालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली

## अभ्यास घटकांचे लेखक

| **लेखन सहभाग** | **सत्र–५ घटक क्रमांक** | **सत्र–६ घटक क्रमांक** |
|---|---|---|
| **डॉ. संघमित्रा सरवदे**<br>श्री आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाई शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ | २ |
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | ३ | ३ |
| **डॉ. सुवर्णा पाटील**<br>मिरज महाविद्यालय, मिरज, ता. मिरज, जि. सांगली | ४ | ४ |
| **डॉ. जयपाल सावंत**<br>शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा | – | १ |

### ■ संपादक ■

**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

**डॉ. सुवर्णा पाटील**
मिरज महाविद्यालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–११** | |
| | **इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह** | |
| १. | इतिहास : अर्थ, स्वरूप व व्याप्ती | १ |
| २. | इतिहासातील नवे प्रवाह | २७ |
| ३. | साधने | ५४ |
| ४. | वस्तुसंग्रहालय : इतिहासाचे साधन | ९४ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१६** | |
| | **इतिहास लेखनाचे तंत्र** | |
| १. | संशोधन प्रस्ताव | ११९ |
| २. | पुराभिलेखागारातील साधनांचा उपयोग | १५६ |
| ३. | क्षेत्र भेट पद्धती | १७८ |
| ४. | संशोधन : तंत्र आणि सादरीकरण | १९५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक १**

# इतिहास : अर्थ स्वरूप व व्याप्ती

**(History : Meaning, Nature and Scope)**

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ इतिहासाच्या व्याख्या (Definitions)

१.२.२ इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती (Nature and Scope)

१.२.३ इतिहासाचे प्रकार (Types of History)

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- इतिहास या ज्ञान शाखेचे स्वरूप समजून घेता येईल.
- इतिहास म्हणजे काय याचा अर्थ सांगता येईल.
- विविध इतिहासकारांनी केलेल्या इतिहासाच्या व्याख्यांचे चिकित्सक परिक्षण करता येईल.
- या व्याख्यांद्वारा मानवी इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन विविध कालखंडात कसा विकसित होत गेला हे सांगता येईल.
- इतिहासाची व्याप्ती समजून घेता येईल.
- इतिहासाचे विविध प्रकार व त्याचे महत्त्व अधोरेखित करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

इतिहास या ज्ञान शाखेने मानवाच्या कल्याणाच्या व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास हा विषय मानवाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. मानवने त्याच्या जीवनात केलेले बरे वाईट कार्य हा इतिहासाचा केंद्रबिंदु आहे. मानवाच्या भाव-भावना, त्याच्या जीवनातील चढ-उतार, खाचखळगे, चमत्कृतीपूर्ण घटना यांचा विचार इतिहासामध्ये केला जातो. थोडक्यात, मानवाच्या प्रगतीची गोष्ट इतिहासात सांगितली जाते. मानव समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा विचार केला जातो. घटना का घडली? कशी घडली? तसेच, समाजजीवनावर पडलेल्या परिणामांचा विचारही केला जातो. म्हणूनच इतिहास भूतकाळ व वर्तमान काळ यातील अखंड संवाद आहे, असे म्हटले जाते. एकंदरीत इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्यामागील तत्त्व, विचार व व्यक्तीची वृत्ती यांचा विचार केला जातो. राजकीय घटनाबरोबरच मानवी संस्कृती, सामाजिक चालीरीती, रूढी, सामाजिक संस्था, आर्थिक स्थिती, धर्म इत्यादिंचा विचार इतिहासात होतो. आजच्या आधुनिक काळात तर इतिहासातील जुन्या त्रुटी टाळून वैज्ञानिक पद्धतीने इतिहासाचे लेखन केले जात आहे. त्यामुळे इतिहासात मानवी संस्कृतीच्या सर्व अंगाने विचार केला जात आहे.

मानवाला आपल्या भूतकाळाबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता असते. आपल्या भूतकाळाबद्दल कुतुहल असते. आपल्या अस्तित्वाची माहिति पुढील पिढीला करून देण्याची धडपड तो त्याच्या अस्तित्वापासूनच करत आलेला आहे. त्याच्या या स्वभाव वृत्ती मधून इतिहासाची सुरुवात झाली आहे. त्याची जशी-जशी बौद्धिक प्रगती झाली तस-तसे त्याचे इतिहाससंबंधित आकलन बदलत गेले. मानवी विकासाच्या विविध टप्प्यावर इतिहाससंबंधित त्यांच्या धारणा व आकलन वेगळे असल्याचे दिसून येते. विविध देशातही इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही भिन्न आहे. इतिहास या ज्ञान शाखेचे योग्य आकलन करून घेण्यासाठी त्या विषयाचा अर्थ, व्याख्या, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. इतिहासाच्या स्वरुपावरून त्याचे प्रकारही सामावून घेता येतील. इतिहासाच्या प्रकाराबरोबरच त्याचा इतर ज्ञान शाखांशी असलेला संबंधही समजावून घेता येईल. त्यामुळे इतिहासाचे एकंदरीत सम्यक आकलन होण्यास प्रस्तुत प्रकरणातून मदत होईल.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ इतिहासाचा अर्थ, व्याख्या

#### अ) इतिहासाचा अर्थ

इतिहास म्हणजे काय? हे जाणून घेण्यापूर्वी इतिहास (History) या शब्दाची व्युत्पत्ती अथवा अर्थ पाहू. इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ असे - असे घडले, अशा प्रकारे घडले (इति + ह + आस) असा होतो. म्हणजे भूतकाळात जे घडले ते सर्व इतिहास विषयाच्या कक्षेत समावते. इंग्रजी भाषेतील 'History' या शब्दाचे मुळ 'Istoria' या ग्रीक शब्दात सापडते. या शब्दाचा अर्थ जिज्ञासेने केले जाणारे संशोधन व त्या

द्वारा नव्या माहितीचा शोध असा आहे. तर जर्मन भाषेत इतिहासासाठी 'Geschichte' हा शब्द असून त्याचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशुद्ध व अर्थपूर्ण विवेचन असा आहे. इतिहासासाठी वापरलेल्या विविध भाषेतील शब्दाच्या अर्थावरून इतिहासाची व्याख्या स्थुलमानाने भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन जे घडले त्याचे जसेच्या तसे वर्णन तर्कशुद्ध व अर्थपूर्ण रित्या करणे अशी केली जाऊ शकते. 'History' या शब्दाचा सर्वप्रथम वापर ग्रीक इतिहासकार हीरोडोटस याने केला. हीरोडोटसला इतिहासाचा जनक मानले जाते. त्याच्या मते इतिहासाचा अर्थ जाणून घेणे अथवा ज्ञात होणे होय!

इतिहास लेखनाची सुरुवात इ.स. पूर्व सहाव्या शतकात ग्रीसमध्ये झाली. हे लिखाण इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत चालू होते. हिकॅटिअस, डायोनियस, हीरोडोटस, थ्युसिडाईडस या ग्रीक इतिहासकारांनी इतिहास लेखनाची सुरुवात केली. हीरोडोटस यास इतिहासाचा जनक मानले जाते. त्याने ग्रीक-इराण संघर्षाचा इतिहास युद्धाचे प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तीकडून माहिती जमवून ९ भागामध्ये लिहिला. इतिहासाची व्याख्या ''भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय'' अशी केली आहे. या व्याख्येनुसार मनोरंजकता व संस्मरणीय हे इतिहासाचे प्रमुख निकष मानले आहे. तो इतिहासातील संस्मरणीय घटनांची निवड करण्याची जबाबदारी इतिहासकारावर टाकतो. हिकॅटिअस म्हणतो इतिहास लेखनात परंपरागत मिथकांचा अंतर्भाव नसावा. जे प्रत्यक्षात घडले त्याचेच वर्णन इतिहासकारांनी करावे. डायोनियस यांच्या मते, इतिहास प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे पुढे मांडून धडे शिकवितो. म्हणजे इतिहास हे मौल्यवान ज्ञानभांडार आहे. त्यातून माणसाला अनेक महत्त्वाच्या बाबी शिकता येतील. 'History is philosophy teaching by examples.' तर थ्युसिडाईड्स (इ.स. पूर्व ४६०-३९६) इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन होय असे मानतो. 'History is story of things worthy to be remembered.' ॲरिस्टॉटल हा ग्रीक तत्त्वज्ञ इतिहास न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे असे मानतो.

इतिहास लेखनाच्या दुसऱ्या टप्प्याचे (मध्ययुगीन समाजाचे) वैशिष्ट्य म्हणजे मानवी विकासाच्या या टप्प्यावर हा ख्रिस्ती धर्माचा व पुढे सहाव्या शतकात इस्लाम धर्माचा झालेला उदय व या धर्माचा समाजावर पडलेला प्रभाव. या प्रभावातून युरोपात झालेले इतिहास लेखन धार्मिक तत्त्वज्ञाने प्रभावित झाले होते. अशा इतिहास लेखनाची सुरुवात इ.स. च्या तिसऱ्या शतकापासून झाली. इस्लाम धर्म तत्त्वांचा प्रभाव अरब इतिहास लेखनावरतीही झालेला दिसतो. परमेश्वर सर्व व्यापी आहे तो करता करविता आहे, विश्व निर्माता व विश्व चालक तोच आहे. ह्या पृथ्वीवरील जीव हे त्याच्या हातातील बाहुले आहेत तोच सूत्र संचालक असल्यामुळे मानवाला स्वतंत्र इच्छा शक्ती अगर कार्य कर्तृत्व नाही. अशी वैचारिक धारणा काही अपवाद वगळता त्या काळातील इतिहास लेखनात प्रतिबिंबीत झाली आहेत. थोडक्यात, धर्म विचार व धर्मनिष्ठा हाच इतिहास लेखनाचा प्रमुख प्रेरणा स्त्रोत असल्याचे आढळून येते. या काळातील आत्यंतिक धर्मनिष्ठा यामुळे मानवाच्या स्वतंत्र प्रज्ञेचा व जिज्ञासु वृत्तीचा लोप पावला. मध्ययुगीन समाजाची इतिहाससंबंधित अशी धारणा १५ व्या शतकापर्यंत प्रभावी होती.

१५ व्या शतकात उत्तरार्धात जगाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या तीन घटना घडल्या. त्या म्हणजे वैचारिक प्रबोधन, धर्म सुधारणा व अज्ञात जगाचा शोध. कॉन्स्टॅन्टिनोपॉल तुर्कांनी जिंकून घेतले तेथे वसलेले

ग्रीक पंडित युरोपात स्थलांतरित झाले. त्यांनी ग्रीक वाङ्मयाचा आणि तत्त्वज्ञानाचा तेथे प्रसार केला. त्यातून युरोपात विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट पसरली. प्राचीन ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे ज्ञानाची नवी दालने खुली झाली. त्यातून धर्माचा प्रभाव कमी होऊन नवे ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, स्वतंत्र विचार शक्ती जागृत झाली. मानव हा सर्व विचाराचा केंद्रबिंदु बनला, यातून मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण झाली. या घटनाचा परिणाम इतिहासावर झाला. मानवी कर्तृत्वाचे महत्त्व ध्यानात घेतले जाऊ लागले. इतिहासात मानवी कर्तृत्वाला स्थान मिळाले आणि इतिहास हे मानवाला उपयुक्त ठरणारे, शहाणपण शिकवणारे ज्ञानभांडार आहे असा विचार व्यक्त होऊ लागला. येथून पुढे इतिहासाचा विचार हा मानवकेंद्रित होऊ लागला व त्या पद्धतीने इतिहासाच्या व्याख्याही पुढे येऊ लागल्या. १७ व्या शतकातील फ्रान्सिस बेकन याने इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे, अशी इतिहासाची व्याख्या केली. तर सर वॉल्टर रेले याने गतकाळातील उदाहरणे देऊन माणसाला शहाणपण शिकविणे व मार्गदर्शन करणे हे इतिहासाचे उद्दिष्ट्ये असल्याचे मत मांडले.

**इतिहासाविषयीची नकारात्मकता :**

१८ व्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश साहित्याच्या क्षेत्रामध्ये केला जाई. या शतकात युरोपात बुद्धिप्रामाण्यवाद शिगेला पोहचला होता. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या निकषावर तपासून पाहण्याची वृत्ती या काळात प्रचलित झाली होती. त्यातूनच बुद्धिवादी विचारवंत इतिहासाची चिकित्सा करू लागले. त्यातून त्यांना इतिहासातील सत्याविषयी शंका उत्पन्न होऊ लागली. त्यातून इतिहासाविषयी नकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला की इतिहासातून शिकण्यासारखे काहीही नाही.

फ्रेंच तत्त्ववेत्ता व्होल्टेअर आपला सर्व इतिहास हा केवळ काल्पनिक आहे असे इतिहासासंबंधी नकारात्मक दृष्टिकोन मांडू लागला. अनेक असत्य गोष्टीतून सत्याशी सादृश्य असलेल्या बाबींची निवड करण्याची कला म्हणजे इतिहास अशी इतिहासाची व्याख्या रूसोने केली. गिबन हा ब्रिटीश तत्त्ववेत्ता इतिहासासंबंधी म्हणतो, इतिहास म्हणजे मानव जातीने केलेले गंभीर गुन्हे, मूर्खपणा आणि दुर्दैव यांच्या कथेशिवाय काही नाही. हेगेल हा जर्मन तत्त्ववेत्ता इतिहासापासून कोणी काही धडे घेतल्याचे आढळत नाही असे विधान करून इतिहासाची निरूपयोगिता  सिद्ध करतो.

**इतिहासाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातील स्थित्यंतरे :**

१८ व्या शतकात इतिहासातील घटनाकडे बुद्धिवादी दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. इतिहासातील त्रुटी दूर करून शास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहास लिहिला जाऊ शकतो अशी भूमिका घेऊन १९ व्या शतकात इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण झाला. त्याच बरोबर या शतकात मात्र युरोपियन जगतात अनेक विचार प्रवाह प्रचलित झाले. त्याचा परिणाम इतिहासाच्या आकलनावर होऊ लागला. अठराव्या शतकातील निखळ बुद्धिवादाविरूद्धची प्रतिक्रिया म्हणून इतिहास लेखनात कल्पना शक्तीला स्थान मिळाले. साहित्य क्षेत्रातील रोमॅन्टिसिझमचा प्रभाव इतिहास लेखनावर झाला. तसेच विज्ञानाच्या विकासाबरोबर इतिहासाचे शास्त्रीय लेखन व्हावे असा आग्रह धरणारे इतिहास तज्ज्ञ पुढे आले. लोकशाहीच्या

विकासाबरोबरच मानवी प्रगतीचा व स्वातंत्र्याचा विचार प्रभावी ठरू लागला. वसाहतवाद, साम्राज्यवाद, राष्ट्रवाद, अशा नव्या राजकीय विचार प्रणाली प्रचारात आल्याने राजकारणाचे महत्त्व इतिहासाच्या क्षेत्रात मांडले गेले आणि औद्योगिक व श्रमिक वर्गाचे शोषण यामुळे इतिहासाच्या मांडणीत आर्थिक हेतुमूलकतेच्या सिद्धांताला व सामाजिक संघर्षाला स्थान मिळाले. आज मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होण्यासाठी राजकीय इतिहासाबरोबरच आर्थिक सामाजिक सांस्कृतिक घटकांचा विचार ही इतिहासात केला जात आहे. आज इतिहासाच्या व्याप्ती व स्वरुपातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत.

**ब) इतिहासाच्या व्याख्या**

इतिहासाच्या व्याख्या समाज परिवर्तनशील आहे. समाजाचे स्वरूप काळानुरूप बदलत असते. समाजाच्या बदलाची प्रक्रिया समाजाच्या गरजेनुसार होत असते. समाज बदलाच्या मुळाशी विचार असतात. आणि त्या काळाच्या विचाराला अनुसरून गरजेनुसार इतिहास लिहिला जातो. समाजाच्या संबंधित वरील धारणा लक्षात घेऊन इतिहासाच्या व्याख्या याचा विचार करता येईल. विविध इतिहासकार राजकीय व्यक्ती समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ यांनी इतिहासाच्या व्याख्या केल्या आहेत. या व्याख्या त्या-त्या काळाचे प्रतिनिधीत्व करतात. या व्याख्यांचा अभ्यास करत असताना आपणास इतिहासाच्या आकलनामध्ये प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत झालेले बदलही लक्षात येतात.

इंग्रज इतिहासकारांनी केलेल्या व्याख्या

१) फ्रांन्सिस बेकन : ''मानवाला शहाणी बनवणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास.''

२) हेन्री जॉन्सन : ''ज्या घटनांचा मानवी मनावर खोल ठसा उमटतो त्याला इतिहास म्हणतात.''

३) प्रो. एच. डब्ल्यू. गेटलँड : ''मानवाने जे कार्य केले किंवा ज्याच्या संबंधाने त्याने विचार व्यक्त केले, त्या पेक्षा त्याने एकंदर परिस्थितीसंबंधी जे विचार व्यक्त केले त्याला इतिहास म्हणतात.''

४) प्रो. मेटलँड : ''इतिहास ही एक वैचारिक प्रक्रिया आहे अशा प्रक्रियेमध्ये माणसाला स्वत:च्या मनाचे प्रतिबिंब दिसत असते. विविध घटना मध्ये असणारे संबंध इतिहासकार ज्ञानाच्या आधारे प्रस्थापित करीत असतो.''

५) प्रो. जी. आर. एलटन : ''मानवाने जी आपली भावना व्यक्त केली, विचार व्यक्त केला किंवा जे कार्य केले अथवा त्याने जे आघात सहन केले ते सर्व म्हणजे इतिहास होय!''

६) एडमंड बर्क : ''इतिहासात सतत घडणाऱ्या बदलाचा संबंध मानवी जीवनाशी असतो. इतिहासाचा संबंध वस्तूशी नसतो. एखाद्या घटनेचा परिणाम हा व्यक्तिसापेक्ष, स्थल सापेक्ष असतो. असा बदल कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसविता येत नाही. ऐतिहासिक व्यक्तीने तत्त्वानुसार हालचाली केलेल्या नसतात तर प्रत्येक बदल हा गरजेतून निर्माण झालेला असतो. त्यामुळे इतिहास हा तत्त्वाचा मार्गदर्शक नसतो तर दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक असतो.''

७) लॉर्ड ॲक्टन : ''इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा आहे. साम्राज्याची मुहुर्तमेढ रोवणे हा इतिहासातील श्रेष्ठ क्षण नव्हे तर ज्या वेळी मानवी स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो तो

क्षण श्रेष्ठ होय! प्रत्येक मानवाच्या ठिकाणी ही सुप्त शक्ती असते आणि अशा शक्तीचा विकास स्वातंत्र्यातच होत असतो. म्हणून इतिहास म्हणजे मानवी स्वातंत्र्याची कथा होय!''

८) प्रो. ए. एल. राऊस : ''इतिहास म्हणजे विशिष्ट अशा भौगोलिक व प्राकृतिक परिस्थितीमध्ये समाज करून राहणाऱ्या मानवी जीवनाची कथा आहे. त्या मानवी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाची निर्मिती त्याच्या परस्परांतील अंतरप्रक्रियेतून आणि सामाजिक व भौगोलिक परिस्थितीच्या देवाणघेवाणातून होत असते.''

९) प्रो. एडवर्ड कार : ''इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे.''

**जर्मन इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) इमॅन्युल कांट : 'निसर्गाने मानवामध्ये काही शक्ती दिल्या आहेत. त्या शक्ती जरूर भासेल त्या प्रमाणे दृगोचर होत असतात. इतिहासाची कारक मानवामधील विवेक शक्ती आहे. म्हणून मानवाच्या विवेक शक्तीला आवाहन करणारा विषय म्हणजे इतिहास होय!'

२) फॉन हार्डर : 'निसर्गाच्या उत्क्रांती मधून इतिहास निर्माण होतो. इतिहासात घटनांची मालिका असते.' फॉन हार्डरने मानवी जीवनाचा नैसर्गिक विकासाशी अविभाज्य संबंध आहे सर्व वस्तू अदृश्य परिवर्तनाने एकमेकांच्या मागे व एक दुसऱ्याच्या आंत प्रवाहित असतात इतिहास आणि निसर्ग दोन्हीही कालमय, गतीशील व सजीव आहेत.

३) फ्रेडरिच हेगेल : 'इतिहास म्हणजे मानवी समाज एका विशिष्ट ध्येयाप्रत जात असताना चढत्या क्रमाने प्रगती होते यालाच इतिहास प्रक्रिया म्हणतात.'

४) लिओपोल्ड फॉन रान्के : रांके यास आधुनिक इतिहास लेखनशास्त्राचा जनक असे म्हणतात. त्याने इतिहास लेखनात साधनांना खूप महत्त्व दिले आहे. त्याचे एक विधान प्रसिद्ध आहे ते म्हणजे, 'सत्य जे काही आहे तेच नोंदवले पाहिजे, अर्थात, The facts must be produced as actually they were.' तसेच, No documents no history हे रांकेचे हे विधान देखील प्रसिद्ध आहे. ''ऐतिहासिक घटना परमेश्वराच्या प्रेरणेने घडत असतात. व्यक्ती व राष्ट्रे परमेश्वरी इच्छांचे प्रकटीकरण करीत असतात. जगात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे अदृश्य शक्तीचा हात असतो.''

५) कार्ल मार्क्स : 'इतिहास म्हणजे वर्गकलह' अशी व्याख्या मार्क्स यांनी केली आहे. मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास केला. मानवी प्रगतीच्या अवस्था सांगून मानवी समाजाची भौतिक मीमांसा केली. त्याने समाजाचा विकास हा उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे असे प्रतिपादन केले, त्याने मानवी जीवनाच्या वाटचालीचा शास्त्रीय व सखोल पद्धतीने अभ्यास करून थांबला नाही तर त्या संदर्भाने त्याने वर्तमानाचा अर्थ लावला आणि भविष्यातील सर्वसामान्य माणसाचे जीवन सुखी करण्यासाठी मार्गदर्शन केले. दुर्लक्षित व शोषित समाज गटांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा व त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखविला. ''पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांनी जगाचे केवळ आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला, परंतू मुख्य मुद्दा

आहे तो त्यात परिवर्तन करण्याचा''. असा विचार त्याने मांडला. समाजाचा इतिहास हा उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे. समाजात शोषक व शोषित दोन गट कार्यरत असतात. शोषित वर्ग आपल्या श्रमाची विक्री करून आपली उपजीविका करणारा असतो. शोषक वर्ग शोषित वर्गाच्या श्रमावर जास्तीचा नफा कमवत असतात. या दोन वर्गाच्या संघर्षातून समाजाचा विकास होत असतो या संदर्भाने त्यांनी द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत मांडला. त्याने केलेली मानवी समाजाची भौतिकवादी मिमांसा दोन गृहितकांवर आधारित आहे. पहिला विचार म्हणजे वर्ग संघर्षातून इतिहास घडतो आणि दुसरा विचार म्हणजे सामाजिक घटकांच्या संबंधांना भौतिक व्यवहारांचा आधार असतो. त्याच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर रशियन साम्यवादी क्रांती व चीनची साम्यवादी क्रांती झाली आहे. इतिहासाची भौतिकवादी मिमांसा करणारा एक प्रवाह इतिहासामध्ये प्रचलित झाला. भारतीय इतिहासाची भौतिकवादी मिमांसा रोमिला थापर, इरफान हबीब, इत्यादिंनी केली.

**फ्रेंच इतिहासकारांनी केलेल्या व्याख्या :**

१) डी. व्हॉल्टेर : ''मृत व्यक्तीवर जिवंत व्यक्तीने केलेली किमया म्हणजे इतिहास. इतिहासामध्ये कल्पना शक्तीला जास्त वाव आहे. मानव कसा आहे हे आपणास शिकविले तो विषय म्हणजे इतिहास होय!''

२) कॉन्डरसेट : ''इतिहास म्हणजे मानवाची बौद्धिक व कल्पनात्मक प्रगती नसून जागतिक मताधिकार व शिक्षण, भाषण व विचार स्वातंत्र्य, घटनात्मक ऐक्य व संपत्तीचे समान विभाजन करणारा विषय होय!''

३) ऑगस्त कॉम्त : ''ख्रिश्चन धर्माचा त्याग करावा व त्या ठिकाणी विवेक शक्तीचा उदय व्हावा. कोणत्याही एका धर्मापेक्षा जगात सर्व धर्म समभाव असावा. मानव जातीची प्रगती तीन टप्प्यांमधून होते.

**इतर देशातील इतिहासकारांच्या व्याख्या :**

१) व्हिको : ''मानवाची सामाजिक प्रगती म्हणजे इतिहास होय!''

२) क्रोचे : ''सर्व इतिहास समकालीन असतो. इतिहासामध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ एका विशिष्ट घटनाक्रमाने जोडलेले असतात अशा साखळीमुळे गतकाळातील घटना समकालीन वाटतात.''

३) डॉ. आर. सी. मुजुमदार : ''इतिहास म्हणजे पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र होय!''

- **स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ सांगा?

२) हिस्ट्री या शब्दांचा सर्वप्रथम वापर कोणी केला?

३) इतिहासाचा जनक कोणास म्हटले जाते?

४) इतिहास ही मानवाला सुज्ञ बनवणारी शाखा आहे ही इतिहासाची व्याख्या कोणी केली?

५) घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो असे कोणी म्हटले आहे?

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) इतिहासात मिथकांचा अंतर्भाव नसावा असे ............ यांनी म्हटले आहे.

अ) हिक्याटिअस ब) थ्युसिडाईड्स क) हेरोडोटस ड) डायोनियस

२) मध्ययुगीन इतिहास लेखनाचा हेतू ............हा होता.

अ) विश्व नियंत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारा सांगणे ब) मानवाचे कर्तृत्व सांगणे

क) सत्य घटनेचे वर्णन करणे ड) मनोरंजन करणे

३) अठराव्या शतकापर्यंत इतिहासाचा समावेश ............क्षेत्रांमध्ये केला जाई.

अ) कला ब) विज्ञान क) पुराण ड) साहित्य

४) इतिहासाचा अर्थ लावताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे असा विचार ............ यांनी मांडला.

अ) फ्रान्सिस बेकन ब) हेगेल क) इ. एच. कार ड) कार्ल मार्क्स

५) इतिहास हा गतकाळ व वर्तमानकाळ यांच्यात अखंडपणे चालणारा संवाद आहे असे ............ यांनी म्हटले आहे.

अ) प्रो. ई. एच. कार ब) हेगेल

क) हेरोडोटस ड) यापैकी नाही

### १.२.२ इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती

गतकालीन मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास अशी साधी सोपी व्याख्या करता येते. अथवा 'रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे होणारी मानवाची वाटचाल म्हणजे इतिहास' या इतिहासाच्या व्याख्येवरून इतिहासाचे स्वरूप स्पष्ट होते. मानवाच्या प्रगती बरोबरच इतिहासासंबंधी अनेक कल्पना अस्तित्वात आल्या व त्यामध्ये बदलही होत गेले. मानव व राष्ट्र यांचे परस्पर संबंध काळानुरूप सतत बदलत राहतात त्यानुसार इतिहासाच्या स्वरुपामध्ये बदल होत राहतात.

मानवी जीवनाशी संबंधित भूतकाळात घडलेल्या घटना हा इतिहासाचा वर्ण विषय असल्याने इतिहास ही मानव्यशास्त्राची अविभाज्य शाखा आहे. म्हणजे गतकालीन मानवी जीवनाची रूपरेखांचा आलेख म्हणजे इतिहास होय हे इतिहासाचे पहिले वैशिष्ट्य होय!

इतिहासामध्ये मानवाच्या लौकिक बाजूचा विचार केला जातो. पारलौकिकतेला इतिहासात स्थान नाही. स्थळ व काळ हे इतिहासाचे दोन आयाम आहेत. या मर्यादेतच इतिहासाचे कार्य चालते. स्थळ व काळानुरूप इतिहासाचे स्वरूप ठरत असते.

मानवी जीवन हे परिवर्तनशील आहे. या मानवी जीवनाच्या परिवर्तनाचे स्थायी व गतिमान स्वरूप उलगडून दाखविणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. निसर्गातील विविध बाबींचा मानवी जीवनावर होणारा परिणामाचा अभ्यास इतिहासकार करतो परंतू त्या बाबीचा स्वतंत्र अभ्यास इतिहासाच्या कक्षेत येत नाही.

इतिहासामध्ये मानवी जीवनातील लक्षवेधी संस्मरणीय घटनांचा अभ्यास केला जातो. सर्वसामान्य घटनाला इतिहासात स्थान नाही कारण अशा घटनापासून काही शिकवण मिळत नाही. म्हणजे इतिहासकार गतकाळात घडलेल्या घटनामधील महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटनांचे वर्णन करतो म्हणून निवड हे इतिहासाचे स्वरूप आहे. विसाव्या शतकात इतिहासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. पूर्वी राजा हा इतिहासाचा नायक होता. तर कालौघात इतिहासाच्या स्वरुपामध्ये अनेक स्थित्यंतरे होऊन आज सामान्य माणूस हा इतिहासाचा नायक बनला आहे. मानवी जीवनात सर्वसामान्य वाटणाऱ्या घटनांची वर्णने करू लागला आहे. त्यातून सर्व सामान्यांचे  जीवन दर्शन घडवू लागल्याचे आढळून येत आहे. या सर्व घडामोडीतून इतिहासाचे स्वरूप कसे बदलत चालले आहे ते लक्षात येते.

घटनांचा अन्वयार्थ लावणे हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासाचे स्वरूप केवळ वर्णनात्मक अगर निवेदनात्मक नाही. इतिहासात वर्णन केलेल्या घटनांचे स्पष्टीकरण करणे त्यावर भाष्य करणे. त्याचे मर्म उलगडून दाखविणे. थोडक्यात, त्या घटनांचा अन्वयार्थ इतिहासकाराला लावावा लागतो. म्हणूनच ई. एच. कार म्हणतात, ''घटना बोलत नाही तर इतिहासकार त्यांना बोलते करतो.''

घटनांच्या वास्तव स्वरुपाचे वर्णन हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात वास्तव घटनांचे वर्णन पुराव्याच्या आधारे करावे लागते. ऐकीव काल्पनिक गोष्टींना, मिथकांना इतिहासात स्थान नाही. ज्या साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन करावयाचे त्याची सत्या-सत्यता पडताळून पाहून हाती आलेल्या सत्यच इतिहासात मांडावे लागते. म्हणजे सत्य शोधन व सत्य कथन हा इतिहासाच्या स्वरुपाचा आत्मा आहे.

वस्तुनिष्ठता हे इतिहासाचे स्वरूप आहे. इतिहासात गतकालीन घटना वास्तवदर्शी मांडण्यासाठी इतिहासकारांमध्ये वस्तुनिष्ठता असणे महत्त्वाचे आहे. पण अशी वस्तुनिष्ठता प्रत्यक्षात शक्य होत नाही. कारण इतिहास म्हणजे गतकाळ व वर्तमान काळ यात अखंड चालणारा संवाद आहे. म्हणून इतिहास विषयाचा अर्थ लावत असताना वर्तमानात राहणारा इतिहासकार काही अंशी त्यात डोकावणे हे अपरिहार्य आहे. हा विचार इ. एच. कार यांनी मांडला.

इतिहासाचे स्वरूप ठरवित असताना आपल्याला इतिहासा संबंधित पुढील संकल्पना समजावून घेतल्यास इतिहासाचा स्वरुपाची  विविधता समजू शकेल.

**इतिहासाची पुनरावृत्ती  होते :**

'इतिहासाची पुनरावृत्ती होते' या विचाराचे काही इतिहासकारांनी जोरदार समर्थन केले आहे तर काही इतिहासकार हे अर्धसत्य मानतात. इतिहासाची  पुनरावृत्ती होते याचा साधा अर्थ म्हणजे ऐतिहासिक घटनात साम्य दिसते. मात्र त्या घटना घडण्याचे मार्ग भिन्न असतात. तसेच एखादी घटना जगाच्या पाठीवर घडत

असताना मानवी कृतीमध्ये एकवाक्यता असते. कारण कोणत्याही देशातील व्यक्ती ठराविक परिस्थितीमध्ये तशीच वागत असते.

**इतिहासामध्ये मूल्यमापन असावे की नसावे ?**

इतिहास लेखन करताना इतिहासकार घडून गेलेल्या घटनांचे वर्णन करत असतो. पण त्या घटनेचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे की नाही या संदर्भात मतभिन्नता आढळते. लॉर्ड ॲक्टन यांच्या मते, इतिहासामध्ये मूल्यमापन, चर्चा, निर्णय घेणे अनिवार्य असते कारण त्याचा त्या विषयाचा अभ्यास असल्याने तो त्या विषयाचा भाष्यकार असतो. ॲक्टन म्हणतो, ''इतिहासाची सर्वात मोठी कामगिरी कोणती असेल तर त्याने माणसाची सद्सदविवेकबुद्धी ही सतेज केली पाहिजे.'' म्हणजेच प्रत्येक गोष्टीचे मूल्यमापन इतिहासकाराने करावे जेणे करून लोकांना योग्य मार्गदर्शन होईल. मात्र रान्के आणि ब्यूटी, या इतिहासकारांना इतिहासामधील मूल्यमापनाचा विचार मान्य नाही. संशोधकाने फक्त घटना मांडव्यात, त्यावर भाष्य करू नये त्यामुळे एखादे वेळी गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. आधुनिक काळात मात्र इतिहासामध्ये मूल्यमापन असावे असा विचार पुढे आला आहे.

**सर्व इतिहास समकालीन असतो**

इटालीयन तत्त्ववेत्ता बेनोडेटो क्रोचे (Benedetto Croce) म्हणतो की, ''सर्व इतिहास समकालीन असतो.'' भूतकाळ व वर्तमान काळ विशिष्ट क्रमाने जोडलेले असतात अशा या साखळीमुळे गतकाळातील घटनासुद्धा समकालीन वाटतात. क्रोचे पुढे म्हणतो की, ''इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसते तर गतकाळातील घटना नव्याने सांगितलेल्या असतात.'' थोडक्यात, याचा अर्थ असा की भूतकाळात घडलेल्या घटना या कालौघात घडत असल्या तरी त्याचे कारणे व परिणाम यामध्ये सारखेपणा दिसतो. तसेच इतिहासकार हा वर्तमान काळात राहून भविष्यकाळातील घटनांचे मूल्यमापन साधनांच्या सहाय्याने करत असतो या घटनांचा अन्वयार्थ लावताना समकालीन विचारांचा प्रभाव पडत असतो.

**इतिहासात भवितव्य वर्तविण्याची क्षमता**

इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असला तरी ती वर्तमान काळाची गरज असते. त्यामुळे भूतकाळाचा नवा अर्थ वेळोवेळी लावला जातो. इतिहासकाराला भूतकाळात जाऊन भूत व वर्तमान यांच्यात सुसंवाद साधायचा असतो. हा सुसंवाद साधत असताना त्याला भूतकाळात घडलेल्या घटना का घडल्या कशा घडल्या हे शास्त्रीय दृष्टिकोनातून त्या घटनांचे विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावावा लागतो. २० व्या शतकात इतिहास हे एक शास्त्र आहे हा विचार सर्वश्रुत झाला आहे. अन्य शास्त्रे जशी नियम तयार करून भविष्य वर्तववितात तसे इतिहासात ही शक्य आहे हा विचार पुढे येत आहे. पण मानवी प्रवृत्ती गुंतागुंतीच्या असतात त्यामुळे त्याच्या मनाचा अंत आपणास लावता येत नाही परिणामी भूतकाळाचा मागोवा घेऊन भवितव्य वर्तवविणे अवघड होणार आहे. असाही एक विचार मांडला जातो.

### इतिहासाची गती सरळ की चक्राकार?

इतिहासाची गती सरळ आहे की चक्राकार आहे हे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. इतिहासाची गती सरळ आहे या संदर्भात असे म्हणतात की, अज्ञात भूतकाळात इतिहासाची गती सुरू होते. ती वर्तमान काळातून भविष्यकाळात जात असते याला प्रगती असे म्हणतात. म्हणजेच असे म्हणता येईल की मानवाची बौद्धिक व भौतिक प्रगतीची दिशा ही चढत्या क्रमाने होत असते. दुसऱ्या चक्राकार विचार प्रवाहाप्रमाणे असे म्हटले जाते की, ज्या ठिकाणाहून गती प्राप्त होते तेथे ती पुन्हा येऊन मिळते. पण मानवी प्रगतीचा आलेख पाहिला तर इतिहासाची गती सरळ रेषेत आहे हे विधान अधिक योग्य वाटते.

### इतिहास अनन्यसाधारण आहे

गार्डिनर यांनी इतिहास स्वयंपूर्ण शास्त्र आहे असा विचार मांडला. आज इतिहासात शास्त्राचे निकष आणण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणजेच इतिहासात शास्त्रशुद्ध सिद्धांत मांडणे, विषयाच्या दृष्टीने साधने जमा करणे, त्याचे अंतरंग व बहिरंग परिक्षण करून त्या घटनांचा अन्वयार्थ लावणे व नंतर भवितव्यता वर्तविण्याचा प्रयत्न केला जातो हे इतिहासाचे स्वरूप आज निश्चित झाले आहे. आज इतिहासाला शास्त्राचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी इतिहास स्वयंपूर्ण आहे. कारण त्याचा मुख्य आधार मानवी मन व मानवी चेतना आहे. शास्त्रा प्रमाणे इतिहासाला ठोकळबाज चौकट नसते. इतिहासातील विविधतेमुळे तो अनन्य आहे.

### इतिहासाची स्वायत्तता

इतिहासाचे स्वरूप खुप व्यापक आहे, त्यात विविधता आहे. इतिहासाचे सर्व व्यवहार मनुष्य निर्मित, मनुष्य प्रेरित, मनुष्य पुरस्कृत असल्याने मानव समाज हाच इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे. इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असतो, इतिहास हा विचारांचा असतो, इतिहास हा संस्कृतीचा असतो. इतिहास हा मानवी जीवनाच्या वाटचालीचा असतो. इतिहास हा भूतकाळ व वर्तमान काळ यांना जोडणारा दुवा आहे.

### ब) इतिहासाची व्याप्ती

इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असल्यामुळे मानवी जीवनाप्रमाणेच इतिहासाची व्याप्ती ही मोठी आहे. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असल्यामुळे त्याचा संबंध सर्व विषयांशी आहे. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान, भाषा, साहित्य, लिपी, नाणकशास्त्र, पुरातत्त्व इ. सर्वच विषयाचा इतिहासाची जवळचा संबंध आहे. मानवाच्या जीवन संबंधी कोणत्याही विषय हा इतिहासाचा विषय आहे. आधुनिक काळात तर सर्वसामान्य जनतेतील लोककथा, दंतकथा व मिथके यांच्या मार्फत वंचितांचा व स्त्रियांचा इतिहास लिहिला जाऊ लागला आहे. यावरून आपल्या लक्षात येते की, इतिहासाची व्याप्ती मानवाच्या विकासाबरोबरच विकसित होत आली आहे. मानवी जीवनाची सर्व क्षेत्रे इतिहासाच्या कक्षात येतात.

**इतिहासाच्या व्याप्तीत समाविष्ट करण्यात येणाऱ्या बाबी**

इतिहास केवळ गतकालीन गोष्टी सांगत नाही तर वर्तमानाचे आकलन करून भविष्याविषयीच्या वाटचालीचे दिशा दर्शनही करतो. थोडक्यात, इतिहास म्हणजे, 'भूतकाळाचे आपण किती ऋणी आहोत? वर्तमान स्थिती आपणास कशी प्राप्त झाली? व भविष्यकाळात आपले काय कर्तव्य आहे? या बाबतचे स्पष्टीकरण होय! म्हणजे मानवी जीवन हे गतकाळातील अनुभवांनी समृद्ध झालेले आहे. अनुभवाने मिळालेल्या शहाणपणाने मानवी जीवन प्रगतीच्या पुढच्या टप्प्यात पदार्पण करत असते. हे जे अनुभव आहेत ते इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. प्रत्येक प्रकारचा अनुभव इतिहासाचा विषय होतो. या अनुभवाचा अभ्यासावरून सारांशरुपाने इतिहासाच्या व्याप्तीत पुढील बाबीचा समावेश करता येईल.

१. गतकालीन वाटचाल रेखाटणे.

२. ही वाटचाल कशी झाली हे सांगणे.

३. या वाटचालीतील घटनांचे विश्लेषण करणे.

४. घटनांची कारण मिमांसा करणे.

५. घटनांचा अन्वयार्थ लावणे.

६. घटनांचा अर्थ लावून सामान्यीकरण करणे.

७. घटनांच्या परिणामांची चर्चा करणे.

इतिहास म्हणजे गतकाळातील माहिती देणारे शास्त्र आहे हे मान्य केली की, मानवी जीवनासंबंधीची सर्व क्षेत्रे या व्याप्ती मध्ये येतात. यात नीति, धर्म, अर्थ, सामाजिक रूढी परंपरा, कला, साहित्य इ. सर्वच बाबी इतिहासाच्या व्याप्तीत येतात.

**इतिहासाची व्याप्ती निश्चित करणारी तत्त्वे**

वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी गतकाळाचा अभ्यास आपण करत असतो. भूतकाळातील घटना व वर्तमान कलातील घटना याचा आपण परस्पर संबंध लावत असतो म्हणजे या प्रक्रियामधून माणूस अनुभव समृद्ध बनत असतो. यातून आपणास असे म्हणता येते की एक प्रकारे इतिहासाची शिकवण ही मानवी जीवनाच्या विकासाला पूरक होते.

प्रो. बाँदिन याच्या मते, इतिहासाची व्याप्ती आपणास पुढील तत्त्वानुसार निश्चित करता येते.

१) ज्या शाश्वत तत्वांवर इतिहासाची बैठक आहे, त्या तत्त्वाची मानवी मनास ओळख होणे आवश्यक आहे.

२) इतिहासाने भविष्य वर्तविण्याच्या क्षमतेचा अधिकाधिक लाभ घेतला पाहिजे.

३) मानवाच्या इतिहासात त्याच्या वाटचालीत कोणती शाश्वत मूल्य दडलेली आहेत हे ओळखता आले पाहिजे.

मानवी जीवनातील शाश्वत मूल्य समजून घेऊन त्या मुल्याच्या आधारे मानव जातीची प्रगती कशी झाली हे ओळखून मानसाला भविष्याचा अंदाज वर्तवता येतो. ही सर्व शाश्वत मुल्ये इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. इतिहासातील विविध प्रकारचे संघर्ष हे मूल्याच्या अधारेच होत असतात.

**इतिहासाच्या व्याप्तीची तत्त्वे**

आधुनिक काळात इतिहास फक्त घटनांपुरता मर्यादित राहिला नसून मानवी जीवनातील कला, धर्म, वास्तुकला, परंपरा सौंदर्य विषयक दृष्टिकोन, इ. विषयक अभ्यास करणारी स्वतंत्र शाखा म्हणून उदयास येत आहे. इतिहासाच्या अभ्यासाने ज्ञानात भर पडते, तत्त्व बोध होतो, मुल्यांची जोपासना होते, स्थळ, काळ, समाजाची जान निर्माण होते. वादग्रस्त प्रश्न शांततेने हाताळता येतात. राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. थोडक्यात, उत्तम नागरिक निर्माण करण्यासाठीचे सर्व संस्कार इतिहासातून मिळतात. म्हणून इतिहास हा सर्वार्थाने व्यापक विषय बनला आहे. इतिहासाची व्याप्ती ही सतत बदलत जाणारी विकसित होणारी संकल्पना आहे. कालौघात इतिहासाची व्याप्ती बदलत गेलेली आहे. प्रो. सलिकी यांच्या मते, ''जी व्यक्ती गतकालीन घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात असते, ती व्यक्ती स्वत:च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यास फारशी चूक करत नाही.'' म्हणजे इतिहासाची व्याप्ती अशा प्रकारे व्यक्तीचे मूल्यमापन करण्यास पात्र असते. चांगल्या वाईटाची जाण इतिहासातून घडत असते. 'जे घडले त्याचे वर्णन करणे'' व 'जे घडले त्याचे मूल्यमापन करणे' या दोन तत्त्वामध्ये वेगळ्या स्तरावर आपणास इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करता येईल.

**प्रो. ट्रिव्हेलियन** (Trevelyan) **यांचे इतिहासाच्या व्याप्तीचे स्तर**

इतिहासाची व्याप्ती ही साहित्याप्रमाणे अतिशय व्यापक आहे. प्रो. ट्रिव्हेलियन यांच्या मते १) शास्त्रीय २) काल्पनिक व ३) साहित्यिक अशा तीन वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करणारा विषय आहे, असे प्रो. ट्रिव्हेलियन यांचे मत आहे. हे तिन्ही स्तरावर इतिहासाची व्याप्ती दर्शवतात. इतिहासाच्या व्याप्तीमध्ये आर्थिक घडामोडी व समाजशास्त्रीय बदल यामुळे वाढ होत गेली आहे. इतिहासाची व्याप्ती ही मानवाच्या उत्क्रांतीशी संबंधित आहे. इतिहासात मानवाच्या विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढाव्याचा आलेख येणे आवश्यक आहे. व्यक्ती इतिहास वाचत असताना तो आपले प्रतिबिंब इतिहासात शोधण्याचा प्रयत्न करत असतो व अशा तऱ्हेचे प्रतिबिंब ज्या वेळी इतिहासात दिसेल त्या वेळी खऱ्या अर्थाने इतिहास लेखन झाले असे म्हणता येईल.

**इतिहासाच्या व्याप्तीचा आलेख**

ग्रीक इतिहासकार हेरोडोटस यास इतिहासाचा जनक म्हटले जाते. History या शब्दाचा वापर सर्वप्रथम हेरोडोटस याने केला होता. History अर्थात His Story म्हणजे त्याची म्हणजे 'मानवाची गोष्ट' होय! म्हणजे अगदी प्रारंभीच्या काळात इतिहासाची व्याप्ती फक्त गोष्टी व कथांपुरतीच मर्यादित होती, असे दिसते. ग्रीक इतिहासकारांनी प्रारंभीच्या काळात इतिहास लेखनासाठी फक्त राजांच्या लढाया, राजकीय घटना, राजघराण्याची माहिती या सारखे विषय निवडले.

मध्ययुग हे अंधार युग म्हणून ओळखले जाते. धर्म संस्थेचे प्राबल्य सर्वत्र वाढल्याने त्याचाच विचार इतिहासात होऊ लागला. दैवी शक्तीमुळे प्रत्येक घटना घडत असते असा समज निर्माण झाला होता. माणूस दैवाच्या हातातले बाहुले आहे असा समज होता. त्यामुळे समाजात अंधश्रद्धा निर्माण झाल्या होत्या. मध्ययुगीन कालखंडात इतिहासाची व्याप्ती व वर्ण्य विषय बदलत गेले. मध्ययुगीन कालखंडाच्या सुरुवातीला ईश्वरी लीलांना इतिहासात स्थान मिळाले. १३ व्या शतकापर्यंत इतिहासावर धर्मगुरूंचा प्रभाव होता. १३ व्या शतकानंतरच्या कालखंडात मानवी कार्य व शौर्य याकडे इतिहासकार वळले. कालांतराने नव्या भूमीच्या शोधामुळे एका खंडातील लोकांचा अन्य खंडातील लोकांशी संबंध येऊ लागला. नव्या भूमीचा शोध घेतल्यानंतर तेथील संस्कृती, तेथील लोकांचे जीवन या विषयी लिखाण होऊ लागले. नवीन ज्ञान मिळू लागले नव्या भूमीच्या शोधामुळे नव्या साम्राज्याचा उदय झाला. जग जिंकण्याच्या आकांक्षाने राजे, महाराजे व सम्राट जग पादाक्रांत करण्याच्या ईर्षेने अन्य देशावर आक्रमणे करू लागली. यातून तुर्क साम्राज्य, रोमन साम्राज्य अशी साम्राज्य उदयास आली. तसेच अलेक्झांडर, नेपोलियन, समुद्रगुप्त, चंगेजखान या राजांनी सर्व जग जिंकण्याचा प्रयत्न केला ते त्या काळाचे इतिहासाचे नायक बनले.

फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती इ. राज्यक्रांत्या घडवून आणणारा सामान्य माणूस इतिहासाचा नायक बनला. माओ-त्से-तुंगचा लाँग मार्च, महात्मा गांधीचा मिठाचा सत्याग्रह अशा किती तरी ऐतिहासिक प्रसंगाचा नायक सामान्य माणूस झाला. या क्रांत्यांमधून इतिहासाचे एक तत्त्वज्ञान निर्माण झाले. राजाकडून सामान्य माणसाकडे नायकत्व येऊ लागले. इतिहासाच्या अध्ययनात मानवी जीवनासंबंधी आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलही इतिहासकारांना आवश्यक वाटू लागले. कालौघात इतिहास लेखनाने भौगोलिक मर्यादाही ओलांडल्या. स्थानिक, देशाचा व जगाच्या इतिहासाचे लेखन होऊ लागले.

इतिहासाचा संबंध सर्व विषयांशी आहे. प्रत्येक विषयाला त्याचा इतिहास असतो. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, विज्ञान, भाषा, साहित्य, लिपी, नाणकशास्त्र, पुरातत्त्व, इ. विषयाचा जवळचा संबंध इतिहासाची आहे. यामुळे इतिहासाचा अभ्यास व व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढली आहे. माणूस व त्याने निर्माण केलेल्या संस्था, धर्म, संस्कृती, त्याच्या धारणा या सर्व इतिहासाचा विषय आहेत. वंचितांचा व स्त्रियांचा इतिहास लिहिण्यासाठी तर सर्वसामान्य जनतेतील लोककथा, दंतकथा, मिथके, लोकगीते यांना ही इतिहासाने आपल्या जाळ्यात ओढले आहे. राजा प्रमाणेच सर्वसामान्यांचा इतिहास लिहिला जाऊ लागला आहे.

आधुनिक काळात इतिहासाची व्याप्ती फक्त सनावळी, वंशावळी पुरती मर्यादित राहिली नाही. इतिहास म्हणजे संपूर्ण मानवी जीवनाचीच कथा असल्यामुळे इतिहासाला कोणताही विषय अस्पृश्य राहिला नाही. इतिहासाच्या प्रवाहात मानवी जीवनातील सर्व गोष्टीचा अंतर्भाव होतो. या प्रवाहात कुठे गौतम बुद्ध, महावीर, प्लेटो, ख्रिस्त भेटतो. तर कुठे सम्राट अशोक, शिवाजी, चंगेजखान, नेपोलियन दिसतो. याच प्रवाहात कधी अजिंठा, वेरूळ यासारखी शिल्पे निर्माण होतात. तर फ्रेंच, अमेरिकन क्रांती मानवी

स्वातंत्र्याची दखल घेण्यास भाग पाडतात. यावरून इतिहासाची व्याप्ती कशी बदलत गेली हे आपल्या लक्षात येते.

काळाच्या ओघात इतिहासकाराच्या इतिहासविषयक दृष्टीत जसा बदल होत गेला. त्याप्रमाणे इतिहास विषयीच्या व्याप्ती संबंधीच्या कल्पनाही बदलत गेल्या.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) इतिहासाची पुनरावृत्ती होते म्हणजे काय?

२) 'इतिहासामध्ये मूल्यमापन व चर्चा होणे अनिवार्य असते' असे कोणी म्हटले आहे?

३) इतिहासामधे मूल्यमापनाचा विचार कोणी नाकारला?

४) सर्व इतिहास समकालीन असतो असे कोणी म्हटले आहे?

५) इतिहासाचा जनक कोणास मानले जाते?

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) 'रानटी अवस्थेकडून ........... अवस्थेकडे होणारी वाटचाल म्हणजे इतिहास होय!'

अ) प्रगत ब) काल्पनिक क) सुसंस्कृत ड) वैज्ञानिक

२) इतिहास हा ............ शास्त्राची अविभाज्य शाखा आहे.

अ) मानव्यशास्त्राची ब) विज्ञानाची क) कलेची ड) मानसशास्त्र

३) घटनांच्या .............. स्वरुपाचे वर्णन हे इतिहासाचे स्वरूप आहे.

अ) वास्तव ब) काल्पनिक क) खोट्या ड) यापैकी सर्व

४) ................. याने इतिहास स्वयंपूर्ण शास्त्र आहे, असा विचार मांडला

अ) बेनेडेट्टो क्रोचे ब) गार्डिनर

क) मार्क्स ड) हेगेल

५) ............. हा इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे.

अ) निसर्ग ब) ईश्वर क) मानव समाज ड) यापैकी नाही

६) इतिहासाच्या व्याप्ती संदर्भात ''जी व्यक्ती गतकालीन घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात असते, ती व्यक्ती स्वत:च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यास फारशी चूक करत नाही'' हे विधान ........... यांनी म्हटले आहे.

अ) प्रो. सलिकी ब) प्रो. ट्रिव्हेलियन क) क्रोचे क) प्रो. ब्लॉक

७) इतिहासाच्या व्याप्तीचे तीन स्तर .............. यांनी स्पष्ट केले आहेत.

अ) प्रो. सलिकी ब) प्रो. ट्रिव्हेलियन क) डॉ. सॅम्युअल जॉन्सन ड) प्रो. बॉर्नस

### १.२.३ इतिहासाचे प्रकार :

इतिहास या विषयात मानवाच्या जीवनासंबंधीत सर्व बाबींचा विचार केला जातो. त्यामुळे मानवाच्या प्रत्येक पैलू विषयीचा अभ्यास करण्यासाठी गरजेनुसार इतिहासाचे प्रकार पाडले जातात. पूर्वी राज्यशास्त्र इतिहासाच्या प्रकाराविषयी प्रो. रेनियर म्हणतात, ''इतिहासाच्या वर्ण विषयात विभाजन अतिशय आवश्यक आहे. कारण त्यामुळे मानवी जीवनाचे नवे पैलू डोळ्यासमोर येऊ शकतात. ज्या वेळी एखाद्या विषयाचे सर्वसाधारण ज्ञान मिळविले जाते, तेव्हा त्या ठिकाणी तंतोतंतपणा किंवा टिकात्मक प्रवृत्ती यांचा अभाव असतो. जर विभाजन केले तर एखाद्या बाबीवर विशेष भर दिला जातो. असे विभाजन अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.'' म्हणजेच इतिहास तज्ज्ञ आपल्या सोईनुसार व गरजेनुसार इतिहासाचे विभाजन करत असतात. मात्र बोअर या इतिहासकाराने मानवी जीवनाची वस्तुनिष्ठता लक्षात घेऊन इतिहासाचे चार प्रकार सांगितले आहेत; वर्णनात्मक, तत्त्वाधिष्ठित, सामाजिक आणि वांशिक तर काही इतिहासकारांनी इतिहासाचे विभाजन काळाला महत्त्व देऊन प्राचीन, मध्ययुगीन आधुनिक असे केले आहे. तर काहींनी इतिहासाचे विभाजन आशिया, अफ्रिका, अमेरिका, युरोप खंड असे केले आहे. पण एवढा मोठा कालखंडाला ठराविक काळामध्ये विभाजन करणे व त्याचा इतिहास मांडणे अवघड आहे. थोडक्यात, इतिहासाचे प्रकार हे अभ्यासकांच्या गरजेनुसार व सोयीनुसार केले जातात. वेगवेगळ्या कसोट्यांवर केले. जातात मात्र ते काटेकोर नसतात. इतिहासाचे प्रकार खालील प्रमाणे पडतात.

**राजकीय इतिहास** (Political History)

राजकीय सत्तेच्या स्थानात व स्वरूपात जी स्थित्यंतरे होतात ते सांगणारा इतिहास हा राजकीय इतिहासात असतो. प्रो. सिले यांनी इतिहास म्हणजे राजकीय इतिहासच होय, अशी भूमिका घेतली होती. एखाद्या देशाचा राजकीय इतिहास राजा त्याची अंतर्गत व परराष्ट्र धोरणे, प्रशासन, राजकीय पक्ष व नेते, संघटना या गोष्टी केंद्रस्थानी असतात.

राजकीय इतिहास हा इतिहासाचा अतिशय लोकप्रिय प्रकार आहे. प्राचीन काळापासून राजकीय घडामोडी, राजकीय संस्था व युद्ध हा इतिहासाचा केंद्रबिंदु राहिला आहे. पण अलीकडच्या काळात सामान्य माणूस हा केंद्रबिंदु बनत आहे. या इतिहास प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्र निर्माण करण्याची ताकद असते. अशा प्रकारच्या इतिहासातून देशाचे भवितव्य घडविले जाते. तरूणांना देश उभारणीच्या कार्यामध्ये सामावून घेऊन त्यांच्या जीवनाला दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. हा इतिहास लिहिण्यासाठी राजकीय दस्तऐवज उपलब्ध असतो. हा इतिहास अधिकृत कागदपत्रावर लिहिलेला असल्यामुळे त्याला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राजकीय इतिहासा संदर्भात प्रो. बॉर्नस म्हणतात, ''राजकीय इतिहास दोन कारणांसाठी महत्त्वाचा आहे, ती म्हणजे हेगेलच्या राज्य विषयी सिद्धांतांमुळे राष्ट्रवाद निर्माण होतो. हेगेलचे राज्य म्हणजे दैवी देणगी आहे, असे विचार मांडले. त्यामुळे राजकीय इतिहासाचे महत्त्व फार वाढले. या इतिहास प्रकाराची उणीव म्हणजे संकुचित व प्रादेशिक वृत्ती निर्माण होण्याचा शक्यता असते.

**घटनात्मक इतिहास** (Constitutional History)

घटनात्मक इतिहास हा राजकीय इतिहासाचा भाग आहे. राजकीय इतिहासापासून घटनात्मक इतिहास हा सोईसाठी निर्माण केला आहे. प्रो. जी. एन. क्लार्क यांच्या मते, 'राजकीय इतिहास व घटनात्मक इतिहास' हे एकमेकांपासून अलग करता येत नाहीत. या इतिहास प्रकारात वेगवेगळ्या राजकीय संस्थांचा उगम, त्यांचा विकास याचा अभ्यास केला जातो. यात त्या देशाच्या घटनेचा अभ्यास, त्या देशाचे नागरिकत्व कसे मिळते, जनतेची मूलभूत हक्क व कर्तव्य कोणती, मालमत्तेचा हक्क, प्रांत व केंद्र सरकारच्या निर्मितीची रचना, संसदेची रचना, कार्यपद्धती, न्यायदान पद्धती सार्वत्रिक निवडणुका आदि बाबींविषयी कायदेशीर माहिती मिळते. इंग्लंडच्या संसदेचा इतिहास हा जगातील कुठल्याही देशाला जर त्यांच्या देशात संसदीय शासन पद्धती सुरू करावयाची असल्यास मार्गदर्शक ठरतो.

**संसदीय पद्धतीची इतिहास** (Parliamentary History)

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात संसदीय पद्धतीच्या राज्यव्यवस्थेचा विचार स्वतंत्रपणे केला जातो. संसदेला वेगवेगळ्या देशात वेगवेगळी नावे आहेत. इंग्लंडमध्ये कनिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ कॉमन्स' व वरिष्ठ सभागृहाला 'हाऊस ऑफ लॉर्ड' असे म्हणतात. भारतात वरिष्ठ सभागृहाला राज्यसभा व कनिष्ठ सभागृहाला लोकसभा म्हणतात. याला द्विगृहीय संसदीय पद्धती असे म्हणतात. जगातील कोणत्याही देशात संसदीय पद्धती सुरू करावयाची असेल तर त्याला इंग्लंडच्या संसदेचा इतिहास मार्गदर्शक ठरतो. इंग्लंडच्या संसदेचे महत्त्व विशद करताना ब्रिटीश घटनातज्ञ म्हणतात, ''ब्रिटीश संसद एवढी सामर्थ्यशाली आहे की ती फक्त पुरूषाचे स्त्रीमध्ये व स्त्रीचे पुरूषामध्ये रूपांतर करू शकत नाही.''

**कायद्याचा इतिहास** (Legal History)

हा घटनात्मक इतिहासाचाच भाग आहे. या इतिहास प्रकारात कायद्याचे मूळ शोधून त्याचा विकास कसा झाला याची माहिती असते. कायदे, राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक स्वरुपाचे असतात. प्रत्येक समाजाला व राष्ट्राला अशा कायद्याचा वारसा असतो. कायद्याच्या अभ्यासातून त्या देशातील लोकांची मन:स्थिती काय होती हे समजू शकते. त्या देशाची सामाजिक आर्थिक स्थितीही स्पष्ट होऊ शकते. या प्रकारच्या इतिहासाचे लेखन करणाऱ्या इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान तसेच कायद्याचा अर्थ लावण्याची क्षमता असावे लागते. त्याचे भाषेवर प्रभुत्व असावे लागते. कायद्याच्या इतिहासकाराने स्वत:चे भाष्य न करता कायद्याचा प्रवास वेगवेगळ्या काळात कसा झाला याचे विवेचन करावे. कायद्याच्या इतिहासाची आज अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. प्रो. मेटलॅण्ड यांचा 'दि कॉन्स्टिट्यूशनल हिस्ट्री ऑफ इंग्लंड' हा ग्रंथ जगातील कायदेपंडितांना मार्गदर्शक ठरला आहे.

**राजनैतिक इतिहास** (Diplomatic History)

राजनैतिक इतिहास ही राजकीय इतिहासाची शाखा आहे. यात आंतरराष्ट्रीय संबंधामधील राजकीय तत्त्वे शोधली जातात. राजकीय पुढाऱ्यांची मुत्सद्देगिरी यातून लक्षात येते. दोन देशामधील राजकीय संबंध

प्रस्थापित करीत असताना किंवा आहे ते संबंध टिकवत असताना त्या देशाच्या नेत्यांसमोर आलेल्या अडचणी व त्यांनी त्यावर मुत्सद्देगिरीने केलेली मात याची माहिती मिळते. या प्रकारच्या इतिहास लेखनातून सत्तासंतुलन, शीतयुद्ध, आंतरराष्ट्रीय करार, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादींवर प्रकाश टाकला जातो.

**लष्करी इतिहास** (Military History)

लष्करी इतिहासात नाविक दलाचा इतिहास व हवाई दलाचा इतिहास याचाही समावेश होतो. इतिहासकार प्रत्येक युद्धामधून कोणती ना कोणती नीति तत्त्वे शोधून काढतात व ती समाजापुढे मांडतात. सर जदुनाथ सरकार यांनी 'मिलिटरी हिस्ट्री ऑफ इंडिया' या नावाचा ग्रंथ लिहिला आहे. लष्करी इतिहास हा युद्ध व युद्ध नीति, युद्ध तंत्र या भोवती केंद्रित झालेला असतो.

या प्रकारच्या इतिहासात लष्करी हालचाली, लष्करी डावपेच, भू-प्रदेशाची वैशिष्ट्ये, युद्ध भूमी, युद्ध तंत्र, युद्धात वापरली जाणारी शस्त्रे, सैन्य व्यवस्था, सेनापतीची भूमिका त्याची कामगिरी याचा अभ्यास केला जातो. लष्करातील हेर खाते अत्यंत महत्त्व पूर्ण असते. हे खाते वेगवेगळ्या मार्गांनी शत्रू पक्षाची माहिती जमा करत असते. या माहितीच्या आधारावरच लष्करी हालचाली होत असतात. या प्रकारच्या इतिहासामुळे युद्ध तंत्राचा विकासाचा इतिहास समजतो.

**वसाहतीचा इतिहास** (Colonial History)

वसाहतीचा इतिहास हा राजकीय इतिहासाचाच भाग आहे. सागरी मार्गाचा शोध व औद्योगिक क्रांती यामुळे युरोपियन राष्ट्रात वसाहती मिळवण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यातून वसाहतवादाला चालना मिळाली. राजकारण, धर्म प्रसार, अतिरिक्त लोकसंख्या, कच्च्या मालाचा पुरवठा, पक्क्या मालाची हमखास बाजारपेठ इ. बाबीच्या पूर्ततेसाठी वसाहती मिळवल्या जाऊ लागल्या. व्यापार, प्रशासकीय व राजकीय गरजेसाठी वसाहतवादी राष्ट्रांनी वसाहतीचे इतिहास लिहिले. वसाहतीची संस्कृती चालिरीती, लोकांची, मानसिकता, धर्म, वसाहतीची आर्थिक स्थिती यांचा अभ्यास करून वसाहतीचे इतिहास लिहिले. अशा प्रकारच्या इतिहासातून अनेक प्रश्न ही निर्माण झाले आहेत. ते सोडवण्याचा प्रयत्न ही केला गेला. या इतिहासातून इतर लोकांना प्रेरणा मिळाली त्यातून अनेक धाडशी प्रयोग केले गेले. अनेक दर्यावर्दींना नवीन भू-प्रदेश शोधण्याची प्रेरणा मिळाली.

**वैचारिक इतिहास** (History of Thoughts)

वैचारिक इतिहास हा समाजाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा इतिहासाचा विषय आहे. हा इतिहास तत्त्वज्ञान या विषयाला अतिशय जवळचा आहे. या इतिहासाच्या महत्त्वा संबंधात सॅम्युअल जॉन्सन म्हणतात, ''बौद्धिक इतिहासाशिवाय मानवी मनाची झालेली प्रगती, त्याच्या विचारसरणीमधील सुधारणा, मानवाची विद्वत्ता, शास्त्रांची प्रगती समजणे शक्य नसते.'' थोडक्यात, प्रत्येक काळात एखादी विचारसरणी किंवा एखादा विचार पुढे येत असतो त्यामुळे संपूर्ण समाजाच्या धारणा बदलत असतात. त्यामुळे समाज जीवन सुसह्य होत असते. इतिहास प्रक्रियेबाबत जे विचार मांडले जातात त्यातून इतिहासाचे तत्त्वज्ञान तयार

होते. ''सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास आहे'' असे विधान कॉलिंगवूड याने मांडले आहे. त्याच्या या विधानावरून आपणास वैचारिक इतिहासाचे महत्त्व लक्षात येते.

**धार्मिक इतिहास** (Religious History)

धार्मिक इतिहास हा इतिहासाचा एक प्रकार आहे. धार्मिक इतिहासात फक्त धर्माचाच अभ्यास होतो असे नाही, धर्माच्या अभ्यासाबरोबरच तात्कालीन समाजकारण, अर्थकारण, समाजातील रूढी परंपरा, याचा विचार होणे अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, ख्रिश्चन धर्मसंस्थेचा इतिहास पाहताना या धर्मसंस्थेचा राजकीय सामाजिक व आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव पाहावा लागतो. बौद्ध व जैन या धर्माचा अभ्यास करताना या धर्माच्या तत्त्वज्ञानाचा राजनीति, भौतिक जीवनावर पडलेला प्रभाव अभ्यासावा लागतो.

ज्या युगात जी धर्म भावना प्रबळ असते त्याचाच विचार धार्मिक इतिहासात केला जातो. धार्मिक इतिहास म्हणजे धर्माचा इतिहास नव्हे असे प्रो. जी. रेनियर म्हणतात. हा इतिहास प्रकार हा सामाजिक इतिहासापेक्षा राज्यशास्त्राच्या जवळचा आहे. उदा. रोमच्या धर्म संस्थेचा इतिहास हा राजनैतिक किंवा लष्करी इतिहासापासून वेगळा करता येणार नाही. मात्र आपल्या देशाच्या दृष्टीने विचार केल्यास धर्मशास्त्राचा इतिहास हा समाजशास्त्रास जास्त जवळ वाटतो. पां. वा. काणे यांच्या धर्मशास्त्राचा इतिहास हा भारताच्या समाजजीवनाशी निगडीत असल्याचे दिसून आले आहे. मात्र १९४५ नंतर जगामध्ये विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला. निधर्मी तत्त्वज्ञानाचा प्रसार झाला तरी अधून-मधून धर्म ही संकल्पना डोके वर काढत असते.

**सामाजिक इतिहास** (Social History)

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. ब्लॉक या इतिहासकाराच्या मते, सामाजिक इतिहास हाच सर्वार्थाने मानवाचा इतिहास असतो. सामाजिक इतिहासात समाजाच्या जगण्याच्या पद्धती, आहार, विहार, सवयी, चालीरीती इ. चा समावेश होतो. टॉयन्बीच्या मते, इतिहासाच्या लेखन प्रकारात समाज व व्यक्ती हे दोनच घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे इतिहासाला एक सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. समाज व संस्कृती इतिहासाचे अविभाज्य भाग आहेत. सामाजिक इतिहास अधिक लोकप्रिय बनवण्याचे श्रेय ट्रिव्हेलियन या ब्रिटीश इतिहासकाराला आहे. त्याचा 'सोशल हिस्ट्री ऑफ इंग्लंड' हा ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे.

या इतिहास प्रकाराची व्याप्ती फार मोठी आहे. मानवाची प्रगती रानटी अवस्थेपासून आज पर्यंत कशी होत गेली याचे चित्रण सामाजिक इतिहासात केले जाते. या इतिहासात मानवाचे विचार त्याचे कार्य, त्याचे दैनंदिन जीवन, त्यांच्या श्रद्धा, अन्न, वस्त्र, पोशाख, करमणुकीची साधने, खाजगी जीवन, उत्सव, विविध सामाजिक संस्था, यांचा संबंध असतो. तसेच समाज प्रबोधनाचा अभ्यासही या इतिहास प्रकारात केला जाते. थोडक्यात, या इतिहास प्रकारात समाजाचे यथार्थ चित्रण येते.

**सांस्कृतिक इतिहास** (Cultural History)

मानवी संस्कृती ही इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. सांस्कृतिक इतिहास ही इतिहासाची महत्त्वाची शाखा आहे. यात अश्मयुगापासून वर्तमान काळापर्यंतच्या मानवी संस्कृतीचा समावेश होतो. संस्कृतीमध्ये सामाजिक आर्थिक, सामाजिक, आदी सर्व बाबीचा समावेश होतो. संस्कृती म्हणजे मानवी समाजाने आपल्या परिसराशी साधलेला काल सापेक्ष संवाद होय! सांस्कृतिक इतिहासाची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. यात धर्म, विविध पंथ, परंपरा, कला, संगीत, नृत्य, रूढी, नीतिमूल्य, इ. सर्व गोष्टीचा समावेश करता येतो.

ज्या विचारांमुळे व संस्थांमुळे मानवाच्या चारित्र्याला व श्रद्धेला वळण लागते त्याला सांस्कृतिक इतिहास म्हणतात. हा मानवी मनाचा व स्वभावाचा इतिहास होय! ज्या काळात जो विचार प्रभावशाली असतो त्या विचाराभोवती संस्कृतीची गुंफण होत असते. त्यामुळे या इतिहासात तत्कालीन समाज जीवन, आर्थिक जीवन, कला, साहित्य, तत्त्वज्ञान, अन्न, वेषभूषा, केशभूषा, करमणूक, न्याय, कायदा, मानवी चारित्र्य, त्यांच्या श्रद्धा, स्थापत्य, जीवन जगण्याच्या पद्धती यांचा अंतर्भाव होतो. मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेख यात मांडला जातो. मानवाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक साधनांची निर्मिती केली त्याचा एकत्रित प्रभाव म्हणजे संस्कृती होय! सांस्कृतिक इतिहासात घटनेपेक्षा विचार, संकल्पना या वर भर दिला जातो.

मानवी जीवनाचा अभ्यास म्हणजे प्रामुख्याने संस्कृतीचाच अभ्यास होय हे मूळ सूत्र पकडून अरनॉल्ड टॉयन्बी यांनी इतिहासाचे विवेचन केले आहे. A Study of History चे बारा खंड त्यांनी लिहिले आहे. संस्कृतीचा उदय विकास व विनाश याचे तर्कशुद्ध विवेचन टॉयन्बी यांनी केले आहे. संस्कृतीच्या विकासाच्या संदर्भात त्यांनी (Challenge and Response Theory) 'आव्हान व प्रतिसाद सिद्धांत' मांडला आहे. त्यानुसार निरनिराळ्या आव्हानांना सामोरे जातच संस्कृती विकसित होते असे टॉयन्बीचे म्हणणे होते.

**आर्थिक इतिहास** (Economic History)

इतिहासाच्या या प्रकारास आज जागतिकीकरणामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या इतिहास प्रकारात प्रथम कोण-कोणत्या कालखंडाचा विचार करावयाचा हे प्रथम ठरवावे लागते. त्या नंतर शेती व्यापार, उत्पादनाची साधने, तंत्रज्ञान, वितरण व्यवस्था, अयात निर्यात, सागरी व्यापार, वस्तू निर्मितीची ठिकाणे इत्यादिंचा सखोल अभ्यास केला जातो. या इतिहास प्रकारातून तत्कालीन समाजाचे आर्थिक जीवनाचे चित्र उभे करता येते. व्यक्ती, समाज व राष्ट्र यांचा खरा इतिहास आर्थिक प्रगतीतून होतो. भरतात डी. डी. कोसंबी, आर. एस. शर्मा, डॉ. इरफान हबीब, एस. एस. सेन यांनी भारताच्या इतिहासाची आर्थिक मांडणी केली आहे. कार्ल मार्क्स याने मानवी इतिहास म्हणजे 'आहे रे व नाही रे' गटातील संघर्ष असल्याचे स्पष्ट करून आर्थिक दृष्टिकोनातून इतिहासाची मांडणी केली.

**भौगोलिक इतिहास** (Geographical History)

नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवन पद्धती यांचा जवळचा संबंध असतो. माणसाच्या शरीराची ठेवण, त्याच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्याच्या सामर्थ्याच्या मर्यादा, स्वभाव वैशिष्ट्ये भूगोलावर अवलंबून असतात. भूमी व हवामान यांचा मानवी जीवनावर परिणाम होतो. काल व प्रदेश यांच्या संदर्भातील मानवाच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य इतिहास व भूगोल करीत असतात. भूगोलाचा इतिहासावर मोठा प्रभाव पडत असतो. इतिहासावर परिणाम करणारे भौगोलिक घटक म्हणजे समुद्र, बंदरे, व्यापार, आक्रमणांचे मार्ग, व्यापारी ठिकाणे, युद्ध भूमी इत्यादिंच्या विचार इतिहासात करावा लागतो. स्थल व काल याच्या संबंधानेच इतिहास लेखन करावे लागते. भौगोलिक वर्णनाशिवाय इतिहास म्हणजे निव्वळ कथा कथन ठरते. म्हणजेच स्थळ म्हणजे भूगोल व काल म्हणजे इतिहास असे सोपे समीकरण आपणाला जोडता येते.

**समकालीन इतिहास** (Contemporary History)

हा इतिहास प्रकार समकालीन राजकारणाशी निगडीत आहे. या प्रकारच्या इतिहासाचे लेखनही कागद पत्राच्या आधारेच करावे लागते. मात्र हे लेखन करताना प्रचलित साधने चिकित्सा करूनच वापरावी लागतात. या साधनामध्ये मुलाखती, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट, संसदीय कागदपत्रे, समकालिन ग्रंथ, नियतकालिके, सर्वेक्षण, सार्वजनिक कागदपत्रे, नव्याने सापडलेली कागदपत्रे व नवा विचार याचा विचार करावा लागतो. कारण ही साधने वादग्रस्त असू शकतात. तेव्हा समकालीन कागद पत्राचा बारकाईने विचार करून त्या मधून विश्वसनीय विचार मांडणे ही इतिहासकारांवर फार मोठी जबाबदारी असते.

**जगाचा इतिहास** (World History)

जगाचा इतिहास हा इतिहास लेखनाचा आधुनिक प्रकार आहे. जागतिक इतिहास लेखनामुळे जागतिक, आंतरराष्ट्रीय घटना त्याचे मानवी जगावर झालेले परिणाम याचा 'वसुधैव कुटुंबकम' या दृष्टीने विचार होऊ लागला आहे. राष्ट्र संघ, संयुक्त राष्ट्र संघ, इ. सारख्या संघटनांमुळे प्रत्येक मानव हा फक्त देशाचा नागरिक न राहता तो जगाचा नागरिक बनला आहे. या संघटना मानव कल्याणाचा विचार करतात. सर वॉल्टर रेले यांनी जागतिक इतिहासाच्या दृष्टीने सर्व प्रथम प्रयत्न केले. प्रो. एल्टन या बाबतीत म्हणतात, ''सर्व उत्तम ऐतिहासिक लेखन म्हणजे जागतिक इतिहासच असतो, कारण जगाच्या एका भागाचा अभ्यास करताना देखील जगाचा विचार करावाच लागतो.'' म्हणजे आपण कोणत्याही देशाच्या इतिहासाबद्दल विचार करताना आपण जगापासून अलिप्त राहू शकत नाही. 'History of Civilization' हा विल ड्यूरंट यांचा ग्रंथ जागतिक इतिहास लेखनाचे उत्तम उदाहरण आहे,

या इतिहास प्रकारात जगाचा इतिहास मांडला जातो. पण जगाचा इतिहासाचा आवाका फार मोठा होतो. तेव्हा जगावर परिणाम करणाऱ्या निवडक घटनांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न या इतिहास प्रकारात केला जातो. आज अनेक कारणांनी जग जवळ येत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहामुळे कोणत्याही एका देशाचा, प्रदेशाचा किंवा खंडाचा एकाकी विचार करणे अशक्य होत आहे. कारण या देशांचे हितसंबंध

एकमेकांशी जोडलेले असतात. एखाद्या देशामध्ये एखादी घटना घडली तर तिचा परिणाम संबंधित विविध देशावर होत असतो. जगाच्या इतिहासात मानववंशाचा विचारांचे व भावनांचे प्रतिबिंब असेल.

जगाचा इतिहास ही तुलनात्मक दृष्टीने नवी कल्पना आहे. त्यामध्ये राष्ट्रीय विचारसरणीला बाजूला सारून जागतिक बदलासाठी अनेक राष्ट्रानी केलेल्या योगदानाचा विचार केला जातो. जगाच्या इतिहासात मानव जातीची भूमिका श्रेष्ठ ठरली आहे.

**स्थानिक इतिहास व प्रादेशिक इतिहास** (Local and Regional History)

स्थानिक व प्रादेशिक इतिहासाचा विचार करण्यापूर्वी 'स्थानिक व प्रादेशिक' या संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा अधिक सूक्ष्म प्रकार म्हणता येईल. कारण अनेक गावांचा स्थानिक इतिहास मिळूनच त्या प्रदेशाचा इतिहास तयार होत असतो. त्यामुळे प्रादेशिक इतिहास ही संज्ञा तशी लवचिक म्हणता येईल. प्रादेशिक इतिहासात त्या-त्या प्रदेशाचे वैशिष्ट्य प्रतिबिंबित होते तर स्थानिक इतिहास हा त्या-त्या स्थानाचे प्रतिनिधित्व करत असतो.

स्थानिक इतिहासाला प्रादेशिक विभागाचा पोट विभाग म्हणता येईल. गेल्या ५०-६० वर्षांमध्ये स्थानिक इतिहास ही पाश्चात्य देशात रूढ झालेली इतिहासाच्या क्षेत्रातील एक सर्वमान्य संकल्पना आहे. स्थानिक इतिहासाच्या साह्याने सर्वांगीण राष्ट्रीय इतिहास लिहिला जाऊ शकतो. स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचाच एक भाग असतो. रिनियर म्हणतो की, स्थानिक इतिहास हा अशा पद्धतीने लिहिला पाहिजे की तो देशाच्या इतिहासामध्ये चपखल बसला पाहिजे.

स्थानिक इतिहासात प्रामुख्याने गाव, शहर, किंवा संस्थानाचा विचार केला जातो. संबंधित स्थानाविषयी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, इत्यादिंची सूक्ष्म सखोल माहिती या इतिहास प्रकारातून मिळते. स्थानिक माहिती मिळवण्यासाठी या प्रकारचा इतिहास फार उपयोग होतो.

**वंचितांचा इतिहास** (Subaltern History)

वंचितांचा इतिहास किंवा सबाल्टर्नवाद या संकल्पनेचा उदय इंग्लंडमध्ये उदयास आलेल्या 'हिस्ट्री फ्रॉम बिलो' या लेखन प्रवाहातून झाला आहे. भारतात डॉ. रणजीत गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीज या प्रकल्पाच्या माध्यमातून वंचितांचा इतिहास म्हणून एक स्वतंत्र लेखन प्रवाह रूढ केला. समाजाच्या तळागळातील सत्तेपासून दूर असलेल्या लोकांची माहिती करून घेतल्याशिवाय तात्कालीन इतिहासाचे सम्यक ज्ञान दर्शन होणार नाही ही धारणा या विचार प्रणालीमागे आहे. हा आधुनिक इतिहास लेखनातील नवा विचार प्रवाह आहे. या इतिहासाने सर्वसामान्य लोकांची नोंद घेतली आहे. सबाल्टर्न या शब्दाचा अर्थ कनिष्ठ दर्जाचे किंवा श्रेणीचे लोक असा होतो.

**मौखिक इतिहास** (Oral History)

मौखिक इतिहास म्हणजे इतिहास घडवण्यात वाटा असलेल्यांच्या मुखातून ऐकलेला आणि नंतर शब्दबद्ध करण्यात आलेला इतिहास होय! इ.स. १९७० ते १९८० या दशकात ब्रिटनमध्ये या प्रकारास मान्यता मिळाली. 'ओरल हिस्ट्री' या नावाचे एक नियतकालिक इंग्लंड मधून प्रसिद्ध केले जाऊ लागले.

भारतात मात्र अगदी १९८७ पर्यंत मौखिक इतिहासाला समकालीन इतिहासाचे एक उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून मान्यता मिळालेली नव्हती. मौखिक इतिहासामध्ये आख्यायिका, परंपरा, ऐतिहासिक म्हणी, ऐतिहासिक पोवाडे व काव्य यांचा समावेश होतो. तसेच एखाद्या चळवळीत सहभागी असणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती या पण मौखिक इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग असतो. उदा. दलित चळवळीत कार्य केलेल्या स्त्रियांचा इतिहास उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांनी 'आम्हीही इतिहास घडवला' हे पुस्तक लिहिले.

**स्त्रियांचा इतिहास** (Women History)

आजवरचा इतिहास हा पुरुष केंद्रित आहे. मानवाच्या आतापर्यंतच्या वाटचालीत स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा आहे. पण त्यांच्या योगदानाची दखल पुरुष केंद्रित इतिहासाने घेतली नाही. परिणाम मानवी इतिहासाचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून पुनर्लेखन झाले पाहिजे अशी स्त्रीवादी इतिहासकारांची भूमिका आहे. व या भूमिकेतूनच स्त्रीवादी इतिहास लेखनाला सुरुवात झाली. हा इतिहास लेखन प्रवाह पुरूषसत्ताक व्यवस्थेत हरवलेल्या स्त्रीचे मनुष्यत्त्व तिला पुन्हा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतो व स्त्री पुरुष समानतेचा आग्रह धरतो.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की इतिहासाचे प्रकार कोणत्याही ताठर तत्त्व रचनेवर केले नाहीत त्यामागे अभ्यासकाची गरज व सोय हे तत्त्व आहे हे लक्षात येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–३**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) बोअर यांनी इतिहासाचे विभाजन कोणत्या चार प्रकारात केले आहे?

२) कोणत्या इतिहास प्रकारात समकालीन कागदपत्राचा बारकाईने अभ्यास करावा लागतो?

३) राजकीय घडामोडीचा व संस्थांचा अभ्यास कोणत्या इतिहास प्रकारात केला जातो?

४) कोणत्या इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण लागते?

५) कोणत्याही देशात संसदीय शासन पद्धती सुरू करावयाची असल्यास कोणत्या देशाचा घटनात्मक इतिहास मार्गदर्शक ठरू शकतो?

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१) इतिहासाचे अभ्यासक हे इतिहासाचे प्रकार त्यांच्या ............ नुसार करतात.

अ) गरज व सोय ब) महत्त्वानुसार

क) वरिष्ठांच्या आदेशानुसार ड) आवडीनुसार

२) इतिहासाच्या ............ प्रकारात राष्ट्राभिमान व राष्ट्र निर्माण करण्याची ताकद आहे.

अ) राजकीय ब) सामाजिक क) आर्थिक ड) स्थानिक

३) ............ इतिहास लिहित असताना इतिहासकाराला कायद्याचे ज्ञान आवश्यक आहे.

अ) राजकीय ब) सामाजिक क) आर्थिक ड) कायद्याचा

४) ............ इतिहास प्रकार तत्त्वज्ञानाला जवळच आहे.

अ) राजकीय ब) वैचारिक क) भौगोलिक ड) सामाजिक

५) समाजाचे यथार्थ चित्रण इतिहास............. प्रकारात केले जाते.

अ) राजकीय ब) कायद्याचा क) सामाजिक ड) सांस्कृतिक

६) ........ इतिहास प्रकारामुळे मानवाच्या चरित्राला व श्रद्धेला वळण मिळते.

अ) सामाजिक ब) राजकीय क) सांस्कृतिक ड) भौगोलिक

७) मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचे रेखाटन .............. इतिहास प्रकारात केले जाते.

अ) सांस्कृतिक ब) स्थानिक क) राजकीय ड) भौगोलिक

८) स्थानिक माहिती मिळवण्यासाठी ................. इतिहास प्रकार उपयोगी आहे.

अ) स्थानिक इतिहास ब) भौगोलिक

क) सांस्कृतिक इतिहास ड) आर्थिक इतिहास

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) मिथक : पुराणकथा

२) आयाम : बाजू

३) परिवर्तनशील : बदल होऊ शकणारा

४) वस्तुनिष्ठ : जसे आहे तसे मांडणे

५) सद्सदविवेकबुद्धी : तर्काच्या आधारावर एखाद्या गोष्टीचे मूल्यमापन करता येणे.

६) शाश्वत मूल्य : जे कधीही नष्ट होणार नाहीत असे चिरंतन मूल्य

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न-१

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) असे घडले, अशा प्रकारे घडले २) हीरोडोटस

३) हीरोडोटस ४) फ्रान्सिस बेकन

५) प्रो. इ. एच. कार

ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) हिक्यॅटिअस २) विश्व नियंत्याचा हेतू व कर्तृत्व कथेद्वारा सांगणे

३) साहित्य ४) प्रो. इ. एच. कार ५) प्रो. इ. एच. कार

स्वयं अध्ययन प्रश्न–२

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) ऐतिहासिक घटनात साम्य असते २) लॉर्ड ॲक्टन

३) रान्के व ब्यूरी ४) बेनेडेट्टो क्रोचे

५) हीरोडोटस

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) सुसंस्कृत २) मानव्यशास्त्राची ३) वास्तव ४) गार्डिनर

५) मानव समाज ६) सलिकी ७) ट्रिव्हेलियन

स्वयं अध्ययन प्रश्न–३

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) वर्णनात्मक, तत्त्वाधिष्ठित, सामाजिक आणि वांशिक

२) समकालीन इतिहास ३) राजकीय इतिहास ४) सांस्कृतिक ५) इंग्लंड

ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) गरज व सोय २) राजकीय ३) कायद्याचा ४) वैचारिक

५) सामाजिक ६) सांस्कृतिक ७) सांस्कृतिक ८) स्थानिक

## १.५ सारांश

इतिहास म्हणजे काय? इतिहासाचे स्वरूप कसे आहे? इतिहासाच्या आकलनामध्ये काळानुरूप कसे बदल होत गेले? आधुनिक काळातील इतिहासाची बदलती संकल्पना कशी आहे? याची ओळख या प्रकरणात आपणास झाली आहे. मानवी प्रगतीमध्ये इतिहासाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इतिहास मानवाच्या सर्वांगीण बाबीचा त्याच्या विकासाचा विचार करतो. मानवनिर्मित सर्व गोष्टींचा अभ्यास या विषयात येत असल्यामुळे त्याची व्याप्ती फार मोठी आहे. त्यामुळे इतिहासाचे विविध प्रकार पडले आहेत. मानवाने हे प्रकार त्याच्या हेतुनुसार व गरजेनुसार केले आहेत. इतिहासाची व्याप्ती मोठी आहे. आज मानवाने आपले जीवन सुसह्य करण्यासाठी ज्या-ज्या कृती केल्या त्याचा अभ्यास स्वतंत्र शाखेत केला जात आहे. त्यातूनच समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, अशा शाखा विकसित होत गेल्या. आज त्यात आणखी भर पडत आहे. इतिहास मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अभ्यास करतो. मानवी जीवनाच्या विशिष्ट पैलूचा अभ्यास करताना इतिहासाचे विविध प्रकार निर्माण झाले आहेत. हे अभ्यास करताना इतिहासकार आपल्या सोईनुसार इतिहासाचे प्रकार निश्चित करतात.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) इतिहासाच्या व्याख्या सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२) इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करून त्याच्या व्याप्तीची चर्चा करा.

३) इतिहासाच्या विविध प्रकाराची माहिती द्या.

ब) टिपा लिहा.

१) इतिहासाचे स्वरूप

२) इतिहासाच्या महत्त्वपूर्ण व्याख्या

३) इतिहासाची व्याप्ती

४) राजकीय इतिहास

५) सामाजिक इतिहास

६) सांस्कृतिक इतिहास

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, डॉ. शांता कोठेकर, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२) इतिहास लेखनशास्त्र डॉ. श्रीनिवास सातभाई, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) इतिहास लेखनशास्त्र डॉ. एम. एस. गाठाळ, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४) प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, डॉ. शोभना गोखले, प्रकाशक डॉ. उमेश केसकर, कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५) इतिहास लेखनाच्या परंपरा, डॉ. प्रभाकर गद्रे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) इतिहासाचे तत्त्वज्ञान, सदाशिव आठवले, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

७) इतिहास लेखन परिचय, डॉ. बी. एन. सरदेसाई, फडके प्रकाशन कोल्हापूर.


❑❑❑

## घटक २

# इतिहासातील नवे प्रवाह

**(Recent Trends in History)**

**अनुक्रमणिका**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ स्थानिक इतिहास (Local History)

२.३.२ स्त्रीवादी इतिहास (Feminist History)

२.३.३ सबालटर्न इतिहास (Subaltern History)

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- इतिहासातील नव्या प्रवाहांची माहिती होईल.
- स्थानिक इतिहासलेखनाची ओळख होईल.
- स्त्रीवादी इतिहासलेखन प्रवाह समजून घेता येईल.
- सबालटर्न इतिहास लेखन प्रवाह म्हणजे काय ते सांगता येईल.

## २.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, मागील घटकाध्ये आपण इतिहासाची व्याख्या, स्वरूप आणि त्यातील विविध प्रकार यांची माहिती घेतली. प्रस्तुत घटकामध्ये आपण इतिहासलेखनाच्या नव्या प्रवाहांची माहिती घेणार आहोत. मानवी समाजात इतिहासलेखनाचा आरंभ झाल्यापासून जगाच्या विविध भागात विविध काळात वेगवेगळ्या प्रकारे भूतकाळातील घटना, घटनाक्रम यांची मांडणी करणाऱ्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात आल्या.

इतिहासलेखन परंपरा म्हणजे इतिहास संशोधनाची तंत्रे वापरून विशिष्ट प्रकारे इतिहासाची मांडणी करण्याची, अर्थान्वय लावण्याची, विश्लेषण करण्याची परंपरा होय. विभिन्न ऐतिहासिक काळ, विभिन्न प्रदेश, विभिन्न वैचारिक मतप्रवाह यांच्या वैविध्यातून विविध प्रकारच्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात आल्या. काळानुरूप ज्ञानाच्या संकल्पना आणि ज्ञान मिळवण्याच्या पद्धती यातील बदलांचा परिणाम इतिहासलेखनावर झाला. इतिहास म्हणजे काय? ऐतिहासिक ज्ञान म्हणजे काय? इतिहास कसा लिहावा ? इतिहास कोणाचा लिहावा? अशा प्रश्नाच्या अनुषंगाने इतिहासलेखन परंपरेत बदल होत गेले. जगातील प्राचीन संस्कृतीमध्ये जसे की, युरोपातील ग्रीक व रोमन संस्कृती, आशियातील भारतीय व चिनी संस्कृती यांच्यामधील आधुनिकपूर्व इतिहास लेखनपरंपरा प्रसिद्ध आहेत. मध्ययुगीन काळातदेखील अनेक प्रकारच्या इतिहासलेखन परंपरा अस्तित्वात होत्या. याकाळात युरोपात चर्चशी संबंधित इतिहासलेखन परंपरा किंवा ख्रिश्चन इतिहासलेखन परंपरा तर आशियात फारसी इतिहासलेखन परंपरा प्रभावी होत्या. युरोपामध्ये प्रबोधनकाळात घडून आलेल्या वैचारिक क्रांतीचा इतिहासलेखनावर मोठ्या परिणाम झाला. शास्त्रीय पद्धतींचा उदय झाल्यामुळे, ज्ञानाच्या आणि ज्ञानप्राप्तीच्या संकल्पनांमध्ये क्रांतिकारी बदल झाले. प्रबोधन काळातील या बदलांचे परिणाम भूतकाळाच्या अभ्यासावर म्हणजेच इतिहास लेखनावर देखील झाले आणि त्यातून आधुनिक पद्धतीच्या इतिहास लेखन परंपरेची सुरुवात सर्वप्रथम युरोपात झाली. आधुनिक इतिहास लेखनाचा प्रसार युरोपातून जगातील इतर राष्ट्रात झाला आणि तेथे देखील आपणास विविध प्रकारच्या आधुनिक इतिहासलेखन परंपरांचा उदय झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत घटकामध्ये आपण स्थानिक इतिहास, स्त्रीवादी इतिहास आणि सबालटर्न इतिहास इत्यादी नव्या इतिहासलेखन प्रवाहांची माहिती घेणार आहोत.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१ स्थानिक इतिहास (Local History)

स्थानिक इतिहासलेखन ही संकल्पना नवीन असली तरी या संकल्पनेतून या अगोदरच अनेक शहरांचा इतिहास लिहीलेला आहे. प्राचीन काळी आपल्याकडे जी स्थलमहात्म्य होती. एखाद्या विशिष्ठ स्थळाचे अथवा स्थानाची महती सांगण्यासाठी त्याच्या भूतकाळासंबंधी काल्पनिक किंवा वास्तविक घटनांची सरमिसळ करून केलेले कथनाला साधारणपणे 'स्थलमहात्म्य' म्हणतात. त्याचाच 'स्थानिक इतिहास' हा आधुनिक व शास्त्रीय अवतार आहे. स्थानिक इतिहास लेखनात 'गाव' ही भौगोलिक संकल्पना महत्त्वाची आहे. एखाद्या गावात राहणाऱ्या व्यक्तीला 'स्थानिक' अथवा 'गावकरी' म्हणतात. त्या स्थानिकांची स्वाभाविकपणे आपल्या गावाशी एक विशिष्ठ नाळ आणि भावना जोडलेल्या असतात. स्थानिक इतिहासकार हा इतिहास लिहिताना त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या माध्यमातून शब्दबध्द करतो. ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि प्रशासकीय असे बहुविध पैलू स्थानिक इतिहासात लक्षात घेतले जातात. या प्रत्येक घटकाचा स्वतंत्रपणे विचार केला गेला असला तरीही हे सारे घटक आतून एकमेकांशी जोडलेले असतात. एका अर्थाने स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. स्थानिक इतिहासाच्या संदर्भात केवळ

घटनांची जंत्री नसून ती एक चिकित्सक, अन्वयार्थी, सैद्धान्तिक आणि आंतरविद्याशाखीय संशोधनाला चालना देणारी स्वतंत्र शाखा आहे.

सांस्कृतिक केंद्र असलेल्या नगराचे भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, वैचारिक असे आलेख काढले गेले आणि अशा अनेक सांस्कृतिक केंद्रांच्या व्यापक व सर्वांगिण इतिहासाच्या साह्यानं सर्व देशाचा इतिहास लिहिला गेला, तर तो निश्चितच समृद्ध व सर्व समाजघटकांना न्याय देणारा असणार, ही कल्पना पुढे आली आणि त्यातूनच स्थानीय इतिहासाची संकल्पना दृढ झाली. एखाद्या शहराचा स्थानीय इतिहास म्हणजे त्या शहराचा व्यापक अर्थाने लिहिलेला सामाजिक व सांस्कृतिक इतिहास. सर्वांगीण इतिहास म्हणजे बहुशाखीय इतिहास हे स्थानीय इतिहासाचं लक्ष्य असल्यामुळे पारंपरिक ऐतिहासिक साधनांबरोबर चित्रं – छायाचित्रं; अशा अपारंपरिक साधनांचा उपयोगही स्थानीय इतिहासात केला जातो. म्हणून स्थानीय इतिहास लेखक, पुरातत्त्व संशोधक, भूगोलतज्ज्ञ, भूगर्भतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कलाइतिहासतज्ज्ञ, वाङ्मय इतिहासतज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका करत असतो. स्थानीय इतिहासकाराला कोणताही विषय वर्ज्य नाही. अगदी पेहेरावातील फॅशन्सपासून आहारातील रूचीवैविध्या पर्यत सर्व विषयांचा यथायोग्य वापर स्थानीय इतिहासासाठी होऊ शकतो.' थोडक्यात एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रीत राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास होय.

- **स्थानिक इतिहासलेखनाची संकल्पना :**

आधुनिककाळात इतिहासलेखनाचे अनेक प्रवाह उदयास आलेले दिसतात. यामध्ये अलिकडील काळात विशेष प्रसिध्दीत आलेला इतिहास लेखन प्रवाह म्हणजे 'स्थानिक इतिहास' अथवा 'स्थानीय इतिहास' होय. 'स्थान' म्हणजे' ठिकाण' किंवा 'स्थानिक' म्हणजे 'मूळचा म्हणजे स्थानांचा अथवा ठिकाणांचा इतिहास'. डॉ. अरुण टिकेकर हे जेष्ठ पत्रकार व मुंबई शहराच्या इतिहासाचे व्यासंगी अभ्यासक होते. अरुण टिकेकर यांनी 'स्थानिक इतिहास' (Local History) ऐवजी 'स्थानीय इतिहास' (Localised History) असा मराठी शब्दप्रयोग केलेला आहे. वास्तविक पाहता स्थानिक इतिहासाची संकल्पना युरोपमध्ये उदयास आली. युरोपात उदयाला आलेल्या या शाखेने इतिहासात मोलाची भर घातली आहे. इतिहासाची भौगोलिक निकषांवर केली गेलेली विभागणी किंवा भूगोलाधारित इतिहास म्हणजे स्थानिक इतिहासलेखन होय. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. स्थानिक इतिहासात गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. भारतातील प्रत्येक गावाला स्वत:चा असा एक इतिहास, स्वत:ची अशी एक संस्कृती आहे.

- **स्थानिक इतिहास लेखनाची सुरुवात :**

१६ व्या शतकात इंग्लंडमध्ये स्थानिक इतिहास लेखन संकल्पनेचा उदय झाला. लंडन शहराचा सूक्ष्म पध्दतीने सर्वेक्षणकरून त्यावर आधारीत ४४ खंड हे इ. स. १८९४ मध्ये प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून एवढे मोठे लिखाण होणार 'लंडन' हे पहीले शहर. रॉबर्ट डॉय यांनी स्थानिक इतिहासाविषयी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. यातून पुढे लंडन विद्यापीठात 'Institute of Historical Research' स्थापन झाले. त्यामुळेच लंडन शहराला 'स्थानिक इतिहासाची जननी' असे म्हणतात. याच

काळात फ्रांन्समध्ये स्थानिक किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रास्त्रे, संग्रहालये, घराणी इत्यादीचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला. १९ व्या शतकामध्ये स्थानिक इतिहास लेखनाचा हा प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहचला. अमेरिकेतील व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, चर्चचा कारभार पाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी सन १८४० च्या दशकात आपपाल्या क्षेत्रातील उदयोग व्यवसायाचा इतिहास लिहीण्यास सुरुवात केली. इंग्लंडमधून अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयांच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

- **स्थानिक इतिहास लेखनाची भारतातील सुरुवात :**

स्थानिक इतिहास लेखनाचा भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास इ. स. १८६३ मध्ये प्रकाशित झालेला गोविंद माडगावकरांचे 'मुंबईचे वर्णन' हा मुंबईचा इतिहास व माहिती देणारा ग्रंथ प्रसिद्ध आहे. लेखक गो.ना. माडगांवकर यांनी त्याकाळात असलेल्या मुंबईचे वर्णन केलेले आहे, तसेच ६०० वर्षांपूर्वीचा इतिहास सुद्धा दिलेला आहे. इ.स. १८६८ मध्ये प्रसिध्द झालेला ना. वि. जोशी यांचा 'पुणे शहराचे वर्णन' हा ग्रंथ पुणे शहराच्या जडणघडणीसह शहराची इत्यंभूत माहिती देणारा ग्रंथ आहे. 'पुणे शहराचे वर्णन' अथवा 'पुणे वर्णन' या पुस्तकाचे एकूण ३ भाग असून पहिल्या भागात जुने पुणे, दुसऱ्या भागात पेशवाईतील पुणे व तिसऱ्या भागात इंग्रजकाळातील पुणे असे वर्णन केलेले आहे. आर. व्ही. सबनीस यांच्या 'नोट्स ऑन कोल्हापूर' हा स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ होय. सन १९२७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'नोट्स ऑन कोल्हापूर' या इंग्रजी ग्रंथात सबनीस यांनी पहिल्या भागात कोल्हापूरच्या प्राचीन ते अर्वाचीन काळातील शासकांची माहिती आणि दुसऱ्या भागात कोल्हापूर शहर आणि परिसर ह्यांची माहिती दिली आहे.

विसाव्या शतकात स्थानिक इतिहासाची ही परंपरा अधिक वृध्दींगत झाली. डी. बी. पारसनीस यांनी स्थानिक इतिहासलेखनाशी संबंधित महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले, यामध्ये 'दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ', 'नोट्स ऑन सातारा महाबळेश्वर', 'सांगली स्टेट', 'पन्हाळा', 'पूना इन बायगॉन डेज' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. ना. गो. चापेकरांचे 'बदलापूर', (१९३३) पु. पा. गोखले यांचे 'जागृत सातारा', (१९३५) दे. गो. लांडगे यांचे 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', (१९५४) राजूरकरांचा 'चंद्रपूरचा इतिहास', (१९५६) अरूण टिकेकर व अभय टिळक यांनी संपादीत केलेले 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) डॉ. अवनिश सोवणी यांचे 'हरवलेले पुणे' यासारख्या अनेक ग्रंथाचा उल्लेख होतो. महाराष्ट्रामध्ये स्थानिक इतिहास लेखनाची अनेक उदाहरणे देता येतील मात्र अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी रोमिला थापर यांनी इ. स. १९७६ मधील पंजाब इतिहास परिषदेच्या अध्यक्ष म्हणून 'प्रादेशिक व स्थानिक इतिहास' या विषयावर केलेल्या मांडणीपासून झाली असे मानले जाते. तेव्हापासून भारतात यानवीन विचार प्रवाहाचा खऱ्या अर्थाने अभ्यास सुरू झाला.

- **प्रादेशिक इतिहासातून स्थानिक इतिहासाकडे :**

इतिहासाची व्याप्ती स्थल व काल सापेक्ष आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी याची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक अशी काळाच्या आधारावर विभागणी केली जाते. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वि. का. राजवाडे यांनी देशिक प्रकार नमूद केलेला आहे. यामध्ये त्यांना विशिष्ट भूप्रदेशाचा म्हणजेच प्रादेशिक इतिहास अभिप्रेत होता, तर प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणून स्थानिक इतिहासाची ओळख आहे. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीतून राष्ट्रीय इतिहास आकारास येतो. मात्र राष्ट्राचा परिपूर्ण व सुसंगत इतिहास साकारण्यासाठी प्रादेशिक व स्थानिक इतिहास महत्व पूर्ण ठरतो. यासंदर्भात डॉ. राजा दीक्षित यांनी प्रादेक्षिक इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासाला केंद्रस्थानी ठेवलेले आहे. राजा दीक्षित यांच्या मते, इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्ठता या दोहोचा वेध असतो, त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे तर, स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासाच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहीला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

- **स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश :**

इतिहास संशोधक अथवा अभ्यासकाला जागतिक, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील घटना माहीत असतात. मात्र एखाद्या गावातील घटना अथवा वास्तूची माहिती नसते. आपण त्या गावात लहानाचे मोठे झालो त्या गावाबद्दलची देखील माहिती नसते. वास्तविक पाहता व्यक्ती, व्यक्ती समूह, सामाजिक वैशिष्ट्ये हे इतिहासाचे अनुबंध स्थानिक इतिहासाशी जवळीक ठेवणारे असतात. स्थानिकता हे पारंपारिक भारतीय समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्ये आहे. प्रत्येक गावावर प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजसत्तानी राज्य केलेले आहे, त्या राजसत्तेच्या स्थित्यंतराच्या अनेक खाणाखुणा अनेक गावागावात विखुरलेल्या आहेत. बऱ्याच प्रसंगी एखादे गाव विशिष्ट राजसत्तेमुळे प्रकाशात आलेले नसते तर ते गाव त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैशिष्ट्यामुळे प्रसिध्दीस आलेले असते त्यामुळे अशा प्रकारच्या स्थानिक ठिकाणांचा अथवा घटनांचा अभ्यास करणे हा स्थानिक इतिहास लेखनाचा उद्देश आहे.

- **स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व :**

स्थानिक इतिहास लेखनाचे अवलोकन केले असता त्याचे विविध दृष्टीकोनातून महत्त्व लक्षात येते. व्यक्ती आणि स्थळ हे इतिहास अभ्यासाचे मुख्यविषय आहेत. मानवी जीवनाचे अभ्यासाच्या आणि आकलनाच्या सोयीसाठी विभाजन केले असले तरी हे मानवी जीवन समग्र व व्यामिश्र आहे. समाजाचा इतिहास हा सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक दृष्टीकोनातून लिहीलेला असतो. यामध्ये मुख्य विषयांमध्ये समाजाची जडणघडण, समाजाची जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप उदर निर्वाहाची

साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, सामाजिक संस्था, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादी अनेक विषयांचा अभ्यास यामध्ये समाविष्ठ असतो.

स्थानिक इतिहास हा भौगोलिकदृष्ट्या स्थानिक संदर्भाच्या विशेषतः स्थानिक समुदायावर लक्ष केंद्रीत करतो. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक व सामाजिक पैलूंचा अंतर्भाव असतो. 'स्थल' इतिहासातील दूसरे महत्त्वाचे परिमाण आहे. कारण स्थानिक संदर्भ व्यक्ती जीवनाप्रमाणेच समाज जीवन देखील प्रभावित करतो. स्थानिक इतिहासातून आर्थिक इतिहासाचे अध्ययन होत असते; त्यामध्ये शेती व शेतीशी संबंधीत उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, व्यापारी संस्था, ग्रामीण बँका इत्यादीचे महत्त्व अधोरेखित केले जाते. याशिवाय दोन भूभागांचा सामाजिक, आर्थिक दृष्टीकोणातून तुलनात्मक अभ्यास केला जातो. दुर्लक्षित व वंचिताचा अभ्यास स्थानिक पातळीवर संशोधनासाठी उपलब्ध झाला आहे. थोडक्यात, आपण स्थानिक इतिहास लेखनाच्या माध्यमातून आपण;

(१) एखाद्या गावाची, घटनेची, स्थानाची सूक्ष्मपणे व विस्तृत मांडणी करू शकतो.

(२) स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून संस्कृती संवर्धनाचा प्रयत्न करू शकतो.

(३) समाज जीवनाची नैतिक आचारसंहिता मांडू शकतो.

(४) स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचा अभ्यास करू शकतो.

(५) दुर्लक्षित घटक, प्रथा, रूढी, परंपरा, आचार, विचार, आहार, अलंकार, पोशाख, खाद्य, कथा, पुराणकथा, दंतकथा, म्हणी, वाक्य प्रचार याचा नव्याने विचार करू शकतो.

**स्थानिक इतिहास लेखन पद्धती :**

स्थानिक इतिहास लेखन ही नवीन संकल्पना आज झपाट्याने विकसित होत आहे. 'नो डॉक्युमेंट नो हिस्टरी' हा प्रवाह महत्त्वाचा असला तरी याच्या व्यतिरीक्तही इतिहासलेखन केले जावू शकते हे आज सप्रमाण सिध्द होत आहे. यासाठी अनेक नवनवीन आधुनिक पध्दती वापरल्या जात आहेत जसे की, १) ऐतिहासिक संशोधन पध्दती (पारंपारिक), २) क्षेत्र भेट, ३) सर्वेक्षण, ४) मुलाखत, ५) प्रश्नावली, ६) मौखिक आणि ७) पुरातत्वीय पद्धती इत्यादी पध्दती अथवा माध्यमांचा आधार घेवून स्थानिक इतिहास लेखन केले जावू शकते. वरील प्रारूपाच्या अनुषंगाने स्थानिक इतिहासाचे लेखन केले जात आहे व केले जावू शकते. याशिवाय यामध्ये इतर अनेक अति विशिष्ट घटक समाविष्ठ होऊ शकतात.

स्थानिक इतिहासलेखन करताना खालील पैलूचा अथवा घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो ते प्रमुख पैलू पुढीलप्रमाणे:

| भौगोलिक पार्श्वभूमी | ऐतिहासिक पार्श्वभूमी | सामाजिक जीवन | सांस्कृतिक जीवन | आर्थिक जीवन |
|---|---|---|---|---|
| जमीन, जमिनीचे | प्राचीन, मध्ययुगीन, | लोकसंख्या, स्त्री- | सांस्कृतिक संस्था | शेती, शेतीचे प्रकार. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रकार | आधुनिक | पुरुष प्रमाण | | औजारे |
| भौगोलिक सीमा | ऐतिहासिक स्थळे | धर्म/पंथ | जत्रा, यात्रा, उरूस | पिके आणि पिक पद्धती |
| नद्या, नाले, ओढे, तलाव, विहिरी, (पाण्याचे स्त्रोत) | ऐतिहासिक स्मारके | कुटुंब संस्था, सामाजिक स्थित्यंतरे | मनोरंजन, संगीत, गायन, वादन, लोकगीते, गाणी, ओव्या | जलसिंचन, जलसिंचनाचे प्रकार |
| पर्जन्य | घटना विशेष | प्रथा, परंपरा, रूढी, विवाह पद्धती | खेळ, क्रीडा प्रकार (लहान मुलांचे, स्त्रियांचे व पुरुषांचे) | व्यापार, व्यापारी जमाती, व्यापाराचे सामान |
| हवामान | व्यक्ति विशेष | जाती -पोटजाती | म्हणी, वाक्यप्रकार | पतपेढी (बँका) |
| जंगल संपदा, पशु पक्षी, वृक्षसंपदा | ऐतिहासिक दंथ कथा | आचार, विचार, निष्ठा, आहार, पोशाख, आभूषणे | भाषा, भाषा प्रकार, बोली, खाद्य संस्कृति | दळणवळण, दळणवळनाची साधने |

**(अ) ऐतिहासिक घटक :**

स्थानिक इतिहास लेखनामध्ये सर्वात महत्त्वाचा पैलू अथवा घटक म्हणून ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व आहे. कोणत्याही गावाचे ऐतिहासिक महत्त्व, गावाची प्राचीनता, गावाच्या नावाची व्युत्पत्ती गावाशी संबंधित पुराणकथा, दंतकथा, लोकसमजूती इत्यादी महत्त्वाच्या असतात. बऱ्याचवेळी गावाच्या नावातच त्या गावाचा इतिहास दडलेला असतो. उदा. कोल्हापूर या नावाचा व्युत्पत्ती शोधण्याचा प्रयत्न केला तर आपणास त्या नावातच त्याच्याशी संबंधी पुराणकथा पहावयास मिळतात. प्रत्येक गावाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, या इतिहास काळात त्या-त्या गावांचा विकास व जडण-घडण झालेली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात लिखित पुरावे नसल्या कारणाने शेकडो, हजारो गावांचा इतिहास शब्दबध्द झालेला नाही. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासली जाणे महत्त्वाचे आहे, यामध्ये नव संशोधकांना अधिक वाव आहे.

**(ब) भौगोलिक घटक :**

जगातील प्रत्येक देशाला, त्या देशातील राज्य, प्रांत, जिल्हा, तालुका, गावांना विविध भौगोलिक परिस्थिती लाभलेली असते. काळानुरूप त्यात बदलही होत जातो, त्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास स्थानिक इतिहास लेखनात केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील जमीनीचे प्रकार, पर्जन्यमान, जंगलसंपदा, पशु-पक्षी, त्या गावाच्या भौगोलिक सीमा, पाण्याचे स्रोत इत्यादीचा अभ्यास केला जावू शकतो. इतिहास आणि ऐतिहासिक घटनावर भौगोलिक घटक परिणाम करतात, या भौगोलिक घटकाचा

त्या-त्या गावावर काय परीणाम होतो किंवा झालेला आहे याचा आपण अभ्यास करू शकतो. कोणात्याही ऐतिहासक घटनेचा अभ्यास करण्याआधी ती घटना ज्या ठिकाणी घडली तेथील भौगोलिक घटक अभ्यासणे आवश्यक असते अन्यथा त्या घटनेचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. उदा. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावरून कसे निसटले यामध्ये त्यांचे रणचातुर्य जेवढे महत्त्वाचे आहे तेवढीच तेथील भौगोलिक परीस्थितीही महत्त्वाची आहे.

**(क) सामाजिक घटक :**

प्रत्येक गावाची एक विशिष्ठ सामाजिक संरचना असते. स्थानिक इतिहास लेखनामध्ये त्या-त्या गावातील सामाजिक जीवन व त्यामध्ये झालेले स्थित्यंतर समाविष्ट करू शकतो. गावातील लोकसंख्या, लोकसंख्येत झालेला बदल, कुटुंब संस्था, कुटुंब संस्थेत झालेला बदल, विविध जाती, पोट जाती, पंथ, रूढी-परंपरा, आचार-विचार, प्रथा, सामाजिक संस्था, आभूषणे, आहार अशा अनेक अंगाने स्थानिक इतिहासात लेखन केले जाऊ शकते. उदा. काही गावात व जातीत लग्न, प्रथा, विशिष्ट केल्या जातात. गावामध्ये विविध जमातीचे लोक राहतात. त्यांची आडनावे प्रामुख्याने गोत्र, गाव, व्यवसाय व हुद्दा या घटकांवरून मिळालेली असतात. गावाचा इतिहास लिहीताना स्त्रियांची स्थिती, स्थान, दर्जा, स्त्री-पुरुष समानता व प्रमाण, मुलींचे शिक्षण, हुंडाप्रथा, विवाह पध्दती इत्यादी संबंधी माहीती नव्याने मांडू शकतो.

**(ड) सांस्कृतिक घटक :**

एखाद्या गावातील सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना तेथील धार्मिक परंपरा, सण, उत्सव, जत्रा, यात्रा, महोत्सव त्यातील प्रथा, परंपरा, संकेत पूजाविधी, दंतकथा, पुराणकथा इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे असते. कारण प्रत्येक गावात विविध देवी-देवतांची मंदीरे, दर्गे मशिदी आहेत आणि त्या-त्या गावात विशिष्ठ पध्दतीने त्यांच्या जत्रा-यात्रा साजऱ्या केल्या जातात, त्याची नोंद स्थानिक इतिहासात होणे गरजेचे आहे. याशिवाय काही गावात अतिविशिष्ठ खेळ, क्रीडा प्रकार, मनोरंजनांची माध्यमे व कला प्रकार आहेत, त्याचाही या ठिकाणी सखोल अभ्यास केला जावू शकतो. उदा. शिराळा येथील नागपंचमी, कवठेएकंद येथील शोभेची दारू उडवण्याची प्रथा, काही गावात दीपावली, बैल पोळा, पाडवा विविध पध्दतीने साजरा केला जातो. सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून त्या गावातील सामाजिक-धार्मिक आर्थिक अनुबंध समजावून घेवू शकतो. साहित्यिक-सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो. काही गावातील यात्रा-जत्रा विशिष्ठ संकेताच्या आधारावर संपन्न होतात. याचाही या माध्यमातून अभ्यास होवू शकतो. सांस्कृतिक जीवन हे ज्या कृषी घटकावर आधारीत आहे, ते अनेक सण-समारंभ कृषक जीवनाचे द्योतक आहेत. त्यामुळे त्या कृषक जीवनाचा प्रभाव व सांस्कृतिक अनुबंध समजावून घेवू शकतो.

**(इ) आर्थिक घटक :**

भारतातील बहुतांश खेड्यांचे अथवा गावांचे अर्थकारण हे शेती अर्थात कृषी जीवनावर आधारीत आहे. त्या-त्या गावातील जमीन, जमिनीचे प्रकार, शेती, शेतीचे प्रकार, शेती आधारीत जोडधंदे, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, जाती आधारीत व्यवसाय, व्यापारी जाती-जमाती इत्यादीचा अभ्यास स्थानिक इतिहास

लेखनांच्या माध्यमातून गावपातळीवर केला जावू शकतो. उदा. एखाद्या गावातील एकूण कृषी क्षेत्रफळ, लागवडी खालील शेती, हंगाम, पिक पध्दती, शेतीची पध्दती, शेती उत्पादन बाजारपेठ, उत्पादन खर्च, हत्यारे, मळणी, नांगरी, कोळपणी अशा कितीतरी अंगाने अभ्यास करून त्या गावाचे अर्थकारण समजावून घेवू शकतो. सांगोला, आटपाडी, मोडनिंब, पंढरपूर, अकलूज येथे पशु-पक्षांचा बाजार भरतो, कोटीच्या धर्तीवर आर्थिक उलाढाल होते, याचाही अभ्यास होवू शकतो. कोल्हापूर जवळील पट्टण कोडोली येथे बिरदेव यात्रेत घोंगड्याचा बाजार भरतो असे आणि कितीतरी उदाहरणे आपणास सहज पहावयास मिळतात.

**(ई) राजकीय व प्रशासकीय जीवन :**

राजकीय व प्रशासकीय घटकामध्ये एखाद्या गावाचे देश, राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील राजकारणातील योगदान, प्रशासनातील योगदान, राजकीय घडामोडी, स्वातंत्र्य, सहकार चळवळीतील योगदान कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था यांचाही अभ्यास केला जावू शकतो.

थोडक्यात स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून छोट्या भौगोलिक परिवेशातील मानवी जीवनाचा इतिहास हा विविध अंगानी उलघडून मांडण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) स्थानीय इतिहास हा मराठी शब्दप्रयोग कोणी केला?

(२) स्थानिक इतिहासाचा अभ्यास झालेले पहिले शहर कोणते?

(३) अखिल भारतीय स्तरावर स्थानिक इतिहास लेखनाची संकल्पना व सैध्दांतिक मांडणी कोणी केली?

(४) पुण्याचे वर्णन हा ग्रंथ कोणी लिहिला?

(५) बऱ्याचदा गावाच्या नावातच काय दडलेले असते?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) गोविंद माडगावकरांचा ........... हा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

(२) 'स्थानिक इतिहासाची जननी' म्हणून ...........शहर ओळखले जाते.

(३) प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा ........... इतिहासाचा अविभाज्य भाग आहे.

(४) व्यक्ती आणि ........... हे इतिहास अभ्यासाचे मुख्यविषय आहेत.

(५) आर. व्ही. सबनीस यांच्या ........... हा स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ग्रंथ होय.

### २.३.२ स्त्रीवादी इतिहास (Feminist History)

जगाच्या कोणत्याही इतिहास काळात स्त्रिया या जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या होत्या. प्रागैतिहासिक काळापासून ते आजच्या काळापर्यंत मानवी समाजाच्या विकासात समाजाचा अर्धा भाग असणाऱ्या स्त्रियांची भूमिका महत्त्वाची हे नाकारता येत नाही. मात्र, जेंव्हा आपण इतिहास ग्रंथांचा आढावा घेतो तेंव्हा आपणास स्त्रियांचा उल्लेख अत्यंत त्रोटक स्वरूपात दिसतो. पारंपारिक आणि मुख्यप्रवाही इतिहासलेखनातून स्त्रियांना वगळण्यात आले. इतिहास ग्रंथातून स्त्रियांची त्रोटक माहिती आणि अपवादात्मक उल्लेख मिळतात. मात्र, ती सर्व माहिती आणि उल्लेख हे उच्चजातीय आणि उच्चवर्गीय स्त्रियांचे असल्याचे दिसून येते. इतिहासात स्त्रियांचा उल्लेख हा केवळ मोजक्या संख्येतील स्त्रियांच्या वैयक्तिक कर्तबगारीचा आढावा असतो. त्यामुळे स्त्रियांनी सामुहिकरित्या मानवी विकासात निभावलेल्या भूमिकांचा उल्लेख इतिहासात कोठेच होत नव्हता. भारतातील मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनात देखील स्त्रियांचे स्थान दुय्यम होते. स्त्रीवादी चळवळीमुळे इतिहासाकडे पाहण्याचा स्त्रीवादी दृष्टीकोन पुढे आला आणि त्यातूनच भारतात स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरा उदयास आली. समाजाचा अर्धा भाग असलेल्या पण दुय्यम मानलेल्या स्त्रियांचा इतिहास त्यांच्याच दृष्टीकोनातून मांडणारा 'स्त्रीवादी' इतिहासलेखन प्रवाह हा भारतातील 'तळाकडून इतिहास' परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे स्त्रीवादी इतिहास लेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

- **स्त्रीवाद म्हणजे काय?**

स्त्रीवादी इतिहासलेखनाच आढावा घेण्याआधी 'स्त्रीवाद' म्हणजे काय? हे जाणून घेणे आवश्यक आहे. 'स्त्रीवाद' ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते. मानवी समाजात पुरुषांचे वर्चस्व आणि स्त्रियांचे दुय्यमत्व-दास्यत्व अस्तित्वात येण्याची कारणमीमांसा स्त्रीवाद करतो. तसेच हे दुय्यमत्व दास्यत्व नष्ट करण्यासाठी विविध प्रकारच्या चळवळी स्त्रीवादींद्वारे केल्या जातात. फक्त स्त्री-पुरुष समानता इतकेच स्त्रीवादास अभिप्रेत नसून तृतीयपंथीय आणि समलिंगींच्या अधिकारांचा देखील पाठपुरावा स्त्रीवादी करतात. संपूर्ण शोषणमुक्त आणि समताधारित समाजाची निर्मिती करणे हे स्त्रीवादाचे ध्येय आहे. स्त्रीवादी चळवळी द्वारे उभारण्यात आलेले लढे हे मुलतः मानवमुक्तीच्या लढ्यांचे अविभाज्य भाग आहेत.

'स्त्रीवाद' हा ज्याप्रमाणे एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे त्याचप्रमाणे 'स्त्रीवाद' हा समाज, इतिहास, राजकारण, संस्कृती, अर्थव्यवस्था, धर्म, जाती-वर्णव्यवस्था यांच्याकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन देखील आहे. स्त्रीवाद हा एकसाची दृष्टीकोन नसून त्यामध्ये विभिन्न प्रवाह आहेत जे विविध काळात आणि विविध परिस्थितीत उदयास आले. या बहुप्रवाही स्त्रीवादाने जगातील विविध वर्गातील, वंशातील, प्रदेशातील स्त्रीप्रश्नांचे सिद्धांकन अतिशय समृद्ध केले. स्त्रीवादी सिद्धांकनाने पितृसत्ता, लिंगभाव, लैंगिकता इत्यादी संकल्पनांच्या आधारे राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, धर्मव्यवस्था, संस्कृती इत्यादींचे अत्यंत नव्या स्वरूपात विश्लेषण केले.

स्त्री स्वातंत्र्यासाठी आणि स्त्रियांच्या हक्कासाठी लढणाऱ्या विविध स्त्रीवादी चळवळी या काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आकारास आल्या. ज्याप्रमाणे समुद्राच्या लाटांमध्ये 'उसळणे-वाढणे-क्षीण होणे' अशी सतत चालणारी प्रक्रिया होते, त्याचप्रमाणे काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर स्त्रीवादी चळवळींमध्ये देखील उदय, विकास आणि क्षीण होण्याची प्रक्रिया दिसून येते. त्यामुळे स्त्रीवादाचे इतिहासकार स्त्रीवादी चळवळींच्या टप्प्यांचे वर्णन 'स्त्रीवादाच्या लाटा' असे करतात. स्त्रीवादाची पहिली लाट १९ व्या आणि २० व्या शतकात विकसित झाली ज्यात स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार हा केंद्रस्थानी होता. १९६०च्या आणि १९७० च्या दशकात आलेल्या स्त्रीवादाच्या दुसऱ्या लाटेत स्त्रियांसाठी समान कायदेशीर आणि सामाजिक हक्कांचा मुद्दा महत्त्वाचा होता. स्त्रीवादाची तिसरी लाट १९९० च्या दशकात उदयास आली आणि आज देखील अस्तित्वात आहे. स्त्रीवादाची तिसरी लाट ही तिच्या दुसऱ्या लाटेशी सातत्य राखणारी असून तिच्या उणिवांच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपात उदयास आली.

- **भारतातील स्त्रीवादी इतिहासाच्या विकासाचे टप्पे :**

भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत १८ व्या शतकात आरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखनापासून भारतासंबंधी आधुनिक इतिहासलेखनास सुरवात झाली. भारताच्या इतिहासासोबतच भारतीय समाजाच्या इतिहासाबद्दलची मांडणी विविध इतिहासलेखन परंपरांच्या मध्ये केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या संदर्भात देखील काही प्रमाणात ऐतिहासिक मांडणी केली गेली. मात्र, काळाच्या ओघात आणि वैचारिक बदलांच्या प्रभावाने स्त्रियांच्या इतिहासलेखनाचा टप्प्याटप्प्याने विकास होत गेला आणि स्त्रीवादी इतिहासलेखनाची परंपरा उदयास आली.

**(१) पहिला टप्पा : वसाहतवादी आणि राष्ट्रवादी दृष्टीकोनातून स्त्रियांचा इतिहास :** भारतामध्ये आधुनिक इतिहास लेखनाची पद्धत १८ व्या शतकात आरंभ झाली. वासाहतिक इतिहासलेखन परंपरेने भारतीय इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाबद्दल लेखन केले. जेम्स मिल, विल्यम जोन्स इत्यादी इतिहासकारांनी भारतीय स्त्रियांच्या स्थिती विषयी लेखन केले. सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा इत्यादी चालीरीती आणि स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक यांची माहिती वासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील साम्राज्यवादी इतिहासलेखकांनी दिली. भारतीय स्त्रियांना मिळणारी अमानुष आणि हीन वागणूक अधोरेखीत करून मांडल्याने 'भारतीय लोक हे मागास प्रवृत्तीचे आहेत आणि त्यामुळे ते स्वतःवर राज्य करण्यास लायक नाहीत' या साम्राज्यवादी मांडणीस बळ मिळत असे. अशा प्रकारची मांडणी ब्रिटीशांच्या भारतावरील सत्तेचे समर्थन करण्यासाठी वापरली जात असे.

भारतासंबंधी आकर्षण आणि कुतूहल असलेल्या वासाहतिक इतिहासलेखन परंपरेतील पौर्वात्यवादी इतिहासकारांनी प्राचीन भारतीय संस्कृतीचे उदात्तीकरण करताना भारतातील प्राचीन काळास 'सुवर्णयुग' संबोधले. भारतीय इतिहासचा प्राचिन काळ हा 'सुवर्णयुग' मानल्यामुळे तो भारतीय स्त्रियांसाठी देखील 'सुवर्णयुग' होता अशी मांडणी पौर्वात्यवादी इतिहासकारांनी केली. प्राचीन काळी भारतात स्त्रियांचे स्थान उत्तम होते आणि त्यांच्यावर कोणती ही जाचक परंपरा व बंधने लादलेली नव्हती, याचा दाखला वैदिक

काळातील स्त्रियांच्या स्थितीवरून देण्यात आला. वैदिक काळात सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा इत्यादी चालीरीतींचे अस्तित्व नव्हते, असे सांगत पौर्वात्यवादी इतिहासकारांनी स्त्रियांसाठी देखील 'सुवर्णयुग'च असल्याची मांडणी केली.

साम्राज्यवादी इतिहासलेखनाची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेल्या राष्ट्रवादी इतिहासलेखनाने पौर्वात्यवादी इतिहासलेखनाची तळी उचलत प्राचीन भारतात स्त्रियांची स्थिती किती चांगली होती हे आणखी अधोरेखित करून मांडण्याचा प्रयत्न केला. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी इतिहासकार अनंत सदाशिव आळतेकर यांनी 'The Position of Women in Hindu Civilization From Prehistoric Times to the Present Day' या ग्रंथ १९३८ साली लिहिला. प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळापर्यंत हिंदू संस्कृतीतील स्त्रियांच्या स्थानाविषयी भाष्य या ग्रंथात करण्यात आले होते. पौर्वात्यवादी इतिहासकारांप्रमाणे आळतेकरांनी प्राचिन भारतात स्त्रियांचे जीवन आणि स्थान हे उच्च आणि उत्तम दर्जाचे होते, असे प्रतिपादन केले. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, काशीप्रसाद जयस्वाल, रोमेशचंद्र दत्त, रोमेशचंद्र मुजुमदार या राष्ट्रवादी इतिहासकारांनी देखील आळतेकर यांच्या सारखीच मांडणी करत 'सुवर्णयुग' सिद्धांताची पाठराखण केली.

सुप्रसिद्ध स्त्रीवादी इतिहासकार उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांनी 'Economic and Political Weekly' या नियतकालीकेत १९८८ मध्ये 'In Search of Our Past: A Review of the Limitations and Possibilities of the Historiography of Women in Early India' हा महत्त्वपूर्ण लेख लिहिला. या लेखात त्यांनी प्राचीन भारतातील स्त्रियांच्या संदर्भातील इतिहासलेखनाची चिकित्सा करून आतापर्यंत झालेल्या संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करत नव्या संशोधनाच्या शक्यता देखील वर्तवल्या. उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांच्या मते:

(१) राष्ट्रवादी चळवळीच्या पृष्ठभूमीवर भारतीय म्हणून हिंदू स्त्रीविषयी इतिहासलेखन केल्यामुळे ते राष्ट्रवादी विचारसरणीने प्रेरित होते. स्त्रियांच्या उत्तम दर्जाचे उदात्तीकरण हे साम्राज्यवादी इतिहासकारांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याच्या हेतूने करण्यात आले.

(२) राष्ट्रवादी इतिहासकारांनी 'स्त्रियांचे स्थान' ठरवत असताना जे मापदंड लावले त्या मापदंडातच समस्या होत्या. स्त्रियांना यज्ञ आणि तत्सम कर्मकांडामध्ये स्थान होते कि नव्हते, अशाप्रकारचे क्षुल्लक मापदंड वापरून स्त्रियांचे स्थान उत्तम होते असे ठरविले गेले. याच काळात सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली होती. सतीप्रथा, बालविवाह, जरठविवाह, विधवा पुनर्विवाहास मनाई, विधवा केशवपन, पडदा पद्धत, देवदासी प्रथा या चालीरीतींना समाज सुधारक विरोध करू लागले. राष्ट्रवादी इतिहासकारांनी या चालीरीती केंव्हापासून सुरु झाल्या याचा शोध घेतला. संशोधनानंतर त्यांना असे आढळून आले की, वैदिक काळात या चालीरीती आढळत नाहीत. वैदिक काळात या चालीरीती नव्हत्या म्हणून त्याकाळी स्त्रियांचा दर्जा उच्च होता असा निष्कर्ष या इतिहासकारांनी काढला. मात्र, त्याकाळी या प्रथा नव्हत्या म्हणून स्त्री आणि पुरुष हे दोघे समान दर्जाचे होते, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे त्याकाळी स्त्रियांचे शोषण होत नव्हते, असे देखील म्हणता येणार नाही.

(३) स्त्रियांवर कडक निर्बंध लादणाऱ्या प्राचीन ग्रंथामधील कायदे व नियमांवर राष्ट्रवादी इतिहासकारांनी सोयीस्कर मौन बाळगले. भारतीय समाजातील 'उच्चवर्णीय' स्त्रियांचा दाखला देत सर्व स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन केले. उच्चवर्णीय स्त्रियांच्या स्थितीचे वर्णन देखील पुरुषसत्ताक दृष्टीकोनातून माता, पत्नी, भगिनी, पुत्री अशा नात्यांच्या गौरविकरणाच्या स्वरुपात केले. भारतातील दासीप्रथा आणि कनिष्ठ वर्णीय स्त्रियांची स्थिती यांच्यावर मौन बाळगले. 'वैदिक काळात उच्च स्थान असलेल्या स्त्रियांची अवनिती ही मुस्लिमांच्या आक्रमणामुळे झाली' अशी जमातवादी मांडणी करून मुसलमानांना दोष देण्याचे जमातवादी राजकारण इतिहासकारांनी केले. प्राचीन काळात उच्चवर्णीय पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथांचा साधन म्हणून वापर करत असताना त्यातील वर्णनाचा खरे-खोटेपणा किंवा त्यातील विसंगती यांच्याकडे राष्ट्रवादी इतिहासकारांनी दुर्लक्ष केले.

ज्याप्रमाणे राष्ट्रवादी इतिहासकारांनी साम्राज्यवादी इतिहासकारांना दिलेल्या प्रतिक्रियेपोटी केलेली प्राचीन काळाची 'सुवर्णयुग' म्हणून केलेली चुकीची आणि वरवरची मांडणी कित्येक वर्ष जनमानसात रुजून आहे. त्याचप्रमाणे भारतीय समाजातील स्त्रियांच्या स्थानाचा चुकीचा आणि वरवरचा इतिहास देखील जनमानसात रुजला आहे.

**(२) दुसरा टप्पा : राष्ट्रनिर्मितीसाठी स्वातंत्र्योत्तरकाळातील ऐतिहासिक स्त्रीचरित्रे :** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नव्याने उदयास आलेल्या राष्ट्राच्या विकासासाठी आणि राष्ट्रवादी भावनेच्या प्रसारासाठी थोर ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे लिहिण्याचे प्रयत्न झाले. शासकीय आणि वैयक्तिकरित्या लिहिलेल्या या चरित्रांमध्ये अनेक ऐतिहासिक स्त्रियांची चरित्रे देखील लिहिली गेली. राजघराण्यातील कर्तुत्वान स्त्रिया, युद्धप्रसंगी शौर्य गाजवणाऱ्या स्त्रिया इत्यादींची या चरित्रांमध्ये भरमार होती. या स्त्रियांनी पुरुषांचे गुणविशेष मानले गेलेले राजकीय कर्तुत्व आणि युद्धातील शौर्य दाखवल्यामुळेच त्यांची चरित्रे लिहिली गेली. तसेच ज्या स्त्रियांची चरित्रे लिहिली गेली, त्या मुख्यत: उच्च वर्णाच्या, उच्च जातींच्या आणि उच्च वर्गाच्या होत्या आणि सामान्य स्त्रियांना यात कोणतेही स्थान नव्हते. पुरुषसत्ताक दृष्टीकोन असलेल्या इतिहासाच्या चौकटीतच या स्त्रियांचा इतिहास बसवण्याचा प्रयत्न केल्याचे या चरित्रांतून दिसून येते.

**(३) तिसरा टप्पा : स्त्रियांच्या योगदानाचा इतिहास :** भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्त्रियांनी मोठ्याप्रमाणात भाग घेतला होता. वसाहतकालीन आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय आणि सामाजिक चळवळीत देखील स्त्रिया सहभाग मोठा होता. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील आणि विविध चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा आणि योगदानाचा इतिहास तिसऱ्या टप्प्यात लिहिण्यात आल्याचे दिसून येते.

**(४) चौथा टप्पा : स्त्रीवादी इतिहास :** स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या लाटेपासून जहाल स्त्रीवाद दिसून येऊ लागला. १९६० मध्ये आलेल्या या लाटेमध्ये 'जे जे खाजगी, ते ते राजकीय' अशी घोषणा केली गेली. स्त्रीवादी विचारप्रणालीमुळे सामाजिक शास्त्रांच्या आकलनाच्या मर्यादा रुंदावल्या आणि त्यांना नवे भान आले. आतापर्यंत झालेल्या ज्ञाननिर्मितीची स्त्रीवादी चिकित्सा करण्याची बौद्धिक चळवळ उभी राहिली.

सामाजिक शास्त्रांमधील संशोधन पद्धतीला आव्हान देऊन त्यांच्या उणीवा दाखवण्याचे कार्य या चळवळीने केले. त्याच बरोबर सामाजिक शास्त्रातील संशोधनाच्या नव्या पद्धती आणि साधने शोधण्याचा आणि विकसित करण्याचा प्रयत्न केला गेला.

मानवी इतिहासाचा अभ्यास करताना चिकित्सात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग स्त्रीवादी विचारवंतानी केला. ज्ञाननिर्मिती होत असताना समाजातील सत्ताविहीन घटक म्हणजेच स्त्रिया, शेतकरी, आदिवासी, कामगार दलित इत्यादींचे अनुभव आणि ज्ञान हे वगळले जातात. त्याचप्रमाणे इतिहास हा पुरुषकेंद्रित स्वरुपात लिहिला गेल्याने स्त्रिया यातून वगळल्या गेल्या. इतिहास पुरुषकेंद्रित असल्यामुळे आणि इतिहास संशोधनाचा दृष्टीकोन देखील पुरुषकेंद्रित असल्यामुळे मुख्यप्रवाही इतिहासातून पुरुषांचे अनुभव, विचार आणि कृती यांनाच स्थान मिळाले. स्त्रियांचे अनुभव, विचार आणि कृती यांना वेगळे काढून तपासण्याचा प्रयत्न मुख्यप्रवाही इतिहासाने केला नाही. त्यामुळे स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांची चरित्रे, स्त्रियांचे योगदान, स्त्रियांची स्थिती यांची मांडणी ही पुरुषकेंद्रित दृष्टीकोनाने आणि पितृसत्ताक व्यवस्थेस रुचेल अशीच केली गेली.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी केल्यास वेगळ्या पद्धतीचे आकलन होईल असे स्त्रीवादी इतिहासकारांना वाटते. ज्ञान हे वस्तुनिष्ठ नसून संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार त्याचे ज्ञानाविषयी आणि इतिहासाविषयी आकलन बदलते अशी मांडणी स्त्रीवादी विचारवंतानी केली. यालाच 'भूमिदृष्टी सिद्धांत' (Standpoing Theory) म्हटले जाते. समग्र वास्तवाच्या आकलनासाठी विविध सामाजिक स्थानांवरून झालेले आकलन समजून घ्यायला हवे अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंतांनी घेतली. स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव हे केंद्रस्थानी असायला हवेत असा त्यांचा आग्रह आहे. स्त्रीवादी इतिहासाची ही भूमिका 'तळाकडून इतिहास'च्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

स्त्रीवादी इतिहासकारांनी मुख्यप्रवाही इतिहासलेखनाविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले. पारंपारिक किंवा मुख्य प्रवाही इतिहासातून स्त्रियांना का वगळले? स्त्रियांचा उल्लेख त्रोटक व वरवरचे का आले? स्त्रियांविषयीचे विचार विकृत आणि नकारात्मक का होते? लढाया, राजकारण, सार्वजनिक क्षेत्र यानाचा इतिहासात स्थान का देण्यात आले? पुरुष लढाया करत असताना स्त्रिया काय करायच्या? त्याची दाखल इतिहासाने का घेतली नाही? स्त्रिया मुलांना जन्म देतात, त्यांना घडवतात, संस्कृती जपतात, तिचे संवर्धन करतात, अन्ननिर्मिती करतात, शेती-कारखान्यात उत्पादन करतात इत्यादी विषयांना इतिहासात स्थान का मिळाले नाही? असे प्रश्न स्त्रीवादी इतिहासकारांनी उपस्थित केले.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करणारे संशोधन जगभरातील विविध देशांत सुरु झाले.स्त्रीवादी इतिहास लेखनात ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि भारताचा विशेष उल्लेख केला जातो. स्त्रीवादी इतिहासाने भारतीय इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आहे.

- **भारतातील स्त्रीवादी इतिहास :**

भारतातील स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये प्रागैतिहासिक काळापासून सद्यकाळापर्यंतच्या विषयांवर इतिहासलेखन केले जाते. प्रागैतिहासिक काळात मानव जेंव्हा शिकार आणि अन्नसंग्रह करून जगत होते तेंव्हा देखील स्त्रियांचा शिकार आणि अन्नसंग्रहात मोठा वाटा होता. शेतीचा शोध, मातीची भांडी बनवणे, वस्त्रे बनवणे, अवजारे बनवणे, घरबांधणी, औषधोपचार या क्षेत्रात स्त्रियांनी मोठी कामगिरी केली होती हे स्त्रीवादी इतिहास्कारणी सिद्ध केले. इरावती कर्वे, डी. डी. कोसंबी, शरद पाटील, एच. डी. सांकलिया यांनी त्यांच्या संशोधनात मातृसत्ताक अथवा मातृप्रधान समाजात स्त्रिया पुरुषांच्या वर्चस्वाखाली नव्हत्या तसेच त्या उत्पादन कार्यात महत्त्वाची भूमिका निभावत होत्या अशी मांडणी केली. या काळात स्त्रिया काठीच्या आधारे शेती करत होत्या, भांडी बनवत, बुरुड काम इत्यादी उद्योग करत तसेच धार्मिक पौरोहित्य देखील करत असत. स्त्रियांच्या जननक्षमतेमुळे तत्कालीन मानवी समूहांत त्यांचा मोठा आदर केला जात असे. हे समाज 'मातृपुजक' असत. रा. चिं. ढेरे यांनी 'लज्जागौरी' या ग्रंथात भारतातील मातृदेवतांच्या उपासनेचा अभ्यास केला. त्यांच्या मते वेदपूर्व काळापासून मातृदेवतांची उपासना होत होती.

शेतीच्या शोधानंतर हळूहळू पितृसत्ताक कुटुंबपद्धती आकारास आली आणि मातृसत्ताक कुटुंबपद्धत क्षीण होत गेली त्या सोबतच स्त्रियांचे स्थान दुय्यम होत गेले अशी मांडणी स्त्रीवादी इतिहासकारांनी केली. भारतात 'ब्राम्हणी पितृसत्ता'ने स्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात मुख्य भूमिका बजावली असे उमा चक्रवर्ती यांचे मत आहे. शेतीसाठी मजूर पुरवठा सतत उपलब्ध रहावा म्हणून वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था आकारास आली. त्यांच्या माध्यमातून बहुसंख्य पुरुषांना नियंत्रित करून शेतीच्या उत्पादनास जुंपता येत असे. स्त्रिया मुलांना जन्म देऊन सतत मजुरांचा पुरवठा करत राहतील म्हणून त्यांच्यावर देखील बंधने आली. त्याच प्रमाणे संपत्तीचा औरस वारस मिळविण्यासाठी आणि जाती-वर्णाचे शुद्धत्व टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि जननक्षमतेवर 'ब्राम्हणी पितृसत्तेने' नियंत्रण आणले. जातीव्यवस्था आणि 'ब्राम्हणी पितृसत्ता' या दोन व्यवस्था परस्पर संबंधी होत्या. या दोन्ही व्यवस्थांचा वापर उच्चजाती व उच्चवर्णातील पुरुषांनी बहुसंख्य पुरुषांचे आणि स्त्रियांचे शोषण करण्यासाठी वर्षानुवर्षे वापरली. 'जात, वर्ग आणि लिंगभाव' हा परीपेक्ष्य वापरून उमा चक्रवर्ती यांनी केलेले संशोधन नवी दिशा देणारे ठरले.

कुमकुम रॉय आणि उपिंदर सिंग यांनी बौद्ध जैन स्तूप, विहार, लेण्या इत्यादी ठिकाणी स्त्रियांनी कोरवून घेतलेल्या लेखांचा अभ्यास केला. तारा भवाळकर, विजया रामस्वामी, इंदुमती शेवडे यांनी जवळपास ७५ संतकवयत्रींचा आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून स्त्रियांना मोक्ष प्राप्तीसाठी पितृप्रधान समाजाशी कसा संघर्ष करावा लागला याची मांडणी केली. स्त्रियांच्या मौखिक साहित्याचा म्हणजेच जात्यावरील गाणी, वेगवेगळ्या सण-उत्सवात म्हटली जाणारी गाणी, म्हणी, वाक्यप्रचार, मिथक कथा, दंत कथा, लोक कथा इत्यादींच्या मध्ये प्रस्तुत होणाऱ्या स्त्रियांच्या जाणिवांचा अभ्यास स्त्रीवादी इतिहासकारांनी केला. राष्ट्रवादाच्या उदया सोबतच राष्ट्रवादी चर्चाविश्वातून स्त्रियांना नव्याने साचेबद्ध कसे करण्यात आले याचा अभ्यास 'Recasting Women : Essays in Colonial History' (१९८९) या कुमकुम संगारी आणि सुदेश वैद यांच्या द्वारे संपादित ग्रंथात करण्यात आला.

आधुनिक काळात स्त्रियांनी केलेल्या लेखनातून स्त्रियांनी पितृसत्तेशी केलेला संघर्ष दिसून येतो. तनिका सरकार, मीरा कोसंबी, विद्युत भागवत यांनी आधुनिक बंगाल आणि महाराष्ट्रात स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याच्या अभ्यासातून स्त्रियांचा पितृसत्तेशी संघर्षाच्या आणि स्त्रियांच्या जाणिवांच्या इतिहासाची मांडणी केली. सुसी थारू आणि के. ललिता यांनी 'Women Writing in India : 600 BC to the Present' या द्विखंडीय ग्रंथात प्राचीन काळापासून आजच्या काळापर्यंत भारतातील स्त्रियांनी केलेल्या लिखाणाचा संग्रह १९९१ मध्ये प्रकाशित केला. महाराष्ट्रात 'साहित्यप्रेमी भगिनी मंडळ'ने 'स्त्री-साहित्याचा मागोवा' (२००२) आणि 'भारतीय भाषांतील स्त्रीसाहित्याचा मागोवा' (२००७) असे अनेकखंडीय स्त्रियांच्या लेखनाचा संग्रह असलेले ग्रंथ प्रकाशित केले. 'सर्व स्त्रिया सारख्याच प्रमाणात शोषित असतात' हा भ्रम नाकारून 'स्त्री' हा एकसाची कोटिक्रम नसून जात, वर्ग, प्रदेश, राष्ट्र अनुरूप स्त्रियांच्या वाट्याला येणारे दुय्यमत्व भिन्न प्रकारचे असते अशी नवी मांडणी स्त्रीवादी अभ्यासकांनी केली. अमेरिकेत ज्या प्रमाणे काळ्या स्त्रियांच्या स्त्रीवाद हा गोऱ्या स्त्रियांच्या स्त्रीवादापेक्षा भिन्न स्वरूपात उदयाला आला. तसेच भारतात मुख्यप्रवाही स्त्रीवादा पेक्षा वेगळा दलित स्त्रीवाद उदयास आला. मुख्य प्रवाही स्त्रीवादी चळवळीने आणि दलितमुक्ती आंदोलनाने दलित स्त्रियांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष्य केले या जाणीवेतून दलित स्त्रीवाद पुढे आला. उर्मिला पवार आणि मीनाक्षी मून यांच्या १९८९ मध्ये प्रकाशित 'आम्हीही इतिहास घडवला' या ग्रंथातून बहुजन समाजातील स्त्रियांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न झाला. शर्मिला रेगे, नारायण भोसले, मीना आनंद यांनी दलित स्त्रीवादाबाबत मांडणी केली.

**स्त्रीवादी इतिहासलेखन परंपरेचे मूल्यमापन :**

मानवी इतिहासाच्या सर्व ऐतिहासिक काळात समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रियांचा इतिहास हा मुख्यप्रवाही आणि पारंपारिक इतिहासलेखनाने दुर्लक्षिलेला होता. हा इतिहास स्त्रीवादी इतिहासलेखनाने समोर आणला. स्त्रीवादी इतिहासाने अगदी प्रागैतिहासिक काळापासून आजच्या काळातील स्त्रियांच्या इतिहासाची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडणी केली. त्यांनी त्यासाठी नव्या प्रकारच्या संशोधनपद्धती आणि साधने वापरली. स्त्रियांची मौखिक परंपरा, त्यांची आत्मचरित्रे, त्यांचे आत्मकथने यांचा वापर स्त्रीवादी इतिहासाने केला. जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या परीपेक्ष्यातून इतिहासाचा अन्वयार्थ लावायला हवा अशी महत्त्वाची दिशादर्शक मांडणी स्त्रीवादी इतिहासातून समोर आली. जातीव्यवस्था आणि 'ब्राम्हणी पितृसत्ता' यांच्या परस्पर संबंधांचा आणि स्त्रियांच्या शोषणाशी त्याच्या संबंधांचा संदर्भ लावण्याचा प्रयत्न स्त्रीवादी इतिहासाने केला. दुर्लक्षित असलेल्या स्त्रियांचा इतिहास, स्त्रियांच्या दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न करणारे स्त्रीवादी इतिहासलेखन भारतातील 'तळाकडून इतिहास' परंपरेतील अत्यंत महत्त्वपूर्ण इतिहासलेखन प्रवाह आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) उमा चक्रवर्ती यांचे मते भारतात स्त्रियांचे स्थान दुय्यम होण्याच्या स्थित्यंतरात कोणी मुख्य भूमिका बजावली?

(२) स्त्रियांचा इतिहास त्यांच्याच दृष्टीकोनातून मांडणारा कोणता इतिहास लेखन प्रवाह हा 'तळाकडून इतिहास' परंपरेचा भाग आहे?

(३) आधुनिक काळात स्त्रियांनी केलेल्या लेखनातून काय दिसून येतो?

(४) मानवी इतिहासाच्या सर्व ऐतिहासिक काळात समाजाचा निम्मा भाग कोण आहे?

(५) स्त्रियांच्या शोषणाशी कशाच्या परस्पर संबंधांचा संदर्भ लावण्याचा प्रयत्न स्त्रीवादी इतिहासाने केला?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) स्त्रीवादाचे इतिहासकार स्त्रीवादी चळवळींच्या टप्प्यांचे वर्णन ........... असे करतात.

(२) ........... आणि उपिंदर सिंग यांनी बौद्ध जैन स्तूप, विहार, लेण्या इत्यादी ठिकाणी स्त्रियांनी कोरवून घेतलेल्या लेखांचा अभ्यास केला.

(३) ........... ही एक सामाजिक-राजकीय विचारप्रणाली आहे जी स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरते.

(४) 'जात, वर्ग आणि लिंगभाव' हा परीपेक्ष्य वापरून ........... यांनी केलेले संशोधन नवी दिशा देणारे ठरले.

(५) शर्मिला रेगे, नारायण भोसले, मीना आनंद यांनी ........... बाबत मांडणी केली.

### २.३.३ सबालटर्न इतिहास (Subaltern History)

इ.स.१९८० च्या दशकात उदयाला आलेल्या 'सबालटर्न स्टडीज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील संशोधक-अभ्यासकांच्या समूहाने भारतीय इतिहासलेखनावर प्रचंड प्रभाव टाकला. त्यांनी वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी तत्कालीन इतिहासलेखनात प्रस्थापित परंपरांची चिकित्सा केली. या इतिहासलेखन परंपरांमधील अभिजन प्रवृत्ती आणि दृष्टीकोन प्रकाशात आणून 'सबालटर्न स्टडीज' च्या इतिहासकारांनी त्यावर टीका केली. अभिजनकेंद्रित इतिहासलेखनाऐवजी समाजतळातून इतिहासलेखन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सबालटर्न स्टडीजच्या इतिहासकारांनी केले. त्यामुळे भारतीय इतिहासलेखन परंपरांचा आणि मुख्यत: तळाकडून इतिहासाचा आढावा घेत असताना 'सबालटर्न स्टडीज'च्या इतिहासलेखनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**'सबालटर्न' म्हणजे कोण?**

'सबालटर्न स्टडीज'चे प्रवर्तक म्हणून रणजीत गुहा यांना ओळखले जाते. इंग्लंडमधील सुप्रसिद्ध सुसेक्स विद्यापीठात प्रपाठक असणाऱ्या रणजीत गुहा यांनी याच विद्यापीठात 'सबालटर्न स्टडीज ग्रुप'ची स्थापना केली. रणजीत गुहा आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या लेखनामुळे 'सबालटर्न स्टडीज' चा प्रसार होऊन भारताच्या इतिहासलेखनातील महत्त्वाचा प्रवाह म्हणून प्रस्थापित झाला. 'सबालटर्न स्टडीज' च्या पहिल्या खंडाच्या

प्रस्तावनेत रणजीत गुहा यांनी ‘सबालटर्न स्टडीज’ची भूमिका मांडली. त्यात त्यांनी ‘सबालटर्न’ म्हणजे कोण?, ‘सबालटर्न’ ही संकल्पना काय आहे? याची चर्चा केली आहे. रणजीत गुहा आणि त्यांच्या ‘सबालटर्न स्टडीज’च्या सहकाऱ्यांनी ‘सबालटर्न’ ही संकल्पना इटलीतील कृतीशील मार्क्सवादी विचारवंत अंतोनियो ग्रामची (१८९१-१९३१) यांच्या कडून घेतली. इटलीच्या कम्युनिस्ट पक्षाचा संस्थापक सदस्य आणि नेता असलेल्या अंतोनियो ग्रामचीला इटलीच्या हुकुमशाह बेनिटो मुसोलिनी याच्या फॅसिस्ट सरकारने २० वर्षांसाठी तुरुंगवासाची शिक्षा दिली. इ.स. १९२६ पासून जवळपास अकरा वर्षे तुरुंगवास भोगून ग्रामची १९३७ मध्ये तुरुंगातच मरण पावला. या अकरा वर्षाच्या कारावासाच्या काळात ग्रामचीने इतिहास आणि राजकीय सिद्धांकानांवर तीस वह्यांमध्ये जवळपास ३००० पानांमध्ये लेखन केले. ग्रामचीच्या मृत्युनंतर १९५० च्या आसपास ग्रामचीचे लेखन 'Prison Notebooks' म्हणून प्रकाशित झाले आणि १९७० नंतर त्याचे इंग्रजी भाषांतर झाले. अंतोनियो ग्रामचीचे 'Prison Notebooks' (‘प्रिझन नोटबुक्स’ म्हणजे ‘कारागृहातील वह्या’) हे विसाव्या शतकातील मुलभूत लेखन मानले जाते. या लेखनातच ग्रामचीने ‘सबालटर्न’ ही संकल्पना वापरली होती. ‘सबालटर्न’चा शब्दश: अर्थ लष्करी अधिकाऱ्यांतील तळाचा, दुय्यम अथवा निम्नस्तरीय अधिकारी असा आहे. मात्र, अंतोनियो ग्रामचीने आपल्या विश्लेषणात याचा वेगळ्या अर्थाने उपयोग केला. ग्रामचीने ‘सबालटर्न’ ही संकल्पना 'Non Hemogenic' गटांना किंवा वर्गांना लागू केली. ‘Non Hemogenic' म्हणजे ज्यांना कोणत्याही पद्धतीचे नेतृत्व अथवा धुरीणत्व अथवा अधिकार नसलेले सत्ताविहीन गट किंवा वर्ग होय. त्याच प्रमाणे ‘सबालटर्न’ ही संकल्पना ही 'Subordinated' गटांना किंवा वर्गांसाठी देखील ग्रामचीने वापरली. 'Subordinated' म्हणजे ‘वर्गभान नसलेले शोषित तसेच अंकित समूह’ होय. वर्गभान नसलेल्या म्हणजे जे लोक शोषित आहेत, ज्यांना दुसऱ्यांच्या वर्चस्वात राहावे लागते आणि ह्या वर्चस्वात राहून देखील आपण अशा पद्धतीने शोषित आहोत/आपले शोषण होतंय/आपल्याला अंकित ठेवले गेले आहे/आपल्याला दुसऱ्याच्या वर्चस्वात राहावे लागते अशी जाणीव नसलेल्या लोकांना 'Subordinated' म्हणजे ‘शोषित अंकित जन’ म्हटले जाते. अंतोनियो ग्रामचीने 'Non Hemogenic' म्हणजे धुरीणत्व नसलेल्या आणि 'Subordinated' म्हणजे ‘शोषित अंकित जन’ यांचा ‘सबालटर्न’ या अर्थाने उल्लेख केला. अर्थात अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी ‘सबालटर्न’ ही संकल्पना वापरली.

**भारतातील ‘सबालटर्न’ कोणास म्हणावे?**

‘सबालटर्न’ ही संकल्पना भारतीय समाजाला समजून घेण्यासाठी उपयोगी ठरेल या विचारातून रणजीत गुहा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ‘सबालटर्न स्टडीज’ या इतिहासप्रकल्पाच्या माध्यमातून त्याचा स्वीकार केला आणि त्या अनुषंगाने भारतीय स्वरूपात त्याचा अवलंब केला. रणजीत गुहा यांनी ‘सबालटर्न स्टडीज’ च्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत भारताच्या संदर्भात ‘सबालटर्न’ कोणास म्हणावे याचा उहापोह केला. भारताच्या संदर्भात ‘सबालटर्न म्हणजे कोण?’ हे ठरवत असताना, त्याची व्याख्या करत असताना ‘अभिजन म्हणजे कोण?’ हे देखील स्पष्ट करणे आवश्यक होते. म्हणजेच भारतातील धुरीणत्व असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटक कोणते ते स्पष्ट होणे गरजेचे होते. रणजीत गुहा यांनी भारतातील धुरीणत्व

असलेले आणि शोषक-वर्चस्वी समाजघटकांमध्ये परदेशी आणि भारतीय वर्गसमूहांचा समावेश केला. परदेशी वर्चस्वी गटामध्ये त्यांनी परदेशी भांडवलदार, गुंतवणूकदार, चहा-कॉफी इत्यादींचे मळेवाले, जमीनदार, मिशनरी इत्यादींचा समावेश केला. रणजीत गुहा यांनी अखिल भारतीय स्वरूपाच्या वर्चस्वी गटामध्ये भारतातील शक्तिशाली सामंतवर्ग, औद्योगिक व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी प्रशासकीय रचनेच्या शिरोभागातील नोकरशाहांचा वर्ग इत्यादींचा समावेश केला. अखिल भारतीय वर्चस्वी गटाला प्रादेशिक व स्थानिक पातळीवरच्या अंकितांचे काही गट देखील सहाय्यभूत ठरत असत. त्यांचाही समावेश वर्चस्वी /अभिजन गटात करण्यात आला. मात्र, यातील प्रादेशिक अथवा स्थानिक पातळीवरील काही घटक अभिजन आणि अंकित अशा दोन्ही प्रकारचे वर्तन करताना दिसतात. या स्थानिक व प्रादेशिक पातळीवरील घटकांमध्ये गावातले वतनदार, दरिद्री जमीनदार, श्रीमंत व मध्यम शेतकरी यांचा समावेश होतो. भारताच्या संदर्भात अभिजन अथवा वर्चस्वी वर्ग कोणते हे ठरवल्यानंतर भारतातील 'सबालटर्न' म्हणजे धुरीणत्व नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट कोणते हे ठरवले गेले. भारतातील शेतकरी, आदिवासी, निम्नजाती, दलित, आणि स्त्रिया यांना 'सबालटर्न' मानण्यात आले. भारतातील राजकीय व्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, पितृसत्ता, पुरुषप्रधान व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांच्यामुळे उल्लेखित समाजघटक हे अभिजनांचे शोषित-अंकित बनून राहतात.

**'सबालटर्न स्टडीज'चे खंड आणि त्यांची भूमिका :**

भारतीय इतिहासलेखन परंपरांमध्ये वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इत्यादी पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांमध्ये अभिजन म्हणजे समाजातील उच्चस्तरातील प्रवृत्ती प्रबळ होत्या. या इतिहासलेखनांमध्ये अभिजनवादी दृष्टीकोन ठेऊन त्याच्याशी सोयीस्कर अशा तत्वांचा, संकल्पनांचा आणि संशोधन पद्धतींचा अवलंब केला जात असे. मात्र, इ.स. १९८० च्या दशकापासून सुरू झालेल्या 'सबालटर्न स्टडीज' या इतिहासप्रकल्पाने अभिजनवादी दृष्टीकोन बाजूला नव्या तत्वांचा, संकल्पनांचा आणि पद्धतीशास्त्रांचा अवलंब करून समाजतळाकडून इतिहास लिहिण्यास आरंभ केला. सुरवातीला त्यांनी नव-मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहासाची मांडणी करण्यास सुरवात केली आणि पुढील काळात ते उत्तर-आधुनिकतावादी चौकटीत स्थिरावले. इ.स. १९८२ ते २००५ पर्यंत 'सबालटर्न स्टडीज' चे एकूण बारा खंड प्रकाशित झाले. यातील पहिले दहा खंड ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस या सुप्रतिष्ठित प्रकाशनाने प्रकाशित केले. अकरावा आणि बारावा खंड देखील अनुक्रमे कोलंबिया विद्यापीठ आणि पर्मनेंट ब्लॅक या तितक्याच प्रतिष्ठित प्रकाशनगृहांनी प्रकाशित केला.

'सबालटर्न स्टडीज'च्या खंडांमध्ये विभिन्न पद्धतींचे ज्यांचा एकमेकांशी थेट संबंध नसतो असे विविध लेख प्रकाशित झाले. मात्र, त्यांच्यातील एक समान धागा हा शोषित-अंकित समूहांच्या प्रतिकाराचा असतो. अंतोनियो ग्रामचीच्या 'सबालटर्न' संकल्पनेच्या आधारे वर्ग, जात, वय, लिंग आणि अधिकार या आधारे दुय्यम मानलेल्यांचा यात समावेश होतो. 'सबालटर्न स्टडीज'ने अशारितीने इतिहास लेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या शोषित-अंकित जनांना प्रकाशात आणले. मुघल काळापासून १९७० च्या दशकापर्यंत तसेच जमातवादापासून औद्योगिक कामगारापर्यंतच्या विभिन्न काळातील आणि विभिन्न विषयांवरील संशोधकीय

आणि अभ्यासपूर्ण लेख 'सबालटर्न स्टडीज' प्रकाशित झाले. भारतातील शेतकरी, औद्योगिक कामगार आणि आदिवासी यांच्या मधील असंतोष आणि त्या असंतोषातून त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात केलेला विद्रोह हा 'सबालटर्न' इतिहासलेखनाचा मुख्य विषय होता. सबालटर्न इतिहासकारांच्या मते, शेतकरी कामगार आणि आदिवासी यांचे विद्रोह हे स्वत:ची स्थिती सुधारण्यासोबतच वसाहतीक अभिजनांचे आपल्याकडे लक्ष ओढून घेण्याचे एक साधन होते. सबालटर्न इतिहासकारांच्या मते पारंपारिक राष्ट्रवादी इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांच्या विद्रोहाला स्वातंत्र्यचळवळीचा भाग मानून त्याच्या नेतृत्वाचे श्रेय अभिजन वर्गास दिले. त्याचप्रमाणे पारंपारिक मार्क्सवादी इतिहासलेखनाने या शोषित-अंकितांमधील आदिवासी आणि शेतकऱ्यांच्या उठावाकडे दुर्लक्ष केले. याउलट सबालटर्न इतिहासकारांनी शोषित-अंकितांच्या या लढ्यांना स्वायत्त राजकारणाचा दर्जा देऊन त्यामागे शोषित-अंकित जनसमूहांच्या जाणीवा होत्या अशी मांडणी केली. याचे उदाहरण म्हणून शेतकरी बंडाकडे पाहता येते. शेतकरी बंडामध्ये कर्जखते, करार पत्रके जाळणे, सावकारावर हल्ले करणे अशी कृत्ये केल्याचे दिसून येते. यातून त्यांच्या शेतकरी असण्याच्या जाणीवा प्रकट होतात.

**'सबालटर्न स्टडीज' चे संशोधक आणि त्यांचे संशोधन :**

आजतागायत 'सबालटर्न स्टडीज'चे एकूण बारा खंड प्रकाशित झाले आहेत. 'सबालटर्न स्टडीज' ने भारताच्या इतिहासातील शोषित-अंकित जनांच्या इतिहासाची मांडणी केली. आधुनिक भारतीय इतिहासलेखनामध्ये 'सबालटर्न स्टडीज'चे इतिहास लेखन अत्यंत मूलगामी आणि प्रभावकारी मानले जाते. त्यामुळे 'सबालटर्न स्टडीज'च्या संशोधकांचा आणि त्यांच्या संशोधनाचा थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

**(१) डेव्हिड अर्नोल्ड :** पूर्वी लंडन विद्यापीठात आणि सध्या वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असणाऱ्या डेव्हिड आर्नोल्ड यांनी तत्कालीन मद्रास प्रेसिडेन्सी (सध्याच्या आंध्र प्रदेशातील) गुडेम आणि रामपा या डोंगराळ प्रदेशातील लोकांच्या १८३९ ते १९२४ इतक्या दीर्घकाळ आणि सतत्याने चाललेय संघर्षाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा लेख 'सबालटर्न स्टडीज'च्या पहिल्या खंडात लिहिला. 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडातील लेखात डेव्हिड आर्नोल्ड यांनी मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये १८७६-७८ दरम्यान पडलेल्या दुष्काळाचा इतिहास लिहिला. भीषण दुष्काळात उदरनिर्वाहासाठी आणि स्वत:ला जागवण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेले प्रयत्न आणि शेतकऱ्यांत निर्माण झालेल्या जाणीवा यांचा अभ्यास या लेखात केला गेला. भारतातील दुष्काळावर झालेल्या प्रचंड लेखनात या अभूतपूर्व संकटांना आपत्तीच्या काळातील मानवी अनुभवांच्या दृष्टीकोनातून पाहीले गेले नाही. तसेच टंचाई आणि दुष्काळाच्या काळातील शेतकऱ्यांचे अनुभव हे राज्याची धोरणे आणि उपाययोजना यांचे लांबलचक विवरण देताना दुर्लक्षित राहिले. अशी मांडणी डेव्हिड आर्नोल्ड यांनी आपल्या लेखात केली आहे.

**(२) ज्ञान पांडे :** एमोरे युनिव्हर्सिटी, अटलांटा-जॉर्जिया, अमेरिका येथे प्राध्यापक असलेल्या ज्ञान(ज्ञानेंद्र) पांडे यांनी १९१९-२२ या काळात तत्कालीन अवध (सध्याचा उत्तर प्रदेश) मध्ये झालेल्या

शेतकऱ्यांच्या बंडांचा आणि त्याचा भारतीय राष्ट्रवादावर झालेल्या परिणामांचा अभ्यास 'सबालटर्न स्टडीज'च्या पहिल्या खंडातील लेखात केला.

**(३) स्टीफन हेनिंनगम :** ऑस्ट्रेलियातील मेलबोर्न विद्यापीठातील इतिहास संशोधक स्टीफन हेनिंनगम यांनी बिहार आणि उत्तर प्रदेश येथील 'चले जाव' आंदोलनाचा अभ्यास केला. 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडातील आपल्या लेखात त्यांनी या भागातील १९४२ चे 'चले जाव' आंदोलन हे दुहेरी आंदोलन असून त्यात उच्चवर्गीय लोकांचा राष्ट्रवादी उठाव आणि 'सबालटर्न' लोकांचा विद्रोह हे एकत्रित दिसून येतात.

**(४) अरविंद नारायण दास :** सुप्रसिद्ध अभ्यासक आणि 'बिबिल्यो' या प्रसिद्ध समीक्षा नियतकालिकाचे संस्थापक संपादक यांनी १९४७-७८ याकाळात बिहार मधील शेती व्यवस्थेतील बदलांवरील लेख 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडात लिहिला. १९४७-७८ या काळात बिहारमध्ये झालेल्या शेतीव्यवस्थेतील बदलांचे कारण उच्चवर्गाद्वारे करण्यात आलेल्या जमीन सुधारणा होत्या असे मानने चूक ठरेल अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. जमीनदारी व्यवस्थेचे उच्चाटन आणि 'भूदान चळवळ' यांच्या माध्यमातून उच्चवर्गाकडून म्हणजेच 'वरून' जमीन सुधारणा राबवल्या गेल्या असे मानले जाते. मात्र अरविंद दास यांच्या मते, या सुधारणा स्वयंस्फूर्तीने राबवल्या गेल्या नसून बिहार मधल्या शेतकऱ्यांच्या असंतोषाला प्रतिक्रिया/प्रतिसाद म्हणून राबवल्या गेल्या. अरविंद दास यांनी अशी मांडणी केली की, स्वामी सहजानंद सरस्वती आणि शक्तिशाली किसान सभा यांनी अनेक वर्षे केलेल्या आंदोलनांमुळे बिहारमध्ये जमीनदारी उच्चाटनासाठी कायदा (१९५०) करण्यात आला. तसेच तेलंगणामध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सशस्त्र उठावानंतर (१९४६-५१) 'भूदान चळवळ' बिहार मध्ये सुरु झाली. ह्या दोन्ही जमीन सुधारणा या शेतकऱ्यांच्या असंतोषामुळे बिहार मध्ये वर्गसंघर्ष पेटू नये यामुळेच केल्या गेल्या अशी मांडणी अरविंद दास यांनी केली. उच्चवर्गाद्वारे केलेल्या सुधारणांमुळे शेतीव्यवस्थेत बदल झाले अशाप्रकारची कोणतीही कारणमीमांसा करणे हे 'वस्तूला न पकडता त्याच्या सावली मागे धावण्यासारखे' आहे, असे अरविंद दास यांना वाटते.

**(५) दिपेश चक्रवर्ती :** अमेरिकेतली शिकागो विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक असलेल्या दिपेश चक्रवर्ती यांनी १८९०-१९४० या काळात कलकत्यातील (सध्याचे कोलकाता) ज्यूट (ताग) कारखान्यातील कामगारांच्या स्थितीविषयीचा शोधनिबंध 'सबालटर्न स्टडीज'च्या दुसऱ्या खंडात लिहिला. अशाच प्रकारचा १९२०-५० याकाळातील ज्यूट कारखान्यातील कामगारांवरील लेख त्यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात देखील लिहिला. आपल्या संशोधनातून दिपेश चक्रवर्ती असे दाखवून देतात की, तत्कालीन कलकत्यातील समाजवादी आणि कम्युनिस्ट नेतृत्वात अभिजनवादी प्रवृत्ती विद्यमान होत्या. समाजवादी आणि कम्युनिस्ट नेते आपल्या नेतृत्वाखालील कामगार संघटनांना स्वत:च्या 'जमीनदारी' असल्याप्रमाणे प्रमाणे वागवत. तसेच कामगारांच्या सोबतचे त्यांचे संबंध हे 'बाबू-कुली' (मालक-गडी) यांच्या संबंधा इतके उतरंडीचे झाले होते.

**(६) शाहीद अमीन :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या शाहीद अमीन यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात महात्मा गांधींवर लिहिलेल्या लेखात शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्ये 'महात्मा'चा करिष्मा कशाप्रकारे रुजला होता याचा शोध घेतला. शाहीद अमीन यांना असे आढळून आले की, 'महात्मा' चा करिष्मा शेतकरी जाणिवांमध्ये रुजण्याचे महत्त्वपूर्ण कारण हे शेतकऱ्यांमध्ये चमत्कारासंबंधी असलेला विश्वास हे होते.

**(७) डेव्हिड हार्डीमन :** इंग्लंडमधील वॉर्विक विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या डेव्हिड हार्डीमन यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात दक्षिण गुजरात मधील आदिवासींमधील 'देवी' सुधारणा चळवळीवर शोधनिबंध लिहिला. या संशोधनातून हार्डीमन यांनी तो पर्यंत दुर्लक्षित असलेल्या आदिवासींच्या जाणिवांवर प्रकाश टाकला आणि समाजशास्त्रज्ञांद्वारे अधिक संशोधनाची गरज व्यक्त केली.

**(८) सुमित सरकार :** दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक असलेल्या सुमित सरकार यांनी 'सबालटर्न स्टडीज'च्या तिसऱ्या खंडात १९०५ मधील बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन आणि १९२१-२२ मधील असहकार-खिलाफत आंदोलन यांच्या मधील जनसामान्यांच्या सहभागावर शोधनिबंध लिहिला. सुमित सरकार यांच्या मते बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलनापेक्षा असहकार-खिलाफत आंदोलनात जनसामान्यांचा उत्साह आणि सहभाग तुलनेने जास्त होता. बंगालच्या फाळणी विरोधातील आंदोलन हे बंगाल मधील 'भद्र लोक' म्हणजेच हिंदू उच्चजातीय अभिजनांच्या पुरतेच सीमित होते. याउलट असहकार-खिलाफत आंदोलनातील जनसामान्यांचा उत्साह आणि पुढाकार इतका प्रचंड होता की त्यामुळे सावध झालेल्या आंदोलनाच्या नेत्यांनी आंदोलन थांबवण्याचे आवाहन केले, अशी मांडणी सुमित सरकार यांनी केली.

वरील संशोधकांबरोबरच रणजीत गुहा, एरिक स्ट्रोक्स, पार्थ चटर्जी, रामचंद्र गुहा, गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक, कांचा इलैय्या, गौतम भद्रा, ज्ञान प्रकाश इत्यादी संशोधकांनी आदिवासी, दलित, स्त्रिया आणि जनसामान्य इत्यादी शोषित-अंकित समूहांचा इतिहास 'सबालटर्न स्टडीज'च्या माध्यमातून मांडला.

**सबालटर्न इतिहासलेखनाचे मूल्यमापन :**

भारतातील पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांनी अभिजनवर्गाच्या दृष्टीकोनातून इतिहास लेखन केले. राष्ट्रवादी इतिहास लेखन आणि मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरेने देखील शोषित-अंकित जनसमुदायांच्या इतिहासाकडे दुर्लक्ष केले. अशा परिस्थितीत शोषित-अंकितांच्या दृष्टीकोनातून म्हणजेच 'तळाकडून' इतिहासलेखनाच आरंभ भारतात 'सबालटर्न स्टडीज'च्या म्हणजेच सबालटर्न इतिहासलेखन परंपरेच्या माध्यमातून झाला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील जनसामन्य लोकांचा सहभाग, या सहभागामागील त्यांच्या जाणीवा-प्रेरणा, त्या मागील त्यांचे स्वत:चे राजकारण-हितसंबंध इत्यादींचा अभ्यास सबालटर्न इतिहासलेखनाने केला. अशाच पद्धतीने आदिवासींचे उठाव आणि शेतकऱ्यांच्या बंड यांचा देखील अभ्यास केला. आदिवासी-शेतकरी यांच्या जाणीवा, उठावामागील कारणे, प्रतिकाराच्या पद्धती इत्यादींचा देखील अभ्यास सबालटर्न इतिहासकारांनी केला. स्त्रियांच्या जाणीवा, पितृसत्ता, स्त्रियांचे शोषण इत्यादी संदर्भातील संशोधनाची देखील सुरवात काही काळानंतर गायत्री चक्रवर्ती-स्पिवाक यांच्या लेखापासून झाली. त्याच

प्रमाणे दलितांचे शोषण, त्यांच्या जाणीवा, त्यांचा सांस्कृतिक प्रतिरोध यांच्या बाबतच्या संशोधनाचा देखील आरंभ उशिरा का होईना कांचा इलैय्या यांच्या लेखापासून झाला. अशारीतीने सबालटर्न इतिहासलेखनाने पारंपारिक इतिहासलेखनामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या जनसामान्य लोकांच्या, आदिवासींच्या, स्त्रियांच्या, दलितांच्या परीपेक्षातून इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन विकसित केला. अभिजन केंद्रित इतिहासामध्ये दुर्लक्षित राहिलेल्या समाज घटकांच्या इतिहासाची मांडणी केल्यामुळे भारताच्या इतिहासाचे एक वेगळे पदर सबालटर्न इतिहासकारांनी उघडून दाखवले.

सबालटर्न स्टडीजच्या नंतरच्या काळातील लेखांमध्ये उत्तर-आधुनिकतावादी दृष्टीकोन प्रभावी ठरू लागला. यातून सामाजिक आर्थिक रचनेत शोषित-अंकित जनाच्या शोषणाच्या कारणांचा आणि त्यांच्या प्रतिकारांचा अर्थ लावण्याऐवजी वर्चस्वी आणि शोषित/अंकित यांच्या संबंधावर भर देण्यात आला. सबालटर्न इतिहास लेखनासाठी काही नव्या प्रकारच्या साधनांचा म्हणजेच मौखिक परंपरा इत्यादींचा वापर सबालटर्न इतिहासकारांनी केला असला तरी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेली आणि सबालटर्न इतिहासकारांनी वापरलेली पुराभिलेखीय साधने ही मूलतः वर्चस्वी वर्गाचीच आहेत. अशा वर्चस्वी वर्गकेंद्रित साधनांच्या आधारे शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिताना मर्यादा येतात. असे असले तरी 'तळाकडून इतिहास' आणि भाषाशास्त्रीय-मनोविश्लेषण इत्यादी नव्या दृष्टीकोन आणि पद्धतीशास्त्रांचा उपयोग करून सबालटर्न इतिहासलेखन परंपरेने भूतकालीन घटनांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. भारतातील अभिजन केंद्रित इतिहासलेखनाच्या प्रवृत्तीला नाकारून शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिणे आणि शोषित-अंकित जनांच्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन करण्याच्या 'सबालटर्न स्टडीज'च्या इतिहासकारांची भूमिकेने भारतीय इतिहासलेखन परंपरेत मूलगामी बदल घडवून आणले. अभिजनकेंद्रित असण्याची जी उणीव भारतीय इतिहासलेखन परंपरेत होती ती भरून काढण्याच्या कामी सबालटर्न इतिहासलेखन परंपरेचे योगदान मोठे आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) १९८०च्या दशकात उदयाला आलेल्या संशोधक-अभ्यासकांच्या कोणत्या समूहाने भारतीय इतिहासलेखनाला प्रभावित केले?

(२) भारतातील कोणत्या समूहांना 'सबालटर्न' मानण्यात आले?

(३) 'सबालटर्न स्टडीज' च्या विविध लेखातील कोणता एक समान धागा असतो?

(४) शेतकऱ्यांच्या जाणिवांमध्ये रुजलेल्या 'महात्मा'च्या करिष्माचा शोध कोणी घेतला?

(५) 'सबालटर्न स्टडीज'चे प्रवर्तक म्हणून कोणास ओळखले जाते?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) अंतोनियो ग्रामचीचे ..........हे विसाव्या शतकातील मुलभूत लेखन मानले जाते.

(२) .......... विरोधातील आंदोलन हे बंगाल मधील 'भद्र लोक' यांच्या पुरते मर्यादित होते अशी मांडणी सुमित सरकार यांनी केली.

(३) इतिहास संशोधक स्टीफन हेनिंनगम यांनी बिहार आणि उत्तर प्रदेश येथील .......... आंदोलनाचा अभ्यास केला.

(४) भारतातील पारंपारिक इतिहासलेखन प्रवाहांनी..........च्या दृष्टीकोनातून इतिहासलेखन केले.

(५) अंतोनियो ग्रामचीने धुरिणत्व नसलेल्या शोषित-अंकित जनांसाठी .......... ही संकल्पना वापरली.

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **सुवर्णयुग :** सर्व क्षेत्रात भरभराट असलेला काळ
- **पितृसत्ता :** कुटुंबामध्ये किंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्कर पुरुष हा कुटुंब किंवा सत्ता प्रमुख असतो.
- **मातृसत्ता :** कुटुंबामध्ये किंवा सत्तेमध्ये सर्वात वयस्कर स्त्री ही कुटुंब किंवा सत्ता प्रमुख असते.
- **पुरुषसत्ताक :** पुरुषांचे वर्चस्व असलेली व्यवस्था
- **स्त्रीसत्ताक :** स्त्रियांचे वर्चस्व असलेली व्यवस्था
- **स्त्रीवाद :** स्त्री स्वातंत्र्याचा आणि समतेचा आग्रह धरणारी सामाजिक-राजकीय विचारप्रणाली
- **सबालटर्न :** धुरीणत्व (वर्चस्व) नसलेले तसेच शोषित-अंकित समाजगट
- **अभिजन :** समाजातील सत्ता संपन्न उच्च वर्ग
- **धुरिणत्व :** राजकीय, सामाजिक, आर्थिक अथवा सांस्कृतिक वर्चस्व

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- १

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) अरुण टिकेकर (२) लंडन (३) रोमिला थापर

(४) ना. वि. जोशी (५) गावाचा इतिहास

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) मुंबईचे वर्णन (२) लंडन (३) राष्ट्रीय

(४) स्थळ (५) नोट्स ऑन कोल्हापूर

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- २

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) ब्राम्हणी पितृसत्ता (२) स्त्रीवादी (३) स्त्रियांनी पितृसत्तेशी केलेला संघर्ष

(४) मानवी इतिहास्त्रिया (५) जातीव्यवस्था आणि 'ब्राम्हणी पितृसत्ता'

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) स्त्रीवादाच्या लाटा (२) कुमकुम रॉय (३) स्त्रीवाद

(४) उमा चक्रवर्ती (५) दलित स्त्रीवाद

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- ३

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) सबालटर्न (२) शेतकरी, आदिवासी, निम्नजाती, दलित, आणि स्त्रिया

(३) शोषित-अंकित समूहांच्या प्रतिकाराचा (४) शाहीद अमीन

(५) रणजीत गुहा

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) प्रिझन नोटबुक्स (२) बंगालच्या फाळणी (३) चले जाव

(४) अभिजनांच्या (५) सबालटर्न

## २.५ सारांश

इतिहासाचे पारंपरिक स्वरूप मर्यादित व अभिजन केंद्रित होते. मात्र, इतिहास लेखनाचा हा पारंपरिक दृष्टीकोन आता मागे पडला आहे. इतिहास म्हणजे राजा आणि राणी, युद्ध -लढाया असे समीकरण न राहता इतिहास म्हणजे मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी या अर्थाने 'मनुष्य' हा इतिहास लेखनाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच अंगोपांगांचा ऊहापोह आता इतिहासात आणि इतिहासलेखनात होणे अपेक्षित आहे. इतिहासातील नव-नवीन दृष्टीकोन व प्रवाहांमुळे इतिहासलेखन समृद्ध बनत आहे. इतिहासातील या विविध दृष्टीकोनाच्या बरोबर इतिहासाची आंतरविद्याशाखीय मांडणी होत आहे. इतिहासात केवळ समग्रलक्ष्यी इतिहासाला महत्व नसून अंशलक्ष्यी इतिहासही तितकाच महत्वाचा बनला आहे. त्याचबरोबर सध्यस्थितीत स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील दुर्लक्षित व वंचित घटकांचा, संस्कृतींचा, परंपरांचा सर्वांगीण अभ्यास करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. स्थानिक इतिहासकारांनी मौखिक साधने, प्रश्नावली इत्यादी पद्धतींचा वापर करून स्थानिक इतिहासात नवी भर टाकली आहे.

समाजाचा निम्मा भाग असलेल्या स्त्रियांच्या इतिहासाकडे जवळपास सर्व इतिहासलेखन प्रवाहांनी दुर्लक्ष केले होते. मात्र, स्त्रीवादाच्या उदयाबरोबर टप्प्याटप्प्यांनी जगात आणि भारतात स्त्रीवादी इतिहासाचा

विकास होत गेला. स्त्रीवादी इतिहासकारांनी प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ लावून स्त्रियांना दुय्यमत्व देणाऱ्या जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांच्या घनिष्ट संबंधाची मांडणी केली. आधुनिक काळात राष्ट्रवादाच्या उदया बरोबर स्त्रियांना नव्याने साचेबद्ध करण्याची प्रक्रिया राबवली गेली याचा उलघडा स्त्रीवादी इतिहासकारांनी केला.

अंतोनियो ग्रामची याच्या 'सबालटर्न' संकल्पनेचा वापर करून भारतातील शोषित-अंकित जनांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न 'सबालटर्न इतिहासलेखन' परंपरेने केला. अभिजन वर्गाशिवाय इतर जे समाजघटक जे शोषित आणि अंकित होते त्यांची इतिहासातील भूमिका कशाप्रकारची होती याचे विश्लेषण 'सबालटर्न इतिहासलेखन' परंपरेने केले. स्थानिक, स्त्रीवादी आणि सबालटर्न या तीनही इतिहासलेखन परंपरामध्ये मुख्य प्रवाही इतिहासलेखनात दुर्लक्षित राहिलेल्या घटकांचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला. इतिहासाच्या या नव्या प्रवाहांमुळे छोट्या-छोट्या खेड्यांचा-शहरांचा, स्त्रिया, दलित, आदिवासी, कामगार, शेतकरी इत्यादी समाजाच्या तळातील शोषित घटकांचा इतिहास समोर आला. या तीन नव्या इतिहासलेखन प्रवाहांच्या माध्यमातून इतिहासचे नवे आकलन व मांडणी आकारास आली.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) 'स्थानिक  इतिहास' ची संकल्पना स्पष्ट करून त्याची सविस्तर चर्चा करा.

(२) स्त्रीवाद' ही संकल्पना स्पष्ट करून स्त्रीवादी इतिहासलेखनाचा आढावा घ्या.

(३) स्त्रीवादी इतिहासाच्या विकासाचे टप्पे स्पष्ट करा.

(४) 'सबालटर्न' ही संकल्पना स्पष्ट करून सबालटर्न इतिहासलेखनाच्या आरंभाची चर्चा करा.

(५) सबालटर्न इतिहासलेखन परंपरेची चिकित्सा करा.

ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

(१) स्थानिक इतिहासलेखनाचे महत्त्व

(२) स्थानिक इतिहासलेखनाचा आरंभ

(३) भारतातील स्त्रीवादी इतिहास

(४) सबालटर्नची संकल्पना

(५) 'सबालटर्न स्टडीज' चे खंड

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Shaikh Ali, B, 'History : its Theory and Method', Manohar Publication, Delhi, 1979

2) Sreedharan, E., 'A Textbook of Historiography, 500 B.C. to A.D. 2000', Orient Blackswan, 2004

३) कोठेकर शांता, 'इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, २०११

४) सरदेसाई, बी., एन., 'इतिहासलेखनपद्धती', फडके प्रकाशन, कोल्हापूर २००४

५) गायकवाड आर. डी., सरदेसाई बी.एन., हनमाने व्ही. एन., 'इतिहासलेखनशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६

६) देव, प्रभाकर, 'इतिहासशास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा', ब्रेनटॉनिक प्रकाशन. नाशिक, २००७

७) वांबूरकर, जास्वंदी, 'इतिहासातील नवे प्रवाह', डायमंड पब्लिकेशन, पुणे २०१४

८) इतिहासलेखनमीमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड-१, लोकवाङ्मय गृह, २०१०


❑❑❑

# घटक ३
# साधने (Sources)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ साधने: लिखित, अलिखित आणि मौखिक (Sources: Written, Unwritten and Oral)

३.२.२ अंतरंग व बाह्यरंग परीक्षण (Internal and External Criticism of Written Sources)

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिति स्पष्ट करता येईल.

- ऐतिहासिक संदर्भ साधनांचे वर्गीकरण करता येईल.
- लिखित संदर्भ साधनांचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- लिखित व अलिखित संदर्भ साधनांचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- संदर्भ साधने कोणत्या पद्धतीने प्राप्त करतात याचे ज्ञान होईल.
- मौखिक इतिहास म्हणजे काय? ते स्पष्ट करता येईल.
- मौखिक संदर्भ साधनांचे प्रकार सांगता येतील.
- अंतरंग व बाह्यरंग परीक्षण म्हणजे काय ते सांगता येईल.

**३.१ प्रस्तावना :**

ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ ज्याच्या आधारे काढता येतो अथवा ज्यांच्यामधून इतिहास लेखनासाठी उपयुक्त सत्य माहिती मिळते अशा वस्तू अथवा वास्तू, लिखित अथवा अलिखित साधनांना सर्वसाधारणपणे इतिहासाचा पुरावा किंवा संदर्भ साधन असे म्हटले जाते. इतिहासलेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक लेखणास पुरावा किंवा संदर्भ देणे महत्त्वाचे असते. प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड यांनी म्हटल्याप्रमाणे ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण करतात व हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्याशिवाय लिहिलेले अथवा बोललेला इतिहास असत नाही. कोणत्याही इतिहासकालीन घटना किंवा गोष्टींचा पुरावा देणाऱ्या वस्तूला साधारणपणे इतिहासाचे साधन असे म्हणतात. साधन या शब्दाला कागदपत्रे हा पर्यायी शब्द आहे. साधन म्हणजे नेमके कशाला म्हणावे या संबंधी तीन महत्वाच्या व्याख्या Shorter Oxford English Dictionary मध्ये खालील प्रमाणे आहेत.

१) ज्यामधून पुरावा आहे असे दिसून येते ते साधन.

२) ज्यामधून सहजासहजी पुरावा दृष्टीस पडतो ते साधन.

३) ज्याचा निर्णय देता येईल किंवा जाणून घेता येईल असे कोणतेही साधन.

वरील तीन महत्वाच्या विधानावरून साधनांच्या व्याख्खे संदर्भात असे म्हणता येईल की, इतिहास लेखनासाठी साधने महत्वाची आहेत. कोणत्याही शास्त्राचा मुख्य आधार साधने अथवा पुरावा असतो. पुराव्या शिवाय कोणतीही गोष्ट सिद्ध करता येत नाही. विश्‍वसनीय संदर्भ साधने व त्या साधनांच्यासाठी वापरात आणलेली शास्त्रशुद्ध मूल्यमापन पद्धती या दोन बाबी इतिहास लेखनासाठी महत्वाच्या आहेत. थुसिडीडीज यांने संदर्भ साधनांचे महत्व विशद करताना म्हंटले आहे की, ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, तंतोतंत वर्णन करणे महत्वाचे आहे. त्यास योग्य साधने जमिवणे आवश्यक आहे. अशा घटना जमिवल्या पाहिजेत की, त्यापासून भविष्यात मानवाला काही धडा मिळू शकेल. थोडक्यात साधन अथवा पुरावा म्हणजे काया हे स्पष्ट करताना असे म्हणता येईल की, गतकालीन घटनांचे, वाटचालीचे, समाजजीवनाचे, संस्कृतीचे, कला अभिव्यक्तीचे असंख्य धागेदोरे, पुरावे या गतकाळाच्या पाऊलखुणा म्हणजेच इतिहासाची साधने होत.

**साधनांचे स्वरूप :**

ऐतिहासिक साधनांचे स्वरूप भिन्न प्रकारचे असून ते कलपरत्वे बदलत गेलेले दिसते. उदा. अश्मयुगीन इतिहासाची साधने वस्तु किंवा वास्तु स्वरुपात आढळतात तर मध्ययुगीन अथवा आधुनिक काळातील साधने लिखित स्वरुपात मिळतात. इतिहासाची व्याप्ती जस जशी वाढत जाते तस-तसे साधनांचे स्वरूपही बदलत जाते. मानव अथवा मानवी संस्कृतीपर्यन्त झालेला आहे. मानवी विकासाची ही स्थित्यंतरे विविध टप्प्यात झालेली आहेत. या विविध स्थित्यंतराचा व टप्प्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध स्वरूपाची साधने इतिहास लेखनासाठी महत्वाची आहेत.

कालपरत्वे ऐतिहासिक साधनांच्या स्वरुपात बदल व विकास झालेला दिसतो. पुरातत्वीय वस्तू किंवा वास्तू, विविध कलाकृती, कागदपत्रे, वाङ्मय, नाणी, शस्त्रास्त्रे अशी अनेक विविध साधने काळानुरूप सापडतात. इतिहासाच्या साधनांचे स्वरूपानुसार वर्गीकरण केले जाते. साधनांच्या स्वरूपानुसार प्रामुख्याने तीन विभागात वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे,

१) लिखित साधने

२) अलिखित अथवा पुरात्वीय साधने

३) मौखिक साधने

याशिवाय इतिहासाच्या अभ्यासासाठी कालखंडानुसार पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१) प्राचीन कालखंड

२) मध्ययुगीन कालखड

३) आधुनिक कालखंड

**कालखंडानुसार साधनांचे स्वरूप**

| प्राचीन कालखंड | मध्ययुगीन कालखंड | आधुनिक कालखंड |
|---|---|---|
| दगडी हत्यारे | ताम्रपट | शासकीय दस्तऐवज |
| प्राणी/मानवी सांगाडे | हस्तलिखिते | खाजगी पत्रव्यवहार |
| मातीची भांडी | दरबारी कागदपत्रे | आत्मचरित्र |
| दगडी अवजारे | इतिवृत | आठवणी |
| धातूची अवजारे/शस्त्रास्त्रे | प्रवास वर्णने | अहवाल |
| धातूची भांडी | आज्ञापत्रे | सर्वेक्षण |
| खेळणी/मनोरंजन साधने | जमाखर्च कागदपत्रे | वर्तमानपत्रे |
| अलंकार/आभूषणे | चरित्र ग्रंथ | भाषण संग्रह |
| विविध प्रकारचे मणी | निवडा पत्रे | गुप्त अहवाल |
| नाणी | बातमी पत्रे (अखबरात) | नियतकालिक |
| इमारती/नगराचे अवशेष | आत्मवृते | मुलाखती |
| गुहाचित्रे | रोजनिशी | प्रश्नावली |
| शिलालेख | तवारीखा | संसदीय कागदपत्रे |
| ताम्रपट | बखरी | इतिवृते |
| प्राचीन शिल्पाकृती | शकावल्या | प्रवासवर्णने |

| | | |
|---|---|---|
| वेद वाड:मय | करीने | नाणी |
| महाकाव्ये | महजर | परकीय कागदपत्रे |
| स्मृतीशिळा | वंशावळी | चरित्र ग्रंथ |
| पुराणे | कुळकुटी | टी. व्ही बातमीपत्रे |
| बौद्ध वाड:मय | धार्मिक साहित्य | रेडिओ बातमीपत्रे |
| जैन वाड:मय | खाजगी पत्रव्यवहार | साप्ताहिके |
| संगम साहित्य | प्रांतिक साहित्य | कादंबरी |
| प्रवासवर्णने | लोक साहित्य | लोक साहित्य |
| लेण्या/गुहा मंदिरे | मंदिरे /मठ/चर्च/मशिदी | मौखिक साहित्य |
| चैत्यगृह/विहार | स्मारके/वाडे | |
| मूर्तिशिल्पे | परकीय कागदपत्रे | |

**३.२.१ साधने : लिखित, अलिखित आणि मौखिक** (Sources: Written, Unwritten and Oral)

**अ) लिखित साधने :**

मानवास लेखन कला अवगत होण्यापूर्वी तो आपल्या जीवनातील काही प्रसंग व आपल्या भावना चित्रस्वरुपात व्यक्त करित होता. जगामध्ये विविध ठिकाणी सापडलेल्या गुहा चित्रावरून स्पष्ट होते. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर लेखन कला अवगत होत गेली. ही लेखन कला विविध लिप्या व भाषामध्ये विकसित झाली व वाढली. बौध्दिकदृष्या सक्षम झालेल्या मानवाने आपल्या लेखन कलेच्या जोरावर विपूल साहित्याची निर्मिती केली. तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, रुढी, परंपरा, आचार- विचार, आहार- विहार इत्यादी संबंधी लिखाण केले. साहित्याच्या या माध्यमातून आपण गतकाळीन घटना व इतिहासावर प्रकाश टाकू शकतो. प्राचीन ते आधुनिक काळातील विविध स्वरुपाच्या लिखित कागदपत्रात अथवा वाङ्मयास लिखित संदर्भ साधन असे म्हणतात.

इतिहासलेखन प्रक्रियेत लिखित संदर्भ साधनांचे महत्व अनन्य साधारण आहे. लिखित ऐतिहासिक साधनांच्या आधारावरच इतिहासाची रचना अवलंबून असते. इतिहासाची ही साधने आपणास दोन स्वरुपात प्राप्त होतात किंवा केली जातात, १) लिखित संदर्भ साधने २) अलिखित संदर्भ साधने. लिखित संदर्भ साधनांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम साधने असे उपप्रकार पडतात. परंतु इतिहास लेखन प्रक्रियेत लिखित- अलिखित किंवा प्राथमिक-दुय्यम साधने परिपूर्ण इतिहासासाठी कमी-अधिक प्रमाणात तितकीच महत्वाची असतात. आपणास या उपघटकात लिखित प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा अभ्यास करावयाचा आहे.

**लिखित प्राथमिक साधने :**

इतिहास लेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून प्राथमिक संदर्भ साधनास अतिशय महत्वाचे स्थान आहे. प्राथमिक संदर्भ साधन म्हणजे एखादी घटना घडत असताना लेखन कर्ता त्या घटनेत सहभागी असतो. किंवा

त्याने ती घटना प्रत्यक्ष पाहिलेली असते की ज्याचा तो साक्षीदार असतो. त्या साक्षीदाराने लिहून ठेवलेल्या साहित्यास प्राथमिक संदर्भ साधन असे म्हणतात. घटना घडत असताना निर्माण झालेली साधने किंवा त्या घटनेच्यानंतर काही काळानंतर लिहिली गेलेली हस्तलिखिते किंवा ग्रंथ यांना प्राथमिक संदर्भ साधन असे म्हणतात. हस्तलिखिते किंवा ग्रंथ यांना प्राथमिक संदर्भ साधने ही जरी इतिहास लेखनाचा पाया जरी असली तरी ती विखूरलेली व त्रोटक असतात. ऑर्थर मॉर्विक यांनी म्हटल्या प्रमाणे ती साधने कच्या माला सारखी असतात. की ज्या कच्च्या मालावर प्रक्रिया केल्यावर ज्याप्रमाणे एखादी वस्तू तयार होते. त्याप्रमाणे या साधनांच्यावर इतिहासकार भाष्य अथवा विवेचन करुन ऐतिहासिक घटनेला इतिहासाचे मूर्त रुप देत असतो.

प्रा. कार्ल गुस्तावसन यांनी आपल्या "The Preface to History" या ग्रंथात प्राथमिक संदर्भ साधनाची व्याख्या करताना असे म्हणतात की केवळ एका ठिकाणी सापडणारी, त्याखेरीज इतरत्र न सापडणारी मुळ स्वरुपातील, त्यात कोणताही बदल न झालेली किंवा त्यावर कोणतीही प्रक्रिया न झालेली समकालीन साधने म्हणजे मूळ किंवा प्राथमिक साधने होय. उदा. पानिपतच्या तिसऱ्या युध्दाच्या वेळी उपस्थित असलेली माहिती किंवा महादेव देसाई यांनी महात्मा गांधीच्या चळवळी विषयी केलेले लिखाण. प्रा. आर्थर मार्विक यांनीही प्राथमिक संदर्भ साधनांची व्याख्या करताना म्हटले आहे की, एकाच माणसाच्या हस्ताक्षरात जो व्यवहार घटला त्याची माहिती देणारे जी कागदपत्रे असतात किंवा एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला विश्वासाने सांगितल्यामुळे जे लिहून ठेवलले असते किंवा सामुदायिक निर्णय तेव्हा घेतलेला असतो, काही प्रश्नांची अशा कागदपत्रामध्ये उत्तरे दिलेली असतात. तसेच एखाद्या प्रकरणामध्ये सरकारचे अंतिम धोरण सांगितले जाते. अशा कागदपत्रांना प्राथमिक साधने असे म्हणतात.

डॉ. शांता कोठेकर यांनी 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान' या आपल्या ग्रंथात प्राथमिक संदर्भ साधने कशाला म्हणावीत या संदर्भात खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

१. संशोधक ज्या काळातील विषयाचा अभ्यास करीत असेल त्या काळातील समकालीन साधने ही अस्सल दर्जाची असतात.

२. संशोधक एखाद्या घटनेचा किंवा प्रसंगाचा अभ्यास करीत असेल तर त्या घटनेत सहभाग असलेल्या व्यक्तीची त्या संबंधीची कागदपत्रे मूळ साधनात मोडतात.

३. प्रत्यक्ष घटनेत सहभागी नसलेली; परंतु प्रत्यक्ष घटना डोळ्यांनी पाहिलेल्या व्यक्तिनी लिहून ठेवलेली कागदपत्रे.

४. एखाद्या व्यक्तीने लिहून ठेवलेले आत्मवृत्त व दिनवृत्त इत्यादी.

५. एखाद्या व्यक्तीने समकालीन व्यक्ती संबंधी केलेले लिखाण.

६. समकालीन वस्तुरुप साधने, उदा. इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुराणवशेष, मूर्ती, नाणी इत्यादी. समकालीन कागदपत्राच्यामधून त्या त्या घटनेविषयी किंवा व्यक्तीबद्दल विश्वसनीय माहिती प्राथमिक संदर्भ साधनामधून मिळत असल्यामुळे प्राथमिक संदर्भ साधताना मूलभूत साधने असे म्हणतात.

**१) समकालीन कागदपत्रे :**

इतिहासलेखनाच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात समकालीन कागदपत्रे अतिशय महत्वाची असतात. समकालीन कागदपत्राच्या साहयाने त्या काळातील वस्तुस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत होते. ही कागदपत्रे अतिशय स्पष्ठ व महत्वाची बिनचूक माहिती देणगी असतात. समकालीन कागदपत्रामधून राजकीय, सामाजिक व समकालीन इतर महत्वाच्या घडामोडीसंबंधी असंख्य बाबीचा समावेश यामध्ये असतो. उदा. रोजनिशी, मुल्यपत्रे, पत्रव्यवहार, वृत्तपत्रे इत्यादी समकालीन कागदपत्राच्या संदर्भात प्रो. गॉसचॉक असे म्हणतात की, एखाद्या घटनेसंबंधी सूचना देण्याच्या उद्देशाने अथवा घटनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तीस स्मरण करून देण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या कागदपत्रात समकालीन कागदपत्रे असे म्हणतात. उदा. कोर्टामधील कागदपत्रे, रेडिओ, वृत्तवाहिनीवरील चर्चा इत्यादी विविध राज्यकर्त्यांनी एकमेकांना केलेला पत्रव्यवहार देखील समकालीन कागदपत्रामध्ये येतो. उदा. कॅप्टन बॉडरनगे पाठविलेली 'लेटर्स फ्रॉम दि मराठा कॅम्प'.

**अ) सरकारी कागदपत्रे :**

सरकारी कागदपत्रे म्हणजे प्रशासकीय दृष्टीकोनातून केलेला पत्रव्यवहार समाविष्ठ असतो. यामध्ये प्रशासकीय जमीन महसून विषयक कागदपत्रे, मांडलिक राज्यकर्त्याकडून मिळालेल्या खंडणीच्या व्यवहारासंबंधी कागदपत्रे, कर्ज रोखे, सनदा, इनामपत्रे, शाही फर्माने तसेच आधुनिक सरकारी कागदपत्रामध्ये सरकारतर्फे प्रसिध्द केली जाणारी खानेसुमारीची आकडेवारी, विविध खात्याचे अहवाल, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, प्रत्येक राज्याच्या विधानसभा व विधान परिषदेची इतिवृत्त, लोकसभा व राज्यसभेची इतिवृत्त, गृहखात्याचे अहवाल

भारतामध्ये १७ व्या शतकापासूनच्या सर्वच सरकारी कागदपत्राचे जतन शासकीय पुराभिलेखागारातून केलेले आहे. याशिवाय अनेक इतिहास संशोधकांनी मराठाकालीन खाजगी परंतु सरकारी कागदपत्राचे संकलन व संपादन केलेले आहे उदा. रियाझकार गो. स. सरदेसाई यांनी संपादीत केलेले पेशवे दप्तराचे ४५ खंड, वि. का. राजवाडे यांनी संपादीत केलेली मराठ्यांच्या इतिहासाची साधने, २२ खंड व ग. चि. वाड यांनीही १३ खंडांचे संपादन केलेले आहे. भारतामध्ये ज्या परकीय व्यापारी कंपन्या झालेल्या होत्या त्यांनीही आपल्या मायदेशी राज्यकारभारा संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराचा समावेश होतो. ब्रिटिशानी केंद्रीय पुराभिलेखागारांची निर्मिती करून सरकारी कागदपत्रे व दप्तर सांभाळण्याचा प्रयत्न केला व सरकारी कागदपत्राच्या संदर्भात गुप्ततेचा कायदा ही केलेला आहे. ब्रिटिश काळापासूनची सरकारी कागदपत्रे भारतातील सर्व पुराभिलेखागारांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

**ब) गुप्त पत्रव्यवहार :**

गुप्त पत्रव्यवहाराला इतिहासलेखनामध्ये खूप महत्वाचे स्थान आहे. राजकीय व लष्करी इतिहासाच्या मांडणीसाठी गुप्त पत्रव्यवहार अनेक घटनावर प्रकाश टाकण्यास साहयाभूत ठरतो. गुप्तपत्रव्यवहार हा अधिकारी वर्ग व सरकार अथवा राज्यकर्ते यांच्याशी संबंधीत असतो. याशिवाय खाजगी गुप्त व्यवहारांचाही

समावेश असतो. लष्करामध्ये अशाप्रकारचा गुप्त पत्रव्यवहार खूप मोठ्या प्रमाणावर होत असतो. उच्च लष्करी अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, पोलिसाचे गोपनीय अहवाल, उच्चश्रेणीतील सरकारी अधिकाऱ्यांचे अहवाल, कनिष्ठ अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना पाठवलेली गोपनीय निरीक्षणे व अहवाल, इत्यादी यामध्ये समावेश होतो. ज्यांनी ही पत्रे किंवा अहवाल लिहिलेले असतात. त्या व्यक्ती व ज्यांनी ही पत्रे पाठवलेली असतात. त्या दोन्ही व्यक्ती एकमेकाच्या विश्वासातील असतात. उदा. सन १८५७ च्या उठावाच्या अगोदर व उठाव चालू असताना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जो गुप्त पत्रव्यवहार इंग्लंडमधील अधिकाऱ्यांशी केलेला होता त्यामधून १९५७ च्या उठावासंबंधी घटनावर अधिक प्रकाश पडतो. ब्रिटिश काळापासूनच्या भारतातील गुप्तवार्ता विभागाच्या डायऱ्या आज उपलब्ध आहेत. यामधील नोंदीही गुप्त स्वरुपाच्याच आहेत. या डायऱ्याच्या मधून भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर वेगळ्या दृष्टीकोनातून प्रकाश पडतो.

**क) सार्वजनिक सरकारी कागदपत्रे :**

सार्वजनिक कागदपत्रे म्हणजे सरकारच्या वतीने प्रसिध्द होणारी कागदपत्रे होय. उदा. हुकुमनामा किंवा जाहीरनामा इत्यादी स्वरुपाची कागदपत्रे सार्वजनिक कागदपत्रात मोडतात. गुप्त कागदपत्राच्या पेक्षा सार्वजनिक कागदपत्रे भिन्न स्वरूपाची असतात. उदा. मुघलकालीन अकबरात ही सार्वजनिक कागदपत्रात मोडतात.

**२) खाजगी कागदपत्रे :**

एखाद्या राजकीय व्यक्तीने, लष्करी अधिकाऱ्याने, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी खाजगीत केलेल्या नोंदीचा समावेश खाजगी कागदपत्रामध्ये होतो. या कागदपत्राच्या मध्ये व्यक्तीगत जीवनापासून सार्वजनिक क्षेत्रातील राजकीय, सामाजिक, आर्थिक घटनांचा समावेश असतो. असा पत्रव्यवहार काही वर्षा नंतर अथवा दशकांच्या नंतर उजेडात येतो किंवा प्रकाशित केला जातो. यामधून इतिहास लेखनास महत्वाची माहिती मिळते. ही कागदपत्रे एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकू शकतात. परंतु त्याचबरोबर समकालीन इतर अनेक घटनावर प्रकाश टाकते. खाजगी कागदपत्राच्या मधून आलेली माहिती एकांगी, पक्षपाती व पूर्वग्रहदूषित असू शकते. त्यामुळे इतिहास संशोधकांनी अशा कागदपत्राची खातरजमा करून लिखाण करावे. अनेक मोठमोठ्या व्यक्तीचा खाजगी पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे उदा. बाळासाहेब खेर, शकंरराव देव, महात्मा गांधी, भूलाभाई देसाई, यशवंतराव चव्हाण, सरदार वल्लभाई पटेल, जी. के. गोखले, ना. वि. गाडगीळ, शंकरराव मोरे, आचार्य आत्रे. अशा कितीतरी व्यक्तीचा पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे.

**ब) रोजनिशी अथवा डायऱ्या :**

रोजनिशी अथवा डायरी हे इतिहासलेखनासाठी महत्वाचे साधन ठरू शकते. अनेक इतिहास प्रसिध्द व्यक्तीनी आपल्या रोजनिशी अथवा डायऱ्या लिहून ठेवलेल्या आहेत. या डायऱ्यामधून त्या व्यक्तीच्या दैनंदिन जीवनातील घडामोडीची नोंद केलेली असते. उदा. ग. चि. वाड यांनी पेशव्यांच्या रोजनिशी संपादीत केलेल्या आहेत. या डायरीवरुन तत्कालिन सामाजिक, आर्थिक व राजकीय धोरणावर प्रकाश पडतो. काही प्रसंगी रोजनिशीतील माहिती अर्धवट, अपूर्ण किंवा अतिशयोक्तीपूर्ण किंवा खोटीही असू शकते.

**क) आठवणी किंवा आत्मवृत्ते :**

राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी प्रशासकीय जीवनात काम करणाऱ्या जगातील अनेक श्रेष्ठ व्यक्तीनी आपल्या आठवणी अथवा आत्मवृत्ते लिहिलेली आहेत. त्यांच्या लिखाणामधून ही तत्कालीन अनेक घटनांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते. मध्ययुगीन कालखंडात 'तुझुक-एबाबरी' (बाबरनामा) हा ग्रंथ खुद्द बाबराने आत्मचरित्रावर लिहिला त्याचबरोबर 'तुझुक-ए-जहागिरी' हे आत्मचरित्र स्वत: जहाँगिराने लिहिले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आठवणी प्रा. गो. मा. पवार यांनी संपादीत केलेल्या आहेत. महात्मा गांधी यांनी 'माझे सत्याचे प्रयोग', प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांचे 'माझी जीवनगाथा', सेतुमाधवराव पगडी यांचे 'जीवन सेतु', माधवराव बागल यांचे 'जीवन प्रवाह' अशी आत्मवृत्ते आज प्रकाशित आहेत. या आठवणी किंवा आत्मावृत्तातून समकालीन विविध घटनावर दृष्टीक्षेप पडतो.

**३) राजकीय तह-करार :**

राजकीय तह किंवा करारनामे हे इतिहासाचे अत्यंत महत्वाचे अस्सल साधन आहे. तह किंवा करारनामा अनेक कलमाचा असतो. प्राचीनकाळापासून जगाच्या इतिहासात तह किंवा करारनामा करण्याची प्रथा अस्तित्वात होती. मध्ययुगीन कालखंडापासूनचे विविध राजवटीतील अनेक तह व करारनामे अजूनही उपलब्ध आहेत. या कागदपत्राच्यामधून तत्कालीन राजकीय व लष्करी जीवनावर प्रकाश पडतो. उदा. ग.चि. वाड यांनी पेशवेकालीन करार व तहनामे संपादीत केलेले आहेत. तह व करारपत्रे यामधून तत्कालीन राजकीय परिस्थिती, राजे त्यांच्या राज्याच्या सिमा व तहातील कलमावरून त्या तहाचे कशाप्रकारे परिणाम झाला याविषयी माहिती मिळते.

**४) प्रवास वर्णने :**

प्राचीन काळापासून भारतात येऊन गेलेल्या परकीय प्रवाशांनी लिहिलेली प्रवासवर्णने ही प्राथमिक संदर्भ साधन मानले जाते. प्राचीन भारताचा अभ्यास करताना मेगॅस्थेनिसचे 'इंडिका' एका अनामिक प्रवाशाने लिहिले 'पेरिप्लस ऑफ दि इरिथ्रिमनशी', टॉलेमीचा भारताचा भुगोल इत्यादी लिखाण महत्वाची माहिती देतात. चिनी प्रवासी युआॅन च्वांग यांचे 'तांतागसियुली', इत्सिगचे प्रवासवर्णन प्राचीन भारतातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती देतात.

मध्ययुगीन काळात आलेला मोरोक्कन प्रवासी इब्ज बतुता यांने लिहिलेले 'किताब-उल-रहेला', पर्शियन वकिल अब्दुर रझाक, फ्रॉन्सचा प्रवासी जॉन ऑफ ऑटे कोर्विनो मार्को पोलो, निकोलो कोटी, रशियन व्यापारी अयन्सिसन निकीतीन व इटलीया लुडोव्होको दी वथेगा इत्यादी. पोर्तुगालचा बार्बोसा व डोमिगोज पीस, इग्लंडमधून आलेले कॅप्टन हॉकीन्स, सर थॉमस रो, फ्रान्समधून आलेला फ्रान्सिस बर्नियर, थेवेनॉट, ॲबे कॅरे, ड्रेवेनिथर फ्रॉन्सिस मॉटिन व जॉन फ्रायर इत्यादीची प्रवास वर्णने मध्ययुगीन भारताच्या संदर्भात बहुमोल माहिती देतात. या प्रवास वर्णनामध्ये त्यांची भाषिक अडचण असो अथवा त्यांचा

भारताकडे पाहण्याचा दृष्टीकोण असो काही प्रमाणात चूकीची माहितीही आलेली दिसते. त्या संदर्भात इतिहास अभ्यासकानी ती माहिती तपासून घेतली पाहिजे.

**५) जमाखर्चाच्या नोंदी :**

कोणत्याही राजवटीतील व प्रशासनातील जमाखर्च हा इतिहासलेखन शास्त्राच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाचा पुरावा मानला जातो. जमाखर्चाच्या नोंदी म्हणजे त्या राज्याचा आर्थिक आरसा मानल्या जातात. याच्या माध्यमातून उत्पन्नाच्या बाजू व खर्चाच्या बाजू या संदर्भात माहिती मिळते. पेशवेकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून पेशवे श्रावणमासामध्ये किती मोठ्या प्रमाणात ब्राह्मणांना दान व ब्राह्मण भोजन करत होते यावर प्रकाश पडतो. मुघलकालीन जमाखर्चाच्या नोंदीवरून थॉमस एडवर्ड यांने "Revenue Resources of the Mughal empire from 1593 to 1707' हा उत्कृष्ठ ग्रंथ लिहिलेला आहे.

**ब) दुय्यम संदर्भ साधने :**

इतिहासलेखनास सोपस्करपणा यावा व संदर्भसाधनांची उपयुक्तता आधोरेखित करण्याच्या दृष्टीने इतिहासाच्या साधनांचे प्राथमिक व् दुय्यम अशा दोन प्रमुख विभागात वर्गीकरण केले जाते. यामध्ये 'प्राथमिक' म्हणजे अधिक दर्जेदार व 'दुय्यम' साधनांनाही महत्व आहे. 'दुय्यम' हा शब्द त्या साधनाचे मुल्य अथवा दर्जा दर्शवित नाही. परंतु ज्यांनी ती घटना पाहिलेली असते त्यांनी ती काही काळाने दुसऱ्याला सांगितलेली असते व त्यांनी त्या घटनेचा वृत्तांत लिहून ठेवलेला असतो. म्हणजेच त्या घटनेचा लेखनकर्ता प्रत्यक्ष साक्षीदार नसतो, परंतु त्यांने ती लिहून ठेवलेली असते. एखादी घटना घडून गेल्यानंतर काही काळानंतर स्मृतीच्या आधारे लिखाण केलेले असते त्यामुळे त्यात चूका होण्याची बरीच शक्यता असते. एखादया व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली तरी 'केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पूर्णपणे जशीची तशी सत्यता येण्याची शक्यता फारच कमी असते. यामुळे या लिखित साधनाला दुय्यम संदर्भ साधन असे म्हटले जाते'.

वास्तविक पाहता प्राथमिक साधनावरच दुय्यम साधने अवलंबून असतात. त्यामुळे दर्जाच्या दृष्टीकोणातून ती दुय्यम ठरत असली तरी त्याचीही विश्वासार्हता प्राथमिक साधनांच्या सारखीच असते. कीथ जेन्किन्स दुय्यम संदर्भ साधना संदर्भात असे म्हणतात की, ''दुय्यम साधनातुन कधी-कधी इतकी मूळ स्वरुपाची माहिती मिळते की त्यामुळे प्राथमिक व मूळ साधनामधील भेद गळून पडतो'' ऑर्थर मार्विक यांनीही दुय्यम संदर्भ साधनांची समर्पकता स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''प्राथमिक साधन हा कच्चा माल असून तो सामान्य वाचकापेक्षा संशोधकाला अधिक मोलाचा असतो; दुय्यम साधन हे मूळ साधनावर आधारलेले असले तरी असे ग्रंथ सुसंगत माहिती देणारे असल्यामुळे, बुद्धिमान, सामान्य वाचकाला तसेच संशोधकालाही मोलाचे ठरतात.''

**दुय्यम संदर्भ साधनांचे प्रकार :**

बखरी

↓

कुळकटी

↓

बाडे

↓

वंशवेली

↓

न्यायनिवाड्याची कागदपत्रे

↓

शकावल्या

↓

चरित्रग्रंथ

↓

करिने

↓

महजर

↓

प्राचीन व मध्ययुगीन साहित्य

वरील साधनांना दुय्यम साधने म्हणण्याची प्रमुख दोन कारणे आहेत.

१. दुय्यम साधनांच्या मधून संबधित लेखकाने स्वतःचे मत मांडले असण्याची शक्यता असते.

२. संशोधकाने वापरलेल्या मूळ साधनांच्या अर्थ आपल्य मतानुसार व विचार सरणीनुसार लावण्याची शक्यता असते.

दुय्यम संदर्भ साधने जरी दर्जाने दुय्यम असली तरीही त्यांचे इतिहास लेखनामध्ये महत्व हे आहेच. ते पुढील प्रमाणे

१. अभ्यास विषयाचे साकल्याने ज्ञान होण्यासाठी व विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्यासाठी

२. अशा संदर्भ साधनापासून संदर्भ ग्रंथाची यादी तयार करणे सोपे जाते.

३. आपल्या विषयाला अनुकुल आशा अवतरणासाठी व उपलब्ध माहितीत असलेल्या उणिवांची पूर्तता करण्यासाठी संशोधकास एखाद्या विषयावर नव्याने भाष्य करण्यासाठी अथवा नव्याने कारणमीमांसा करण्यासाठी दुय्यम साधनाचा उपयोग अधिक प्रमाणात होतो. प्रा. गॉसचॉक यांनी दुय्यम साधने शास्त्रीय परीक्षणावर टिकली पाहिजेत असे मत व्यक्त केले आहे व दुय्यम संदर्भ साधनाबाबत संशोधकाने खालील बाबीचा विचार करण्यावर भर दिलेला आहे.

१. त्यामध्ये संबधित विषयाला अनुसरुन माहिती असणे आवश्यक आहे.

२. दुय्यम साधनांच्या माध्यमातून प्राथमिक साधनांतील वस्तूनिष्ठतेचा पडताळा टीकात्मक पध्दतीने सिध्द झाला पाहिजे.

३. दुय्यम साधने प्राथमिक साधनांना पूरक असली पाहिजे.

प्राथमिक साधनांचे न पटविलेले संदर्भरहीत निर्देश ज्ञानात भर न घालता संभ्रम निर्माण करतात. तर दुय्यम ग्रंथातील एखादाच समर्पक पुरावा लिखाणाला नवी दिशा देण्यास उपयुक्त ठरतो. त्यामुळे कोणत्याही साधनांचा कसा व किती वापर करावयाचा हे संशोधकाने ठरवायचे असते. कारण प्रा. एडवर्ड कार यांनी आपल्या 'What Is History' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ''घटिते स्वतः बोलत नाहीत, तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो'' त्यामुळे मूळ साधनाच्यावर लिहिलेले ग्रंथ कितीही विद्वतापूर्ण असले तरी ते दुय्यम साधनच मानले जाते. उदा. सर जदुनाथ सरकार, डॉ. एस. आर. शर्मा, प्रो. इरफान हबीब, डॉ. एस. एन. सेन व डॉ. अ. श. कुलकर्णी यांच्या सारख्या प्रज्ञावंत संशोधकांनी प्राथमिक अस्सल साधनांच्यावर आधारीत ग्रंथ दुय्यम संदर्भ साधनच मानले जाते.

**१) बखरी :**

बखर हा एक वाङ्:मय प्रकार मानला जातो, त्यामुळे बखरीला दुय्यम संदर्भ साधन म्हणून गणले जाते. म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृत्तांत असतो की ज्यामध्ये वीर पुरुषांचा गौरव सांगणारा इतिहास असतो शिवाय करीना, हकीकत, कैफियत, आत्मवृत्त व ऐतिहासिक घटनांच्या संदर्भातील अख्यायिकांचा अंतर्भाव असतो. वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ४ बखरीचे वर्गीकरण तीन प्रकारात केलेले आहे.

**१. समकालीन बखरी :**

विश्वसनीयतेच्या संदर्भात या प्रकारातील बखरीना इतिहास लेखनात महत्वाचे स्थान आहे. परंतु या विश्वसनीयतेलाही काही मर्यादा असतात. अस्सल कागदपत्रांच्या अभावी या बखरीवरं विश्वास ठेवण्यास हरकत नाही. उदा. कृष्णाजी अनंत सभासदकृत-शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर १६९७) चित्रगुप्तकृत - शिवाजी महाराजांची बखर (चित्रगुप्त बखर १७५९) खर्ज्याच्या स्वारीला बखर, ९१ कलमीची (१७०२ ) इत्यादी.

**२. कर्णोपकर्णी ऐकलेल्या हकीकतीची बाडे :**

या प्रकारातील बखरीचे लिखाण ऐकीव व सांगीवाणीच्या माहितीवर आधारीत असते. उदा. पेशव्याची बखर, (१८१८) गायकवाडांची हकीकत, गोविंदपंत बुंदेल्याची बखर (१८१८)

**३. पूर्वीच्या जून्या टिपणीची बखर :**

या प्रकारच्या बखरीतील लिखाण पूर्वीच्या जून्या बखरीतील व टिपणातील माहिती जशीच्या तशी किंवा थोडेफार बदल करून लिहिलेली असते. उदा. चिटणीसकृत शिवछत्रपतीचे सप्त प्रकरणात्मक चरित्र (चिटणीसंबखर-१८१०) शिवदिग्विजय (१८१९) श्री शिवप्रताप (१८२९) इत्यादी.

याशिवाय बखरीची ऐतिहासिक कालखंडाच्या दृष्टीने देखील वर्गवारी केली जाते.

१. शिवपूर्वकालीन बखरी उदा. सिंधवादी यादवाच्या बखरी, हेमाडपंती बखरी, राज्यतागडीची बखर

२. शिवकालीन बखरी उदा. सभासद बखर

३. पेशवेकालीन बखरी उदा. पेशव्यांची बखर, पानिपत बखर

बखरी इतिहासलेखनासाठी दुय्यम प्रकारचे संदर्भ साधन जरी असले तरी बखरीचे लिखाण घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षानी केलेले आहे. परंपरागत पध्दतीने आलेल्या माहितीचा समावेश बखरीमध्ये समाविष्ट असल्याने बखरी माहितीवर किती विश्वास ठेवायचा हे संशोधकाने निश्चित केले पाहिजे. कारण बखरीमध्ये खालील प्रकारच्या उणीव आढळतात.

१. बखरकारांनी फक्त परंपरेने आलेली माहिती संकलीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२. बखरकारांनी कोणतेही अस्सल साधन पाहिलेले दिसत नाही.

३. बखरीतील विवेचन पध्दती ही पौराणिक स्वरुपाची आहे.

४. अतिशयोक्तीची पुराण परंपरा बखरकारांनी पुढे चालवलेली दिसते.

५. बखरीमध्ये प्रामुख्याने चरित्रलेखन व प्रसंगवर्णनावर भर दिलेला दिसतो.

६. बखरकारांनी काळ, व्यक्ती व स्थळ यांचा विपर्यास केलेला आहे..

बखरीच्या संदर्भात वि. का. राजवाडे म्हणतात, की, ''बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात असे जरी म्हटले असते, तरी त्यांच्या विश्वसनीयतेला काही मर्यादाही आहेत. अस्सल कागदपत्रे मिळाली असता यातील खुलासेवार मजकुरात वरील तफावत दिसून येते असे आढळून आले आहे. तरी अस्सल कागदपत्रांच्या अभावी या बखरीवर बराच विश्वास ठेवण्यास हरकत नाही.''

**२) कुळवटी :**

कुळकटी म्हणजे कुलांचा किंवा घराण्यांचा इतिहास होय. मध्ययुगीन कालखंडात कुळांचा इतिहास लिहिण्याची प्रथा होती. अनेक कुळांचा इतिहास त्या काळात लिहिला गेलेला आहे. या कुळकटीचा उपयोग

इतिहास लेखनासाठी होतो. कुळकटीच्या माध्यमातून कुळाचा विस्तार कसा झाला. नाते संबंध कोणाशी आले, त्या कुळाची घसरण कोणत्या कारणामुळे झाली इत्यादी माहिती यामधून प्राप्त होते कुळकटीच्या माध्यामातून तत्कालीन सामाजिक व धार्मिक विषयावर देखील प्रकाश टाकण्यास मदत होते. म्हणून बखरीपेक्षा कुळकटी अधिक प्रमाणात ग्राह्य मानली जाते. आठवले, गोखले, घोरपडे, पटवर्धन, गुणे, हिंगणे, पेठे, चंद्रचूड, रास्ते व पुरंदरे इत्यादी घराण्याच्या कुळकटी प्रकाशित झालेल्या आहेत. कुळकटी इतिहास प्रसिध्द घराण्यांपुरत्याच मर्यादीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य घराण्यावरं यातून काहीही प्रकाश पडत नाही.

**३) बाडे :**

एखाद्या कुटूंबाशी हस्तलिखित स्वरुपात लिहून ठेवलेली माहिती म्हणजे बाड होय. मध्यकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने महत्वाच्या कागदपत्रांच्या नक्कला करुन त्या सांभाळून ठेवल्या जात. अशा कागदपत्रांना बाड अथवा बाडे असे म्हणतात. बाडाच्या माध्यमातून देवादिक, राजे, बादशाहा यांच्या कारर्कीदीची कालगणती, निवडक ऐतिहासिक प्रसंग तिथी, शके संबंधी माहिती मिळते. दुय्यम स्वरुपातील या साधनाचा वापर करून ऐतिहासिक घराण्यावर, त्या घराण्यातील पराक्रमी व्यक्तीच्या चरित्रावर व समकालीन सत्ताधिशांच्यावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**४) वंशवेल – वंशावळी :**

कुळकटीप्रमाणेच ऐतिहासिक घराण्यांचा वंशवृक्ष तयार करण्यांची प्रथा मध्ययुगीन काळात अस्तित्वात होती. एखाद्या वृक्षाचे वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा असतो. परंतु शिवकालीन बऱ्याच वंशवेली उजवीकडून डावीकडे लिहिलेल्या आढळतात. मोठमोठ्या नामांकित घराण्यांच्या वंशावळीना अगदी ब्रह्मापासून सुरुवात केलेल्या आढळतात. यामधील पहिला क्रम हा पुराणावरुन घेतलेला असतो. वंशवेलीतून प्रत्येक व्यक्तीची किंवा त्यातील मुख्य व कतृत्वान व्यक्तीचा जन्म किंवा मृत्यूच्या तारखा देण्यात येत असत. अनेक उदाहरणामध्ये वंशावळी अपूर्ण असलेल्या दिसतात. वंशवेलीचा अभ्यास करुन एखादया घराण्याचा विस्तार कुठपर्यंत झालेला होता किंवा त्या घराण्यातील व्यक्ती कोणत्या व्यक्तीस अथवा राजास समकालीन होती. यावर प्रकाश टाकता येतो. वंशवेलीवरून समकालीन व्यक्तीचा अभ्यास करून तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. गो. स. सरदेसाई यांनी मुसलमान रियासतीचे दोन खंड व मराठी रियासतीचे ८ खंड यामध्ये खूप मोठ्या संख्येने विविध घराण्यांच्या वंशवेली दिलेल्या आहेत.

**५) न्याय निवाड्याची कागदपत्रे :**

करीने, महजर, तकरीरा व पुरशिसे इत्यादी साधने न्याय मिळविण्याच्या अथवा देण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. यातील मजकूर साधार लिहिण्याची खबरदारी घेतलेली दिसते. यामधील मजकुराची कालमर्यादा ही अनेक वर्षाची अगर अनेक पिढ्याची असू शकते त्यामुळे यातून प्राथमिक किंवा संपूर्ण व एकत्रित माहिती मिळेलच असे मात्र नाही. न्यायनिवाड्या संदर्भात करीने व महजर मधून न्याय व्यवस्थेसंबंधी माहिती मिळते.

### अ) करीने :

एखाद्या घराण्याच्या मालकीच्या जमीनीबद्दलची किंवा वतनाबद्दल माहिती देणारी कागदपत्रे म्हणजे 'करीने' होय. करीन्यामध्ये जी माहिती दिलेली असेल त्यांच्या खरे-खोटेपणाबद्दल पंचायतीमध्ये कागदपत्रे दाखल करीत. करीना सादर केल्यानंतर कामदार किंवा गोतपंचायत एकत्र बसून चौकशी करीत व नंतर करीन्याचे एक वैशिष्ट्ये म्हणजे आधीच्या पिढीने जसे सादर केलेले असेल त्याची नक्कल करून ती माहिती जशीच्या तशी सादर केली जात असे करीन्यामधून तत्कालीन जमिनी संदर्भात माहिती मिळवण्यास मदत होते. जमिनचे क्षेत्र, वर्गवारी, महसूल आकारणी, जमीन धारणेचा प्रकार इत्यादी संबंधीवर प्रकाश टाकण्यास 'करीने' महत्वाचे साधन ठरतात.

### ब) महजर :

महजर म्हणजे न्याय निवाड्याची कागदपत्रे, गोतसभेत न्यायनिवाड्या संदर्भात झालेली चर्चा व गोतसभेच्या अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय यासंबंधीची माहिती व त्यासंबधीचे साक्षीदार, अधिकारी यांच्या सह्या व हुद्याची नोंद असलेल्या कागदपत्राची नक्कल महजर मध्ये असते. गोतसभेत चर्चा होऊन त्यांची नोंद महजर मध्ये केली जात व महजरमध्ये नोंद झाली म्हणजे वाद संपला असे म्हणत. एखाद्या न्यायनिवाड्यासंदर्भात जो साक्षी पुरावा सादर केला जात असे. अशा कागदपत्रातून मध्ययुगीन न्यायव्यवस्थेवर, न्यायनिवाड्याची पध्दत, न्याय देणाऱ्याचा हुद्दा व न्यायनिवाड्याचे स्वरूप यावर प्रकाश टाकण्यात मदत होते. गणेश चिमणाजी वाड यांनी न्यायदान विषयक जे निवाडे संपादीत केलेले आहेत. (वाड डायरी, १३ वा खंड)

### ६) शकावल्या :

शकावल्यामध्ये एखाद्या महत्वाच्या घराण्या संदर्भात घडलेल्या घडामोडीची तिथी, वार, शके यानुसार नोंद केलेली असते. यालाच जंत्री किंवा शकावली असे म्हणतात. एखाद्या घराण्यासंदर्भात किंवा व्यक्ती चरित्रा संदर्भात महत्त्वाची माहिती यामधून मिळते. शकावल्याचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

१. पौराणिक परंपरेचा प्रभाव असलेल्या शकावल्या.

२. राजकीय घडामोडी संदर्भातील शकावल्या.

याशिवाय कालखंडानुसार देखील शकावल्यांचे दोन प्रकारात विभाजन केले जाते.

१. शिवकालीन शकावल्या

२. शाहू छत्रपतीच्या बाजूच्या शकावल्या.

शकावल्यांच्यामध्ये दररोजच्या खर्चापासून ते राज्यव्यवस्थेपर्यत अनेक गोष्टीचा उल्लेख असतो. मराठाकालीन अनेक शकावल्या आज उपलब्ध आहेत. यामध्ये जेथे शकावली, शिवापूर दप्तरातील शकावली, व सहा कलमी शिवापूरकर देशपांडे बखरीतील शकावली, गदाधर प्रल्हाद शकावली, घोडेगावकर व सहा कलमी शकावली या शकावल्या नसून ती टिपणे आहेत. जेधे शकावली भारत इतिहास संशोधन मंडळाच्या चतुर्थ अहवालात प्रसिध्द केलेली आहे. जेधे शकावली सर नदुनाथ सरकार यांनी इंग्रजीत

भाषांतरीत केलेली आहे. शकावल्यांची वर्णन पध्दती पौराणिक कथेसारखी असते संशोधकाने यांचा वापर जपून केल्यास उत्कृष्ठ स्वरूपाचे संशोधन होण्यास मदत होते.

**७) चरित्र ग्रंथ :**

इतिहासलेखनात चरित्र ग्रंथ दुय्यम संदर्भ साधन म्हणून वापरले जातात. चरित्रग्रंथ एखादी व्यक्ती जीवंत असताना किंवा त्यांच्या मृत्यू नंतर लगेच लिहिलेले असतात. चरित्रग्रंथ आत्मचरित्रापेक्षा वेगळे असतात. आत्मचरित्र ही स्वत: लिहिलेले असतात व चरित्रग्रंथ हे दुसऱ्या व्यक्तीनी लिहिलेले असतात. प्राचीन कालखंडात चरित्र लेखनांची परंपरा आपल्याकडे फारसी प्रचलित नव्हती. विशाखा दत्ताने रचलेले 'बुध्दचरित्र' बाणभट्टाचे 'हर्षचरित्र' पहावयास मिळतात. मध्यपूर्व व मध्ययुगीन कालखंडात अरबी, तुर्की, फार्शी भाषेत चरित्र ग्रंथ लिहिले गेले. उदा. तारीखे रशीदी, हुमायुनामा, अकबरनामा, शहाजानांमा, परमानंदाचे शिवभारत, मराठा काळात लिहिलेल्या अनेक प्रकारच्या बखरी हे एक प्रकारचे चरित्रग्रंथच आहेत. आधूनिक काळात अनेक व्यक्तीवर हाजारो चरित्र ग्रंथ समकालीनानी लिहिले आहेत. उदा. डॉ. बी. आर. आंबेडकरांचे चरित्र.

**८) प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मय साहित्य :**

भारतातील विविध राजघराण्यातील सत्ताधिशांनी प्राचीन काळापासून अनेक विद्ववानांना व साहित्यिकांना राजाश्रय दिलेला दिसतो. या विद्वानांनी संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, कन्नड, तेलगु, तामिळ अशा अनेक भाषामध्ये विविध प्रकारची काव्ये, कथा, नाटके, कादंबऱ्या इत्यादी लेखन केले. या वाड:मयीन अभिव्यक्तीच्या मांडणीवर अथवा वर्णनावर तत्कालीन समाजाचा प्रभाव पडलेला दिसतो. उदा. विशाखा दत्ताचे 'मुद्राराक्षस' व 'देवीचंद्रगुप्तम' भासाचे 'स्वप्नवासवदस्त', कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र', श्रीहर्षाचे 'रत्नावली' व 'प्रियदर्शिका' ही नाटके इतिहासाचे साधन म्हणून महत्वाचे आहे. दक्षिण भारताच्या इतिहासाला उपयुक्त ठरणारे तमिळ साहित्य की जे 'संगम साहित्य' म्हणून ओळखले जाते. पांड्य, चोल, चेर इत्यादी राजवटीच्या कालखंडातील आदान गुरु, कुरदोगे, परिपाडल, रेगुत्तर, भट्टीरण, पदीदुयन्तु, कलितोगे व पुरूनारुल इत्यादी आठ संग्रहाचा समावेश आहे. याशिवाय 'इंलोगो' या कवीने लिहिलेले 'शिलपादीकारम' हे महाकाव्य, याशिवाय संगम साहित्यामधील 'मणिमेखला' हे महाकाव्य, व 'जीवकचिंतामणी' इत्यादी संगम साहित्यातील शेवटी दिलेल्या टिपणीवरून त्या काळातील राजांच्या वंशावळीवर प्रकाश टाकता येतो. या साहित्याच्या मदतीने दक्षिण भारतातील प्रशासन व्यवस्थेवर प्रकाश टाकता येतो. या काळातील युध्दपध्दती, करपध्दती, अन्नधान्य, शेती, व्यापार, उद्योग चलन व्यवस्था इत्यादी संबंधी माहिती मिळते.

मध्ययुगीन कालखंडातीलही ललित साहित्य उपलब्ध आहे. अकबरांच्या दरबारातील महेश ठाकूर यांचे 'अर्वदेशवृत्तांत', पद्मसुंदरचे 'अकबरशाही शृंगार', 'दर्पण', देविमल यांचे 'हिरा सौभाग्य', जगन्नाथ पंडिताचे 'जगदाधारण', 'भामिनी विलास', 'राजागंगाधर' इत्यादी काव्ये. याशिवाय मुघल काळातील हिंदी, बंगाली,

ओरिसा, गुजराती या भाषेतील अनेक प्रकारचे वाङःमय उपलब्ध आहे. या साहित्यामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**ब) पुरातत्त्वीय साधने :**

लिखित साधनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, इमारतीचे अवशेष व भिंतीचित्रे यासारखी भौतिक साधने इतिहासलेखणासाठी उपयुक्त ठरतात. संस्कृतीच्या या विविध साधनांच्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८ व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला. लिखित साधनांच्या तुलनेने पुरातत्त्वीय साधने तुलनेने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाङ्मयीन साधनापेक्षाही विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने याच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते. या कालखंडातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, राजवाडे व गढ्या, किल्ले, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, अलंकार, चित्रे, नकाशे व काष्ठशिल्प इत्यादींचा प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांमध्ये समावेश होतो.

इतिहासलेखनासाठी अलिखित म्हणजे पुरातत्वीय साधनांना पुरावा म्हणून विशेष महत्वाचे स्थान आहे. कारण लिखित साधनांच्यामध्ये फेरफार अथवा बदल केला जावू शकतो. मात्र पुरातत्वीय साधनांमध्ये ते शक्य नसते. लिखित साधनांच्या प्रमाणे ही साधने जरी बोलकी नसली तरी लिखित साधनांच्यामध्ये जी पोकळी किंवा उणीव राहीलेली असते ती भरून काढण्यासाठी अथवा ज्या काळातील अथवा घटनेशी संबंधीत लिखित साधने उपलब्ध होवू शकत नाहीत त्यावर प्रकाश टाकण्यासाठी पुरातत्वीय साधने विशेष महत्वाची असतात. समकालीन घटना व वाटचालीचा तो पुरावा असतो.

इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक कालखंडाच्या संदर्भात पुरातत्वीय साधने महत्वाची ठरतात. या पुरातत्वीय साधनांना 'भौतिक' साधने असेही संबोधले जाते. पुरातत्वीय साधने प्रत्यक्ष घटना स्थळावर किंवा विविध ठिकाणच्या संग्रहालयामध्ये संवर्धीत केलेली आपणास पहावयास मिळतात. पुरातत्वीय साधने समकालीन असल्याने ती अधिक विश्वसनीय व उपयुक्त मानली जातात. उत्खननात सापडणारे अवशेष एखादी वस्ती, गाव, नगर, किल्ल्याचे अवशेष, मंदिराचे अवशेष इत्यादी स्वरुपातील असतात. पुरातत्वीय साधने म्हणजे पुरावे एकतर जमिनीवर उपलब्ध असतात अथवा जमिनीच्या खाली गाडलेल्या अवस्थेत असतात आणि ते उत्खननात सापडतात. याशिवाय नदीच्या पात्रात अथवा नदीच्या खोऱ्यातदेखील पुरातत्वीय अवशेष सापडतात. अशा अवशेषांचा अभ्यास पुरातत्वशास्त्रात केला जातो

ब) पुरातत्वीय साधनांचे प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते

अ) पुरातत्वीय वस्तू:

ब) पुरातत्वीय वास्तू:

अभ्यासाच्या दृष्टीकोणातून जरी वरीलप्रमाणे दोन प्रकारात वर्गीकरण केले जात असले तरी खालील प्रमाणे पुरातत्वीय साधने आढळून येतात.

**पुरातत्त्वीय साधने**

- अ) पुराणवस्तू (उत्खनित अवशेष)
  - वस्तू अवशेष → अलंकार/आभूषणे → धातू व मातीची भांडी → शस्त्रास्त्रे → शेतीची अवजारे → वजन/मापे → नाणी व मुद्रा → मानवी/ प्राण्याचे सांगाडे → मुर्त्या
  - वास्तू अवशेष → स्मारके → धार्मिक स्थळे/ मंदिरे → वाडे → किल्ले → नांगरांचे अवशेष → स्तूप/ विहार → लेण्या, गुहा → शिल्पावशेष/स्मृतीशिला
- ब) आलेख (अभिलेख)
  - शिलालेख
    - प्रस्तरलेख
    - स्तंभालेख
    - गुहालेख
  - ताम्रपट

पुरातत्वीय वस्तू अथवा वास्तूच्या स्वरुपात जी साधने उपलब्ध होतात त्याच्यामधून इतिहासाच्या पाऊलखुणा आढळतात. या वस्तू अथवा वास्तूच्या माध्यमातून अभ्यासकास तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणे शक्य होते. यामधील काही प्रमुख साधनाचा या ठिकाणी अभ्यास करावयाचा आहे.

**१) पुराणवस्तू/उत्खनित अवशेष :**

मानवी संस्कृती व मानवी विकासाचे भूतकालीन अवशेष असतात त्याला उत्खनित अवशेष असे म्हणतात. मानवी जीवनातील विविध प्रकारच्या नित्योपयोगाच्या वस्तू म्हणजे गतकालीन समाज जीवनाचा

एकप्रकारे आरसा असतो. ज्या वस्तूच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे चित्र प्रतिबिंबीत झालेले असते. ज्या ठिकाणी उत्खनन होते त्या उत्खननामध्ये तत्कालिन संस्कृती अथवा वसाहतीचे विविध थर आढळतात. या थरांच्यामध्ये विविध प्रकारच्या मानवी वापरातील वस्तू आढळतात. यामध्ये भांडी, खापरे, अलंकार, शस्त्रास्त्रे, खेळणी, मणी, कलाकुसरीच्या वस्तू, मानवी सांगाडे, विविध प्राण्याचे सांगाडे, धार्मिक साहित्य, मुर्त्या अशा कितीतरी प्राप्त वस्तूच्यावरून त्या थरांचा कालखंड निश्‍चित करता येतो. तत्कालीन संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर रासायनिक प्रक्रिया कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया करून त्यांचा काळ, वय, वंश त्यांच्या मृत्यूचे कारण, प्राण्याचे प्रकार इत्यादी अवगत होण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये प्राप्त झालेली मातीची भांडी अथवा खापरे अतिशय महत्वाची असतात. असे म्हटले जाते की, मातीची खापरे ही पुरातत्व विद्येची मुळाक्षरे आहेत. मातीची भांडी मानव हजारो वर्षापासून वापरत आहे, परंतु ते बनविण्याचे तंत्रज्ञान प्रत्येक देशात वेगवेगळे असलेले आढळते. या मातीच्या भांड्यावरून व त्यावरील चित्रकलाकृतीवरून तत्कालीन मानवी संस्कृती, जीवनमान, व्यवसाय, कलात्मक जीवन, इत्यादी प्रकाश पडतो.

शेतीची अवजारे, शिकारीसाठी वापरली जाणारी हत्यारे व युध्दातील विविध शस्त्रास्त्रे यावरून तत्कालिन कृषक जीवन कशाप्रकारे होते, तो कशाप्रकारची शेती करित असावा किंवा शेतीचे तंत्रज्ञान काय असावे या संबंधी माहिती मिळते. शिकारीच्या हत्यारावरुन आदिम अवस्थेपासून मानवी जीवनात झालेला बदल शिकारीच्या पध्दती व हत्यारावरून तो कशाप्रकारे व कोणत्या प्राण्याची शिकार करीत असावा या संबंधी माहिती मिळते. विविध प्रकारची हत्यारे व शस्त्रास्त्रामधून धातू व तंत्रज्ञानात झालेला बदल अभ्यासण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये दैनंदिन वापरातल्या असंख्य वस्तू प्राप्त होतात. यामध्ये सौंदर्य प्रसाधने, धान्याचे कण, बांगड्या, अलंकार, खेळणी इत्यादी स्वरूपाच्या अनेक वस्तू आढळून येतात. दैनंदिन वापरातल्या वस्तूतून सामान्य माणसाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. सामान्य माणसापासून ते राजे-रजवाड्यापर्यंतच्या वस्तू उत्खननातून प्राप्त होतात. मुलाच्या खेळण्यावरून तत्कालीन दळणवळणाच्या साधनाची कल्पना येवू शकते. विविध प्रकारच्या अलंकारातून त्या-त्या काळातील कलात्मकता कळते, शिवाय ते अलंकार विशिष्ट काळाचा निर्देश करणारे असतात. कारण कलाकुसरीचाही विशिष्ट काळातील एक पोत असतो, यामधून तत्कालिन सांस्कृतिक इतिहास कळतो.

**२) वास्तू अवशेष :**

प्राचीन काळापासून भारतामध्ये विविध प्रकारचे स्थापत्य विकसित झालेले दिसते. हजारो वर्षाच्या वाटचालीतले हे स्थापत्य अवशेष आज उद्धवस्त अवस्थेत कोणवा क्वचित प्रसंगी सुस्थित आढळतात. स्तूप, विहार, लेणी. मंदिरे, नगरे, मशिदी, किल्ले, राजवाडे, वाडे, गढया इत्यादी अवशेष काळाच्या ओघात नामशेष झाले किंवा गाडले गेले अथवा परकीय आक्रमणामुळे व पर्यावरणीय आपत्तीमुळे उद्ध्वस्थ झाले.

भारतात विविध ठिकाणी उत्खनने झालेली आहेत. तक्षशिला, कालीबंगल, नालंदा, लोथल, नागार्जुन कामाम तर जो दायमाबाद इत्यादी ठिकाणांमधून प्राचीन संस्कृतिचे वास्तू अवशेष प्राप्त झालेले आहेत.

भारतातील विविध स्थापत्य कलांचा विकास लेण्यामधून झाला. बिहार, चैत्यगृहे, गुहा मंदिर हे लेण्याचे उपप्रकार आहेत. अजिंठा, वेरुळ, कार्ले, भाजे, पितळखोरे, नाशिक, धारापुरी, औरंगाबाद, बाधा, बादामी, उदयगिरी, हातिगुंफा इत्यादी असंख्य लेण्या आज अस्तित्वात आहेत. विविध कालखंडातील राजघराण्यांच्या राजाश्रयाने निर्माण झालेल्या लेण्या व बिहार यांच्यावर त्या-त्या राजाने ज्या धर्माला राजमान्यता दिली त्याचा प्रभाव आढळतो. लुबिणी, राजगृह, कुशिनगर, श्रावस्ती, वैशाली, गया, सारनाथ, नालंदा, साची, भारहूत व अमरावती इत्यादी ठिकाणचे स्तुप बौध्द धर्माबद्दलची माहिती देतात. प्राचीन गुहा शिल्पातून मंदिरस्थापत्यशैलीचा उदय झाला व त्यानंतर मोठया संख्येने विविध पंथीयांची व धर्माची मंदिरे बांधण्यात आली. ऐहोळ, पट्टडकल, वेरूळ इत्यादी ठिकाणची मंदिरे भारतातील अतिप्राचीन मंदिरे मानली जातात. गुप्त काळाच्या नंतर भारतात मंदिराच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसते. गुप्त, प्रतिहार, पाल, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, चोल, पांडय, यादव व होयसळ इत्यादी राज्यकर्त्याच्या काळात मंदिर स्थापनेस चालना मिळाली. हेमाडपंथी, ओडिसी, द्रविडी शैलीची मंदिरे या काळात अस्तित्वात आली. या मंदिरांच्यामधून धार्मिक इतिहासबरोबर स्थापत्य कलेचा अभ्यास करण्यास हे महत्वाचे साधन आहे. प्राचीन भारतीय कलावस्तू किंवा वास्तुशिल्पे ही प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाची होती. धर्म किंवा धर्मोपदेशक हे समाजाचे आधारस्तंभ मानले गेलेले असल्याने एखाद्या विशिष्ट काळात ज्या धर्माचे प्राबल्य असेल त्याला त्या पंथाचे नाव देण्याची प्रथा सुरु झाली. यातून बौध्द, जैन, शैव, वैष्णव, शाक्त इत्यादी बरोबर ज्या कलेवर परकीय आक्रमणांचा प्रभाव पडला त्या काळामधून धार्मिक, कथा, समजूती, परंपरा, आचार, विचार, रुढी इत्यादी अभ्यास करण्यासाठीचे महत्त्वाचे आहे.

मुघल कालखंडातील इतिहासाचे आणखी एक महत्त्वाचे भौतिक साधन म्हणजे विविध राजवाडे व गढ्या आणि किल्ले हे आहे. या पुरातत्त्वीय साधनाच्या माध्यमातून मुघल स्थापत्य कलेचा इतिहास जाणून घेणे सोपे होते. मुघल बादशाहाना स्थापत्य कलेची आवड असल्याने त्यांनी इतर वस्तूंबरोबरच राजवाडे, गठ्यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर केली. शेरशहाने बांधलेला पुराणा किल्ला, अकबराच्या काळात बांधलेला आग्र्याचा किल्ला, लाहोरचा किल्ला, याशिवायत्याने अजमेर, मेरठ, कटक, इत्यादी ठिकाणी किल्ले बांधलेले आहेत. शाहाजहांनच्या काळात बांधलेला लाल किल्ला जग प्रसिद्ध आहे. निजामशाही व आदिलशाही कालखंडातील अनेक किल्ले आज दक्षिण भारतात आपले अस्थित्व टिकवून आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यांच्या बळावरच मुघल आणि अदिलशाहा सारख्या शत्रूना नामोहरण केले आहे.

**३) शिल्पावशेष :**

प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आलेल्या मूर्ती, कला अवशेष, चित्रकलेला पाश्चात्य अभ्यासकांनी इतिहासाचे एक साधन म्हणून पाहिलेले आहे. या अवशेषावरून त्यांनी भारतीय कला परंपरांचा

इतिहास शोधला. कलेची वैशिष्ट्ये जगासमोर आणली. शिल्पावशेषांच्या माध्यमातुन इतिहास, मुर्तीशास्त्र, कला, अभिव्यक्ती इत्यादी ची समीक्षा या अवशेषाच्या माध्यमातूनच केलेली आहे. इतिहासाचे एक साधन म्हणून या शिल्पावशेषाला महत्त्व आहे. शिल्पावशेषात मूर्तिशास्त्राचा चित्रपरंपरेचा अभ्यास केला. त्यातन सामान्य जीवन, केशभूषा पध्दती, वेशभूषा पध्दती, अलंकारभूषणे, वापरात असलेली निरनिराळी वारे इत्यादी अभ्यास व त्याचे प्रार्यासास सिध्द केलेले आहे. अभिव्यक्तीची अनेक माध्यमे आहेत. यामधील शिल्पकला हे ही एक आहे. या कालाभिव्यक्तिमा तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब सहजपणे उतरलेले दिसते. त्या दृष्टीकोणातून शिल्पकला किंवा त्याचे अवशेष तत्कालीन समाजाच्या व्यवहाराचे महत्वपूर्ण पुरावे ठरतात. या पुराव्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजजीवनाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. चित्र रेखाटणे किंवा दैनंदिन जीवनातील प्रसंग दगडावर कोरून ठेवणे ही मानवी प्रवृत्ती संपूर्ण जगभर पहावयास मिळते. म्हणूनच हे अवशेष विस्मरणीय व अस्सल दर्जाचा पुरावा मानला जातो.

### ४) आलेख/अभिलेख :

प्राचीन काळी लिहिलेला अथवा कोरलेला मजकूर म्हणजे अभिलेख अथवा पुराभिलेख पुरातत्वीय साधनांच्यामध्ये अत्यंत महत्वाचे व अविनाशी साधन म्हणून याचा उल्लेख केला जातो. ताम्रपट, स्तमालेख, गुहालेख, प्रस्तरलेख इत्यादी प्रकार यामध्ये आढळतात. इतिहासलेखन व पुर्नलेखनासाठी अतिशय उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून याचा उपयोग होतो. कारण शिलालेख अथवा ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखाच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, बतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. सदर विषयाच्या अनुशंगाने संशोधकास तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

### ५) शिलालेख व स्तंभालेख :

प्रारंभीच्या काळातील शिलालेख छोट्या शिळा, स्तंभ किंवा लेण्यामधून कोरलेले दिसून येतात. सम्राट अशोकाच्या काळात स्तंभालेखाचा उपयोग खूप मोठ्या प्रमाणात झाला. किंबहुना हे शिलालेख अथवा स्तभलेख म्हणजे मौर्यकालीन इतिहासचे सर्वोत्तम साधन मानले जाते. मौर्य, गुप्त, सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, शिलाहार व यादव इत्यादी राजघराण्यांचा मोठा इतिहास आपणास या शिलालेखांच्या माध्यमातून कळतो. सम्राट अशोक, राजा खारबेल, सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी, चालुक्य सम्राट द्वितीय पुलकेशी इत्यादी कार्यावर या शिलालेखांच्या माध्यमातुन प्रकाश पडलेला आहे. गुप्तकाळापूर्वी उभारलेल्या छोट्या-मोठ्या स्तंभालेखाची संख्या १५०० पेक्षा अधिक आहे. गुप्त काळानंतर उभारलेल्या किंवा कोरलेल्या स्तंभलेखांची भाषा बहुतांशी संस्कृत आहे. विविध प्रसंगी राजे-महाराजे अशा प्रकारचे शिलालेख कोरत असत. यामध्ये स्तंभलेख, प्रस्तरलेख, लघुप्रस्तर व गुहालेखांचा समावेश होतो. ग्रंथाच्या तुलनेत शिलालेख प्रामुख्याने ब्राह्मी व खरोष्टी लिपीतील आहेत. सन १७८४ मध्ये सुरु झालेल्या एशियाटीक सोसायटीने प्राचीन भारतीय शिलालेख ताम्रपट व जुनी हस्तलिखिते याचा अभ्यास करण्यासाठी सन १७८८ मध्ये 'एशियाटीक रिसर्चेस'

नावाचे नियतकालिक सुरू केले. ब्रिटीश अधिकारी जेम्स प्रिन्सेस यांनी 'ब्राम्ही' व 'खरोष्टी' लिपीचा अभ्यास करुन शिलालेख वाचण्यास सुरुवात केली. शिलालेख अथवा स्तंभालेखांच्या खालील विषयास अनुसरुन काही शिलालेख आढळतात.

१. व्यापारी स्वरुपाचे शिलालेखः उदा. मंदसोर येथील राताकुमारगुरव बघुवर्मन यांचा शिलालेख १२. धार्मिक स्वरुपाचे शिलालेख : उदा. सम्राट अशोकाचे शिलालेख

२. दानात्मक स्वरूपाचे अथवा अर्पण स्वरूपाचे उदा. कान्हेरीगुंफा, नाशिक, कार्ले, भाजे इत्यादी ठिक शिलालेख.

३. प्रशासकीय स्वरूपाचे शिलालेख : उदा. सम्राट अशोकाचे कलिंग येथील शिलालेख

४. राजांच्या स्तूतीपर आलेख : उदा. जुनागड व मिसारी येथील दगडी स्तंभावर कोरलेला स्कंदा शिलालेख अलाहाबाद येथील समुद्रगुप्ताचा स्तंभालेख, मंदसोर येथील राजा यशोवर्धन यांचा शिलालेख व हाथीगुफा येथील राजा खारवेलचा शिलालेख इत्यादी.

प्रा. ई. जे. रैप्सन शिलालेखाचे महत्त्व विशद करताना म्हणतात की, '' शिलालेखातून आपल्या देशाची समकालीन, राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती संबंधी विश्वसनीय माहिती मिळते.

प्राचीन भारताच्या तुलनेत मध्ययुगीन कालखंडात आढळणाऱ्या शिलालेखांचे प्रमाण फारच कमी आहे. सदरचे शिलालेख किल्ले, राजवाडे, पडक्या इमारती, कबरी आणि देवालयावर आढळतात. शिलालेखावरून सुलतानांची नावे, कालखंड, राज्याच्या सीमा इत्यादींची संबंधी माहिती मिळते. यामधून तत्कालीन प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक, आर्थिक इतिहासाशी संबंधीत माहिती प्राप्त होते.

**६) ताम्रपट/अभिलेख :**

शिलालेखाप्रमाणे ताम्रपटसुध्दा अत्यंत विश्वसनीय साधन मानले जाते. मानवी जीवनात जसा धातुचा वापर होऊ लागला. तेव्हापासून तांब्याचा वापर ताम्रपट तयार करण्यासाठी होऊ लागलेला दिसतो. तांब्याच्या जाड पत्र्यावर अक्षरे कोरून ताम्रपट तयार केला जातो. शिलालेखांच्या तुलनेत ताम्रपटाची संख्या अधिक आहे. ताम्रपटाचा वापर मुख्यत्वे दानपत्रे व जमीन विषयक हकपत्रे यासाठी केलेला दिसतो. सामान्यतः एक ताम्रपट एकाच विषयासाठी वापरण्याचा प्रघात दिसतो. याशिवाय राजघराण्यांच्या वंशावळी, राज्यविस्तार, पराक्रम, राज्यारोहण इत्यादी प्रसंगाचे वर्णन करण्यासाठी ताम्रपटांचा वापर होत असल्याचे दिसते. गुप्त, वाकारण, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार व यादव कालीन ताम्रपट आढळतात. वाकाटक घराण्याचा इतिहास केवळ ताम्रपटामधून आढळतो. विविध राजवटीतील अनेक विद्वान लोकांना, धर्मसंस्थांना, विद्यापीठांना देणग्या अथवा जमीनदान दिलेल्या आहेत. राजांनी केलेल्या दानांची नोंद ठेवणे हा जरी ताम्रपटाचा प्रमुख उद्देश असला तरी अशा ताम्रपटातून तत्कालीन राजे, राजघराणी, त्यांचा काळ, दान देणाऱ्या, घेणाऱ्या व्यक्तीची नावे, राज्याच्या चतु सीमाबरोबरच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय माहिती मिळवण्याचे महत्वाचे साधन आहे.

चिनी प्रवाशी फाहीयान यांने बौद्ध मठामध्ये अनेक ताम्रपट पाहिले की ज्याच्यावरती जमीन दान दिल्याचा उल्लेख होता, त्यामध्ये काही बुद्ध कालीन होते. सुएनत्संग या दुसऱ्या चिनी प्रवाशाने कनिष्काने बोलवलेल्या सभेमध्ये बोलण्यासाठी केलेले भाषण तीन ताम्रपटाच्यावरती कोरलेले होते असा उल्लेख करतो. नंतर या ताम्रपटांना दगडी पेट्यांमध्ये ठेवून त्यावर स्तूप बांधण्यात आले. शिलालेख किंवा ताम्रपटांचा इतिहास लेखनांच्या कोनातून विचार केला संदर्भ साधन म्हणून त्याचे महत्व अनन्य साधारण आहे. यातील नोंदी सविस्तर असतात. धार्मिक लेख किंव दानपत्रे ही राजकीय इतिहास लेखनास पूरक ठरतात. या ताम्रपटाच्यामधून तत्कालिन, तिथी, वार, नक्षत्र, वर्ष इत्यादीचा संदर्भ असल्याने संबंधित मजकुराची कालनिश्चिती करण्यात मदत होते.

ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व नि:सदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखाच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, वतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. विजयनगर साम्राज्याची माहिती मिळविण्यासाठी तर शिलालेख, ताम्रपट व नाणी हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विजयनगर काळात चार प्रकारचे आलेख होते. 'शासनम्', 'जयपत्रम्', 'आज्ञापत्रम्' आणि 'प्रज्ञापत्रम्'. साधारणत: जमीन दान देण्यासाठी शासनम् दिले जात असे. यांची नोंद दगडांवर, भिंतीवर अथवा ताम्रपटावर केली जात असे. कायदेशीर बाबींमध्ये दिलेले निर्णय जयपत्रम्मध्ये, सरकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या राजाज्ञा आज्ञापत्रममध्ये, प्रज्ञापत्रममध्ये राजाचे जाहीरनामे, तर ताम्रपटात केलेल्या दानधर्माचा उल्लेख आढळतो. ताम्रपटात दान देणाऱ्याचे नाव, ठिकाण, त्याची वंशावळ, दानाचे स्वरूप, दान घेणाऱ्या व्यक्तीचे नाव इत्यादीचा उल्लेख आढळतो. प्राचीन भारताच्या तुलनेत सुलतानशाहीमधील ताम्रपट फार कमी संख्येने आढळतात.

**७) नाणी :**

पुरातत्वीय वस्तुमध्ये अधिक खात्रीशीर व विश्वसनीय साधन म्हणून नाण्यांच्या अथवा विविध मुद्राचा उल्लेख केला जातो. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या इतिहास लेखनासाठी 'नाणी' महत्वाची भूमिका बजावतात. समकालीन विविध राजकीय राजवटीचा पुरावा म्हणून नाणी इतिहासलेखनात साधन म्हणून वापरली जातात. सन १२ व्या शतकात काल्हणाने आपल्या 'राजतरंगिणी' मध्ये नाण्याचा वापर इतिहासाचे साधन म्हणून सर्वप्रथम केला. 'नाणकशास्त्रात' नाण्याचा शास्त्रशुध्द अभ्यास केला जातो. सन १७९० मध्ये भारतीय नाण्यांचे अध्ययन करण्यास सुरवात झाली. सन १८२४ मध्ये कर्नल टॉड ह्याने नाण्यांविषयी एक लेख प्रकाशित केला. कर्नल व्हेन्चुरा व चार्लस मॅसन यांनी अनेक नाणी जमा केली. सन १८३७ साली विल्सन ह्याने भारतीय नाण्यांची एक यादी केली तर कर्नल टॉमसने सन १८५८ मध्ये जॉन प्रिन्सेपचे 'एसेज ऑन इंडियन अँटिक्विटिक्स' संपादित करून भारतीय नाणकशास्त्रात मोलाची भर घातली. अलेक्झांडर कनिंगहॅम ह्याने नाणकशास्त्राचा पाया घातला. सन १८८६ मध्ये एलियटचा 'कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया' व सन १८९७ मध्ये रॅपसनचा 'इंडियन कॉइन्स' हे ग्रंथ प्रकाशित झाले. भारतामध्ये सन १७८४ मध्ये स्थापन झालेल्या एशियाटीक सोसायटी ऑफ बेंगाल या संस्थेने भारतीय नाणकशास्त्राचा पाया घातला. यानंतर भारतीय नाण्यावर संशोधन सुरु झाले. यापैकी इलिटने 'द कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया' हे भारतीय

नाण्यावरील पहिले पुस्तक लिहिले. भारतीय संशोधकांच्या पैकी सी. आ. सिंघल, प्रो. ए. एस. आळतेकर, डॉ. के. पी. जायस्वाल, वि. वा. मिराशी, डॉ. परमेश्वरीलाल गुप्ता, डॉ. डी. डी. कोसंबी यांनी नाणकशास्त्रावर अभ्यास केलेला आहे.

**८) वस्त्रे, धातू कलावस्तू :**

मुघल काळात ओरिसा, बंगाल, गुजरात, खंबायत, बुराहणपूर, लाहोर, जौनपूर, अलाहाबाद, बनारस, पाटणा, अवध, ढाक्का, लखनौ इत्यादी कापडनिर्मिती केंद्र होती. विशेष प्रकारच्या रेशीम कापडासाठी पैठण, आग्रा, खंबायत ही शहरे प्रसिद्ध होती. लाहोर मधील 'ओर्मेसिन' आणि 'मच्छिवारा वाफ्ता' हे कापड प्रकार प्रसिद्ध होते. सरहिद येथे लालशालू आणि चिटाचे कापड तयार होत होते. बनारस येथील 'मिरीरकुल' हे कापड प्रसिद्ध होते. अकबराने लोकर उत्पादनाला उत्तेजन दिलेले दिसते. आज मुघल काळातील कोणत्याही स्वरूपाची वस्त्रे प्राप्त होत नसली तरी तत्कालीन चित्रावरून याची माहिती प्राप्त होते. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांत भिन्न प्रकारची वेशभूषा अस्तित्वात होती. कपडावरुन व्यक्तीचा समजतील दर्जा कळून येतो. विविध प्रथा, परंपरा, सण-उत्सव यातील वैविध्य वस्त्रावरून समजून घेण्यास मदत होते. विविध स्तरातील स्त्री-पुरुष यांच्यातील विविध वस्त्र प्रकार याचे आकलन होते.

**९) बाग-बगीचे व कालवे :**

मुघल कालखंडात अनेक बाग-बगीचे तयार करण्यात आले. यावर पर्शियन बागांचा प्रभाव जाणवतो, याला चारबाग पद्धती म्हणतात. मुघल बादशहानी दिल्ली, आग्रा आणि इतर ठिकाणी फळा-फुलांच्या बागा लावल्या. जहांगीरने बादशहाने काश्मीरमध्ये 'शालिमार उद्यान' 'निशांत बाग' निर्माण केली. दिल्ली मधील 'हुमायूँ का मकबरा बाग', आग्रा मधील ताजमहाल बाग, आर्म बाग, मेहेताब बाग, रामबाग, जहराबाग, पिंजोर मधील यादवेन्द्र बाग, इलाहाबाद मधील खुसरो बाग इत्यादींचा उल्लेख करता येईल. शहाजहान द्वारा निर्मित 'अंगुरीबाग' प्रसिद्ध आहे. मुघल बादशहांच्या बरोबर राजस्थानमधील राजपूत राजांनी जोधपूर, उदयपूर, बिकानेर आणि जयपूर इत्यादी ठिकाणी अनेक बाग-बगीचे तयार केले. या काळात कालवे व बंधारे बांधून शेतीला व जनतेला पाणीपुरवठ्याची सोय केली जाई. पंजाब, सिंध, लाहोर, गोवळकोंडा इत्यादी ठिकाणी तलाव बांधून शेतीला पाणीपुरवठ्याची सुविधा पुरवण्यात आल्याचे उल्लेख मिळतात. मेवाड मधील 'धेवर' सरोवर प्रसिद्ध होते. मुघल काळातील बाग-बगीचे, धरणे व कालवे काही उत्तम स्थितीत तर काही अवशेषरूपाने पहावयास मिळतात. तत्कालीन मुघल कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी ही सर्वांत विश्वसनीय समजली जाते. या वरून इतिहास संशोधक तत्कालीन बांधकाम कला, स्थापत्य तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, शेती पद्धती, आवड-निवड, अभिरुचि इत्यादीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**१०) शस्त्रास्त्रे व अवजारे :**

पुरतात्वीय साधनांच्या मध्ये विविध प्रकारची शस्त्रास्त्रे आणि शेतीची अवजारे यांचा समावेश होतो. भारत आणि परदेशातील विविध वस्तुसंग्रहालयांच्यामध्ये शस्त्रास्त्रे आणि अवजारे पाहावयास मिळतात. तत्कालीन युद्धशास्त्राचा आणि शेतीचा अभ्यास करण्यासाठी ही साधने महत्वाची आहेत. बाबराने

पानिपतच्या युद्धात पहिल्यांचा तोफाचा वापर केला, बंदुकांचा वापर सुरू झाला. पारंपरिक युद्धं शास्त्रात खूप मोठ बद्दल घडून आला. किल्ला स्थापत्य शास्त्रात झालेला बदल आणि शास्त्रास्त्रे याचा या वस्तु अवषेशावरून अभ्यास केला जावू शकतो, त एक महत्वाचे साधन आहे. मुघल काळातील ढाल, तलवार, भाला, धनुष्यबाण, कट्यार, खंजीर, दांडपट्टा, सुरा-बरचा, वाघनखे, बंदुका, तोफा, जिरेटोप, चिलखत, शिंगाडा इत्यादीसारखी अनेक शस्त्रास्त्रे पहावयास मिळतात. या शस्त्रास्त्राच्याद्वारे तत्कालीन लढाईमध्ये कोणकोणती शस्त्रे वापरली असून त्या लढाईचे तंत्र कसे होते यावरही प्रकाश टाकता येतो. मुघलकालीन शेतीशी संबंधित विविध आवजारांच्यावरून शेती पद्धतीचा अभ्यास केला जावू शकतो.

### ११) गुहाचित्रे (चित्रकला) :

मानवी भावनांच्या अभिव्यक्तीचे एक साधन म्हणून आपल्या मनातील भाव-भावनांचे सुंदर चित्रण दगड धातू, गुहा व लाकडावर कोरीव अथवा रंगाच्या माध्यमातून चित्रे रेखाटलेली दिसतात. आदिमानवाला भाषा येण्यापूर्वी तोंडातील स्वरांनी केवळ विकारच दर्शविता येत असावेत. मानवी बुध्दीच्या विकासाबरोबर त्याला विचाराचीही अभिव्यक्ती करण्याची गरज वाटली असावी. शब्दशुन्य विचार आकाराने व्यक्त करता येतो. जेथे शब्द नसतो किंवा शब्दच संपतो तेथे कलेचा प्रारंभ होतो. भाषेचा विकास होण्यापूर्वी स्वाभाविकपणे मानव कलेकडे वळला. मानवी संस्कृतीच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी गुहाचित्रे अथवा चित्रकला हे प्रमुख साधन आहे.

### १२) नकाशे :

इतिहासलेखनासाठी व ऐतिहासिक घटना विशद करण्यासाठी नकाशांचा उपयोग होतो. ए. ए. मिलर यांन 'The Dissection Analysis of Maps' या ग्रंथात नकाशाचे महत्व विशद करताना म्हणतात की, "I refer to the map as a tool in reality it is a whole bag of tools, containing more ingenious devices than boy scouts knife and if property Used it will open almost any geographic problem" वरील विधानावरुन नकाशाचे महत्व लक्षात येते. रोमन संस्कृतीच्या काळात नकाशे तयार करण्याच तंत्रात प्रगती झाली. टॉलेमीने लिहिलेल्या 'जिऑग्राफिया' या ग्रंथात विविध नकाशे पहावय मिळतात. भारताचा पहिला नकाशा टॉलमीने रेखाटला, त्यानंतर सर थॉमस रो यांने मुघल साम्राज्याचा नक काढला. भारताचा पहिला अधिकृत नकाशा सन १७५२ मध्ये डी-ॲनव्हील यांने काढला. ब्रिटिश काळात 'सर्वे ऑफ इंडिया' या विभागाची स्थापना झाली. त्यांच्या मार्फत अधिकृत नकाशे तयार केले जाऊ लागले. कर्तोग्राफी (Cartography) या विषयामध्ये नकाशा शाखाचा अभ्यास केला जातो.

### अ) मौखिक साधने :

इतिहासलेखन व आधुनिक संदर्भ साधनांचे क्षेत्र अधिक विस्तारत आहे. इतिहासलेखनात नवनविन विचार प्रवाहांचा अंर्तभाव झालेला आहे. वंचितांचा इतिहास, ॲनल्स, संरचनावादी, स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक, खाद्य संस्कृतीचा इतिहास इत्यादी नवनवीन प्रकारचे इतिहासलेखन प्रवाह एकाच घटनेचे विविध अंगानी इतिहास लेखन करताना दिसतात. या नविन विचारप्रवाहांनी नव्याने ऐतिहासिक साधनांचे महत्व,

चिकित्सा, विश्लेषण अथवा प्रचलित साधनांचा नव्या पध्दतीने वापर करण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये मौखीक परंपरा आणि साधनां अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटुंबिक, समूहिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि दैनंदिन जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांसंबधी मौखिक स्वरूपातील माहितीचा संग्रह आणि अभ्यास होय. लिखित साधनांपेक्षा मौखिक साधनांची विश्वासार्हता कमी मानली जात असली, हे जरी खरे असले तरी जेथे लिखित साधनाचा अभाव असतो तेथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. मानवी समाजात काही समूहाकडे-जमातींकडे लिखित साधनांचा अभाव होता अथवा त्यांना लेखन कलेची माहिती नव्हती. त्याचप्रमाणे लेखन कलेची माहिती असून देखील काही समूहांनी आपली माहिती मौखिक परंपरेनेच पिढ्यानपिढ्या संक्रमित केली आणि पाठांतराद्वारे पिढ्यानपिढ्या त्यांचे जतन देखील केले. अशा पद्धतीने ज्ञान, स्मृति, भूतकालीन घटना, पारंपारिक कथा-गाणी, पारंपारिक कायदे यांचे ग्रहण, संवर्धन आणि संक्रमण होत राहिले. पारंपारिक कथा, दंतकथा, मिथके, म्हणी, पोवाडे, ओव्या, गाणी इत्यादींचा अंतर्भाव मौखिक परंपरेत केला जातो. मौखिक परंपरेतून मिळालेल्या माहितीची लिखित अथवा पुरातत्त्वीय साधनांशी पडताळणी करून इतिहासकार त्या माहितीचा वापर करतात. अशा पडताळणीमुळे माहितीच्या सत्यासत्यताची तपासणी करता येते.

**मौखिक इतिहासाचे महत्त्व :**

ऐतिहासिक घटना किंवा घडलेले प्रसंग बऱ्याच वेळा लिहून ठेवलेले नसतात किंबहुना ते त्यांना शक्यही नव्हते. कारण प्राचीन काळापासून साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. त्यामुळे त्या घटना किंवा प्रसंगांची नोंद झाली नाही. परंतु मौखिक साधनांच्या मधून ते प्रतिबिंबित झालेले दिसते. मौखिक परंपरेत प्रसंग किंवा घटना सारखीच असते परंतु सांगणारी व्यक्ती वेगळी असते, त्यामध्ये तो स्वत: ची भर घालून अधिक रंजकता आणण्याचा प्रयत्न करत असतो किंवा केलेला असतो. त्यामुळे घटना व प्रसंग सारखाच असतो परंतु त्यातील नावे वेगवेगळी असतात. तो प्रसंग किंवा घटना अनेक मौखिक साधनांच्या माध्यातून वर्षानुवर्षे सांगण्याचे काम चालू असते. त्यामुळे प्रसंगातील वस्तूनिष्ठता लुप्त होते. परिणामी मौखिक साधनांचा इतिहास लेखनामध्ये फारसा उपयोग होत नाही, त्याचे महत्वही राहत नाही, हे जरी खरे असले तरी अशा मौखिक साधनांच्या माध्यमातून जी माहिती प्राप्त होते अथवा त्यामधुन जो अर्थबोध होतो त्या माहितीच्या आधारे पूर्वी घडलेल्या घटनांच्या ऐतिहासिक सत्यापर्यंत जाता येते. जेव्हा एखाद्या महत्वाच्या घटनेविषयी कोणताही लिखित अस्सल पुरावा किंवा साधन उपलब्ध होत नाही तेव्हा अशा मौखिक साधनांच्या आधाराने काही अंशी त्या घटनेवर प्रकाश टाकणे शक्य होते. मौखिक साधनांच्यामधून मिळालेल्या ऐतिहासिक माहितीची तर्क संगत दृष्टीकोणातून चिकित्सा किंवा अभ्यास करून त्या संबंधीत घटनेचा उचीत अन्वयार्थ काढता येतो. मौखिक साधनांच्या माध्यमातून परंपरागत चालत आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय इतिहासावर प्रकाश टाकण्यास मदत होते. त्याचबरोबर तत्कालीन आचार-विचार, रुढी-परंपरा, आहार-विहार इत्यादी संबंधी माहितीही मिळते.

**मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधने :**

**१) पोवाडे :**

पोवाडा म्हणजे एखाद्या घटनेवर अथवा व्यक्तीवर आधारीत काव्य स्वरुपात आवेशयुक्त भाषेत निवेदन करणारे कवन. गायनाद्वारे मनोरंजनात्मकदृष्ट्या पोवाडा सादर करणाऱ्या व्यक्तीस 'शाहीर' असे म्हणतात. बहामनी राज्याच्या अमलापासून 'शाहीर' हे नाव अरबी-फारसी भाषेतून मराठीत रुढ झाले. पोवाडा हा विरांच्या पराक्रमाचे, विद्वानांच्या, बुध्दिमत्तेचे, सामर्थ्याचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन अथवा स्तुती स्वरुपात असते. पोवाड्यामधील अनेक वर्णन ऐतिहासिक सत्याला धरून असल्यामुळे त्याचा एक मौखिक साधन म्हणून वापर केला जातो. बखरीपेक्षा पोवाड्यास वरचे स्थान असावे असे मत वि. का. राजवाडे यांनी व्यक्त कलेले आहे. पोवाड्याचे छत्तिसगडी पोवाडे, कच्छमधील भाट व वादी यांचे पोवाडे, सिंधचे पोवाडे, मराठी पोवाडे इत्यादी प्रांतिक भाषेनुसार प्रकार आढळतात. मराठी भाषेतील ३०० ऐतिहासिक पोवाडे उपलब्ध असून त्यापैकी शिवकालीन ०४, शाहूकालीन ०३, पेशवेकालीन १५० व उर्वरित इंग्रजी कालखंडातील आहेत. मराठ्यांच्या इतिहासावरील पोवाड्यांचे संकलन इत्यादी संपादन शाळीग्राम, य. न. केळकर यांनी केलेले आहे, दिनेशचंद्र सेन यांनी 'Ballads of Eastern Begal Mai Manisng' या ग्रंथात बंगाल प्रांतातील पोवड्यांचे संकलन आहे.

इतिहासाचे साधन म्हणून पोवाड्यांचा मर्यादीत प्रमाणात उपयोग होतो. राजकीय इतिहासापेक्षा तत्कालीन सांस्कृतिक जीवनांचे प्रतिबिंब पोवाड्यातून ठळकपणे उमटलेले दिसते. अफझल खानचा वध, सिंहगडाची स्वारी, सवाई माधवरावाचा मृत्यु, संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, तुळाजी आंग्रे, संताजी-धनाजी, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे व पहिला बाजीराव यांच्यावरील पोवाडे उपलब्ध आहेत. पेशव्यांच्या काळात अनंत फंदी (१७४४-१८५३), शाहीर परशराम (१७५४-१८४४), रामजोशी (१७५८-१८१३), प्रभाकर (१७६९-१८४३), सगनभाऊ (१७७४-१८४०) व होनाजी बाळा इत्यादी प्रसिध्द शाहीर होवून गेले. पोवाड्यांची परंपरा मौखिक पध्दतीने एका-पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असल्याने बऱ्याच वेळा मूळ पोवाड्यातील काही कडवी विसरली जाऊन त्या ठिकाणी दुसरी कडवी आलेली दिसतात. शिवाय पोवाडे हे मनोरंजनाचे साधन असल्याने त्यामध्ये रंजकता आणण्यासाठी अतिशयोक्ती, पाल्हाळ, दंतकथा, विभूतीपूजा ज्याच्यावर पोवाडा रचावयाचा आहे त्याच्या विषयी वाटणारा आदर किंवा आकस यामुळे पोवाड्यातून त्याचा विपर्यास झालेला दिसतो. तरी ही पोवाडे हे एक ऐतिहासिक साधन म्हणून महत्व आहे .

**२) म्हणी आणि वाक्प्रचार :**

लौकिक अर्थाने अनेक म्हणी व वाक्प्रचार बोली भाषेच्या रुपाने व्यवहारात प्रचलित असतात. त्यापैकी काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक घटना व प्रसंगावर आधारित असतात. वाक्प्रचार आणि म्हणी हा मौखिक वाङ्मयाचा अमोल ठेवा आहे. कणभर शब्दात मणभर आशय प्रकट करणे हे या म्हणींचे वैशिष्टय आहे. भाषिक इतिहासाच्या दृष्टीने वाक्प्रचार आणि म्हणींचे महत्व आहे. वाक्प्रचार व म्हणी हा जीवनातील अनुभवांचा अर्क असतो. तो एक भाषिक, अल्पाक्षरी जीवनानुभव असतो. एखादा विशिष्ट प्रसंग लोकांच्या

मनावर चांगलाच परिणाम घडवून आणतो. हा प्रसंग जितका संस्मरणीय असेल, त्या प्रमाणात त्यावर आधारीत एखादी म्हण अथवा वाक्प्रचार अस्तित्वात येतो व बराच काळ अस्तित्वात राहतो. ऐतिहासिक प्रसंगावरून किंवा पुरुषांच्या नावावरून तयार झालेल्या म्हणी पुढे काही शतके जनमानसावर प्रभाव टाकतात. म्हणीला भाषा संप्रदाय यांचे मर्यादीत स्थान असते. एखादी म्हण अथवा वाक्प्रचार एखाद्या गावापूरता किंवा भौगोलिक प्रदेशापुरता मर्यादीत असतो. म्हणी साधारणतः दंतकथा, पुराणकथा किंवा विशिष्ट ऐतिहासिक प्रसंगावर आधारीत असतात. काही म्हणींचा अर्थ सरळ असतो तर काहींचा अर्थ विरोधी, उपरोधी अथवा निषेधी स्वरूपाचा असतो.

शिवकालीन प्रसंगावर आधारीत काही म्हणी आजही टिकून आहेत. उदा. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा', 'गड आला पण सिंह गेला', 'आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे', 'बचेंगे तो और भी लढेंगे' इत्यादी याशिवाय काही म्हणी व वाक्प्रचार ऐतिहासिक दंतकथेवर आधारीत असतात, उदाः 'हा सुर्य हा जयद्रथ', 'सतीचे वाण' (ही म्हण/वाक्प्रचार दासकन्या सतीच्या दंतकथेवर आधारीत आहे.) म्हणीप्रमाणे काही वाक्प्रचारही ऐतिहासिक घटनेवर आधारित असतात. उदा. 'लष्कराच्या भाकरी भाजणे', 'तोफेच्या तोंडी देणे', 'सुळावर देणे', 'सुळावरची पोळी', 'हुतात्मा होणे', 'इतश्री होणे' इत्यादी स्वरुपाच्या म्हणी व वाक्प्रचारातून काही ऐतिहासिक प्रसंग तत्कालीन न्यायनिवाडा, सामाजिक, सांस्कृतिक, प्रथा परंपरांच्यावर प्रकाश टाकतात. वाक्प्रचार आणि म्हणींतून जातिव्यवस्थेवरही प्रकाश पडतो.

म्हणी व वाक्प्रचार यांचेही संकलन करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून 'ज्ञानसिंधू' छापखान्याने सन १८४२ मध्ये केला. म्हणीचा पहिला संग्रह 'कुडूकवही' (फुर्डक वही) या नावाचा काढला. सदाशिव विश्वनाथ यांनी 'सर्व देशांतील निवडक म्हणी' या नावाने चार हजारांवर म्हणींचा संग्रह सन १८५८ मध्ये प्रसिद्ध केला 'सर्व देशांतील' असे म्हटले असले तरी मुख्यत्वे इंग्रजी व मराठी म्हणींचा संग्रह हेच त्याचे स्वरूप आहे. गंगाधर गोविंद सापकर ह्यांनी १८७२ मध्ये 'मराठी प्रचारातील म्हणी' चा एक संग्रह प्रकाशित केला. रेव्हरंड ए. मॅनवॉरिंग यांच्या 'मराठी प्रोव्हर्भ' (Marathi Proverbs) या मराठी म्हणींच्या संग्रहातून येथील जनसामान्यांची विचारपद्धती व स्वभावधर्म यांवर चांगला प्रकाश पडतो. गुणवत्तेच्या दृष्टीने मॅनवॉरिंगचे हे काम अधिक वाखाणण्याजोगे आहे. यानंतर सन १९०० मध्ये म्हणींचा पहिला कोश गणेश नारायण देशपांडे यांनी तयार केला.

**३) लोकपरंपरा : (लोककथा/दंतकथा आणि प्रथा परंपरा)**

पारंपारिक सांस्कृतिक आशय असलेली व मौखिक परंपरेने जतन केली जाणारी कथा म्हणजे 'लोककथा' होय. समग्र लोक साहित्याप्रमाणे लोककथा ही सुध्दा समूहनिर्मित व समूहरहित असते. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ती संक्रमित होत असते व पिढ्यान पिढ्या जतन केली जाते. लोक कथा या प्रवाही व परिवर्तनशील असतात आणि भौगोलिक प्रदेशानुसार त्यांची रूपेही बदलतात. वि. का. राजवाडे यांनी पारंपारिक कथासाठी सर्वप्रथम 'लोककथा' हा शब्द वापरला. लोककथांना विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व पारंपारिक रूढी परंपरांचे आशय असतात. उदा. ब्रह्मकथा, पंचतंत्र, जातककथा,

वेताळ पंचविशी इत्यादी. मेरी फ्रिअरचे 'ओल्ड डेक्कन डेज' (१८६८), मध्ये काही पारंपारिक लोककथाचे संकलन केलेले आहे. तर रिर्चड टेंपल यांनी राजपूताना व पंजाबमधील पारंपारीक मौखिक लोककथा 'लीजण्ड्स ऑफ पंजाब' या ग्रंथात संकलित केलेल्या आहेत दंतकथा ही संज्ञा स्थानिक अथवा ऐतिहासिक आख्यायिकांना वापरली जाते. इंग्रजीतील 'Legend' या शब्दाला मराठीत 'दंतकथा' हा समानार्थी शब्द जातो. दंतकथा म्हणजे असंबध्द व पुष्कळदा विस्मृत इतिहास असे लोकसाहित्याचे विशारद मानतात. हे जरी खरे असले तरी दंतकथेत इतिहासाचा अगदी सुक्ष्म का असेना भाग अथवा धागा असतो. श्रीधरांनी लिहिलेल्या 'पांडवप्रताप' या ग्रंथात प्रथम 'दंतकथा' हा शब्द वापरला. श्रीधरांनी दंतकथा हा शब्द 'तोंडो-तोंडी' सांगितलेल्या गोष्टी ज्यांना पुराव्याचा लेखी आधार नाही या अर्थाने वापरलेला आहे. दंतकथेचा प्रभाव जनमानसावर कायम राहतो. दंतकथेमध्ये सत्य व कल्पित यांची अशी सरमिसळ केलेली असते की, वस्तूस्थिती त्यापेक्षा वेगळी असते.

राघोबा मोरोबा यांनी सन १८५५ मध्ये केलेले 'Tales of King Vikrama of Ujjain' प्राकृत भाषेतील हरिदास यांच्या पुस्तकाचे इंग्रजीत केलेले भाषांतर हे मराठी माणसाने केलेले गोष्टींचे पहिले संकलन असले तरी, भारतातील मौखिक कथांच्या मौखिकता आणि लोकसाहित्य संकलनाचा पाया मेरी फ्रिअर हिने घातला. सन १८६८ मध्ये तिने 'ओल्ड डेक्कन डेज' या आपल्या पुस्तकास भारतातील कथांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे संकलन केले. त्यातून महाराष्ट्रातील काही ऐतिहासिक दंतकथा आणि काही लोककथा हाती लागतात.

सेतूमाधवराव पगडी यांनी अशाच दंतकथेवर आधारीत 'इतिहास व कल्पित' हा ग्रंथ लिहिलेला आहे. ना. गो. चापेकरांनी 'बदलापूर' या पुस्तकामध्ये चंद्रहासाची कातोडी दंतकथा संकलित केलेली आहे. त्र्य. श. शेजवलकरांनी वि. ग. भिडे यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मोत्याच्या कणिसाची दंतकथा दिलेली आहे. भटक्या यहुश्याच्या मीडसच्या दंतकथेच्या धर्तीवर श्री शं. ग. दाते यांनी 'लोककथा व लोकगीते' या ग्रंथात 'राजा धिंग माया शिंग' ही दंतकथा संकलित केलेली आहे. याशिवाय राजपूतान्यामधील 'खेमरोजी आभलदे' राजा हुण व त्याची पत्नी पिंगला यांच्यावरील 'पिंगलेची कथा' इत्यादी प्रसिध्द ऐतिहासिक दंतकथा आहेत. दंतकथेचा उगम वस्तूस्थितीत असला तरी त्या वस्तूस्थितीला अधिक उठाव किंवा रंजकता यावी म्हणून त्या घटना अथवा व्यक्तीला दैवत्व किंवा देवतास्वरुप देण्याचा प्रयत्न केलेला असतो असे सरोजिनी बाबर यांचे मत आहे. दंतकथेच्या आधारे इतिहासलेखन करताना अधिक खबरदारी घेतली जाते. जरी दंतकथेतून काही ऐतिहासिक घटनांचा बोध होत असला तरी दंतकथा या विर्पस्त असतात. प्रत्येक भाग, जिल्हा, तालुका व त्या तालुक्यातील गावा-गावात अशा काही दंतकथा प्रचलित असतात, की त्यांचा संदर्भ काही ऐतिहासिक घटनेशी असतो. बऱ्याच दंतकथा वंशपरंपरेने चालत आलेल्या असतात. अशा दंतकथांचा शोध घेवून त्यांचा ऐतिहासिक अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केल्यास नवीन इतिहास समोर येण्याची शक्यता असते.

आर्थर क्रॉफर्डचे 'लीजंडस् ऑफ कोकण' (१९०९) हे पुस्तक दंतकथांचा सुरेख संग्रह आह. यात अगदी जुन्या पुराणकथा व शिवाजी महाराज, पेशव्यांच्या व इंग्रजांच्या सत्तेच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या नव्या दंतकथा यांचे गमतीदार मिश्रण आहे. भाषाविज्ञान, लोकसाहित्य व सामाजिक इतिहास या दृष्टींनी या

संग्रहाचे महत्त्व विशेष आहे. जेम्स कॅम्बेलचे 'स्पिरीट बेसिस ऑफ बेलीफ अँड कस्टम' (१८८५) हे पुस्तक 'इंडियन अँटिक्वेरी' मधून क्रमशः टिपणांच्या स्वरूपात पहिल्यांदा प्रसिद्ध झाले. कॅम्बेलचे हे काम म्हणजे तत्कालीन उच्चवर्णीय व कनिष्ठवर्णीय हिंदू प्रजेच्या मनात खोलवर रुजलेल्या समजुतींचा शोध आणि विश्लेषण आहे. कॅम्बेलने हिंदूमधील प्रथाप्रघातांचे निरीक्षण करताना विशेषतः जन्म, विवाह, स्त्रीत्व, गरोदरपण, अंत्यसंस्कार यांवर विशेष भर दिला आहे.

बी. ए. गुप्ते यांनी लिहिलेले 'हिंदू हॉलिडेज अँड सेरेमोनीज, विथ डेजरटेशन ऑन ओरिजन, फोल्क्लोरे अँड सिंबोल' (१९१०) Hindu Holidays and Ceremonies, with dissertations on origin, folklore and symbols हे पुस्तक महाराष्ट्रातील हिंदू जातीजमातीत त्या काळी प्रचलित असणाऱ्या व्रतवैकल्यांची, उपवास तापासांची, सणाउत्सवांची माहिती आहे. या अनुषंगाने लेखकाने अनेक कहाण्यांचे भाषान्तर केले आहे. श्रावणी रविवार, आजेपाडवा, चैत्रगौरी, चंपाषष्ठी आणि आदित्यराणुबाईची कहाणी, खंडोबा आणि बनाईची कहाणी, गोपद्माची कहाणी व गोपाद्मपूजा, महालक्ष्मीची कथा आणि महालक्ष्मीचे व्रत, सोमवाराचे व्रत, नागपंचमीचे व्रत व नागपंचमीची कथा यांसारख्या अनेक तपशिलांनी युक्त असणारे हे पुस्तक सांस्कृतिकदृष्ट्या मौल्यवान माहिती पुरविते. ए. एम. टी. जॅक्सन आणि आर. ई. एन्थोवेन यांच्या Folklore of konkan (1915) for Folk-Lore of Bombay (1924) निर्देश येथेच करावयास हवा. जॅक्सनचा नाशिकला वध झाल्यावर लोकसाहित्याच्या संकलनाच्या कामाची जबाबदारी एन्थोवेन यांच्यावर येऊन पडली. जॅक्सन यांची टाचणे (Folklore notes on the Konkan and Gujarat) एन्थोवेन यांनी इंडियन अँटिक्वेरीत दोन लेखांत प्रसिद्ध केली.

सी. ए. किंकेड यांचे "Deccan Nursery Tales' (१९१४) हे पुस्तक पुराणातील, मध्ययुगीन व स्थानिक स्वरूपाच्या अनेक गोष्टींचा संग्रह आहे. मुलांना आकर्षक वाटतील अशा गोष्टींच्या या संग्रहातील कथानिवेदन व शैलीही वेधक आहे. रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार आणि गुरुवार, शुक्रवार, शनिवार अशा वारांच्या गोष्टी, महालक्ष्मी व दोन राण्या, बेटावरील राजवाडा, नागोबा-सापांचा राजा, सोनेरी मंदिर यांसारख्या एकंदर सतरा गोष्टी येथे आहेत.

**४) लोकगीते :**

मौखिक परंपरेने चालत आलेल्या अनेक विविध गीतप्रकारांचा समावेश 'लोकगीते' या संज्ञेत होतो. पारंपारिक गीतांना लोकगीते हा शब्द प्रयोग सर्व प्रथम वि. का. राजवाडे यानी वापरला. प्राचीन काळापासुन प्रचलित असलेला 'गाथा' प्रकार हा लोकगीताचाच प्रकारमनाला जातो लोकगीताचाच एक प्रकार मानला जातो. लोकगीत अथवा लोकगाथा हा मौखिक परंपरेने चालत आलेला प्रदीर्घ कथनपर गीत काव्याचा प्रकार वि. का. राजवाडे यांनी 'सज्जनगडचे एक लोकगीत' 'Flock Song of Sajjangad' हा लेख लिहून लोकगीतातून आलेली ऐतिहासिकता अथवा इतिहासाचे अंग शोधण्याचा प्रयत्न केला. यानंतर लोकगीताच्या माध्यमातून सामाजिक इतिहासाचे संशोधन ठरण्याच्या उद्देशाने सन १९१५-२५ या काळात भारत इतिहास संशोधन मंडळाने वार्षिक माध्यमातून लोकगीतांचा संग्रह प्रसिध्द केला. यामध्ये वि. का. राजवाडे व श्री

मुंडले यांनी धनगरांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील धनगरांच्या दोन मौखिक ओव्यांचा अभ्यास प्रा. ॲन फेल्डहाउस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे. ह्या ओव्याचे ध्वनिमुद्रण प्रसिद्ध जर्मन अभ्यासक गुंथर सोन्थायमर यांनी सन १९७० मध्ये केले होते. ओवी धनगर लोकांच्या बिरोबा आणि धुळोबा ह्या देवांबद्दल आहेत. याओव्यांचा सखोल अभ्यास करून धनगर लोकांचे जीवन अनुभव, सामाजिक चालीरीती, मूल्यं, संकल्पना, भौतिक परिस्थिती व मानसिकते बद्दल महत्त्वाची आंतरदृष्टी मिळते. धनगरांचा भौगोलिक प्रदेश, त्यांची अर्थव्यवस्था, जात आधारित श्रम-विभागणी आणि त्यांचे राजकीय जीवन याचे संदर्भ कळतात. मौखिक साधनांचा अभ्यास करून प्रा. ॲन फेल्डहाउस यांनी धनगर समूहाचे जग आणि जीवन वाचकासमोर प्रकट केले आहे.

ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्रातील मुसलमान स्त्रियांच्या ओव्या इत्यादी संपादन केले आहे. ना. गो. चापेकरांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिके मध्ये वासुदेव गीते, गोसावी गीते, इत्यादी संकलन केलेले आहे. एखाद्या ऐतिहासिक घटनेवर अथवा प्रसंगावर व व्यक्तिवर आधारीत भारतातील विविध प्रांतिक भाषेतील मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते आजही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या लोकगीतातून तत्कालिन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, रुढी, परंपरा इत्यादी संबंधी माहिती मिळण्यास मदत होते. लोकगीतामधून प्रतिविधीत झालेला इतिहास खरा असेलच असे ठाम सांगता येत नाही यामध्ये काही प्रमाणात विपर्यस्त माहिती येण्याची शक्यता असते.

**मौखिक परंपरेचे धोके :**

युरोपमधील बऱ्याच पत्रकारांनी आणि इतिहासकारांनी समकालीन इतिहासलेखनात साहित्य म्हणून अशी अनेक पुस्तके दिली आहेत ज्यामुळे आपल्याला इतिहास पुन्हा समजण्यास भाग पाडले आहे. इतिहासाची मौखिक परंपरा दीर्घकाळ टिकणारी आहे, परंतु ती कधीतरी नोंदविली जाणे देखील आवश्यक आहे. अशा स्त्रोतांचा धोका देखील कमी नाही, कारण बऱ्याच वेळा लोक आपल्या समुदायाचा अभिमान बाळगण्यास अतिशयोक्तीही करतात. पण त्यात सत्याचा काही अंश नक्कीच आहे. हा तुकड्याची चाळण करून तो समोर आणण्याची जबाबदारी इतिहासकारांची आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) The Preface to History हा ग्रंथ कोणत्या लेखकाचा आहे.

अ) प्रा. कार्ल गुस्तावसन | ब) प्रा. आर्थर मार्विक

क) प्रो. गॉसचॉक | ड) प्रो. इ. एच. कार

२) पेशवे दप्तराचे संपादक कोण आहेत.

अ) गो. स. सरदेसाई | ब) वि. का. राजवाडे

क) स. मा. गर्गे | ड) ग. चि. वाड

३) प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांचे आत्मचरित्र कोणते आहे.

अ) माझी जीवनगाथा ब) माझे सत्याचे प्रयोग

क) जीवन सेतु ड) जीवन प्रवाह

४) मध्ययुगीन काळात आलेला मोरोक्कन प्रवासी इब्ज बतुता यांने कोणते पुस्तक लिहिले आहे.

अ) किताब- उल-रहेला ब) तुझुक-एबाबरी

क) तुझुक- ए- जहांगिरी ड) बाबरनामा

५) उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर कोणती रासायनिक प्रक्रिया केली जाते.

अ) कार्बन १४ ब) कार्बन १५ क) कार्बन १६ ड) कार्बन १७

६) एशियाटीक सोसायटीने प्राचीन भारतीय शिलालेख ताम्रपट व जुनी हस्तलिखिते याचा अभ्यास करण्यासाठी सन १७८८ मध्ये कोणते नियतकालिक सुरु केले.

अ) एशियाटीक रिसर्चेस ब) इंडिया रिसर्चेस

क) एसेज ऑन इंडियन अँटिक्विटिक्स ड) कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया

७) विजयनगर काळात किती प्रकारचे आलेख होते.

अ) चार ब) पाच क) सहा ड) यापैकी नाही

८) 'शाहीर' हे नाव कोणत्या भाषेतून मराठीत रुढ झाले.

अ) अरबी-फारसी ब) मराठी क) कन्नड ड) हिन्दी

९) पारंपारिक कथासाठी सर्वप्रथम लोककथा हा शब्द सर्व प्रथम कोणी वापरला.

अ) वि. का. राजवाडे ब) गो. स. सरदेसाई

क) स. मा. गर्गे ड) ग. चि. वाड

१०) लीजंडस् ऑफ कोकण हे दंतकथांचे पुस्तकाचे लेखक कोण आहे.

अ) आर्थर क्रॉफर्ड ब) मेरी फ्रिअर क) रिर्चड टेंपल ड) जेम्स कॅम्बेल

११) मौखिक साधनांचा अभ्यास करून प्रा. ॲन फेल्डहाउस यांनी कोणत्या समूहाचे जीवन प्रकट केले आहे.

अ) धनगर ब) कोळी क) भिल्ल ड) रामोशी

### ३.२.२ अंतरंग व बाह्यरंग परीक्षण (Internal and External Criticism of Written Sources)

**संदर्भ साधनांचे चिकित्सक परीक्षण :**

संशोधकाने संशोधांनासाठी आवश्यक संदर्भसाधने संकलित केल्यानंतर संशोधन प्रक्रियेतील दूसरा टप्पा म्हणजे कागदपत्रांची चिकित्सा करणे. यालाच आपण संदर्भ साधनांचे परीक्षण करणे असेही म्हणतो. इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांची जंत्री असते. भूतकाळात नेमके काय घडले, कसे घडले याची माहिती संदर्भ साधने देत असतात. मात्र त्यातून मिळणाऱ्या माहितीचे परीक्षण करणे आवश्यक असते. कारण अशा कागदपत्रांमध्ये फेरफार झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण इतिहासकार हा वर्तमान काळात संशोधन करीत असतो तर संशोधनाचा विषय आणि त्या विषयातील घटना या कित्येक वर्ष अगोदर म्हणजे भूतकाळात घडलेल्या असतात. त्यामुळे ती घटना पुन्हा घडविता येत नाही. म्हणून इतिहासकाराला साधनांची यथार्थ माहिती मिळवण्यासाठी साधनांचे परीक्षण किंवा चिकित्सा करावी लागते. या संदर्भात प्रो. बी. शेख अली यांनी आपल्या 'History it's Theory and Method' असे म्हंटले आहे की, 'संशोधन ही एक प्रक्रिया आहे. यामध्ये कागदपत्रांचे परीक्षण केले जाते. ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर मानवी शरीराची चिरफाड करून त्यातील असाधारण असा भाग काढून टाकतो. त्याप्रमाणे इतिहासकार परीक्षणाच्या आधारे पुराव्यातील दोष काढून टाकतो. परीक्षणाचा मुख्य हेतू हाच असतो की आपल्या लेखनातील चुका टाळणे व सत्य जाणून घेणे'. संशोधकाने प्राप्त मूळ साधने तत्कालीन आहेत की नाही हे ठरविणे आवश्यक असते. संदर्भ साधनांच्या परीक्षणाचा टप्पा चिकित्सक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा असतो. संदर्भ साधनांच्या चिकित्सेचे दोन टप्पे आहेत, यामध्ये बहिरंग व अंतरंग परीक्षण समावेश आहे. बहिरंग परीक्षणामध्ये कागदपत्राचा लेखक कोण, काळ कोणता व स्थळ याबद्दलची सत्यता तपासली जाते. तर अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागपत्रांच्यामधील मुख्य मजकुराची विश्वसनीयता तपासली जाते. याशिवाय अंतरंग परीक्षणामध्ये सकारात्मक व नकारात्मक परीक्षण देखील केले जाते.

**अ) बाह्य अथवा बहिरंग परीक्षण** (External Criticism) :

संदर्भ साधनांच्या चिकित्सक परीक्षणातील बहिरंग परीक्षण हा पहिला टप्पा आहे. यामध्ये कागदपत्रांची विश्वसनीयता सिद्ध केली जाते. प्राप्त साधने अथवा कागदपत्रे, अवशेष, अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत? अस्सल आहेत की नकली आहेत? कागदपत्रांचा लेखक कोण, त्याचा कालखंड कोणता, कागदपत्र लिहिलेली लिपी, भाषाशैली, हस्ताक्षर याच्या आधारे बहिरंग परीक्षण केले जाते. याशिवाय लिहीण्यासाठी वापरलेली शाही, कागदाचा रंग, धातु इत्यादी संबंधी विविध शास्त्रांचा आधार घेऊन शोध घ्यावा लागतो. बहिरंग परीक्षणात खालील बाबींचा समावेश केला जातो.

**१) कागदपत्रातील विषय :**

संशोधकाने संशोधनासाठी ज्या विषयाची निवड केलेली आहे त्याच विषयाची कागदपत्रे आहेत का? हे प्रथम पाहिले जाते. संशोधनाचा विषय शिवकालीन आहे आणि संदर्भ साधने जर पेशवेकालीन असेल तर

तो प्रथम दर्शनीच आपल्या संशोधनास उपयोगी नाही हे निश्चित करता येते. थोडक्यात ज्या काळाशी निगडीत आपला विषय आहे त्याच काळाचा प्रथम विचार केला जातो.

**२) कागदपत्रांचा अस्सलपणा :**

संदर्भ साधनांच्या अथवा कागदपत्राच्या परीक्षणातील दुसरी पायरी म्हणजे प्राप्त कागदपत्रांचा अस्सलपणा/खरेपणा ठरविणे. संशोधकाने संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे, हस्तलिखिते मूळ स्वरूपाची आहेत की नक्कल केलेली आहेत याचा शोध घेणे. कारण प्रत्येक कालखंडात लिहिण्याच्या पद्धतीत बदल झालेला आहे. प्रत्येक कालखंडातील लेखन पद्धती वेगळी असते, अक्षराचे वळण वेगळे असते, काही शब्द त्या-त्या काळात रूढ झालेले असतात. वरील निकषावरून प्राप्त साधनांची शहानिशा करता येते. कागदपत्रावर वेगवेगळ्या काळातील शिक्क्यावरूनही काळ ठरविण्यास मदत होते. एखाद्या हस्तलिखिताची एखादी प्रत सापडल्यानंतर त्याच्या इतर काही प्रती उपलब्ध आहेत का याचा प्रथम शोध घ्यावा लागतो.

**३) लेखकाची सत्यता :**

अनेकदा जुन्या कागदपत्रातील प्रारंभीचा भाग नष्ट झाला असण्याची शक्यता असते. परिणामी लेखकाची ओळख होत नाही. बर्याचदा हे जाणीवपूर्वक केलेले असते. त्यामुळे अशा कागदपत्राचा लेखक हा समकालीन आहे की नाही हे ठरविणे अवघड होते. आपल्या लेखनाला महत्व मिळावे यासाठी प्रसिद्ध व्यक्तीच्या नावाचा वापर करून लेखन केलेलं असण्याची शक्यता असते. आशावेळी मजकूरातील आशय, वापरलेले शब्द पाहून कागदपत्राची सत्यता पडताळाणे महत्वपूर्ण ठरते.

**४) शिक्का मारण्याची पद्धत :**

विविध कालखंडातील राजवटीत अथवा शासकीय कागदपत्रावर विशिष्ट ठिकाणी शिक्का मारण्याची पद्धत होतीआणि आजही आहे. अशा प्रकारचा शिक्का न दिसल्यास अथवा हा शिक्का इतरत्र मारला असल्यासही त्या कागदपत्राच्या बाबत शंका उपस्थित होते त्या कागदपत्राच्या सत्यतेबद्दल शंका निर्माण होते. त्यामुळे हा कागद त्याच काळातील आहे का की नंतर तयार केलेला आहे हे ठरवणे महत्वाचे असते.

**५) लेखनकाळ :**

कालगणनाशास्त्र, भाषा शास्त्र, लिपिशास्त्र आणि हस्तालेखाशास्त्र यासारख्या सहाय्यकरी शस्त्रांच्या मदतीने आपल्याला लेखकाचा लेखनकाळ समजण्यास मदत होते. संशोधक ज्या कालखंडाचा अभ्यास करीत असतो त्याच कालखंडातील कागद असेल तर लेखकही त्याच कालखंडातील असणे अपेक्षित असते. अनेकदा एखादी घटना घडल्यानंतर म्हणजे उत्तरकालीन कागदपत्रे असतात. त्यामुळे लेखनकाळ कोणता आहे हे ठरवल्याने कागदपत्राची सत्यता समजू शकते.

**६) स्थळ :**

अंतरंग परीक्षणातील शेवटची पायरी म्हणजे संदर्भ साधनांचे अथवा कागदपत्राचे स्थळ निश्चित करणे. अनेकदा कागदपत्रात स्थळांचा स्पष्ट उल्लेख नसतो. ज्या ठिकाणी एखादी घटना घडली आहे अशा ठिकाणाच्या जवळील भौगोलिक बाबी म्हणजे नद्या, पर्वत, गाव किंवा इतर माहितीचा उपयोग होतो.

याशिवाय प्रदेशानुसार शब्द ही वेगवेगळे असतात. त्यामुळे भाषिक बदलाच्या आधारेही संशोधकस घटनेचे स्थळ निश्चित करता येते.

**ब) अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षण** (Internal Criticism) :

अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षणाला संदर्भ साधंनांच्या परीक्षण प्रक्रियेतील दुसरा टप्पा आहे. बाह्य परीक्षणापेक्षा अंतर्गत परीक्षणाला संशोधनामध्ये अधिक महत्त्वाचे स्थान आहे. अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रातील मजकूराची सत्यता तपासण्यात येते. संदर्भ साधन अथवा कागदपत्रांचा लेखक, काळ व स्थळ या बाह्य परीक्षणाची माहिती घेतल्यानंतर सदर कागदपत्राच्या आतील आशय खरा आहे का? हे अंतर्गत परीक्षणामध्ये तपासावे लागते. कागदपत्रातील मजकूराची चिकित्सा केली जाते. म्हणजे लेखकाने आपल्या पत्रात अथवा लेखात काय म्हटले आहे, तसे म्हणण्यामागची त्याची भूमिका काय आहे? त्याचे कोणाविषयी काय मत आहे, लेखकाची वैचारिक भूमिका काय आहे, मजकूरातील शब्दार्थ व गर्भितार्थ इत्यादी बाबींचे यामध्ये परीक्षण केले जाते. मिळालेली माहिती अथवा कागदपत्राची गुणवत्ता तपासणे हाच या परीक्षणाचा मुख्य हेतू असतो. डॉ. के. एन. चिटणीस या संदर्भात असे म्हणतात की, 'आंतरिक परीक्षणाचा हेतू कागदपत्रांमध्ये आत शिरून त्यांचे विश्लेषण करणे व शेवटी सत्य घटना जगापुढे आणणे हाच असतो.' अंतर्गत परीक्षणाचे सकारात्मक (वास्तववादी) परीक्षण (Positive Criticism) आणि नकारात्मक परीक्षण (Negative Criticism) असे दोन प्रकार आहेत.

**अ) सकारात्मक परीक्षण :**

सकारात्मक (वास्तववादी) परीक्षणामध्ये कागदपत्रातील आशय समजावून घेण्याचा प्रयत्न असतो. म्हणजेच शब्दांचा लौकिक अर्थ व खरा अर्थ समजावून घेतला जातो. लेखकाने कागदपत्रामध्ये मांडलेली सर्वच मते खोटी असतीलच असे नाही. यातील काही भाग खरा असू शकतो हा सकारात्मक विचार यामध्ये असतो. मात्र संशोधोकाला भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक असते. कारण काळानुसार व प्रदेशानुसार भाषा बदलत असते. त्यामुळे शब्दांचे वाच्यार्थ व गर्भितार्थ समजणे आवश्यक असते. एखाद्या काळामध्ये प्रचलित असलेला शब्द नंतरच्या काळात लुप्त झालेला असतो. किंवा एखाद्या प्रदेशात वापरत असलेल्या शब्दाला दुसऱ्या प्रदेशात दुसरा शब्द प्रचलित असतो. याशिवाय शहरी व ग्रामीण भागानुसारही शब्दांचे अर्थ वेगवेगळे असतात. कागदपत्राचा लेखक जे काही म्हणत असतो त्यामागची त्यांची भूमिका काय आहे हे प्रथम संशोधकाने जाणून घेतले पाहिजे. यासाठी त्याने कागदपत्राच्या भाषेची चिकित्सा केली पाहिजे. गरज भासल्यास शब्दकोशाचा ही वापर केला पाहिजे. थोडक्यात सकारात्मक परीक्षणात लेखामधील अथवा कागदपत्रातील विधानांचा खरा अर्थ समजावून घेतला जातो.

**ब) नकारात्मक परीक्षण :**

नकारात्मक परीक्षणाला इतिहासलेखनशास्त्रात उच्चप्रतीचे परीक्षण (Higher Criticism) असे म्हणतात. नकारात्मक परीक्षणामध्ये संकलित कागदपत्रांमधील प्रत्येक कागदपत्र हे खोटे आहे असे गृहीत धरून अथवा संशय घेऊनच सत्याचा शोध घेतला जातो. संशोधकाने जिथे-जिथे शक्य आहे तिथे संशय

व्यक्त केला पाहिजे. जोपर्यंत योग्य पुरावा मिळत नाही तोपर्यंत प्रत्येक विधानाबाबत शंका घेतली पाहिजे हा नकारात्मक परीक्षणाचा मुख्य हेतू असतो. त्यासाठी संशोधकाने लेखनकर्त्याची पात्रता, लेखनामध्ये सत्य सांगण्याची त्याची पात्रता आहे का?, त्याने केलेल्या निवेदनात तंतोतंतपणा अथवा खरेपणा आहे काय?, लेखनकर्त्याची वैचारिक पार्श्वभूमी कोणती आहे? त्याने कोणत्या परिस्थितीमध्ये सदरची विधाने अथवा विचार व्यक्त केले आहे याच विचार या ठिकाणी करणे आवश्यक असते.

**१) लेखनकाळ :**

संशोधकाने कागदपत्रातील घटनेचे वर्णन लेखन कर्त्याने केव्हा आणि कोणत्या परिस्थित केले आहे यावर कागदपत्राचे महत्व ठरते. एखादी घटना घडून गेल्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर त्या घटनेचे लेखन केलेले असेल तर, संबंधित लेखकाला घटनेचे विस्मरण होण्याची शक्यता अधिक असते. परिणामी घटना, स्थळ, काळ, वेळ आणि व्यक्ती याबाबत लेखनकर्त्याची गफलत होऊ शकते. लिखाणकाळ हा घटना घडल्यानंतर लगेचच असेल तर लिखाणाची विश्वासार्हता अधिक असते.

**२) लेखकाचा आश्रय :**

प्राप्त कागदपत्रातील लेखनकर्त्यास जर राजाश्रय असेल, लेखक शासकीय सेवेत असेल अथवा एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य असल्यास त्या लेखनकर्त्याची विधाने व्यक्तिनिष्ठ असण्याची शक्यता असते. कारण त्याच्यावर असलेल्या राजाश्रयामुळे त्याला आपली मते मोकळेपणांनी मांडता येत नाहीत. नकारात्मक परीक्षणात वरील बाब संशोधकाने बारकाईने पाहणे महत्वाचे ठरते.

**३) लेखकाची सामाजिक पार्श्वभूमी :**

लेखनकर्ता कोणत्या समाजातील कोणत्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतो अथवा त्याचा आर्थिक स्तर काय आहे, अथवा तो कोणत्या सामाजिक गटाचे प्रतिनिधित्व करतो याचाही प्रभाव त्यांच्या लिखानावर असू शकतो ही बाब संशोधकाने तपासली पाहिजे.

**४) लेखकाची पात्रता :**

ज्या लेखनकर्त्याने संबधित कागदपत्रे लिहिली आहेत त्याची पात्रता काय आहे. ज्या घटनेचे वर्णन लेखामध्ये आलेले आहे ती घटना त्याने स्वतः जवळून पाहिली आहे का? स्वत: अनुभवली आहे का? हे तपासले पाहिजे. यावरून संशोधकाला लेखकाची पात्रता समजून येऊ शकते.

**५) बौद्धिक क्षमता :**

एखाद्या घटनेची सत्य माहिती देण्यासाठी लेखकाकडे बौद्धिक क्षमता असावी लागते. कारण विषयाचे ज्ञान नसेल तसा अनुभव नसेल बौद्धिक पात्रता नसेल तर संबधित लेखनकर्त्याकडून घटित घटनेचे वर्णन अथवा इतिवृत चुकीचे होण्याची शक्यता असते.

### ६) लेखकाचा प्रामाणिकपणा :

संशोधक ज्या साधनांचे परीक्षण करणार असतो, त्या साधनाच्या लेखनकर्त्याच्या व्यक्तिमत्वाची, सभोवतालच्या परिस्थितीची, त्याची वैचारिक व बौद्धिक पातळी, त्याची मानसिकता या संबंधिची माहिती करून घेणे आवश्यक असते. या माहितीच्या आधारे संशोधकाला संदर्भ साधनांची विश्वसनीयता ठरविण्यासाठी मदत होते.

### ७) विचारसारणी :

लेखनकर्त्यावर राष्ट्रवादी, बुद्धिवादी, कल्पनावादी, अतिरेकी अशा विविध विचाराचा प्रभाव असण्याची गृहीत धरावी लागते. त्यामुळे संबंधित लेखनकर्त्यावर विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव तर नाही ना याचीदेखील तपासणी केली पाहिजे. कारण या विचारसरणीचे प्रतिबंब लिखानामध्ये उमटत असते.

### ८) धार्मिक प्रभाव :

व्यक्तीवर असलेला धार्मिक प्रभाव त्याच्या लिखाणावरही पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. लेखनकर्त्यावर कोणत्या धार्मिक विचाराचा प्रभाव आहे का नाही याची माहिती असणे आवश्यक असते. अशा व्यक्तीकडून विनाकारण दुसऱ्या धर्माबद्दल विशिष्ट प्रभाव असण्याची शक्यता असते.

### ९) लेखकाचा हेतू :

एखादे विधान करण्यामागे लेखकाचा कोणता हेतू आहे हे ही समजून घेणे अपेक्षित असते. अतिशयोक्तीपूर्ण विधान करण्यामागे, प्रौढी मिरविण्यासाठी किंवा आपण ज्याच्या आश्रयास आहे त्याची वाह वाह मिळविण्यासाठी अशी विधाने केलेली आहेत का? यामागे लेखकाचा हेतू काय आहे हे ही तपासवे लागते.

### १०) सत्य सांगण्याची क्षमता :

एखादी घटना लेखनकर्त्याने पाहिली अथवा अनुभवली असल्यास त्याचे वर्णन कागदपत्रांमध्ये जसेच्या-तसे येण्याची खात्री देता येत नाही. लेखक आपल्या सोयीनुसार त्यातील काही भाग लिखाणातून वगळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही वेळा लेखकाने घटना प्रत्यक्ष पाहिली नसेल, परंतु उत्तम प्रतिभाशक्ती असेल तर त्या घटनेचे वर्णन हुबेहूब करेल, घटना प्रत्यक्ष पाहिल्यासारखे वर्णन करू शकेल. त्यामुळे लेखनकर्त्याची सत्य सांगण्याची क्षमता तपासली पाहिजे.

### ११) घटनेचा साक्षीदार :

कागदपत्राचा लेखनकर्ता एखाद्या घटनेचा प्रत्यक्षदर्शी जर असेल तर त्या घटनेचे वर्णन अचूक व बिनचूक असण्याची शक्यता असते. लेखक घटनेचा प्रत्यक्षदर्शी आहे की त्यांने ती माहिती ऐकीव माहितीच्या आधारे लिहिलेली आहे हे पाहणे आवश्यक आहे.

**१२) लेखकाची अभिरुची :**

लेखनकर्त्याची विशिष्ट एखाद्या घटनेत अभिरुची नसेल तर ज्या घटनेचे लिखाण त्याने केले असेल तर त्याचे वर्णन तो मनापासून करणार नाही हा दृष्टीकोण तपासले पाहिजेत. याच्या बरोबर उलट जर लेखकाला संबंधित विषयाची आवड असेल तर त्या घटनेचे वर्णन तो हुबेहूब करेल.

थोडक्यात लेखनकर्ता जरी प्रामाणिक असला तरी त्याच्याकडून कळत नकळत लिखाणात चुका होण्याची शक्यता असते. त्या चुका लक्षात घेऊन संशोधकांनी कागदपात्राचे परीक्षण करणे गरजेचे असते. मूळ कागदपत्रांचे परीक्षण करताना बर्हिरंग परीक्षणाद्वारे लेखाचे स्थळ, काळ, लेखक याची निश्चिती करण्यात येते. तर अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून सकारात्मक परीक्षणामध्ये लेखाचा वाच्यार्थ व मूळ अर्थ समजून घेतला जातो. नकारात्मक परीक्षणामध्ये लेखकाची लेख लिहिण्यामागची भूमिका तपासली जाते म्हणजे लेखकाचा प्रामाणिकपणा तपासला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) रिकाम्या जागा भरा

१) संदर्भ साधनाच्या परीक्षणाचे किती प्रकार आहेत.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

२) बखरीतील भाषेवर कोणत्या भाषेचा प्रभाव आहे.

अ) फारशी ब) उर्दू क) कन्नड ड) राजस्थानी

३) संशोधन प्रक्रियेमध्ये पहिली पायरी कोणती आहे.

अ) विषयाची निवड ब) साधनांची क्रमवारी क) मांडणी ड) पुरव्यांनाचे संकलन

४) कोणत्या टप्यात लेखकाची सत्यता तपासली जाते.

अ) बहिरंग परीक्षण ब) अंतरंग परीक्षण क) मांडणी ड) सादरीकरण प्रक्रिया

५) संशोधकाचे वैयक्तिक पूर्वगृह असल्यास इतिहासलेखनावर काय परिणाम होतो.

अ) वस्तुनिष्ठ लिखाण ब) व्यक्तिनिष्ठ लिखाण

क) एकांगी लिखाण ड) तर्कसंगत लिखाण

६) कागदपत्र ज्या काळातील आहेत त्या काळातील कोणती माहिती संशोधकास असणे आवश्यक आहे.

अ) लोक जीवन ब) धार्मिक जीवन क) भाषिक ड) भौगोलिक

७) संशोधकाने आपल्या लिखाणात काय आणणे जरूरी असते.

अ) वस्तुनिष्ठता ब) व्यक्तिनिष्ठता क) एकांगीपणा ड) आपुलकी

८) कागदपत्राच्या परीक्षणानंतर जी माहिती संशोधकाच्या हाती येते त्यास काय म्हणतात.

अ) घटिते ब) साधने क) गृहीतके ड) यापैकी नाही

९) अन्वयार्थ हा संशोधांकाचा.......... आहे.

अ) डोळा ब) मेंदू क) श्वास ड) यापैकी नाही

१०) नकारात्मक परीक्षणाला इतिहासलेखनशास्त्रात कोणत्या प्रतीचे परीक्षण म्हणतात.

अ) उच्चप्रतीचे ब) दुय्यम प्रतीचे क) तृतीय प्रतीचे ड) उच्च कोटीचे

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.

अभिजन : उच्च स्थानावरील लोक अथवा श्रेष्ठ (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय)

सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख

पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र

ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

भौतिक साधने : पुरतत्वीय अवशेष

दिने-ए-इलाही : सम्राट अकबराने पुरस्कृत केलेला धर्मसंप्रदाय.

खलिफा : प्रेषितांचा वारस

टाकंसाळ : नाणी तयार करण्याचा कारखाना अथवा ठिकाण

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

* स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

१) अ) प्रा. कार्ल गुस्तावसन

२) अ) गो. स. सरदेसाई

३) अ) माझी जीवनगाथा

४) अ) किताब- उल-रहेला

५) अ) कार्बन

६) अ) एशियाटीक रिसर्चेस

७) अ) चार

८) अ) अरबी-फारसी

९) अ) वि. का. राजवाडे

१०) अ) आर्थर क्रॉफर्ड

११) अ) धनगर

* स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१) अ) दोन

२) अ) फारशी

३) अ) विषयाची निवड

४) ब) अंतरंग परीक्षण

५) अ) वस्तुनिष्ठ लिखाण

६) क) भाषिक

७) अ) वस्तुनिष्ठता

८) अ) घटिते

९) क) श्वास

१०) अ) उच्चप्रतीचे

## ३.५ सारांश :

ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ ज्याच्या आधारे काढता येतो अथवा ज्यांच्यामधून इतिहास लेखनासाठी उपयुक्त सत्य माहिती मिळते अशा वस्तू अथवा वास्तू, लिखित अथवा अलिखित साधनांना सर्वसाधारणपणे इतिहासाचा पुरावा किंवा संदर्भ साधन असे म्हटले जाते. इतिहासलेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक लेखणास पुरावा किंवा संदर्भ देणे महत्त्वाचे असते. यासाठी साधने अतिशय महत्वाची असतात. इतिहास लेखनाचे स्वरूप आधुनिक काळात बदलत चालले आहे. त्या दृष्टीकोणातून मौखिक साधनांना महत्व प्राप्त झाले आहे. अशा प्रकारची साधने संशोधकास एखादा प्राप्त झाली की त्या साधनांचे चिकित्सक परीक्षण करणे गरजेचे असते. यामध्ये बहिरंग परीक्षण व अंतरंग परीक्षण महत्वाचे असते. या परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रांची विश्वसनीयता तपासली जाते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा:

१) पोवडे

२) ताम्रपट

३) मौखिक इतिहासाचे महत्व

४) वास्तू अवशेष

५) नाणी

६) नकारात्मक परीक्षण

७) लोकपरंपरा

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्राथमिक साधंनांचे महत्व सांगा.

२) इतिहासलेखनाचे साधन म्हणून पुराभिलेखीय साधने सांगा.

३) मौखिक इतिहासाचे भारतातील संशोधन पारंपरिक साधनांची माहिती द्या.

४) इतिहासलेखनाचे साधन म्हणून दुय्यम साधंनांचे महत्व सांगा.

५) बहिरंग परीक्षण म्हणजे काय ते सांगा

६) अंतरंग परीक्षण म्हणजे काय ते सांगा

## ३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) दिक्षित, राजा., इतिहास वाड:मय, संपादक जाधव, र. ग., मराठी वाड:मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०

७) विद्या, व्यवहारे, लोकसाहित्य आणि लोक संस्कृती, प्रतिमा प्रकाशन, २००२

८) ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

९) खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

१०) पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

११) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.


❑❑❑

## घटक ४

# वस्तुसंग्रहालय : इतिहासाचे साधन

**('Museum' as a Source of History)**

**अनुक्रमणिका**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ वस्तुसंग्रहालयाची व्याख्या, स्वरूप आणि प्रकार (Museum and Museology)

४.३.२ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (Chhatrapati Shivaji Maharaj Vastusangrahalaya Mumbai)

४.३.३ टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर (Town Hall Museum, Kolhapur)

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भ आणि अधिक वाचनासाठी ग्रंथ


## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

- वस्तुसंग्रहालयाचा अर्थ समजावून घेता येईल.
- वस्तुसंग्रहालय शास्त्र म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.
- इतिहासाच्या अभ्यासासाठी वस्तुसंग्रहालयाचे असणारे महत्त्व लक्षात येईल.
- मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (प्रिन्स ऑफ वेल्स) याचा अभ्यास करणे शक्य होईल.
- टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर याचा अभ्यास करणे शक्य होईल.

## ४.२ प्रास्ताविक

नवनवीन शोध लावून समाजाचे प्रगती साधणे ही जशी काळाची गरज आहे त्याप्रमाणे आज पर्यंत मानवाने निसर्गाशी किंवा मानवनिर्मित संकटाशी मुकाबला करून आपल्या प्रगतीचे जे टप्पे पार केले आहेत ते टप्पे समाजासमोर देशासमोर ठेवणे ही सुद्धा काळाची गरज आहे. ते ठेवण्यासाठी अनेक पर्याय आहेत

पैकी एक पर्याय म्हणजे ‘वस्तूसंग्रहालय’ होय. वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून जर आपण आपला प्राचीन इतिहास, परंपरा, वारसा इत्यादी समाजापुढे ठेवू शकलो तर समाजामध्ये आपल्या परंपरेविषयी अभिमान निर्माण होईल, तसेच भविष्यकाळ उज्वल बनवण्याची इच्छा निर्माण होईल. हे लक्षात घेऊनच समाज व शासनाकडून वस्तुसंग्रहालय उभारण्यात येत असतात. मानव हाच मुळात संग्रह प्रिय प्राणी आहे. व्यक्तीच्या अनेक छंदातून अनेक वस्तूचा संग्रह होत असतो. या वस्तू वस्तुसंग्रहालयामध्ये प्रदर्शित करून ठेवल्या तर त्या ऐतिहासिक अभ्यासासाठी, संशोधनासाठी उपयुक्त असतात. या वस्तू समाजाच्या ज्ञानामध्ये भर टाकण्याचे काम करत असतात. व्यक्तीच्या, समाजाच्या सौंदर्य विषयक दृष्टिकोनाबाबत मार्गदर्शन करतात. म्हणून वस्तू संग्रहालय ही आधुनिक काळात ज्ञान केंद्रे झालेली आहेत.

## ४.३ विषय विवेचन

### ४.३.१ वस्तुसंग्रहालयाची व्याख्या आणि स्वरूप

वस्तुसंग्रहालयांना इंग्रजीमध्ये 'Museum' हा शब्द आहे. ‘म्युझियम’ या शब्दाचा उगम 'Muses' या शब्दातून झाला आहे. ‘म्यझेस’ ही ग्रीक पुराणातील एक देवता आहे. तर ‘वस्तुसंग्रहालय म्हणजे वस्तु + आलय ठेवण्याचे ठिकाण म्हणून ते वस्तुसंग्रहालय. ग्रीक रोमन परंपरेमध्ये असे मानले जाते की म्युझेस ही ग्रीक पुराणातील ‘झेऊस’ व ‘मेनॅओसीन’ या देवतेचे अपत्य आहे. ‘म्युझ’ या शब्दाचा ऑक्सफर्ड डिक्शनरीमधील अर्थ मुक प्रेरणा, दैवी प्रेरणा सर्जनशील प्रभावांना उत्तेजन देणारी देवता असा आहे. म्हणजेच कोणतीही साहित्य कृती किंवा कलात्मक निर्मिती यासाठी ‘म्युझेस’ या देवतेचीच आराधना केली पाहिजे. प्रो. सौ. बक्शी आणि द्विवेदी यांच्या मते अशा नऊ म्युझेस आहेत. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे –

१. कॅलोप (Calope) महाकाव्याची प्रेरणा.

२. क्लिओ (Cli0) इतिहासाची प्रेरणा किंवा देवता

३. इरॅटी (Erato) गेय काव्य

४. युटेरपो (Euterpe) बासरीवादनाची देवता

५. मेल पोमीन (Mel Pomene) शोकांतिकेची देवता

६. टर्पिसकोअर (Terpsichore) नृत्यदेवता

७. पॉलिहिमॅनिया (Polyhymnia) मूक अभिनयाची देवता

८. थालिय (Thalia) हास्यरसाची देवता

९. युरानिया (Urania) खगोलशास्त्राची देवता

थोडक्यात, म्युझेस देवतेचा संबंध विविध प्रकारांनी विविध लोककला, नाट्यकला, काव्य, संगीत, कलात्म वस्तु, बुद्धिमत्ता व शास्त्रीय ज्ञानाची कास या सर्व बाबींशी जोडला जातो. थोडक्यात वस्तू

ठेवण्याच्या ठिकाणाला ‘वस्तुसंग्रहालय’ असे म्हणतात. वस्तुसंग्रहालयाच्या उगमाकडे पाहिले की असे दिसून येते की, वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे. विद्वानांच्यात वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे की कला याबाबत साशंकता निर्माण झालेली होती. या संदर्भात असे लक्षात येते की, शास्त्रीय दृष्टिकोणातून केलेले ज्ञान संग्रहित केले जाते. ज्ञानाच्या त्या विभागाला शास्त्र असे म्हणतात. हा निकष वस्तुसंग्रहालयांना लागू होत असल्याने वस्तुसंग्रहालय हे शास्त्रच आहे. विद्वान व्यक्तींनी आपापल्या दृष्टिकोणातून वस्तुसंग्रहालयाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

वस्तुसंग्रहालयांबद्दल वेगवेगळ्या अनेक प्रकारच्या व्याख्या केलेल्या आहेत व त्यांच्यामध्ये सतत बदल होत आहे, त्या पुढीलप्रमाणे –

१) **सर एफ केन्यास (१९२७) :** ‘मानवी जीवनामध्ये ज्या गुणात्मक मूल्यमापनाची आवश्यकता असते, त्यांच्याशी संबंधीत प्रदर्शित केलेल्या वस्तूंना पाहून बघणाऱ्यामध्ये सौंदर्यबोध, जिज्ञासा व आपल्या भूतकाळाविषयी आस्था निर्माण होते. अशा वस्तूसंग्रह स्थळांना वस्तूसंग्रहालय असे म्हटले जाते. ‘सर एडवर्ड पी. अलेक्झेंडर: ‘वस्तुसंग्रहालय ही एक जटील संस्था आहे. तिची व्याख्या करणे सोपे कार्य नाहीं. कारण तिची व्याख्या करण्याच्या पार्श्वभूमीमध्ये आपला आपला दृष्टिकोन राहतो. जो व्याख्या करण्याची आवड व नावड यांच्यावर अवलंबून असतो.‘

२) **ए. सी. पार्कर :** ‘आधुनिक विचारधारेनुसार वस्तूसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे, जिचे मुख्यतः मानव, प्रकृती मानव लौकिक क्रियाविषयक विस्तारीत माहिति प्रस्तुत करणे कार्य आहे. लेखकांच्या मतानुसार वस्तुसंग्रहालयास एका अशा रूपामध्ये स्वीकार केला पाहिजे की, जे आपल्याकडील संकलितम वस्तूंच्या आविष्कारामध्ये सक्रिय भूमिका येते. वस्तुसंग्रहालयांना दुर्मिळ कलापूर्ण वस्तुसंग्रहालयाचे केंद्र मानले जाते. संकलित असलेल्या विलक्षण वस्तू स्वतः अबोल आहेत, ज्यामध्ये अनेक अद्भुत कथा साठलेल्या आहेत. ज्यांना पाहण्यामुळे बघणाऱ्यांच्या ज्ञानात भर पडते. या कला वस्तूंना अनेक सूचना, लेख, आलेख यांच्या माध्यमातून वस्तूसंग्रहालय संस्थेकडून एक व्यवस्थित रूप दिले जाते. ज्यांच्यामुळे पाहणारे शिक्षित होण्याबरोबरच आनंदीत होण्याचा अनुभव घेतात.’

३) **डॉ. जॉन्सन :** ‘ज्ञान व जिज्ञासा निर्माण करणाऱ्या वस्तूंचे संग्रह स्थळ म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.’

४) **सर आशुतोष मुखर्जी (१९९४) :** ‘वस्तुसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे की जिच्यामध्ये वस्तूचे संकलन करून सुरक्षित ठेवले जाते. ज्यांचा उपयोग जनसामान्यांना त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी विषयक ज्ञान मिळवूत देवून आनंद देण्याच्या हेतूने केला जातो.’

५) **सर आर्थर किथ (१९५०) :** ‘संग्रहालय हे एक असे ग्रंथालय आहे कि ज्यांच्या कपाटामध्ये मानवी मेंदूकडून व्यक्त झालेले विचार मुद्रीत, वस्तूरूपाच्या नैसर्गिक कार्याचे मूळ रूप प्रामाणिकपणे संग्रहीत केले जाते. सर आर्थर किथच्या म्हणण्यानुसार, वस्तुसंग्रहालय ही एक जिवंत शिक्षण संस्था असून ती कला, इतिहास, प्रकृती, विज्ञान, कृषी, संस्कृती इत्यादी विविध विषयांचा ज्ञान प्रत्यक्ष, प्रामाणिक व मृत वस्तूंच्या

माध्यमातून सादर करते. हे एक बहुमुखी ज्ञानाच्या पुस्तकांसारखे असून विविध क्षेत्रांशी संबंधित शाखेच्या पुस्तकातील अध्यायासारखे आहे. ज्यांना विषयांनुसार व क्रमवार सजविले आहे.'

६) **डी. एफ. निक्लियस :** 'उपलब्ध नसणाऱ्या वस्तूंचे गुप्त स्थळ म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.'

७) **बेंजामिन गिलमैन (१९२३) :** 'वस्तुसंग्रहालय वास्तवामध्ये विविध वस्तू व प्रदर्शनाच्या सामुग्रीचा संग्रहहोय. वस्तूसंग्रहालय हे ललित कलाशी संबंधित विविध वस्तू कायम स्वरूपी प्रदर्शन प्रदर्शित असणारे ठिकाण होय.ज्यांच्या माध्यमातून विविध कला वस्तूपासून संपूर्ण कला क्षेत्रासंबंधी सर्व वैशिष्ट्ये व्यक्त केली जातात.'

८) **डॉ. जॉर्ज ब्राऊन :** 'वस्तुसंग्रहालय हे एक चांगले शिक्षण देणारे असून ते संग्रहीत वस्तूचे संपूर्ण विवरण सादर करत असते.'

९) **युनिव्हर्सल इंग्रजी शब्दकोष :** 'संग्रहालय हे एक अभ्यास केंद्र, ग्रंथालयाबरोबरच महाविद्यालय व जनसंख्या आहे. जिथे सामान्य तसेच विद्वान व्यक्ती ज्ञान प्राप्तीसाठी व मनोरंजनासाठी एकत्र येतात.'

१०) **आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद (आयकॉम) (१९५१) :** 'वस्तूसंग्रहालयाची संज्ञा अशा संस्थेस दिली जाऊ शकते, जिच्यामध्ये सांस्कृतिक वैज्ञानिक कला वस्तूचे संरक्षण व प्रदर्शन मुख्यतः ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाच्या उद्देशाने केले जाते.

Any permanent Institute which conserves and display for study, education and enjoyment, collection of objects of cultures or scientific significance.

येथे 'आयकॉम' ने अभ्यास व शिक्षण व्यतिरिक्त आनंद व मनोरंजन देणारी सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्वाच्या कलावस्तूंचे संकलन व संरक्षण करणाऱ्या संस्थांना वस्तूसंग्रहालयाची मान्यता दिली आहे. वस्तूसंग्रहालयांची वरील व्याख्येमध्ये १९५६ मध्ये आयकॉम सुधारणा करून वस्तूसंग्रहालय शब्दांची व्यापक अर्थातून व्याख्या केली.'

११) **आयकॉम संविधान अनुछंद १ व २ (१९५६)** – वस्तूसंग्रहालय अशा संस्थेस म्हटले जावू शकते की, जिच्याकडून लोकांच्या आवडीनुसार संरक्षित केलेल्या विविध उपक्रमाद्वारे त्यांच्या विकासासाठी व विशेषतः कलात्मक, ऐतिहासिक, वैज्ञानिक व तांत्रिक वस्तूंचा संग्रह, वनस्पती व प्राणी उद्याना बरोबरच मत्स्य जलाशय इ. आनंद आणि शिक्षण देणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांच्या कला वस्तूंच्या अवशेषांना संकलित करून जनतेसाठी प्रदर्शित करण्याच्या उद्देशाने केले जाते.

१२) **एस. टी. सत्यमूर्ति (१९६३) :** 'वस्तुसंग्रहालयांस आधुनिक युगामध्ये असे व्याख्यानित केले जाऊ शकते की, ज्यामध्ये अशा वस्तू संरक्षण केले जावू शकते. ज्या निसर्गाचा आविष्कार व मानवी संरचनेची उत्तम पद्धतीने व्याख्या करते व ज्यांचा उपयोग ज्ञान मिळविण्याबरोचरच मानवी संस्कृतीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व सामान्य जनतेस संस्कारीत करणाऱ्यांच्या हेतूने केला जावू शकतो.'

१३) **सत्यप्रकाश (१९६४) :** 'संग्रहालय ही केवळ एक अशी संस्था आहे, ज्यामध्ये मानवाचा इतिहास व त्यांची कलात्मक, सृजनशीलता यांची भौतिक वस्तूरुपातील आविष्कार प्रदर्शनाच्या माध्यमातून केला जातो.'

१४) **एम. एल. निगम (१९६६) :** 'वस्तूसंग्रहालय एक कारखाना आहे. जिथे वस्तूसंग्रह व निर्माण केल्या जातात, हे एक विद्यालय आहे जिथे वस्तू तयार करण्यास शिकविल्या जातात, ते एक उच्च शिक्षण संस्था व सांस्कृतिक मनोरंजनाचे एक असे स्थान आहे जेथे व्यक्ती आपली दिनचर्या, परिश्रम च व्यक्तिगत चिंतेपासून दूर जावून आनंद मिळविण्याविषयीची इच्छा पूर्ण करतो व त्यास एका मोठ्या क्षितीजाचा शोध लागल्याचा अनुभव येतो.'

१५) **संयुक्त राष्ट्र अमेरिका (१९६९) :** 'वस्तूसंग्रहालय ही एक स्थिर व अलाभकारी संस्था आहे. जिथे मुख्यत्वेकरून शैक्षणिक व सौंदर्याबोधकात्मक कार्यविषयक वस्तूंचे संकलन, जतन, संवर्धन, प्रदर्शन व संशोधन केले जाते.'

१६) **बडापेस्ट (युगोस्लाव्होकिया) संरक्षण व वस्तूसंग्रहालय प्रक्रिया संस्था (१९७३) :** 'वस्तूसंग्रहालय ही एक सांस्कृतिक संस्था आहे. जिथे कलात्मक संग्रह व संशोधन व शिक्षणाचे कार्य केले जाते.'

वर्तमान काळामध्ये वस्तूसंग्रहालय ही एक ज्ञानाची बहुमुखी संस्था म्हणून पाहिले जावू लागले आहे. जिथे क्षेत्र पूर्वीपेक्षा अत्यंत विस्तारीत होत गेलेले वरील व्याख्येवरून दिसून येते.

१७) **आयकॉम (कोपेनहेगॅन) (१९७४) :** 'एका अलाभकारी स्थिर संस्था जी समाजाची सेवा व विकासामध्येसक्रिय असणारी व जनसामान्यास खुली असलेली, जिच्यापासून मानव व त्यांच्या वातावरणाशी संबंधित स्थूल प्रमाणांचा अभ्यास शिक्षण व आनंद प्राप्ती करण्याच्या दृष्टीकोनातून वस्तूचे संग्रह, संरक्षण, संशोधन, संभाषण व प्रदर्शन करते ती संस्था म्हणजे वस्तूसंग्रहालय होय. 'आयकॉमद्वारे वस्तूसंग्रहालयाच्या या व्याख्येमध्ये जनसामान्यांसाठी वस्तूसंग्रहालय खुले करणे याला विशेषतः महत्त्व दिले आहे.

१८) **बोल्टन (१९७६) :** 'वस्तुसंग्रहालय हे वास्तविक दुर्मीळ वस्तूचे कोषागार आहे. जे अशा प्रत्येक व्यक्तीसाठी आहे जे मानवी जीवनाविषयी दररोज वेगवेगळ्या पद्धतीने विचार करते.'

१९) **केनिथ हडसन (१९७७) :** 'संग्रहालय ही एक शिक्षण देणारी संस्था आहे, जी दृश्य दृकश्राव्य तंत्राद्वारे आपल्या सांस्कृतिक वारशाचे संपादन, जतन व संवर्धन करते. ज्याचा उपयोग प्रदर्शनासाठी विविध क्षेत्रामध्ये केला जातो.'

या व्याख्येवरून असे दिसते की, कोणत्याही देशांचा विकास त्यांच्या संस्कृतीवर दिसून येत असतो. गतसालापासून चालत आलेली मानवी संस्कृती प्रचलित संस्कृतीची विविध शिल्पकला, चित्रकला, संगीत साहित्य व अभिनय, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादींना एकत्रित स्वरूपात आणून वस्तूसंग्रहालये गती त्यास देतात. मानवी संस्कृतीचा पूर्ववीपासून चालत आलेल्या मार्गास प्रशस्त करून त्यांचा विकास दाखवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वस्तूसंग्रहालये करतात. त्यामुळे वस्तूसंग्रालयांना भूतकाळातील सांस्कृतिक परंपरागत प्रतिकांचे संग्रह

जतन, संवर्धन व प्रदर्शन स्थळ बरोबरच शिक्षण, मनोरंजन इत्यादी संग्रहालयांविषयक विविध विकास घडत असल्याचे वरील व्याख्यात दिसून येते असे म्हटले गेले आहे.

**स्वरूप :**

वस्तुसंग्रहालय म्हणजे ऐतिहासिक ठेवा जतन व संवर्धन करण्याचे ठिकाण आहे. त्यामध्ये वस्तुसंग्रहालयाचा मालक, शासन व जनता हे तीन घटक महत्त्वाचे आहेत. परंतु या वरील तीन घटकांच्यामध्ये आणि वस्तुसंग्रहालयाच्या हेतूमध्येही बदल घडून येऊ शकतात. या सर्वांमध्ये एक महत्त्वाची बाब म्हणजे सर्व प्रकारच्या वस्तुसंग्रहालयातून आपल्या ज्ञानात वाढच होत असते. त्यामुळे वस्तुसंग्रहालय म्हणजे अशा सेवा पुरविणारे शासकीय, सार्वजनिक व ऐतिहासिक माहिती मिळविण्याचे ठिकाण की ज्याचा मुख्य उद्देश हा असतो की ज्या वस्तुसंशोधक व अभ्यासकासाठी अतिशय मौल्यवान, दुर्मीळ व अतिमहत्त्वाच्या व अपिरहार्य असतात. अशा सर्व वस्तूंचे विनाश, विध्वंस व हरवण्यापासून जतन व संरक्षण करणे.

**प्राचीन कालखंड :**

'वस्तुसंग्रहालय' या संकल्पनेचा उगम प्रथम युरोपमध्ये झाला. इ.स. पूर्वीच्या तिसऱ्या शतकात अलेक्झांड्रीयामधील टॉलेमी राजाने आपल्या राजवाड्यात पहिल्यांदा वस्तुसंग्रहालय सुरू केले. तेथील राजवाड्यातच अलेक्झांडर-द-ग्रेट याचा ग्रंथसंग्रह ठेवण्यात आलेला होता. परंतु इ.स.च्या दुसऱ्या शतकात ग्रीक लेखक पॉसॉनियस याच्या माहितीनुसार अथेन्स शहरात एका मोठ्या दालनात काही पेंटिंग्ज सार्वजनिक प्रदर्शनासाठी ठेवलेल्या होत्या. ही प्राचीन काळातील सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाची सुरुवात होती. पुढील काळात ग्रीस व रोमन लोकांनी आक्रमण केले त्यावेळी तेथील मौल्यवान शिल्पे पळवून नेली आणि ती रोममध्ये वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आली. या आक्रमणानंतरही ग्रीकमधील वस्तुसंग्रहालयाची असणारी परंपरा अस्तित्वात राहिलेली दिसून येते. हेलेनिक युगानंतर ख्रिश्चन युगाला सुरुवात झाली. त्यावेळी वस्तुसंग्रहालयाबद्दलची संकल्पना ही स्फूर्ती निर्माण करणारी व ज्ञानार्जन करणारी वास्तू अशी होती. पुढे अंधारयुगाच्या काळात ही संकल्पना मागे पडली. परिणामी ग्रीसमधील वस्तुसंग्रहालये मागे पडली. प्राचीन काळातील वस्तुसंग्रहालयांची ही संकल्पना आजच्या आधुनिक काळात उपयुक्त ठरणारी अशीच आहे.

**मध्ययुगीन कालखंड :**

या कालखंडात वस्तुसंग्रहालये जरी अस्तित्वात आली नसली तरी ख्रिश्चन धर्मगुरूंनी कलाकृतीच्या द्वारा धार्मिक भावना जागृत होतात, त्यामुळे ज्ञान प्राप्त होते. त्यासाठी चर्चेसमध्ये विविध धार्मिक प्रसंगावरील, नीतीसंबंधीची चित्रे आणि कलाकुसर केलेली आढळते. त्याचबरोबर चर्चेसमधीन भिंती, काचेच्या खिडक्या, तावदाने बावर धार्मिक कथांचे चित्रण केलेले दिसून येते. उदा. व्हेनिस येथील सेंट मार्क चर्चमध्ये तेथील भिंतीवर नितिकथांचे चित्रण केलेले दिसून येते, त्यामुळे तत्कालीन काळात चर्चही केवळ प्रार्थनेची ठिकाणे न राहता ती धार्मिक व नितीमतेची शिक्षण देणारी ठिकाणे ठरली. तर काही चर्चमध्ये खिस्ती धर्मगुरूंचे अवशेष, मृतांचे अवशेष अनेक पेटयांच्यामधून प्रदर्शित केले आहेत. उदा. जर्मनीत हाल या

चर्चमध्ये मृतांचे अवशेष पेट्यात ठेवण्यात आलेले आहेत. पुढे १४, १५, १६ व्या शतकामध्ये विद्येचे पुनरुज्जीवन झाले. या कालखंडात इटलीमधील राजघराणी, सरदारवर्ग, श्रीमंत इ.नी अनेक दुर्मीळ वस्तू आपल्या महालामधून, प्रासादामधून, दिवाणखान्यात सर्वांना दिसतील अशा तऱ्हेने ठेवण्यास सुरुवात केली होती. आपापल्या घराण्यातील या प्राचीन वस्तूंचा त्यांना अभिमान वाटत असे. यामध्ये प्रामुख्याने पुराण अवशेष, कलात्मक वस्तू, विविध भूसा भरलेले प्राणी, वनस्पतीचे नमुने इ. चा समावेश असे, अशा प्रकारचे प्रदर्शन करणारी इटलीमधील फ्लॉरेन्स येथील Medici, माटुंगा येथील Gonzaga, फ्लोरा वेधील Este, अर्बिनो येथील Monte इ. कुटुंबे आहेत. पुढील काळात वरील सर्व ठिकाणी वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. याच कालखंडामध्ये आपणास वॉशिंग्टन येथील नॅशनल गॅलरी तसेच न्यूयॉर्क शहरातील मेट्रालिटन म्युझियम ऑफ आर्ट उभारलेली दिसून येतात. तसेच ऑस्ट्रिया, रोम, फ्रान्स, कोपेनहेगेन, इंग्लंड, व्हिएन्ना इ. ठिकाणीही दुर्मीळ वस्तूंचे संग्रह उभारण्यात आले. यानंतरच्या कालखंडात कलादालनाचा (आर्ट गॅलरी) चा उगम झालेला दिसून येतो. इटलीमध्ये अशा आर्ट गॅलरीमधून नक्षीकामाच्या कलात्मक वस्तू, पदके, ब्राँझ धातूच्या मूर्ती, कलावस्तु, चित्रे, नग्नमूर्ती, व्यक्तिचित्रे इ. चा समावेश असे. तत्कालीन अनेक राज्यकर्त्यांनी आपापल्या राजवाड्यामधून मोठमोठ्या भिंतीवर चित्रकारांच्याकडून चित्रे काढून ती रंगवून घेतली होती. येथूनच आर्ट गॅलरी ही संकल्पना उदयास आली. त्यामुळे अगोदरचे Museo आणि Art Gallery ही सध्या वस्तुसंग्रहालयांची दोन पूर्वज म्हणता येईल.

**आधुनिक कालखंड :**

सन १७२७ मध्ये C. F. Neickelius या लेखकाने 'म्युझिओग्राफिक' (Museographic) हा ग्रंथ लिहिला. तो प्रदर्शन कसे मांडावे या विषयावरील पहिले हस्तपुस्तिका म्हणून ओळखले जाते. ही पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक व्यक्तींचे लक्ष या विषयाकडे वळले. याच दरम्यान इंग्लंड येथील हेन्स स्लोन प्रसिद्ध संग्रहक यांनी स्वतःचा ब्लूम्सबरी येथील संग्रह राष्ट्राला अर्पण केला. तत्कालीन सरकारने सन १७५९ ला कायदा करून हा संग्रह लोकांच्या अभ्यासासाठी खुला केला. त्यामुळे तो संग्रह ब्रिटिश म्युझियमचा पायाभूत संग्रह म्हणून ओळखला जातो. यानंतर वस्तुसंग्रहालयाचे जे स्वरूप बदलले ते फ्रेंच राज्यक्रांती नंतर (१७८९). इ. स. १७९३ मध्ये फ्रान्सच्या तत्कालीन सरकारने पॅरिसमधील राज्यकर्त्यांच्या सर्व वस्तू एकत्र करून सार्वजनिक वस्तुसंग्रहालयाची स्थापना करण्यात आली. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय संपत्तीचे जतन करण्यासाठी फ्रेंच सरकारने अलेक्झांडर लेनार यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र समितीची स्थापना करून त्याद्वारे अनेक कला वस्तुसंग्रहालये स्थापन करण्यात आली. याच दरम्यान युरोपातील महत्वाच्या शहरांच्या ठिकाणी वस्तुसंग्रहालये उभारले. त्यामध्ये सन १८०२ ला बुडापेस्ट, १८१८ ला प्राग, १८९४ ता लंडन, सन १८३० ला बर्लिन, १८३६ ला म्युनिच इ. या वस्तुसंग्रहालयांची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे त्यामधील वस्तूंचे वर्गीकरण व त्यांची रचना शास्त्रशुद्धपणे करण्यात आली होती आणि ती सर्व संग्रहालये सर्वसामान्यांच्यासाठीही खुली ठेवण्यात आली होती. या दरम्यान नाणी, शिक्के, पदके, मृतांच्या थडग्यावरील दगड, कबरी, व्यक्तिचित्रे इ. वस्तु ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या मानल्या जाऊ लागल्या. ऐतिहासिक वस्तूंचा वेगळा स्वतंत्र असा संग्रह करण्यात येऊ लागला. फ्रान्समध्ये नेपोलियन बोनापोर्टने फ्रान्सचा प्रादेशिक विस्तार करण्यासाठी आक्रमक

धोरण स्वीकारले आणि युरोप आणि युरोपच्या बाहेर जेथे जेथे आक्रमणे केली त्या त्या ठिकाणाहून अनेक मौल्यवान वस्तू मायदेशी आणल्या. या मौल्यवान आणि पुरातन वस्तू सर्व जनतेने पाहण्यासाठी वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आल्या. या वस्तूंचे वर्णन व महत्त्व सांगणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. त्यामुळे अभ्यासकांना आणि जनतेला इतिहासाचे महत्त्व जाणवू लागले.

**भारतीय वस्तुसंग्रहालये :**

भारतामध्ये प्राचीन काळापासून श्रीमंत लोकांच्याकडे वस्तुसंग्रहालय असत. विशेषतः राजे, सरदार घराणी यांच्याकडे संग्रहालये असत. अशा संग्रहालयांना चित्रशाळा, विश्वकर्मा मंदिर अशा संज्ञा असत. ह्या संग्रहालयांची निर्मिती होत असताना एक बाब प्रकर्षाने जाणवते की, नालंदा, तक्षशिला इ. सारख्या ख्यातनाम विद्यापीठात समृद्ध असे ग्रंथ-संग्रह असत. परंतु या काळात तेथे वस्तुसंग्रहालये अस्तित्वात असल्याचा उल्लेख आढळून आलेला नाही. भारतात ब्रिटिश सत्ता सुरू झाल्यानंतर ब्रिटिश अधिकारी सर विल्यम जोन्स यांच्या प्रयत्नामुळे इ.स. १७८४ मध्ये बंगाल येथे पुरातत्त्वीय वस्तूंचा अभ्यास करण्यासाठी 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेने इ.स. १८१४ ला मानववंशशास्त्र, भूस्तरशास्त्र, पुरातत्त्व, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र इ. शी संबंधीत अशा वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. यानंतर खऱ्या अर्थाने भारतामध्ये वस्तुसंग्रहालय या संकल्पनेला सुरुवात झाली असे म्हणता येईल. सन १८५१ मध्ये मद्रास या ठिकाणी दुसऱ्या वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्यात आली. याच वर्षी कलकत्ता येथे 'व्हिक्टोरिया म्युझियम' व अल्बट या दोन संग्रहालयांची निर्मिती करण्यात आली. मुंबईचे 'प्रिन्स ऑफ वेल्स' सध्या ते 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' म्हणून ओळखले जाते. गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झनच्या काळात भारतात पुराणवस्तू संशोधन खात्याचा सरसंचालक सर जॉन मार्शल याच्या प्रोत्साहनामुळे अनेक पुराणवस्तूंची प्रदर्शन मांडण्यात आली होती. उदा. इ.स. १९०४ मध्ये सारनाथ व इ.स. १९१७ साली नालंदा येथे वस्तूंचे प्रदर्शन करणे या उद्देशाने वस्तुसंग्रहालयांची उभारणी करण्यात आली. इ.स. १९२७ पर्यंत मोहेंजोदडो, हडप्पा व तक्षशिला येथेही संग्रहालये सुरू करण्यात आली. पुण्यामध्ये 'लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्युझियम' होते. याचेच पुढे 'महात्मा फुले वस्तुसंग्रहालय' असे नामकरण करण्यात आले. तसेच वाराणसी, गुवाहाटी इ. ठिकाणी वस्तुसंग्रहालये सुरू करण्यात आली. ब्रिटिशांच्या आधुनिक विचारसरणीमुळे इतिहासाच्या अभ्यासाला व संशोधनाला वेगळे वळण मिळाले व ही प्रक्रिया गतिमान झाली. लॉर्ड कर्झनने केलेल्या 'ॲन्शंट मॉनुमेंटस ॲक्ट'मुळे भारतातील दुर्मीळ वस्तु, किल्ले यांच्या संरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. पुढे भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही सर्व वस्तुसंग्रहाल पुरातत्त्व विभागाकडे सोपविण्यात आली. आज वस्तुसंग्रहालय हे स्वतंत्र शास्त्र विकसित झाले आहे. त्यामुळे भारतातील विविध विद्यापीठांमध्ये 'वस्तुसंग्रहालय' हा स्वतंत्र अभ्यासक्रम शिकविला जातो. इतिहासाचे संशोधन करीत असताना ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये ज्या रिकाम्या जागा असतात त्या भरून काढण्याचे काम पुरातत्वीय वस्तू करीत असतात. म्हणजेच विशिष्ट तत्त्वानुसार जर वस्तूंची मांडणी केली तर तो विषय समजण्यास सोपा जातो. उदा. मानवाची प्रगती कशी झाली हे दाखवण्यासाठी आपण पुराण अश्मयुगाचे विविध टप्पे दाखविले तर मानवाची प्रगती

आपणास लगेच समजते आणि मानवी प्रगतीच्या इतिहासाचे टप्पे स्पष्ट होतात. उदा. प्रथम जुने अश्मयुग त्यानंतर नवे अश्मयुग.

आज मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करून जाण्याचे सामर्थ्य इतिहास विषयाला प्राप्त झाले आहे. आज इतिहास विषयाचा संबंध अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, तर्कशास्त्र, वाणिज्यशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, कालगणनाशास्त्र इ. शास्त्रांशी प्रस्थापित झाला आहे. असेच इतिहासाचा पुरातत्त्वशास्त्राच्या माध्यमातून नैसर्गिक शास्त्रांशी जवळचा संबंध प्रस्थापित झाला आहे. ही सर्व शास्त्रे मानवांच्या विकासाचे चित्र स्पष्ट करण्यास मदत करीत असल्याने पर्यायाने ती इतिहासाला पूरक अशा प्रकारची शास्त्रे ठरतात. त्यामुळे प्राचीन काळातील व्यक्ती, त्यांचा पोशाख, त्यांचे स्थापत्य, सांस्कृतिक जीवन, शेतीची अवजारे इ. ना महत्त्व प्राप्त झाले आहे. या सर्व वस्तूंचा उपयोग फक्त इतिहासकारालाच होतो असे नव्हे तर त्या त्या विषय-क्षेत्रातील लोक करू शकतात. त्याचबरोबर संशोधकाला संशोधन करीत असताना ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ती कागदपत्रे त्याला वस्तुसंग्रहालयात मिळतात. उदा. भारतात इतिहास संशोधक मंडळ, पुणे इथे अनेक महत्वपूर्ण कागदपत्रांचा संग्रह करण्यात आला आहे.

आधुनिक काळात शिक्षणाच्या आणि ज्ञानाच्या कक्षा प्रचंड प्रमाणात रुंदावल्या आहेत. आज कोणत्याही शास्त्राचा स्वतंत्रपणे कोणत्या तरी विषयाशी संबंध प्रस्थापित झालेला असतो. त्यामुळे तशाच पद्धतीने संशोधक आपल्या संशोधनाचे कार्य करीत असतो. उदा. आपणास गुप्तकालीन आर्थिक स्थितीचा आढावा घ्यावयाचा असेल तर वस्तुसंग्रहालयातील संग्रहित केलेली नाणी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरतात. थोडक्यात, वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तू मिळविणे, त्या मांडणे, त्यामधून एक सूत्र तयार करणे ही महत्त्वाची भूमिका असते. वस्तुसंग्रहालय हे ठिकाण शिक्षण, संशोधन, राष्ट्रीय उदात्तीकरण व सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास करण्याचे ठिकाण आहे. त्यामुळेच बातुसंग्रहालयाकडे शिक्षणाचे व प्रबोधनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहिले जाते. तसेच ती अविरतपणे ज्ञानदान करण्याचे महत्त्वपूर्ण काम करीत असतात.

**वस्तुसंग्रहालयांचे कार्य :**

वस्तुसंग्रहालयाचे कार्य युनेस्को या युनोच्या एका घटकांने म्हणजेच आंतरराष्ट्रीय संघटनेने वस्तुसंग्रहालयाचे कार्य सांगितले आहे. ते पुढील प्रमाणे -

१. प्रदर्शनास योग्य वस्तू गोळा करणे.

२. संग्रहालयात गोळा केले वस्तूंचे रक्षण करणे.

३. संग्रहालयातील वस्तूंचे प्रदर्शन करणे.

**वस्तुसंग्रहालयाच्या उद्दिष्टांमध्ये नमूद केलेले कार्य :**

१. इतिहास संशोधकांना सहाय्यभूत ठरेल असे कार्य करणे म्हणजे पुरातत्त्वाच्या संबंधी वस्तूंची माहिती संबंधित संशोधकास देणे तसेच संशोधकाला पुराभिलेखागारमधील कागदपत्रे, हस्तलिखिते त्याच्या संशोधनासाठी पुरविणे.

२. वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे काय महत्त्व आहे याविषयीची माहिती लिहून, छापून ती ग्रंथरूपाने प्रकाशित करणे.

३. संग्रहालयातील दुर्मिळ व अनमोल वस्तूंचे नमुने तयार करून त्यांचे प्रदर्शन भरवणे.

**वस्तुसंग्रहालयाची वैशिष्ट्ये :**

आधुनिक काळात म्हणजे २१ व्या शतकात वैज्ञानिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, संग्रहालय व विविध वस्तूंची वस्तू संग्रहालय यांना अत्यंत महत्त्व आहे. राष्ट्राचा किंवा समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी वरील गोष्टींची गरज आहे. वस्तुसंग्रहालयाबाबतीत अलीकडे लोकांच्या मध्ये जाणीव जागृती झाली आहे. वस्तुसंग्रहालयाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील –

**१. दुर्मिळ व मौलिक वस्तू एकत्र आणता येतात :** वस्तुसंग्रहालयामध्ये प्रदर्शनास योग्य असणाऱ्या दुर्मिळ व मौलिक वस्तू एकत्र ठेवता येतात. उत्खनामध्ये मिळालेल्या प्राचीन वस्तू उदाहरणार्थ मोहेंजोदडो, सारनाथ, नालंदा, तक्षशिला इत्यादी ठिकाणी उत्खननात ज्या दुर्मिळ वस्तू मिळाल्या आहेत त्या एकत्रित ठेवल्यामुळे त्या काळातील प्राचीन इतिहासाची व मानवी प्रगतीची माहिती आपणास मिळते. भारतीय इतिहास व संस्कृती यावर नवा प्रकाश पडण्यास मदत होते. वस्तुसंग्रहालयामध्ये या दुर्मिळ वस्तू फक्त एकत्रितच ठेवल्या जातात असे नाही तर त्यांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन सुद्धा केले जाते.

**२. तलात्मक प्रदर्शन :** वस्तुसंग्रहालयामध्ये अनेक प्रकारच्या वस्तू, शस्त्रास्त्रे एकत्र ठेवून कलात्मक पद्धतीने प्रदर्शन केलेले असते. त्यामुळे व्यक्तीचे मनोरंजन होऊन त्याच्या ज्ञानात भर पडते. तलवारी अनेक प्रकारच्या असतात त्यांची मांडणी विशिष्ट पद्धतीने केलेली असल्यामुळे तलवारी तलवारींमधील सूक्ष्म फरक लक्षामध्ये येतो. वस्तुसंग्रहालयातील वस्तू पाहिल्यानंतर व्यक्तीच्या संकल्पना व समजुती स्पष्ट होतात. ज्ञानात भर पडते. ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात.

**३. प्राचीन हस्तलिखिते व ग्रंथांचा संग्रह :** वस्तुसंग्रहालयात प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील दुर्मिळ ग्रंथांच्या हस्तलिखित पोथ्या, कागदपत्रे इत्यादी ठेवलेले असतात वस्तुसंग्रहालयामध्ये त्याचे शास्त्रशुद्ध पद्धतीने दीर्घकाळ जतन करणे शक्य होते या हस्तलिखितानमधून प्राचीन इतिहास समाजासमोर येऊ शकतो.

**४. वस्तुनिष्ठ ऐतिहासिक साधनांचा खजिना :** वस्तुसंग्रहालयामध्ये असलेल्या सर्व वस्तू या ऐतिहासिक साधनांचा खजिना असतात. सर्व वस्तू या वस्तुनिष्ठ व वास्तव इतिहासाचा परिचय करून देत असतात. त्यामुळे वस्तुसंग्रहालयातील वस्तू या इतिहासाचे एक प्राथमिक अस्सल संदर्भ साधन म्हणून त्याचा उपयोग करता येतो. या प्राथमिक अस्सल संदर्भ साधनांमध्ये शिल्पे, कलाकृती, मूर्ती, शिक्के, नाणी, ताम्रपट, शस्त्रास्त्रे, भांडी, अलंकार इत्यादी अनेक बाबींचा समावेश होतो या सर्व गोष्टी इतिहास संशोधनास प्राथमिक संदर्भ साधन म्हणून अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**५. गुणात्मक तत्त्वानुसार वस्तूंची मांडणी :** वस्तू संग्रहालयामध्ये वस्तूंचे गुण त्यातील कलात्मकता व तत्व या बाबींचे निरीक्षण करून त्यांची मांडणी केलेली असते. एखाद्या विषयाचा अभ्यास कसा प्रगत होत गेला हे समजावून घेणे सोपे जाण्यासाठी त्या पद्धतीने त्या वस्तूंची मांडणी केलेली असते उदाहरणार्थ अश्मयुगापासून माणसाची प्रगती काळानुरूप कशी होत गेली याचे चित्र आपल्यासमोर उभा केलेले असते किंवा एखाद्या विशिष्ट विषयांमध्ये संशोधन कस कसे पुढे गेले याची मांडणी मॉडेल रूपाने केलेली असते.

**वस्तुसंग्रहालयाचे प्रकार :**

आधुनिक कालखंडात अनेक क्षेत्रांमध्ये नवनवीन संशोधन होत गेले तसतसे त्या विषयाचे किंवा त्या संशोधन क्षेत्राचे स्वरूप बदलत गेले त्या पद्धतीने वस्तुसंग्रहालयाचे सुद्धा स्वरूप प्राचीन कालखंडापासून बदलत आलेले आपल्याला दिसून येते. वस्तुसंग्रहालयाचा सुद्धा विकास होत गेला. वस्तुसंग्रहालयाच्या प्रकारामध्ये नवनवीन भर पडत असल्याचे दिसून येते. आज नवनव्या विषयाच्या संदर्भात नवनवीन वस्तू संग्रहालय अस्तित्वात येत आहेत. भविष्यात आणखी नवीन वस्तू संग्रहालयाच्या प्रकारांची त्यात भर पडत राहील. वस्तुसंग्रहालयाच्या प्रकारांचा अभ्यास करत असताना आपल्याला त्यामध्ये एकूण प्रमुख तीन आधार असल्याचे लक्षात येते.

**१. प्रादेशिक स्तर :** वस्तुसंग्रहालयाच्या उभारणीमधील प्रादेशिक स्तरावरून वस्तू संग्रहालयाचे प्रकार पडतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वस्तुसंग्रहालयाच्या विकासाने गती घेतली. सन १९६५ मध्ये सेंट्रल अडवायझरी बोर्ड ऑफ म्युझियम या मार्फत भारतातील म्युझियमचा सर्वे करण्यासाठी एक कमिटी नियुक्त करण्यात आली. या कमिटीने म्युझियमचे पाच वर्गात विभाजन केले आहे

१. राष्ट्रीय वस्तू संग्रहालय, २. राज्य वस्तू संग्रहालय, ३. प्रादेशिक वस्तू संग्रहालय, ४. जिल्हा संग्रहालय, ५. स्थानिक संग्रहालय असे वस्तू संग्रहालयाचे विभाजन केले आहे.

**२. वस्तुसंग्रहालये कोणी स्थापन केली आहेत –** यानुसार सुद्धा वस्तू संग्रहालयाचे प्रकार केले आहेत.

१. केंद्र सरकार द्वारा स्थापित व निर्धारित वस्तू संग्रहालय, २. राज्य सरकार द्वारा स्थापित व निर्धारित वस्तू संग्रहालय, ३. स्वयंसेवी संस्था द्वारा स्थापित व निर्धारित वस्तू संग्रहालय, ४. स्थानिक स्वराज्य संस्था द्वारा स्थापित व निर्धारित वस्तू संग्रहालय, ५. खाजगी वस्तू संग्रहालय

**३. वस्तुसंग्रहालयामध्ये कोणत्या प्रकारच्या वस्तू आहेत –** यावरून सुद्धा वस्तू संग्रहालयाचे प्रकार पाडलेले आहेत.

वास्तविक इतिहासाच्या अभ्यासासाठी हेच प्रकार जास्त उपयुक्त असल्याचे दिसून येते

१. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, २. पुरातत्वीय वस्तुसंग्रहालय, ३. कला वस्तुसंग्रहालय, ४. वनस्पती वस्तुसंग्रहालय, ५. वस्त्र वस्तुसंग्रहालय, ६. प्राणी संग्रहालय, ७. शस्त्रास्त्र वस्तुसंग्रहालय, ८. विज्ञान वस्तुसंग्रहालय, ९. व्यक्ती विशेष वस्तुसंग्रहालय, १०. संरक्षण विषयक वस्तुसंग्रहालय, ११. औद्योगिक वस्तुसंग्रहालय, १२. शेती विषयक वस्तुसंग्रहालय, १३. धावती वस्तुसंग्रहालय, १४. हस्तकला वस्तुसंग्रहालय, १५. मानव वंश वस्तुसंग्रहालय, १६. शास्त्रीय वस्तुसंग्रहालय, १७. ग्रंथ वस्तुसंग्रहालय,

१८. टपाल वस्तुसंग्रहालय, १९. तिकिटे वस्तुसंग्रहालय, २०. ग्रामीण वस्तुसंग्रहालय, २१. आरोग्य विषयक वस्तुसंग्रहालय, २२. शहरी वस्तुसंग्रहालय, २३. शिशु वस्तुसंग्रहालय

असे वस्तुसंग्रहालयाचे अनेक प्रकार आहेत. आधुनिक काळाबरोबर या प्रकारात अजून नव नवीन प्रकारांची भर पडत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना इ.स. ................ मध्ये झाली.

अ) १९४७ ब) १९४८ क) १९४९ ड) १९५०

२. ........... समितीने भारतासाठी राष्ट्रीय संग्रहालय बांधण्याची कल्पना मांडली होती.

अ) बेअर ब) गेअर क) मेअर ड) डेअर

३. भारतील कलेमध्ये .............. यांच्या कारकिर्दीत कलेचा परमोच्च बिंदू गाठल्याचे दिसते.

अ) मौर्य ब) शुंग क) कुशाण ड) गुप्त

४. राष्ट्रीय संग्रहालयातील ........... हे दालन सर्वात प्रतिष्ठेचे आहे.

अ) लघुचित्र ब) सजावटी कला वस्तू

क) पूर्व कलाकृती ड) उत्तर कलाकृती

५. कुशाण दालनातील प्रतिमांचा मुख्य विषय ................ हा होता.

अ) चंद्रगुप्त ब) महावीर क) बुद्ध ड) विष्णु

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. राष्ट्रीय संग्रहालय नवी दिल्ली याचे उद्घाटन कोणी केले?

२. हडप्पाकालीन दालनामधील सर्वात प्रसिद्ध कलाकृती कोणती आहे?

३. मेवाड लघुचित्रांचा विषय कोणता होता?

४. बौद्ध कलाकृती दालनामधील बुद्ध अवशेष कोठे सापडले आहेत?

५. म्हैसूर आणि तंजावर दालनामध्ये कोणत्या धार्मिक चित्रांचा समावेश आहे?

## ४.३.२ छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई :

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय हे जगातील एक प्रमुख वस्तुसंग्रहालय म्हणून ओळखले जाते. या वस्तुसंग्रहालयाचा पायाभरणी समारंभ ब्रिटनमधील राजकुमार 'प्रिन्स ऑफ विल्स' यांच्या हस्ते ११ नोव्हेंबर १९०५ रोजी झाले. हेच प्रिन्स ऑफ वेल्स पुढे ग्रेट ब्रिटनचा राजा जॉर्ज पंचम म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांच्या स्वागतासाठी मुंबई येथील पश्चिम किनाऱ्यावर 'गेट वे ऑफ इंडिया' नावाचे प्रवेशद्वार बांधण्यात आले. या प्रवेशद्वाराची उभारणी प्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ 'जॉर्ज विटेट' यांनी केली. प्रिन्स ऑफ

वेल्सच्या भेटीची स्मृती म्हणून त्यांच्या थोडे पुढे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमची उभारणी करण्यात आली. हे म्युझियम उभे करण्याचे काम जॉर्ज विटेट यांच्याकडे देण्यात आले. कारण इंडोसर्सानिक वास्तुस्थापीत्यातील ते तज्ञ म्हणून ओळखले जात होते. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाची इमारत इंडोसारसनिक शैलीचा उत्तम नमुना आहे. या शैलीत हिंदू व मुस्लिम स्थापत्य शैलीचा मिलाप झाला आहे. असे असले तरी या वास्तूत पश्चिमात्य वास्तू शैलीची वैशिष्ट्ये सुद्धा आढळतात.

या वस्तू संग्रहालयाच्या तीन मजली इमारतीचे बांधकामसन १९१४ साली पूर्ण झाले. हे संग्रहालय जनतेसाठी १० जानेवारी १९२२ रोजी खुले झाले. सन १९१४ ते १९२२ या काळात या इमारतीचा उपयोग ब्रिटिश शासनाने लष्करी दवाखाना व बालकल्याण केंद्र म्हणून केला. कारण हा कालखंड पहिल्या महायुद्धाचा होता. स्वातंत्र्यानंतर प्रिन्स ऑफ विल्स म्युझियमचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय असे नामकरण करण्यात आले. या वस्तुसंग्रहालयाची इमारत तीन मजली असून ती आयताकृती आहे. या इमारतीवर मोठा गोलघुमट आहे. त्या गुमठाच्या चारी बाजूंना छोटे छोटे मिनार आणि त्यावर छोटे छोटे गोल घुमट आहेत. इमारतीच्या मध्यभागी मोठे प्रवेशद्वार आहे. प्रवेशानंतर मोठा हॉल आहे. या हॉलमध्ये महत्त्वाच्या कलात्मक वस्तू ठेवलेले आहेत. त्यात भारताच्या पाच हजार वर्षाच्या प्राचीन कला इतिहासाचे उत्तमोत्तम नमुने ठेवले आहेत .

**वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचा संग्रह :**

वस्तुसंग्रहालयाच्या पायाभरणीपासूनच म्हणजेच सन १९०५ पासून कलात्मक वस्तू जमा करणे व एकत्रित करण्याचे काम सुरू होते. सन १९१५ मध्ये शेठ  पुरुषोत्तम मावजी यांचा लघुचित्रांचा व कला वस्तूंचा संग्रह या वस्तुसंग्रहालयास मिळाला. शेठ पुरुषोत्तम मावजी यांच्याकडे असणारा हा कलासंग्रह पूर्वी पेशव्यांचे कारभारी असणारे नाना फडणवीस यांच्या चित्रकला संग्रहाचा एक भाग होता. पुढे पाकिस्तानमध्ये असलेल्या 'मिरपुरबास' येथे जे उत्खनन झाले तेथील बुद्ध स्तूपाच्या ठिकाणी ज्या वस्तू मिळाल्या त्या वस्तू उत्खनन करणारे हेन्री  कुझेन्स यांनी या वस्तुसंग्रहालयास दिल्या. सर रतनजी टाटा यांनी सन १९२२ मध्ये आपला कलासंग्रह या वस्तुसंग्रहालयास भेट दिला. त्यांचे अनुकरण करून सर दोराब टाटा यांनी १९३३ मध्ये आपला कलासंग्रह भेट म्हणून दिला. त्यानंतर संग्रहालयामध्ये प्रामुख्याने युरोपियन तैलचित्रे व कलावस्तू, जपानी कलावस्तू. चेन्नई कलावस्तू, भारतीय व लघुचित्रे शस्त्रास्त्रे, वस्त्रे धातूच्या मूर्ती इत्यादींचा समावेश होता. १९३४ मध्ये सर अकबर हैदरी यांच्या कलासंग्रहालयातील कला व वस्तू या वस्तुसंग्रहालयामध्ये भेट म्हणून दिल्या. याशिवाय वस्तुसंग्रहालयाच्या प्रशासनाने अनेक प्रकारच्या कला वस्तू व चित्रे मिळवली. जागृत व सुज्ञ नागरिकांनी आपणाकडे असणाऱ्या ऐतिहासिक वस्तू या वस्तुसंग्रहालयात दिल्या. आजरोजी वस्तू संग्रहालयाकडे जवळजवळ ५० हजार कला वस्तूंचा संग्रह आहे.

**वस्तुसंग्रहालयातील दालने :**

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या तीन मजली इमारतीत अनेक दालने आहेत. संग्रहालयास मिळालेल्या विविध कला वस्तूंचे वर्गीकरण व पंजीकरण करून ही दालने या क्षेत्रातील तज्ञांच्या

मार्गदर्शनाखाली तयार केली आहेत. कारण त्यातून भारताचा पाच हजार वर्षाचा इतिहास उलगडत आहे. वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या व्यक्तीस ज्ञान मिळावे त्याची उत्सुकता वाढावी तसेच त्याचे मनोरंजन व्हावे हा हेतू आहे. त्या कला वस्तूंचे प्रभावीपणे दर्शन व्हावे अशी उत्तम प्रकारचे व्यवस्था केली आहे. या वस्तू संग्रहालयाची अनेक कलादालने आहेत. त्या दालनांचा व त्यातील वस्तूंचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे -

१. मार्गदर्शक दालन - तळमजला - मुख्यइमारत

२. शिल्पकला - तळमजला - मुख्यइमारत

३. प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन - पोट मजला - मुख्य इमारत

४. प्रकृती विज्ञान दालन - तळ मजला - विस्तारित इमारत

५. लघुचित्र दालन - पहिला मजला - मुख्य इमारत

६. शोभिवंत कला वस्तूंचे दालन - पहिला मजला - मुख्य इमारत

७. नेपाळ - तिबेट दालन - पहिला मजला - मुख्य इमारत

८. कार्ल व मेहेरबाई खंडालावाला दालन- पहिला मजला - विस्तारित इमारत

९. नाणी दालन - पहिला मजला - विस्तारित इमारत

१०. अतिपूर्वेकडील कला वस्तूंचे दालन - दुसरा मजला - मुख्य इमारत

११. युरोपीय चित्रांची दालने - दुसरा मजला - मुख्य इमारत

१२. शस्त्र दालन - दुसरा मजला - मुख्यमारत

१३. कृष्ण दालन - पहिला मजला - मुख्य इमारत

अशाप्रकारे या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात १३ दालने आहेत त्यांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे -

**१. मार्गदर्शक दालन-तळमजला :** हे दालन वस्तू संग्रहालयातील प्रशस्त व प्रमुख दालन आहे. या दालनात भारतातील टेराकोटा, ब्रांझ, लघुचित्रकाला, शोभेच्या कलाकृती तसेच अतिपूर्वेकडील कलाकृती ठेवल्या आहेत. या दालनातील खांब राजस्थानी देवळामधील खांबासारखे आहेत. पहिल्या मजल्यावरील लाकडाचे काम नाशिक जवळच्या एका वाड्यातून आणले आहे. या वस्तू संग्रहालयाच्या इमारतीचा गोल घुमट विजापूरच्या गोलघुमट्याची आठवण करून देतो. या दालनात रेवा खंजीर, मध्य प्रदेश रेवा संस्थान, सुरई -लखनऊ, उत्तर प्रदेश १०० फुलांनी सजलेली फुलदाणी, चिनीमातीवरील झीलई काम, युवतीचे शीर्ष - मृणमुर्ती - अखनूर काश्मीर ऋषभनाथाची चोविसी (काव्य) खानदेश, महाराष्ट्र, बाहुबली (कास्य) कर्नाटक, विष्णूचे त्रिविक्रम रूप - (कास्य) बंगाल, भाविक - मृण्मुर्ती - सिंध पाकिस्तान इत्यादी कला वस्तूंचा संग्रह आढळतो.

**२. शिल्पकला–तळमजला–मुख्य इमारत :** शिल्पकला प्राचीन भारतीय समाजावर धर्माचा प्रभाव होता. त्यामुळे धार्मिकता ही प्राचीन भारतीय शिल्पकलेचे वैशिष्ट्य आहे. या दालनात महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात व काश्मीर इत्यादी राज्यात सापडलेली प्राचीन शिल्पे प्रदर्शित केली आहेत. त्याशिवाय अफगाणिस्तान व पाकिस्तान येथे सापडलेली शिल्पे सुद्धा आहेत. या दालनात वैकुंठ चतुमुर्थी काश्मीर, द्वारपाल यक्ष (बेसोल्त) औरंगाबाद महाराष्ट्र, बुद्ध आणि काश्याप ब्राह्मणाची भेट–(करडा शिष्ट दगड) गांधार पाकिस्तान, शिवगण (वालुकाश्म) सतना, मध्य प्रदेश, महिषासुरमर्दिनी (बेसाल्ट) घारापुरी महाराष्ट्र, शिव (बेसॉल्ट) मुंबई महाराष्ट्र, गरुड (डोलेराईट दगड) दोहद गुजरात, गणेश (बेसाल्ट दगड) ठाणे महाराष्ट्र , महेशमूर्ती (वालुकाश्म) मध्य प्रदेश, ब्रह्म (वालुकाश्म) विजापूर कर्नाटक, शांतिनाथ (संगमरावर) बेरावन, इत्यादी प्राचीन शिल्पे या दालनात आहेत .

**३. प्रागैतिहास व पूर्व इतिहास दालन–पोट मजला–मुख्य इमारत :** या दालनात पश्चिम भारतातील प्रागइतिहासिक काळातील दगडांच्या हत्याऱ्यांचा संग्रह तसेच हडप्पा व मोहेंजोदडो संस्कृतीतील उत्खननात मिळालेल्या वस्तू ठेवलेल्या आहेत. या उत्खननात फारच कमी दगडी शिल्पे मिळालेली आहेत. पण त्या संस्कृतीतील लोकांनी बनवलेली मातीची भांडी, मूर्ती, खेळणी, दागिने व मुद्रिका इत्यादी वस्तू सापडल्या आहेत. या वस्तू त्या काळातील लोकांच्या कलासक्त मनाची साक्ष देतात. या दालनात हडप्पा मोहेंजोदडो येथील उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा मोठा साठा आहे. दालनाची मांडणी विद्यार्थीवर्गाची गरज लक्षात घेऊन केली आहे. दालनात अनेक कलाकुसर काढलेली भाजक्या मातीची भांडी, त्या भांड्यांचे फुटलेले अवशेष, मातीच्या मूर्ती, मातीचे मुखवटे, खेळणी, लहान मोठी विविध प्रकारची मानवाच्या उपयोगात असणारी भांडी, मडक्यापासून धान्य ठेवण्याच्या मोठ्या रांजणापर्यंतच्या वस्तू आहेत. बैलगाडीचे खेळणे इत्यादी, येथे स्त्री पुरुषांचे अलंकारही सापडले आहेत. ते वैशिष्ट्यपूर्ण आहेत. हे अलंकार तांबे, कास्य, शिंपले, हस्तिदंत, माती इत्यादी प्रकारच्या मन्याने बनवलेले आहेत. यात सोने–चांदी, कार्नेलियन आगेट, जास्पर इत्यादी विविध उत्पादानांचा वापरही केला आहे. येथे सापडलेले मणी, गोल, चपटे, निमुळते, दंडगोल इत्यादी विविध आकाराचे आहेत. येथे भाजक्या माती पासून बनवलेल्या विविध प्राण्यांच्या आकृत्या म्हणजेच बैल, म्हैस, मेंढा, टोकदार शिंगाचे हरिण, गेंडा, कुत्रा, मांजर, कासव, सुसर, पक्षांच्या आकाराची खेळणी, चक्रव्यूह इत्यादी प्रकारच्या वस्तू मातीत बनवून त्या भाजल्या आहेत. अशा प्रकारच्या वस्तू या दालनात आहेत.

**४. प्रकृती विज्ञान दालन :** भारतातच नाही तर सर्व जगभर लोक पावत चाललेली जंगले व प्राणी व पक्ष्यांच्या प्रजाती आपणास दिसत आहेत. म्हणून अशा प्राण्यांची नमुने या दालनात प्रदर्शित केले आहेत. यात सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी, पहावयास मिळतात. येथे तग धरून राहिलेल्या दुर्मिळ असा गिधाड कुळातील 'जटायु गीधाड', इंगूल, किंवा काश्मिरी हरीण, पांढरा वाघ, मोठा भारतीय माळढोक, धनेश पक्षाच्या कुळातील महाधनेश इत्यादी प्राणी वैशिष्ट्यपूर्णरित्या प्रदर्शित केले आहेत.

**५. लघुचित्र दालन–पहिला मजला–मुख्य इमारत :** भारतात लघु चित्रकलेची सुरुवात प्राचीन धार्मिक ग्रंथातून झाली. प्राचीन ग्रंथ हे ताडाच्या पानावर लिहित. या पानांचा आकार १२ इंच लांब व तीन इंच रुंद

असा असे. त्यामुळे यावरच चित्रे रेखाटली जात. तीच लघुचित्रे होत. ही चित्रे त्या काळातील धर्म, संस्कृती व समाज यावर प्रकाश टाकतात. त्या काळातील पोशाख, पागोटी, अलंकार इत्यादी विषयीची चित्रे रेखाटली आहेत. या दालनातील चित्रे १४ व्या शतकापासून १९ व्या शतकापर्यंत म्हणजे ६०० वर्षांच्या भारतातील विविध प्रांतातील धर्म, संस्कृती, सामाजिक, राजकीय स्थितीवर प्रकाश टाकतात. या चित्रामध्ये पुढील चित्रे आहेत. महावीरांचे केश, लोचनचे चित्र, महावीर आपला दैवी पोशाख ब्राम्हणाला भेट देत असल्याचे चित्र, १४ वे शतक, राधेच्या मनस्थितीचे वर्णन करणारी सखी चे चित्र-१६ वे शतक. गीतगोविंद या संस्कृत ग्रंथाची रचना कवी जयदेवने १२ व्या शतकात केली. या काळात राधा-कृष्ण या दैवी प्रेमीयुगुलाच्या मन:स्थितीचे रसभरित वर्णन कवी जयदेवने केले आहे. या काळातील अनेक प्रसंगावर आधारित भरपूर लघुचित्रे या दालनात आहेत. उदा. विरहामुळे राधेच्या मन:स्थितीचे वर्णन करणारी सखी, सखीसह बागेत वार्ताला करणारी चंदा, माळी व अस्वलाचा संवाद एक बागेत चालला आहे असे चित्र, अजमेरच्या दर्जात खैरात वाढताना जहांगीर बादशहा, काळवीट व हरीने या जोडीचे चित्र, राम परशुराम भेटीचे चित्र, वणवा कळंकृत करताना कृष्ण त्याच्यासोबत गाई गोपिका, गो धुली चित्र, घाणेरावचे राजे पद्मसिंह व त्यांचा दरबार चित्र, वियोग घटिका चित्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र, नाथपंथी योगी गोरक्षनाथ व नागांना व योग्यांना वंदन करणारी स्त्री, हुक्का ओढणारा राजा, राधा- कृष्ण भेट इ. चित्रे दालनात आहेत.

**६. शोभिवंत कला वस्तू दालन-पहिला मजला-मुख्य इमारत :** कला आसक्त भारतीय लोकांनी हस्तिदंत, लाकूड, धातू व दगड यापासून अनेक शोभिवंत कलावस्तू बनवल्या आहेत. तसेच रोजच्या वापरात येणाऱ्या वस्तू सुद्धा या दालनात ठेवल्या आहेत. उदाहरणार्थ सुंदर नक्षीकाम केलेली हस्तिदंती दागिन्यांची पेटी, खास व वैशिष्ट्यपूर्ण अलंकाराचे नमुने, सुंदर नक्षीकाम केलेला लाकडी दरवाजा, सुगंधी चंदनाच्या लाकडातून विविध कलात्मक चंदनी लाकडाच्या वस्तू, अलंकार ठेवण्यासाठी बनवलेली जाळीदार नक्षीकाम केलेली दागिन्याची पेटी, लाकडी वाडगा, भिरुमल नायकाची प्रतिमा, दुर्मिळ व मौल्यवान वाडगा, भारतातील स्त्री पुरुष वापरत असलेली दागिने, दैवतांचे दागिने, सौभाग्य अलंकार जोडवे व इतर विविध दागिने इत्यादी दागिने या दालनात आहेत.

**७. नेपाळ-तिबेट दालन-पहिला मजला-मुख्य इमारत :** या दालनात बौद्ध धर्मातील वज्रायन पंथातील गूढ व तांत्रिक बाबींचे दर्शन घडते. तिबेट हा अतिउंचावरील जगाशी फारसा संबंध नसणारा गुढरम्य देश आहे. त्यांची संस्कृती हिमालयाच्या निसर्गाशी जोडलेली आहे. राजा सॉंग सॉंन ग्याम्पो काळात म्हणजे सातव्या शतकात तेथे बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार झाला. या दालनात अनेक तिबेटी बौद्ध देवतांच्या प्रतिमा आहेत. ध्यानस्थ बुद्ध, अवलोकितेश्वर, तारा, संरक्षक देवता, महासिद्ध व लामा इत्यादींचा समावेश आहे. तसेच नेपाळमध्ये हिंदू व बौद्ध धर्मीय लोक राहतात. या दालनात नेपाळी धातू शिल्पे, मंडल चित्रे, धार्मिक वस्तू, पटचित्र इत्यादींचा समावेश आहे. यात राजा सॉंग संन गम्पोचे शिल्प आहे. कापडावरील लक्षचैत्यांची चित्रे आहेत. यात बुद्धाचे कास्याची ध्यानस्थ बसलेले शिल्प आहे. प्रसिद्ध असे सोन्याचा मुलांमा दिलेले कास्याचे 'मैत्रेय' शिल्प प्रसिद्ध आहे.

**८. कार्ल व मेहेरबाई खंडालावाला दालन–पहिला मजला–विस्तारित इमारत :** कार्ल खंडालावाला हे या वस्तू संग्रहालयाचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांना कलेची उत्तम जाण होती. ते उत्तम लेखक व कला संशोधक होते. त्यांच्या संग्रहालयात त्यांनी अनेक चित्रे, कलाकृती, लघुचित्रे, काष्ठ चित्रे, मृणमूर्ती संग्रहालयास भेट दिल्या. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ या दालनास त्यांचे नाव दिले आहे. या दालनात ध्यानस्थ उभा असलेल्या संकट मोचन श्री हनुमानाचे अप्रतिम असे कास्याचे शिल्प आहे. तसेच राणी तोडा लघुचित्र, राधेचे प्रतीक्षा करणारे कृष्णाचे चित्र, नगरशेट येथील राहूटीतील राजा बलवंत सिंहाचे चित्र, तसेच करूणेची देवता तारा हिचे तांब्याचे पण सोन्याचा मुलामा दिलेले शिल्प इत्यादी गोष्टी या दालनात आहेत.

**९. नाणे दालन–पहिला मजला–विस्तारित इमारत :** या वस्तू संग्रहालयात इ.स.पु. ७ व्या शतकापासून ते आजपर्यंत च्या नाण्याचा मोठा संग्रह आहे. या संग्रहालयास भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून भेट म्हणून व विकत घेतलेल्या नाण्यांचा संग्रह आहे. या नाणी दालनात प्रवेश करतात संपत्ती व समृद्धीची देवता गजलक्ष्मीचे चित्र आहे. जनपद व १६ महाजनपदे कालीन पंचकर्म नाणी येथे ठेवली आहेत. मगधची नाणी, मौर्यकालीन नाणी, इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील सिकंदरच्या भारतावरील स्वारीनंतर इंडो- ग्रीक, इंडो-बॅक्टरियल नाणी येथे प्रदर्शनात ठेवली आहेत. इसवी सन चौथे शतक गुप्त काळातील चंद्रगुप्त दुसरा याची सुवर्ण नाणी, मोगलकालीन बादशहाच्या काळातील नाणी, विशेषता जहांगीर बादशहाची नाणी, तसेच मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे 'शिवराई' व 'सोन्याचा होन', पुढे भारतातील अनेक राजे व संस्थानांचे अधिपती यांची नाणी, शेरशाह सुरी पासून 'रुपया' या नाण्याचा प्रवास कसा झाला हे दर्शवणारे एक सुंदर व विशेष रुपयांचे प्रदर्शन इत्यादी या दालनात आहेत.

**१०. अतिपूर्वेकडील वस्तूंचे कलादालन :** या दालनात चीन व जपान मधील हजारो कलाकृतींचा संग्रह आहे. या सर्व वस्तू रतन व दोरा टाटा यांनी भेट म्हणून या संग्रहालयास दिले आहेत. या दालनात पोर्सलेन, सिरॅमिक, लाकरवियर, क्रिस्टल, लाकडी, धातू, इत्यादींपासून बनवलेल्या दुर्मिळ जपानी वस्तू ठेवले आहेत. त्यात अमरत्वाची देवता डॉंगफान्ग शुओ, अत्यंत दुर्मिळ असे मोर व लांडोर यांची नक्षी असणारा खुजा (सुरईसारखे भांडे) टेबल स्क्रीन, धूपदाणीच्या आकारातील लाख व धातूपासून बनवली कला वस्तू, तपकिरीच्या विविध आकारांच्या व विविध रंगांच्या बाटल्या इत्यादी आहेत.

**११. युरोपियन चित्रांचे दालन :** या दालनातील सर्व चित्रे ही टाटा बंधूंनी या संग्रहालयास भेट म्हणून दिली आहेत. यात बोहिम्यान जिप्सीज (बोहेमियातील विमुक्त भटके लोक) ऍडोरेशन (सौंदर्याचे कौतुक), दि अडोरेशन ऑफ दि मेजाई (बाळ येशूने मेजाईला दिलेले दर्शन) फिडिंग डी पॅरोट (पोपटाला भरवणारी स्त्री) इत्यादी अप्रतिम चित्रे या दालनात प्रदर्शनासाठी ठेवली आहेत. या दालनात जागतिक चित्रकार की जे इटालियन, फ्लेमिश, डच आणि ब्रिटिश इत्यादी स्कूलसचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय आदिवासी पिस्तनजी बोमनजी व मकबूल फिदा हुसेन या बॉम्बे स्कूलच्या चित्रकारांची चित्रे सुद्धा या दालनात आहेत. या दालनात जमशेदजी टाटा यांचे उत्तम तैलचित्र आहे.

**१२. शस्त्र दालन :** मानवी इतिहासात शस्त्रास्त्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शस्त्रांचा उपयोग स्वसंरक्षण व आक्रमणासाठी केला जात असे. या दालनात हडप्पा संस्कृतीतील तांब्याची शस्त्रे, तलवारी, खंजीर, बाणाची टोके, भाला इत्यादी पहावयास मिळतात. लोखंडाचा शोध लागल्यानंतर शस्त्राच्या प्रगतीत, विकासात अमुलाग्र बदल झाला. मध्ययुगीनकाळातील उत्तम तलवारी, ढाली, भाले व इतर युद्ध साहित्य या दालनात प्रदर्शनासाठी ठेवले आहे. उदाहरणार्थ शहंशाह अकबराचे चिलखत व शीरस्त्राण, शहाजान बादशहाची ढाल, मुघलकालीन सर्व प्रकारचे शस्त्रास्त्रे कलात्मक रीतीने मांडली आहेत.

मराठा राज्याच्या स्थापनेनंतर मराठ्यांची शास्त्रास्त्रे, मराठी हे उत्तम तलवार बहाद्दर होते. सरळपात्याची लांब तलवार, बाकदार पात्याची शमशेर, सरळ पाते व खालच्या बाजूस जाड होत गेलेले ते खडग पट्टा म्हणजे सरळ लांब लवत्या पातीची दोन्ही बाजूस धार असणारी तलवार, कोपरापर्यंत ढाली प्रमाणे झाकणारी, मूठ असणारी तलवार हे मराठा योद्ध्यांचे आवडते हत्यार होते. याशिवाय विविध प्रकारची खंजिरे, कट्यारे बिछवा, वाघ नखे इत्यादी. तसेच विविध प्रकारचे भाले, ढाली, हत्यारे, बंदूक इत्यादी शस्त्रास्त्र या दालनात आहेत.

**१३. कृष्ण दालन :** या दालनात कृष्णाशी संबंधित अशा सर्व भारतीय कलात्मक वस्तू आहेत. कृष्णाच्या लीलांची चित्रे यात खोडकर कृष्ण, बाल कृष्णाच्या लिला, राधाकृष्ण कृष्ण, गोपिका, रास क्रीडा, दुर्जनांचे निर्दालन, महाभारत युद्ध, कुरुक्षेत्र, अर्जुनाचे सारथ्य, इत्यादी विषयांची चित्रे प्रदर्शित केली आहेत, उदाहरणार्थ बकासुर वध, नारायणी रूपी विष्णू, कालियामर्दन, राधाकृष्ण एकरूपता इत्यादी चित्रे आहेत.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात प्रमुख अशी तेरा दालने आहेत त्यामुळे पर्यटकांचे मनोरंजन होतेच, पण त्याबरोबर त्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या मानत इतिहासाविषयी आवड निर्माण होते.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे पूर्वीचे नाव ............ होते.

अ) प्रिन्स ऑफ व्हेल्स ब) प्रिन्स ऑफ आर्थ

क) प्रिन्स ऑफ वेल्स ड) प्रिन्स ऑफ केन

२. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातील ............ हे दालन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रदर्शनासाठी सुरू केले गेले.

अ) जे खंडालावाला ब) प्रेमचंद रायचंद क) सर कावसजी ड) अकबर हैरी

३. प्राचीन धार्मिक ग्रंथातून .............. चित्रकलेची सुरुवात झाली.

अ) लघु ब) मध्यम क) सजावट ड) युरोपीय

४. कार्ल आणि मेहेरबाई खंडालावाला दालनामध्ये ध्यानस्थ उभे असलेले ........... देवतेचे शिल्प आहे.

अ) श्री शंकर ब) श्री गणपती क) श्री हनुमान ड) श्री राम

५. युरोपियन चित्र दालनातील सर्व चित्रे ............ या बंधुंनी भेट दिली आहेत.

अ) टाटा ब) बजाज क) खंडालावाला ड) अगरवाल

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे बांधकाम कोणी केले?

२. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय कोणत्या शैलीत बांधले आहे?

३. मुख्य इमारतीमधील तळमजल्यावरील शिल्पकला दालनामध्ये कोणत्या मंदिराच्या कोरीवकामाचे दगडी तीनपट मांडलेले आहे.

४. प्रकृतीविज्ञान दालनामध्ये कोणती चित्रे पहावयास मिळतात?

५. नेपाळ-तिबेट दालनात प्रवेश करताच कराचि दर्शन घडते?

## ४.३.३ टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर

कोल्हापूरचे वस्तुसंग्रहालय हे शासकीय संग्रहालय आहे. हे कोल्हापूरमध्ये 'टाऊन हॉल' नावाची इमारत आहे तेथे उभे केले आहे. याची स्थापना ३० जानेवारी १९४६ रोजी झाली कोल्हापूर संस्थानांमध्ये असणाऱ्या पुरातत्त्व विभागाने पंचगंगा नदीच्या किनारी असणाऱ्या ब्रह्मपुरी येथे उत्खन केले ते उत्खनन जतन करण्यासाठी संग्रहालय निर्माण केले. सन १९४९ मध्ये सध्याच्या टाऊन हॉलमध्ये हे संग्रहालय हलविण्यात आले. पुढील चार वर्षे या संग्रहालयामध्ये पुरातत्त्व हा एकच विभाग होता. १९५३ मध्ये चित्रकला कृतींचा विभाग सुरू करण्यात आला. कोल्हापूरला कलापूर म्हणजेच योग्य ठरेल असे येथे एका पेक्षा एक श्रेष्ठ चित्रकार होऊन गेले, बाबुराव पेंटर, आबालाल रहमान, माधवराव बागल, या चित्रकारांनी कोल्हापूरच्या चित्र विश्वाला कलेच्या क्षेत्रात मोठे स्थान मिळवून दिले आहे. हळूहळू संग्रहालयाची व्याप्ती वाढू लागली नवे विभाग सुरू झाले. सावंतवाडी, कागल इथून शस्त्रास्त्रे आणण्यात आली. त्यांचा एक स्वतंत्र विभाग करण्यात आला. सावंतवाडीहून लाकडी पुतळे, भरजरी पंखे, मातीची शोभिवंत भांडी, जुनी वस्त्रे, चंदनी मूर्ती आणल्या. सन १९५५ पासून या संग्रहालयास पुरातत्व संग्रहालय असे स्वरूप न राहता सर्वसाधारण संग्रहालयाचे स्वरूप आले. सन १९६८ मध्ये येथे चित्रकला कृती विभाग सुरु केला.

संग्रहालयातील विभाग खालीलप्रमाणे -

**१. शिल्पाकृती विभाग :**

यामध्ये विष्णू, लक्ष्मी नारायण, नरसिंह, श्रीकृष्ण, राम, श्री गणेश, जैन तीर्थकर, जैन यक्ष, यक्षणी, विरघळ यांच्या मूर्ती आहेत. विष्णूची मूर्ती काळ्या चकचकी दगडाची आहे. मूर्तीच्या मागील बाजूस कीर्तीमुख आहे. विष्णूच्या हातात शंक,चक्र, पद्म व गदा आहे. विष्णूची मूर्ती केशव पंथी दिसते. मूर्तीच्या मागे जी प्रभावळ दिसते त्यामध्ये दशावतार कोरलेले आहेत. लक्ष्मीनारायण मूर्तीमध्ये नारायण ललित आसनामध्ये बसलेला आहे. त्याच्या डाव्या बाजूस लक्ष्मी आहे. नरसिंहाच्या दोन मूर्ती आहेत. त्यापैकी एक लहान आकाराची आहे. तिच्यावरील कोरीव काम उल्लेखनीय आहे. यामध्ये लक्ष्मी नरसिंह दाखवले आहेत. तज्ञांच्या मते या मूर्ती अकराव्या किंवा बाराव्या शतकातील असाव्यात. श्रीकृष्णाची मूर्ती सतराव्या शतकातील असावी. या मूर्तीमध्ये श्रीकृष्ण वेणू वाजवताना दिसत आहे. पाठीमागे नागाची फणी आहे. कृष्णाच्या पायाजवळ कमळ दाखवले आहे. याशिवाय इतरही मूर्ती आहेत.

**२. पुरातत्त्व विभाग :**

कोल्हापूर हे तसे प्राचीन ठिकाण आहे. येथे मौर्य, सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, बदामी, यादव, शीलाहार, यांच्या राजवटी झाल्या. त्याच्या खुणा ब्रह्मपुरीच्या उत्खननात मिळाल्या आहेत. त्या वस्तू पुरातत्त्व विभागात ठेवण्यात आलेल्या आहेत. या अवशेषामध्ये मातीच्या भांड्याचे तुकडे, मणी, पंचरसी धातूंच्या वस्तू, दगडांच्या वस्तू, मातीच्या वस्तू, बांगड्यांचे तुकडे, लोखंडी वस्तू, नाणे, शिलालेख, ताम्रपट, इत्यादीचा समावेश होतो. मण्यामध्ये गोमेद, कारनोलिएन, गारनेट, अरगेट, अमेस्मिन्स्त, क्रिस्टल, लापीस, लाझुली, जास्फर, फियान्स, सोनेरी, मातीचे व काचेचे इत्यादी पंचरसी धातुच्या रोमन वस्तू ब्रह्मपुरी च्या उत्खननात सापडल्या आहेत. त्या येथील वस्तू संग्रहालयात आहेत.

**३. शस्त्रास्त्र विभाग :**

या विभागात गदा, मुदगल, कट्यार, खंजीर, सुरी, भाला शूल, बाण, तोफा, गोफण इत्यादी वस्तू दिसून येतात. संग्रहालयामध्ये एकंदर ३९ तलवारी आहेत. त्या तीन प्रकारच्या आहेत. १. कमळाच्या पानाप्रमाणे गोलाकार २. मंडलाग्र ३. असियष्टा. येथे एकंदर पाच तोफा, चार भाले, २६ बंदूका आहेत. याशिवाय ढाल, शिरस्त्राण, मशीनगन्स, गुप्ती इत्यादी आज सहसा न दिसणारी काही शस्त्रे आहेत.

**४. चित्रकला कृती विभाग :**

या विभागामध्ये बाबुराव पेंटर, आनंदराव मिस्त्री, आबालाल रेहमान, कृष्णराव मिस्त्री, भीमा सुतार, बाबा गजबर, रवींद्र मिस्त्री, जी.आर. मिस्त्री, रा.शी. गोसावी, दत्तोबा दळवी, माधवराव बागल, गणपतराव वडणवीकर, इत्यादींच्या चित्रकृती आहेत. त्यांची संख्या १३५ आहे. छत्रपती शिवाजी महाराज, पावनगडाचा देखावा, नळावर पाणी भरणारी स्त्री इत्यादी चित्रे अतिशय वास्तववादी आहेत. माधवराव बागलांची ३४ चित्रे या दालनात आहेत.

५. **संकीर्ण कलाकृती विभाग :**

या विभागात मातीची रंगीत भांडी, कोरीव काम केलेली मातीची भांडी, चंदनाच्या मूर्ती आहेत. अशा मूर्तींमध्ये गणेश, कृष्ण, विष्णु, शिवगौरी, महिषासुरमर्दिनी यांच्या मूर्ती आहेत. धातूच्या ही काही मूर्ती आहेत.

अशा प्रकारे कोल्हापुरातील 'टाऊन हॉल' हे वस्तू संग्रहालय महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध संग्रहालय आहे. इतिहासाचे अभ्यासासाठी प्राथमिक साधनांचा खाजीनाकच आहे. विशेषतः कोल्हापूरच्या प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासावर प्रकाश टाकणारी साधने येथे उपलब्ध आहेत.

**वस्तुसंग्रहालयाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व :**

वस्तुसंग्रहालयाचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्व अत्यंत उच्च प्रतीचे आहे. तथापी वस्तुसंग्रहालयाचा संबंध मुख्यत्वे करून भूतकाळाशी असतो भूतकाळातील घटनांची माहिती समाजास फारशी नसते ती जाणून घेण्यासाठी वस्तुसंग्रहालय उपयुक्त आहेत. वस्तुसंग्रहालयामध्ये ज्या वस्तू ठेवलेल्या असतात त्या इतिहासाची प्राथमिक संदर्भ साधन म्हणून महत्त्वाच्या आहेत. पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय मधील वस्तू उत्खनामध्ये सापडलेल्या असतात त्यामुळे त्याचा ऐतिहासिक साधन म्हणून दर्जा उच्च प्रतीचा असतो. वस्तुसंग्रहालय मधून इतिहासाच्या अभ्यासाविषयी विद्यार्थ्यांनमध्ये संशोधन वृत्ती निर्माण करता येते. विद्यार्थ्यांच्या संवेदना तीव्र होतात. संशोधनासाठी नवनवीन विषय सापडतात. इतिहास जपण्याची जाणीव निर्माण होते.

स्वयं अध्ययन प्रश्न-३

अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१. सुरवातीच्या काळात टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय ............. येथे सुरू करण्यात आले.

अ) मंगळवारपेठ ब) बुधवारपेठ क) गुरुवारपेठ ड) शुक्रवारपेठ

२. टाऊन हॉल या वस्तुसंग्रहालयाची रचना .............. शैलीतील आहे.

अ) गॉथिक ब) नैसर्गिक क) पिरॅमिड ड) ग्रीक

३. ब्रह्मपुरी येथील उत्खनन क्र. ५ व ६ हा .................. कालीन आहे.

अ) पूर्व सातवाहन ब) उत्तर सातवाहन क) शिलाहार ड) बहामनी

४. इ.स. ९ व्या शतकात महालक्ष्मी देवालयातील काशी कुंडात ............ ची मुर्ती सापडली.

अ) श्री नरसिंह ब) श्री बवानी क) श्री गणेश ड) बुद्ध

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. १९४५-१९४६ मध्ये कोणत्या संस्थेच्या वतीन ब्रह्मपुरी येथे उत्खनन करण्यात आले?

२. कोल्हापूर वस्तु संग्रहालयाचा उद्देश कोणता?

३. १९४९ मध्ये कोणत्या मोठ्या जागेत हे वस्तुसंग्रहालय हलविण्यात आले?

४. ग्रीक रोमन कलेचा उत्कष्ट नमुना म्हणून कोणती शिल्पाकृती या वस्तुसंग्रहालयामध्ये आहे?

५. मध्ययुगीन कालखंडातील शिल्पांवर कोणत्या पद्धतीचा प्रभाव दिसतो?

## ४.४ सारांश :

वस्तुसंग्रहालय हे मानवी विकासातील एक महत्त्वाची बाब आहे. टवस्तुसंग्रहालय' ही संकल्पना व वस्तुसंग्रहालयाच्या निर्मितीमुळे मानवी इतिहासामध्ये एक महत्त्वाचे साधन म्हणून त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूंचा संग्रह एकत्र करून त्या वस्तू विशिष्ट पद्धतीने मांडणी करून व जतन करून ठेवल्या जातात. त्याचा उपयोग सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन व ज्ञान तसेच इतिहास संशोधक, मार्गदर्शक यांना उपयोगी आहे. इतिहासाला इंग्रजीमध्ये 'म्युझियम' असे म्हणतात. वस्तुसंग्रहालयाचा उदय युरोपमध्ये झाल्याचे दिसून येते. आधुनिक कालखंडामध्ये जसजसे विविध विद्याशाखांचा विकास होत जाऊन त्याच्या उपशाखा निर्माण झाले आहेत तसेच वस्तुसंग्रहालयामध्ये सुद्धा विविध प्रकार निर्माण झाले आहेत. हे प्रकार वस्तुसंग्रहालयाच्या निर्मितीचा हेतू, वस्तुसंग्रहालयाचे निर्मितीचे प्रादेशिक ठिकाण, तसेच वस्तुसंग्रहालय कोणी स्थापन केली आहे यानुसार प्रकार पडले आहेत. हे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहेत आणि हे वस्तुसंग्रहालयाच्या विशेष विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतामध्ये वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व आणि विकास हा ब्रिटिश संपर्कमुळे झाला. भारतात विविध राज्यांच्या मुख्य शहरांमध्ये वस्तू संग्रहालय उभारले गेले आहेत. ही वस्तू संग्रहालय राज्य शासनाकडून, केंद्र शासनाकडून, तसेच स्वयंसेवी संस्थांकडून, वैयक्तिक धनाड्य लोकांकडून उभारली गेली आहेत. मुंबई या ठिकाणी 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई' हे जगप्रसिद्ध वस्तुसंग्रहालय आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन इतिहासापासून ते आधुनिक इतिहासापर्यंत अनेक प्राथमिक संदर्भ साधनांच्या अनुषंगाने या वस्तू संग्रहालयाचे महत्त्व विशेष आहे. कोल्हापूरचे 'टाऊन हॉल' मधील 'शासकीय वस्तुसंग्रहालय' हे देखील कोल्हापूरच्या स्थानिक इतिहासाच्या अनुषंगाने तसेच महाराष्ट्राच्या प्राचीन, मध्ययुगीन इतिहासापासून आधुनिक इतिहासाच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाचे आहे. वस्तुसंग्रहालयाकडे शिक्षणाचे व प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून पाहिले जाते. इतिहास विषयाच्या संशोधक, अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

## ४.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१. वस्तुसंग्रहालय – वस्तूंचा संग्रह त्यांची जपणूक करणारे व अभ्यासासाठी अशा साधनांची उपलब्ध करून देणारी वास्तू म्हणजे वस्तू संग्रहालय.

२. पुराभिलेखागार – सरकारी दप्तरखाना

३. इतिहासाची साधने – इतिहास लिहिण्यासाठी वापरले जाणारे पुरावे/संदर्भ

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

अ) १. क – १९४९ २. ब – गेअर ३. ड – गुप्त ४. अ – लघुचित्र

५. क – बुद्ध

ब) १. राष्ट्रीय संग्रहालयाचे उद्घाटन भालाचे गव्हर्नर जनरल श्री. आर. सी. राजगोपालाचारी यांनी केले.

२. कास्य धातुतील नृत्य करणारी स्त्री.

३. हिंदु पौराणिक कथा.

४. उत्तर प्रदेश सिद्धार्थनगर

५. वैष्णव आणि शैव धर्मचित्रे

**स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

अ) १. क – प्रिन्स ऑफ वेल्स २. ब – प्रेमचंद रायचंद

३. अ – लघुचित्र ४. क – श्री हनुमान

५. अ – टाटा

ब) १. स्थापत्य विशारद जॉर्ज विटेट

२. इंडो सर्सिनिक

३. ऐहोळ मंदिराचे

४. लोप पावत असलेली जंगले, प्राणी, पक्षी प्रजाती

५. बौद्ध धर्मातील वज्रायन पंथातील गुढ व तांत्रिक बाबींचे

**स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

अ) १. ड – शुक्रवारपेठ २. अ –गॉथिक

३. ब – उत्तर सातवाहनकालीन ४. क – श्री गणेश

५. क – उषःकाल

ब) १. डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्युट

२. कोल्हापूरचा वारसा जिवंत राहावा.

३. कोल्हापूर नगर मंदिर (टाऊन हॉल)

४. पोसायडान शिल्पाकृती

५. चालुक्य आणि होयसळ

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१. वस्तूसंग्रहालयाचा अर्थ व व्याख्या

२. वस्तूसंग्रहालयाचे प्रकार

३. वस्तूसंग्रहालयाचे इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्व

४. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई.

ब) सविस्तर उत्तरे लिहा.

१. म्युझियमची व्याख्या सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाची सविस्तर माहिती द्या

३. वस्तुसंग्रहालयाचे इतिहासासाठी असलेले महत्त्व उपयोग स्पष्ट करा.

४. टाऊन हॉल वस्तुसंग्रहालयाची सविस्तर माहिती द्या.

## ४.८ संदर्भ साधने व अधिक वाचनासाठी पुस्तके


१. श. म. केतकर – संग्रहालय परिचय

२. शिवराममूर्ती सी. – संपादक– भारतीय संग्रहालयाची निर्देशिका

३. गणेश डॉ. आर – भारत के विविध संग्रहालय

४. डॉ. कटारे, डॉ. साखरे – पुरातत्व विद्या वस्तुसंग्रहालय शास्त्र आणि पर्यटन

५. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र – दूर शिक्षण केंद्र, बी. ए. भाग तीन इतिहास, सत्र पाच – पेपर नंबर ११ इतिहास लेखन परिचय (२०१५–१६)

६. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, – मुंबई पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार

७. देसाई कल्पना, जोसेफ सेंट – द म्युझियम मुंबई मार्गदर्शक पुस्तिका –

८. मंजुळकर, वाघ – इतिहासाचे विभाग: पुरातत्व शास्त्र, वस्तुसंग्रहालय शास्त्र, पर्यटन


❑❑❑

## घटक १
## संशोधन प्रस्ताव
(Preparation of Research Proposal)

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ संशोधन विषयाची निवड (Selection of topic )

  १.२.२ अभ्यास क्षेत्र (स्थानिक आणि कालिक मर्यादा)
  (Study area (Spatial and Temporal Limits)

  १.२.३ संदर्भ साहित्याचा आढावा (Review of literature)

  १.२.४ उद्दिष्टे व पद्धती (Objectives and methodologies)

१.३ सारांश

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके

### १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१. संशोधन प्रकल्प लिहीत असताना संशोधन विषयाची निवड कशी करावी स्पष्ट करता येईल.

२. संशोधन प्रकल्प स्थानिक व कालिक मर्यादित कसा ठेवणे आवश्यक आहे हे स्पष्ट करता येईल.

३. संशोधकास आपल्या संशोधनापूर्वीच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे हे स्पष्ट करता येईल.

४. संशोधन प्रकल्प लेखनामध्ये संशोधनाची उद्दिष्टे व वेगवेगळ्या पद्धतींचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

### १.१ प्रास्ताविक :

इतिहास म्हणजे 'भूतकाळात घडून गेलेल्या घटना' असे आपल्या डोळ्यासमोर येते. या इतिहासाचा आत्मा म्हणून इतिहास लेखन प्रक्रियेकडे पाहिले जाते. साधारणपणे १९ व्या शतकात शास्त्रीय दृष्टिकोनातून इतिहास लेखनाला गती प्राप्त झाली. १९०३ मध्ये केंब्रिज येथील विद्यापीठाचे इतिहास विषयाचे प्रा. ब्युरी यांनी आपल्या भाषणात 'इतिहास हे दुसरे तिसरे काही नसून शास्त्रच आहे' असे विधान केले आणि

'शास्त्राला जे नियम असतात तेच नियम इतिहासाला लावून इतिहास हे शास्त्र मानले पाहिजे' असे त्यांनी ठामपणे सांगितले. प्रा.ब्युरी यांच्या या बाबीवर अनुकूल आणि प्रतिकूल असे दोन्ही मतप्रवाह निर्माण झाले. परंतु इतिहास या विषयाला शास्त्र मानले तर वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करणे क्रमप्राप्त आहे. 'गतकाळातील घटनांची शास्त्रशुद्धरित्या तपासणी करून त्यावर आधारित लेखन करणे म्हणजे इतिहास संशोधन करणे' असे समजले जाऊ लागले. अशा घटनांची पद्धतशीरपणे तपासणी करण्याची प्रक्रिया म्हणजे इतिहास संशोधन होय. इतिहासात कागदपत्रे व पुराव्यांच्या आधारे प्रचलित ज्ञानात भर घालण्यात येते किंवा नव्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकला जातो. इतिहास संशोधन ही सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे त्यामुळे कोणत्याही संशोधन कार्यास सुरुवात करताना संशोधन विषयाची निवड कशा प्रकारे करणे गरजेचे आहे? आपल्या संशोधन विषयाला कालखंडाच्या आणि प्रदेशाच्या मर्यादा कशा घालता येतील? आपल्या संशोधनाच्या दृष्टिकोनातून पूर्वी काही संशोधन झाले आहे काय? आपल्या संशोधनाची उद्दिष्टे आणि पद्धती कोणत्या असाव्यात? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधल्यानंतर इतिहास लेखन प्रक्रियेची ही माहिती घ्यावी लागते व इतिहास लेखन प्रक्रियेच्या अनेक पायऱ्या पार करून आपल्या प्रबंधाचे लेखन करता येते.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ संशोधन विषयाची निवड (Selection of topic )

इतिहास हे एक शास्त्र आहे हे सिद्ध करण्याकरिता इतिहास संशोधन प्रक्रिया शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे गरजेचे आहे आणि ही प्रक्रिया शास्त्रशुद्ध पद्धतीने होण्यासाठी विषयनिवडीपासून ते शेवटी लेखन पूर्ण होईपर्यंत एका विशिष्ट क्रमाने काही टप्पे पूर्ण करावे लागतात. कोणतेही ऐतिहासिक संशोधनास आरंभ करण्यापूर्वी आपणास कोणत्या विषयावर संशोधन करावयाचे आहे ही बाब विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे. इतिहासातील संशोधनासाठी विषय निवडताना त्या विषयाचे महत्त्व आणि त्याचे संशोधनाचे मूल्य जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

इतिहासकाराचा दृष्टिकोन हा त्याच्या इतिहास संशोधनाच्या विषयाच्या निवडीवर आणि त्याच्या संशोधन कार्यावरती अतिशय विस्तृत परिणाम करतो. सतत आणि अतिशय काळजीपूर्वक संशोधनाचे कार्य केल्यानेच ऐतिहासिक ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. जी.आर.एलटन ऐतिहासिक संशोधनाची व्याप्ती अतिशय सुंदर शब्दात मांडताना म्हणतात, "Historical method is no more than a recognised and tested way of extracting from what the past has left the true facts and events of that past, and so far as possible their true meaning and interrelation, the whole governed by the first principle of historical understanding, namely that the past must be studied in its own right, for its own sake and on its own terms. It is a way of turning the evidence to account and though there is nothing mysterious about it, it is nevertheless vigorous and not to be confused with the so-called common-sense approach of the intelligent but untutored enthusiast. If fundamental principles are only two, and they may be

expressed as questions thus exactly what evidence is there, and exactly what does it mean?" यावरून आपल्याला ऐतिहासिक संशोधनाची व्याप्ती अगदी स्पष्टपणे कळते.

**संशोधन विषय निवडीचे सहाय्यकारी घटक :**

इतिहास संशोधनाची सुरुवात संशोधनासाठी विषय निवडण्यापासून होते. विषय निवडताना अनेक बाबींची काळजी घ्यावी लागते. त्यावरच इतिहासलेखन प्रक्रिया अवलंबून आहे. संशोधनासाठी विषय निवडणे हा इतिहासलेखनाचा पाया आहे. इतिहासलेखनाचा पाया पक्का असणे म्हणजेच योग्य तो विषय निवडणे अतिशय महत्त्वाचे ठरते. संशोधकाने निवड केलेल्या विषयांमध्ये नक्की काय संशोधन करणार याचा विचार प्रथम करणे गरजेचे आहे. यानंतर त्याच्या संशोधनाचा आराखडा मांडणे गरजेचे आहे व हा संशोधन आराखडा तयार करत असताना संशोधकाने अनेक बाबींची काळजी घ्यावी. संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधक संदर्भ साधनांचा शोध घेतो अशी संदर्भ साधने आपल्या निवडलेल्या विषयास अनुरूप मिळतील काय याचा अंदाज प्रथमतः संशोधकाने घेणे क्रमप्राप्त आहे जेणेकरून त्याच्या पुढील संशोधनाची वाटचाल सुकर होऊ शकेल. त्याने अशा प्रकारची संदर्भ साधने जुळवल्यानंतर त्यासंदर्भात साधनांचे परीक्षण करणे गरजेचे आहे. व तदनंतरच ही साधने त्याच्या संशोधनाकरिता उपयुक्त आहेत काय याची त्यास खात्री होऊ शकते.

१. संशोधक जो विषय संशोधनाकरिता निवडू इच्छितो तो विषय समाजातील कोणत्या घटकास उपयुक्त ठरणार आहे हे त्यास ज्ञात असले पाहिजे. म्हणजेच त्याच्या संशोधनाचे महत्त्व आणि त्या संशोधनाची प्रासंगिकता असणे गरजेचे ठरते.

२. जेव्हा संशोधक ऐतिहासिक संशोधनाकरिता विषय निवड करतो तेव्हा त्या विषयाचे प्राथमिक संदर्भ स्त्रोत उपलब्ध असण्याची खात्री केली पाहिजे इतकेच नव्हे तर त्या स्त्रोतांची उपलब्धता संशोधकास होईल व त्यांचे परीक्षण करता येईल याची खात्री संशोधकास असणे महत्त्वाचे आहे.

३. सामाजिक शास्त्रांतर्गत आंतरविद्याशाखीय संशोधन गरजेचे ठरत आहे. इतिहास संशोधकाने त्याच्या विषयाची निवड करत असताना इतिहासासोबत इतर सामाजिक शास्त्रांचा जसे की राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इ.यांचाही त्यात समावेश करणे गरजेचे आहे. जेणेकरून त्याच्या विषयाची व्यापकता वाढू शकते व असे आंतरविद्याशाखीय संशोधन समाज हितासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

४. संशोधनाचा विषय हा सर्वसमावेशक समाजातील सर्व स्तरातील लोकांना उपयुक्त ठरेल असा असणे आवश्यक आहे.

५. संशोधकांनी संशोधन विषयाची निवड करत असताना अतिशय लहान विवादास्पद घटकाची विषय म्हणून निवड करावी जेणेकरून त्या घटकाची चौकसपणे अतिशय सुक्ष्मरित्या सर्वसमावेशक अभ्यास करता येईल व विद्यमान असलेल्या संकल्पनेमध्ये नव्या बाबींची भर घालता येईल.

६. संशोधकाचे संशोधनाअंती आलेले निष्कर्ष हे समाजाच्या सामूहिक स्मृती आणि राष्ट्रीय अस्तित्वास प्रभावित करू शकतात. विषयाची निवड ही एकतर प्रस्थापित असलेल्या संकल्पनांना मजबूतीने स्थापित करते किंवा विद्यमान असणाऱ्या संकल्पनांना हादरा देऊ शकते. त्यामुळे संशोधकाने विषयाची निवड करत असताना या बाबींचा विचार करणे गरजेचे ठरते.

७. समकालीन जगतातील समाजाच्या चिंता वाढवणारा किंवा भविष्यात निर्माण होणाऱ्या धोक्यांची सूचना देणारा संशोधनाचा विषय असल्यास समाजामध्ये त्याच्या संशोधन विषयासंदर्भात अधिक प्रतिबद्धता व प्रासंगिकता वाढू शकते व त्याच्या संशोधनावर इतर समाजाचे लक्ष केंद्रित होऊ शकते.

८. निवडलेला विषय हा नैतिक पेचप्रसंग वाढवू शकतो. मुख्यत्वे संवेदनशील किंवा अतिशय दुःखदायक असणाऱ्या घटना अभ्यासत असताना इतिहास संशोधकाने अतिशय संवेदनशीलतेने संबंधितांच्या सन्मानाचा आणि त्यांना आलेल्या अनुभवांचा आदर ठेवून लेखन करणे महत्त्वपूर्ण आहे.

९. संशोधक त्याची एखाद्या विषयासंबंधी असणारी अत्यंतिक आवड व कुशलता यातून विषयाची निवड करतो. अशावेळी त्याचे त्या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन विषयावर परिणाम करतात.

१०. संशोधकाच्या विषयाच्या निवडीवर परिणाम करणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे त्या संशोधनाकरिता होणारी आर्थिक मदत होय. शिष्यवृत्तीद्वारे काही विशिष्ट विषयांवर संशोधन करून त्या संशोधन विषयातील आजवर दुर्लक्षित पैलू समाजासमोर मांडले जातात.

अंतिमतः असे म्हणता येईल की इतिहास लेखन प्रक्रियेतील विषय निवड हा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय असून या निर्णयाच्या द्वारे संशोधकाच्या एकूण संशोधनाची दिशा आणि त्याचे परिणाम ठरवले जातात. त्यामुळे संशोधकाने संशोधनाकरिता विषय निवडत असताना संशोधनाचा लाभ घेणारे घटक, संशोधनाचे उद्देश, संदर्भ साधने, आर्थिक गरजा या सर्व बाबींचा परिपूर्णरित्या विचार करून सर्वसमावेशक असणारा विषय निवडणे गरजेचे आहे. संशोधक वर्तमानकालीन समाजाशी एकरूप होत असताना मानवी भूतकाळाबद्दलच्या संकल्पना अधिक सूक्ष्मरित्या समजून देण्यासाठी हातभार लावतो.

**इतिहास लेखन प्रक्रियेतील विषय निवडीची वैशिष्ट्ये**

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषयाची निवड ही एक विचारशील आणि उद्देशपूर्ण प्रक्रिया आहे, जी ऐतिहासिक संशोधनाच्या दिशा आणि व्याप्तीवर प्रभाव टाकणाऱ्या विशिष्ट वैशिष्ट्यांद्वारे मार्गदर्शन करते. ही वैशिष्ट्ये निवडलेल्या विषयाची प्रासंगिकता, महत्त्व आणि संभाव्य प्रभाव निर्धारित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. गंगाधर वि. कायंदे-पाटील आपल्या 'संशोधन पद्धती' या ग्रंथात संशोधन समस्या म्हणजेच संशोधन विषयाच्या निवडीवर चर्चा करीत असताना याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे मांडतात,

१. संशोधनाची समस्या ही प्रश्नवाचक विधान असते.

२. संशोधन समस्येवर संशोधन करून उपाय सुचविण्याचे कार्य संशोधकास करावे लागते.

३. संशोधन समस्येद्वारे संशोधन विषयास योग्य स्वरूपात मांडले जाते.

४. संशोधन समस्येची निवड ही संशोधनातील पहिली अवस्था किंवा पायरी असते.

५. संशोधन समस्येमध्ये नावीन्यता असावी.

६. चांगल्या संशोधन समस्यांवर कमी संशोधक संशोधन करतात आणि सर्वसाधारण समस्येवर अनेक संशोधक संशोधन करतात असे आढळून येते.

७. संशोधन समस्येत वादग्रस्तता कमी असते.

८. संशोधन समस्या निवडण्यामागे योग्य प्रकारे पूर्वतयारी करणे आवश्यक असते, त्यासाठी संशोधकाने अभ्यास केला पाहिजे.

९. संशोधन समस्या ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी आणि वेगवेगळ्या संबंधित घटकांचे सहकार्य मिळेल यानुसार निश्चित केलेली असते.

१०. संशोधन समस्या अति महत्त्वाकांक्षी नसते, ती समस्या सहज साध्य होईल या स्वरूपात असते.

११. चांगली संशोधन समस्या संदिग्ध किंवा अतिसंकुचित राहत नाही.

१२. संशोधन आराखडा तयार करताना समस्या निवड महत्त्वाची असते.

इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषयाची निवड ही एक वैचारिक आणि अतिशय उद्देश पूर्ण प्रक्रिया असून तिचा संशोधनाच्या दिशेवर पुढील दिशा दिशेवर आणि व्याप्तीवर प्रभाव पडतो. ऐतिहासिक संशोधनांमध्ये संशोधक इतिहासातील कायमस्वरूपी प्रभाव टाकणाऱ्या महत्त्वाच्या घटना किंवा व्यक्तींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतात. काही प्रसंगी समकालीन जगतातील महत्त्वपूर्ण विषय किंवा वादविवाद उजेडात आणण्याचे प्रयत्न करतात. संशोधकाने निवडलेल्या विषयात प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांची पुरेशी उपलब्धता असणे आणि त्याचे परीक्षण करण्याची क्षमता संशोधकाच्या अंगी असणे महत्त्वपूर्ण आहे. इतिहासकाराचे आपल्या संशोधनातून संकल्पनांना नवीन दृष्टिकोनातून अभ्यासून विद्यमान असलेल्या संशोधनातील अंतर दूर करून भूतकाळ समजून सांगितला पाहिजे. याकरिता आंतरविद्याशाखीय मूल्य संशोधकाने बाळगणे गरजेचे आहे. जेणेकरून इतर सामाजिक शास्त्रांचा उपयोग त्यास इतिहास लेखन करणे करिता सोबतच अनेक संकल्पनांच्या विश्लेषणाकरिताही होऊ शकतो.

नैतिक संकल्पना बाळगणे हे इतिहासकाराचे कर्तव्य आहे. संशोधकाने विषय निवडत असताना सर्वसमावेशकता बाळगणे व स्वतःचे वैयक्तिक स्वारस्य दूर ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. निवडलेल्या विषयाची व्याप्ती किती असावी हे त्यास ज्ञात असणे गरजेचे आहे. संशोधन विषयाची व्याप्ती खूप विस्तृत असेल तर संशोधन वरचा उपचार होते या ऐवजी संशोधन विषय लहान असेल तर त्यातून अर्थपूर्ण निष्कर्ष प्राप्त होऊ शकतात.

एकंदरीत, इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेतील विषयाच्या निवडीची वैशिष्ट्ये संशोधन निर्मितीसाठी इतिहासकाराची वचनबद्धता दर्शवतात. ऐतिहासिक महत्त्व, संशोधन क्षमता, नैतिक विचार आणि प्रतिनिधित्व यांचा काळजीपूर्वक विचार करून, इतिहासकार आपल्या सामायिक मानवी भूतकाळातील सखोल समजून घेण्यास आणि समकालीन समाजाशी असलेल्या त्याच्या संबंधात योगदान देणारी कथा तयार करू शकतात.

**विषय निवडताना विचारात घेण्यासाठी काही महत्त्वपूर्ण टप्पे :**

इतिहास लिहिण्याची प्रक्रिया संशोधन आणि लेखनासाठी विषय निवडण्यापासून सुरू होते. योग्य विषय निवडणे महत्त्वाचे आहे, कारण ते संपूर्ण ऐतिहासिक चौकशीचा पाया तयार करते. इतिहास संशोधन प्रकल्पासाठी विषय निवडताना खालील बाबींचा आवश्य विचार करावा:

**१. वैयक्तिक आवड :** आपल्या स्वतःच्या आवडी आणि आवडींचा विचार करून सुरुवात करा. तुम्हाला खरोखर गुंतवून ठेवणारा विषय संशोधन आणि लेखन प्रक्रिया अधिक आनंददायक आणि फायद्याचा बनवेल. स्वतःला विचारा की इतिहासातील कोणते कालखंड, घटना तुम्हाला सर्वात जास्त आकर्षित करतात.

**२. महत्त्व आणि प्रासंगिकता :** ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेले आणि व्यापक ऐतिहासिक संदर्भाशी सुसंगत असलेले विषय शोधा. निवडलेला विषय मानवी विकास आणि समाजाच्या संदर्भात का महत्त्वाचा आहे याचा विचार करा.

**३. व्याप्ती आणि व्यवस्थापन क्षमता :** तुमच्या प्रकल्पाची व्याप्ती निश्चित करा. तुमच्या उद्दिष्टांवर अवलंबून, तुम्हाला एक लहान किंवा विस्तृत विषय निवडण्याची आवश्यकता असू शकते. उपलब्ध वेळेत आणि संसाधनांमध्ये विषयाचे संशोधन होणार असल्याची खात्री करा.

**४. उपलब्ध स्त्रोत :** तुमच्या विषयाशी संबंधित प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या उपलब्धतेचा विचार करा. सखोल संशोधन करण्यासाठी आणि चांगल्या प्रकारे समर्थित युक्तिवाद तयार करण्यासाठी पुरेसे आणि विश्वासार्ह स्त्रोत आवश्यक आहेत.

**५. मौलिकता :** जेव्हा संशोधक अनेक चांगले ऐतिहासिक विषय अभ्यासतो तेव्हा त्याचा संबंधित विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. संशोधकाने उपलब्ध ज्ञानामध्ये मौलिक भर घालण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून आपण या विषयात नवीन काहीतरी योगदान द्या. संशोधकाचे असे संशोधन निर्माण होण्याकरिता त्याचा मूळचा दृष्टिकोन या ठिकाणी महत्त्वपूर्ण ठरतो.

**६. मार्गदर्शकांशी सल्लामसलत :** तुम्ही शैक्षणिक प्रकल्पावर किंवा प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली काम करत असल्यास, तुमच्या संभाव्य विषय निवडींवर त्यांचा सल्ला आणि अभिप्राय घ्या. ते संशोधकास संशोधनातील महत्त्वपूर्ण गोष्टी सांगू शकतात व आपल्या संभाव्य विषय निवडीत मदत करू शकतात.

**७. सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव :** निवडलेला विषय भूतकाळातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा आर्थिक पैलूंवर कसा प्रकाश टाकू शकतो याचा विचार करा.

**८. व्यवहार्यता :** आपल्या संशोधनास समर्थन देण्यासाठी आवश्यक संसाधने, संग्रहालय, ग्रंथालये आणि संबंधित विषयातील तज्ज्ञ यांच्याशी भेट होऊ शकते की नाही याची माहिती घ्या. एखादा विषय जो खूप अस्पष्ट आहे किंवा अगम्य आहे तो सर्वसमावेशक संशोधन करण्याच्या प्रक्रियेत अडथळा आणू शकतो.

**९. नैतिक विचार :** विषय निवडताना नैतिक बाबी लक्षात घ्या. काही ऐतिहासिक घटना किंवा विषयांमध्ये संवेदनशील समस्यांचा समावेश असू शकतो किंवा त्यात सहभागी लोक आणि संस्कृतींचा काळजीपूर्वक हाताळणी आणि व्यक्तींना आदर देणे आवश्यक असू शकते.

**१०. संभाव्य वाचक :** संशोधकांनी विषय निवड करत असताना आपल्या संशोधनाचे संभाव्य वाचक कोण असतील याचाही विचार करणे गरजेचे आहे. इतिहासाची परिचित असलेल्या वेगवेगळ्या सामाजिक आर्थिक व इतर स्तरातील वाचकांना आकर्षित करणारा विषय आपण निवडणे आवश्यक आहे.

वरील सर्व विवेचन आपणास लवकर लक्षात यावे याकरिता या ठिकाणी मी एक उदाहरण देत आहे. इतिहास संशोधन करणाऱ्या संशोधकास प्राचीन, मध्ययुगीन अथवा आधुनिक अशा तीनही कालखंडात संशोधन करता येऊ शकते. संशोधकाची वैयक्तिक आवड पाहून त्याने आपला विषय निवडावा जसे की, ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' हा विषय निवडला असता या विषयाची आवड संशोधकाला वैयक्तिक असणे आवश्यक आहे. या विषयाचे महत्त्व पाहता स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये सातारा जिल्ह्याने फार मोठे योगदान दिलेले आहे. या जिल्ह्यातील राजकीय व्यक्तिमत्वांनी महाराष्ट्राच्या विकासामध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. ज्यावेळी आपण या विषयाची व्याप्ती पाहतो तेव्हा हा विषय सातारा जिल्ह्याच्या प्रादेशिक मर्यादेमध्ये बांधलेला दिसतो तसेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या चाळीस वर्षांमध्ये या विषयाचा कालखंड मर्यादित केलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेले प्राथमिक व दुय्यम स्त्रोत आपणास सातारा जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांचे रेकॉर्ड, सातारचे शासकीय व सामाजिक संघटना विविध घटकांच्या माध्यमातून केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल तसेच सातारा जिल्ह्यातील सार्वजनिक उत्सव साजरे करणाऱ्या विविध सार्वजनिक उत्सव मंडळांच्या माध्यमातून विश्वासहार्य माहिती प्राप्त होऊ शकते. त्याचप्रमाणे या कालखंडातील राजकीय सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध जाणकारांच्या मुलाखती, सातारा जिल्ह्यातून प्रकाशित होणारी वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत. या विषयाची मौलिकता पाहता या विषयावर संशोधन करून आपण एखाद्या देशाच्या अथवा राज्याच्या विकासामध्ये सातारा जिल्ह्याने दिलेले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. या संभाव्य विषयाची मार्गदर्शकांशी चर्चा केल्यानंतर मार्गदर्शक या संशोधन विषयातील अनेक लहानसहान बाबींची माहिती स्पष्टपणे संशोधकास देऊ शकतो जेणेकरून त्याच्या संशोधन विषयांमध्ये अधिक स्पष्टता येऊ शकेल. सातारा जिल्ह्यातील सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक अशा विविध पैलूंवर या विषयाच्या अभ्यासाने सखोल माहिती उजेडात येईल आणि अंतिमतः हा विषय सातारा जिल्ह्यापर्यंतच मर्यादित असल्याने सातारा जिल्ह्यातील अनेक ग्रंथालय वाचनालय संग्रहालय आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीतील अनेक व्यक्तिमत्त्वांची तज्ञांची या ठिकाणी भेट घेणे शक्य होऊ शकते. जेणेकरून या विषयावर विद्यार्थी संशोधकास बरीच माहिती उपलब्ध होऊ शकते. या विषयाचे संशोधन पूर्ण केले असता सातारा जिल्ह्यातील सर्वसामान्य व्यक्तीस या ग्रंथाचे आकर्षण तर असेलच परंतु सातारा जिल्ह्याच्या बाहेर महाराष्ट्रात देखील सातारा जिल्ह्यातील राजकीय सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या व्यक्तींची आणि

त्यांच्या कार्याची माहिती प्राप्त व्हावी यासाठी अनेक वाचक आतुरतेने या ग्रंथाचे वाचन करतील त्यामुळे या विषयावर संशोधन होणे गरजेचे राहील.

लक्षात ठेवा की विषय निवडण्याची प्रक्रियेमध्ये पुनरावृत्ती होऊ शकते. तुम्ही संशोधन प्रक्रियेचा सखोल अभ्यास करत असताना तुम्हाला तुमच्या प्रारंभिक कल्पना सुधारण्याची किंवा समायोजित करण्याची आवश्यकता असू शकते. विविध शक्यता, अज्ञात बाबी उजेडत आणण्याकरिता वेळ काढा आणि एक विषय निवडा जो तुम्हाला उत्तेजित करेल आणि इतिहासकार किंवा संशोधक म्हणून तुमच्या ध्येयांशी जुळेल. अशा पद्धतीने संशोधकाने संशोधनासाठी विषय निवडताना अनेक घटकांचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे आणि योग्य लक्ष दिले पाहिजे. संशोधन प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी संशोधनाची समस्या किंवा विषय, विषयाचे महत्त्व, विषयाचे स्वरूप, विषयाची व्यापकता, विषयाच्या मर्यादा, विषयासाठी उपलब्ध होणारे साहित्य याबाबतचा अभ्यास आणि विचार संशोधकाने संशोधनाची समस्या निवडताना केली पाहिजे.

**१.२.१ स्वयं अध्ययन प्रश्न**

प्रश्न : योग्य पर्याय निवडा?

१. इतिहास हे एक ....... आहे.

अ) कला  ब) विज्ञान  क) शास्त्र  ड) यापैकी नाही

२. संशोधक ज्या विषयाची संशोधनाकरिता निवड करत असतो तो विषय...... उपयुक्त असणे गरजेचे आहे.

अ) संशोधकास  ब) मार्गदर्शकास  क) समाजास  ड) विद्यापीठास

३. इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत विषयाची निवड ही एक.... व .... प्रक्रिया आहे.

अ) वैचारिक व उद्देशपूर्ण  ब) प्रभावशाली व महत्त्वपूर्ण

क) गरजेची व कर्तव्याची  ड) यापैकी नाही

४. संशोधकाने विषय निवडत असताना ...... बाळगणे व....... दूर ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

अ) सर्वसमावेशकता व स्वतःचे वैयक्तिक स्वारस्य

ब) महत्त्वाच्या घटना किंवा व्यक्तींवर प्रकाश टाकणे

क) अत्यंतिक आवड व कुशलता  ड) प्रतिबद्धता व प्रासंगिकता

५. तुम्ही शैक्षणिक प्रकल्पावर किंवा प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली काम करत असल्यास, तुमच्या संभाव्य विषय निवड करत असताना त्यांनी दिलेला ....... स्वीकारा.

अ) सल्ला  ब) विषय  क) आदर  ड) यापैकी नाही

## १.२.२ अभ्यास क्षेत्र स्थल व काल मर्यादा (Study area Spatial and Temporal Limits)

**अभ्यास क्षेत्र स्थल मर्यादा**

संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाची निवड करीत असताना आपल्या विषयाला स्थल व काल या दोन बाबींची मर्यादा देणे अत्यावश्यक आहे. जेव्हा एखादा विद्यार्थी संशोधक आपल्या विषयाची मांडणी करत असतो त्यावेळी त्या विषयास ठराविक स्थल बंधनात अडकवणे गरजेचे आहे. जेव्हा कोणताही संशोधक विद्यार्थी आपला संशोधन आराखडा तयार करत असतो तेव्हा त्याने निवडलेल्या विषयामध्ये सर्वात मोठी त्रुटी जाणवते ती म्हणजे असे संशोधक विद्यार्थी अशा विषयावर लिहिण्याचा प्रयत्न करतात की ते विषय स्थल मर्यादेच्या बाहेर जातात यामुळे त्या संशोधक विद्यार्थ्यास त्याने निवडलेल्या विषयाच्या भौगोलिक मर्यादेची जाणीव रहात नाही. जर संशोधक विद्यार्थ्यास अतिशय विस्तृतरित्या आपल्या संशोधन विषयाची मांडणी करावयाची असेल तर त्याने आपल्या संशोधन विषयास स्थल मर्यादा देणे आवश्यक आहे जेणेकरून त्या मर्यादित भागाची माहिती संशोधक विद्यार्थी प्राप्त करू शकेल. स्थल मर्यादा घातल्यानंतर संशोधक विद्यार्थ्यास आपल्या विषयाच्या अनुषंगाने त्या स्थलाच्या संदर्भाने असलेली कागदपत्रे प्राप्त करणे सोयीचे ठरेल. इतिहासावरील संशोधन हे विशिष्ट देश, राज्य किंवा प्रांत, विशिष्ट भाषिक गट आणि एकाच वांशिक लोकसंख्येपुरते मर्यादित असते. भारताचा इतिहास, जर्मनीचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास अशा पद्धतीने इतिहासामध्ये संशोधन केले जाऊ शकते.

संशोधक विद्यार्थी जेव्हा एखाद्या प्रदेशाशी अथवा भागाशी निगडित इतिहास संशोधन करतो तेव्हा तो त्याच्या राष्ट्राच्या इतिहासामध्ये बहुमोल योगदान देतो. त्याच्या या ऐतिहासिक संशोधन विषयाच्या अभ्यासांती आलेल्या निष्कर्षांचा उपयोग एखाद्या विशिष्ट गावाचा, शहराचा, एखाद्या परिसराचा किंवा प्रदेशाचा विकास शोधण्यासाठी, स्थानिक सरकारचे एकक म्हणून त्याची प्रगती अधोरेखित करण्यासाठी केला जाऊ शकतो. दुसरं म्हणजे शेजारच्या परिसरात कोणत्या राष्ट्रीय महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत हे शोधून काढू शकतो आणि त्यांच्या वर्णनासाठी थोडा वेळ देऊ शकतो. तिसरे म्हणजे एका विशिष्ट जिल्ह्यात नेमके काय घडले, याचा संदर्भ देऊन आपण आपला मोठा राष्ट्रीय इतिहास स्पष्ट करू शकतो.

जर तुमच्या विषयामध्ये तुम्हास मौलिकता आणावयाची असेल तर तुम्ही स्थल मर्यादा घातल्याने त्या विशिष्ट स्थलाची सखोलरित्या संदर्भ साधने प्राप्त करून आपण त्याचे विश्लेषण करू शकतो. विषयास स्थल मर्यादा असल्याने त्या विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असणाऱ्या संदर्भ साधनांच्या आधारे तो विषय परिभाषित करणे संशोधक विद्यार्थ्यास सोयीचे जाते. संशोधन करत असताना तुमच्या संशोधनाचे क्षेत्रफळ जेवढे लहान असेल तेवढ्या जास्त प्रमाणात तुमचे लक्ष त्याच्यावर केंद्रित होऊ शकेल. उदाहरणार्थ संशोधन विषय घेत असताना संशोधक विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारताचा इतिहास हा विषय संशोधनाकरिता निवडला तर संशोधक विद्यार्थ्यास भारताच्या उत्तरेकडील जम्मू काश्मीर राज्यापासून दक्षिणेस केरळ राज्यापर्यंत व पश्चिमेस महाराष्ट्रापासून पूर्वेकडील मणिपूर, मिझोराम, नागालँड या राज्यांपर्यंत विविध ठिकाणी विविध वेळी झालेल्या राजकीय घडामोडी, त्या राजकीय घडामोडींचे झालेले परिणाम राजकीय

व्यक्तिमत्व त्यांचे कार्यकर्तृत्व इत्यादी सर्व सर्व घटकांचा एकत्रित अभ्यास करणे गरजेचे आहे हे करणे त्या संशोधक विद्यार्थ्यास फार अडचणीचे ठरते. याउलट यापूर्वी उदाहरणादाखल घेतलेल्या विषयाचे याच दृष्टिकोनातून विश्लेषण केले असता आपल्या, ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' या विषयांमध्ये भारत देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्यातील सातारा या जिल्ह्याचा आपणास राजकीय अभ्यास पाहावयाचा झाल्यास यामध्ये संशोधक विद्यार्थी सातारा जिल्ह्यातील ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदार तसेच खासदार या सर्व बाबींचा सखोलरित्या अभ्यास करू शकतो. या सर्व ग्राम स्वराज्य संस्थांमध्ये तसेच विधानसभा व लोकसभेच्या झालेल्या निवडणुका, या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने चर्चेला आलेले विशेष मुद्दे, विजयी झालेल्या उमेदवारांनी पाच वर्षात केलेले कार्य याचप्रमाणे त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दी बाबत संशोधक विद्यार्थी सखोल अभ्यास करून त्याचे विश्लेषण मांडू शकतो. याचे कारण म्हणजे जर संपूर्ण भारत देशाची राजकीय वाटचाल अभ्यासण्यास आरंभ केला तर कोणत्याही संशोधकास जम्मू काश्मीर पासून केरळ पर्यंतच्या फक्त सर्व विधानसभा आणि लोकसभा यांचा अभ्यास करणे जिकीरीचे जाईल मग ग्राम स्वराज्य संस्थांमधील राजकीय बाबींचा अभ्यास करणे तर दूरच राहील याचाच अर्थ असा होतो की, संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनासाठी विषय निवडत असताना त्या विषयास स्थल मर्यादा दिली असता तो त्या स्थल मर्यादेमध्ये अत्यंत उत्कृष्ट संशोधन करू शकेल अन्यथा त्याचे संशोधन एक तर पूर्ण होणार नाही, त्यात मौलिकता येणार नाही.

**अभ्यास क्षेत्राच्या कालीक मर्यादा**

संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाचा कालखंड निश्चित करणे गरजेचे आहे. हा कालखंड निश्चित करताना त्याने आपल्या संशोधन विषयाचा आरंभबिंदू आणि अंतिमबिंदू नक्की करावा. संशोधक विद्यार्थी ज्या कालखंडाचा अभ्यास आपल्या विषयात करीत आहे त्या काळातील राजकीय आर्थिक धार्मिक सामाजिक अशा सर्व क्षेत्रातील बाबी त्याला तपासाव्या लागतात. हे करत असताना संशोधकाला अभ्यासाकरिता निवडलेल्या विषयाच्या कालखंडाचा व त्यातील महत्त्वपूर्ण घटना आणि तथ्यांची निवड करावी लागते. त्या घटना व तथ्यांमुळे निर्माण झालेल्या प्रभाव मूल्यांचे स्थान ठरवावे लागते त्याकरिता त्यास घटनांचे विश्लेषण करावे लागते. या काळातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक व या कालखंडातील नेतृत्व या सर्व बाबी तपासणे महत्त्वाचे आहे. कोणतीही घटना घडत असताना त्या घटनेची मूळ असणारी कारणे व तात्कालीक कारण या दोन्ही बाबींचा शोध घेणे गरजेचे आहे. हे करत असताना संशोधकाला अभ्यासाकरिता निवडलेल्या विषयाच्या कालखंडाचा व त्यातील महत्त्वपूर्ण घटना आणि तथ्यांची निवड करावी लागते. त्या घटना व तथ्यांमुळे निर्माण झालेल्या प्रभाव मूल्यांचे स्थान ठरवावे लागते त्याकरिता त्यास घटनांचे विश्लेषण करावे लागते.

इतिहास संशोधकास त्याच्या विषयाच्या संदर्भाने कालक्रमाची माहिती असणे आवश्यक असते. इतिहास भूतकाळातल्या घटना कधी घडल्या आणि दोन घटनांमध्ये किती काळाचे अंतर होते हे निश्चित करते त्यामुळे संशोधन करत असताना प्रत्येक घटनेची सुसंगती लावून योग्य क्रमाने घटना दिल्या नाही तर

त्या लेखनास ऐतिहासिक महत्त्व राहत नाही. सुप्रसिद्ध भारतीय इतिहासकार निळकंठ शास्त्री यांच्या मते, Chronology is the eye of history. घटनांना कार्यक्रम नसल्यास त्यांना अर्थ उरत नाही. काल विपर्यास दोष निर्माण होतो व त्यातून अनेक मतभेद निर्माण होतात.

इतिहासाचा संशोधक विद्यार्थी आपला विषय कालखंडाच्या मर्यादेत बांधत असताना त्यास अनेक पद्धतीने विषय तयार करता येतो.उदा. मानवी प्रगती वा परागतीच्या अनुषंगाने विषय निवडत असताना ठराविक दशकांमध्ये कोणत्या घडामोडी झाल्या हे त्यास मांडता येऊ शकते. संशोधक विद्यार्थी आपला विषय प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक, समकालीन अशा कोणत्याही कालखंडातील घेऊ शकतो त्याचप्रमाणे राज्यक्रांती वा राजवटी लक्षात घेऊन, कर्तृत्ववान व्यक्तींचा प्रभाव लक्षात घेऊन, उत्पादन संबंधातील परिवर्तनाचे संदर्भबिंदू लक्षात घेऊन कालखंड ठरविता येतात. उदाहरणार्थ, सरंजामशाहीचा कालखंड, भांडवलशाहीचा कालखंड, जागतिकीकरण व उदारिकरणाचा कालखंड, महायुद्धोत्तर कालखंड, शीतयुद्धाचा कालखंड, शितयुद्धोत्तर कालखंड अशी कालखंडांची गुणविशेषात्मक सीमारेषा ठरविता येते. राजवटींनुसार यादव काल, बहामनीकाला, शिवकाल, पेशवे काल, ब्रिटिश वसाहतीचा काळ, स्वातंत्र्योत्तर काळ अशी कालखंडरचना करता येते. नेतृत्वगुणांनुसारही कालखंडनिश्चिती करता येते. उदाहरणार्थ, टिळक पर्व, गांधी युग, नेहरू युग, असे कालखंड ठरविता येतात. कर्तृत्ववान व्यक्तींचा दृष्टिकोन, मूल्याधार, प्राधान्यक्रम, संगती-विसंगतींची दखल घेऊन कालखंडाचे आकलन करावे लागते. मात्र आपल्या विषयाचा कालखंड निश्चित करत असताना संशोधकाने प्रारंभबिंदू आणि अंतिम बिंदू नक्की करावा. या कालखंडाच्या दोन्ही बिंदू मधील घटनाघडामोडींची क्रमवारी, त्यांतला कार्यकारण संबंध, प्रभाव वा प्रतिसादांची मात्रा लक्षात घेऊन आपल्या संशोधन विषयाची मांडणी करावी. परंतु हे करत असताना जर कालखंडाची मर्यादा अतिशय मोठी घेतली तर ज्याप्रमाणे स्थलमर्यादेच्या नियमांना तोडून विषयाचा आवाका जास्त घेतला म्हणजे संशोधन कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो त्याचप्रमाणे कालखंडाचा आवाकाही जास्त मोठा घेतल्यास त्याचा संशोधन कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास आधुनिक भारताचा इतिहास असा विषय संशोधक विद्यार्थ्यांनी घेतल्यास प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत भारतामध्ये घडलेल्या सर्व घटनांचे विश्लेषण आपल्या संशोधन अहवालात सखोलरित्या मांडता येणार नाहीत. आधुनिक भारताच्या इतिहासाची सुरुवात ब्रिटिश कालखंडापासून होते तिथपासून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची भारताची विकासाची माहिती संशोधकास आपल्या संशोधन अहवालात मांडावी लागेल. यामध्ये ब्रिटिशकालीन राजकीय घडामोडी व स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय घडामोडी, ब्रिटिशकालीन भारताची आर्थिक शोषण होणारी परिस्थिती व स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक विकासाच्या सर्व योजना, ब्रिटिश काळातील ब्रिटिश सरकारचे दबाव तंत्र व स्वातंत्र्योत्तर काळातील भारत सरकारची नीती, ब्रिटिश कालीन सामाजिक परिस्थिती व स्वातंत्र्यानंतरची भारतातील सामाजिक परिस्थिती या व अशा इतर सर्व बाबींना संशोधकाने सखोल अभ्यासणे फार अवघड बाब आहे. याउलट जेव्हा आपण उदाहरणादाखल घेतलेल्या या ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' विषयाची कालखंडाच्या बाबतीत चर्चा केली जाईल तेव्हा हा कालखंड अवघा चाळीस वर्षांचा

असल्याने स्वातंत्र्योत्तरकालीन सातारा जिल्ह्यामध्ये या कालखंडातील घडलेल्या सर्व राजकीय उलथापालती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक विकास, सांस्कृतिक बदल अगदी बारकाईने त्यास आपल्या संशोधन अहवालात रेखाटता येऊ शकतात.

### १.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न

१. संशोधन करत असताना तुमच्या संशोधनाचे ......... जेवढे लहान असेल तेवढ्या जास्त प्रमाणात तुमचे लक्ष त्याच्यावर केंद्रित होऊ शकेल.

अ) संशोधन अभ्यास   ब) संशोधन विचार

क) संशोधनाचे क्षेत्रफळ   ड) संशोधनाचे मार्गदर्शक

२. संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनासाठी विषय निवडत असताना त्या विषयास ......... दिली असता तो त्या मर्यादेमध्ये अत्यंत उत्कृष्ट संशोधन करू शकेल.

अ) आर्थिक मागणी   ब) लेखन मर्यादा   क) सामाजिक मागणी   ड) स्थल मर्यादा

३. संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाचा ......... निश्चित करताना त्याने आपल्या संशोधन विषयाचा आरंभबिंदू आणि अंतिमबिंदू नक्की करावा.

अ) आर्थिक   ब) राजकीय   क) कालखंड   ड) सामाजिक

४. परिवर्तनाचे संदर्भबिंदू लक्षात घेऊन ......... ठरविता येतात.

अ) कालखंड   ब) लेखन   क) संशोधन विचार   ड) यापैकी नाही

५. ......... यांच्या मते, Chronology is the eye of history.

अ) इरफान हबीब   ब) निळकंठ शास्त्री   क) जी. एस. सरदेसाई ड) प्रो. ई. एच. कार

### १.२.३ संदर्भ साहित्याचा आढावा (Review of literature)

संशोधक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष संशोधन सुरू करण्यापूर्वी आपल्या विषयाच्या निगडित असलेल्या संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. दर्जेदार संशोधनाकरिता संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या संदर्भाने असलेल्या संशोधन साहित्याचा व्यापक आढावा घ्यावा. या प्रक्रियेमध्ये संशोधक विद्यार्थ्यांनी उपलब्ध साहित्याकरिता विस्तृत असे सर्वेक्षण करावे. कोणत्याही आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय किंवा इतर विषयाच्या संदर्भाने मुबलक साहित्य उपलब्ध असते त्याचा वापर संशोधकाने आपल्या विषयाच्या अनुषंगाने असलेल्या संदर्भ साहित्याच्या पुनरावलोकनामध्ये करावा.

संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या अनुषंगाने संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करणे हा त्याच्या संशोधनाचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे. हे संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन संशोधक ज्या विषयावर संशोधन करणार आहे त्या त्या विषयाच्या अनुषंगाने जे जे संशोधन झालेले आहे त्याची माहिती संशोधकास देते. संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन केल्याने संशोधकास या संशोधनाचा नवा अर्थ देखील प्राप्त होऊ शकतो

किंवा या विषयावर असलेल्या सर्व वादविवादांसह त्या क्षेत्रातील आजपर्यंत झालेली प्रगती लक्षात येऊ शकते. या आढाव्यातून स्त्रोतांचे मूल्यमापन होऊ शकते व त्या स्त्रोतांमध्ये असलेल्या माहितीबद्दल समर्पक विचार समोर येऊ शकतो.

**संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करण्याची गरज काय आहे?**

संशोधन करत असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर त्यास आपल्या विषयाशी संबंधित साहित्य कोणते आहे व त्याची जुळवाजुळव करणे शक्य होते. संबंधित साहित्याच्या पुनरावलोकना नंतर त्या विषयातील आजपर्यंतच्या कामकाजाची माहिती त्यास प्राप्त होते. पूर्वी झालेल्या संशोधनातील समानता व विरोधाभास संशोधकास ज्ञात होते. ज्या विषयावर आपण संशोधन करणार आहे त्या विषयावर झालेल्या सर्व संशोधनाची त्यास माहिती झाल्यामुळे संशोधनाच्या पुनरावृत्तीची भीती उरत नाही उलट झालेल्या संशोधनाचा आधार घेऊन आपल्या संशोधन विषयाची पार्श्वभूमी तयार करणे त्यास सहज शक्य होते. आजवर झालेल्या संशोधनाअंती संशोधकांनी पुढे कोणते संशोधन करणे अपेक्षित आहे हे सूचित केलेले असते त्याची माहिती संशोधक विद्यार्थ्यास प्राप्त होते.

**संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करावयाचे साहित्य**

संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करत असताना किती आणि कोणते संदर्भ साहित्य या पुनरावलोकन प्रक्रियेमध्ये समाविष्ट करायचे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. याबद्दल कोणताही नियम नाही. परंतु संशोधक विद्यार्थ्यांनी या विषयाच्या संदर्भाने असलेले उत्कृष्ट आणि अग्रगण्य साहित्य निश्चितपणे या प्रक्रियेत समाविष्ट केले पाहिजे. याशिवाय संशोधक विद्यार्थ्यांनी अलीकडे विशेषत: गेल्या ५ ते १० वर्षांत प्रकाशित झालेल्या सर्व संबंधित संशोधन कार्यांचाही यामध्ये समावेश करावा. संदर्भ साहित्याच्या पुनरावलोकनासाठी संशोधक विद्यार्थ्याने जर्नल मध्ये छापले गेलेले लेख, मोनोग्राफ, दस्तऐवज, अप्रकाशित दस्तऐवज किंवा काही अधिवेशन व सेमिनार मध्ये वाचलेले शोधनिबंध इत्यादींचा समावेश करावा. याशिवाय इंटरनेट हे एक महत्त्वाचे संदर्भ साधन आहे आहे जिथून संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करण्याकरिता लेख आणि गोषवारा प्राप्त केले जाऊ शकतात. वर नमूद केल्याप्रमाणे सर्व संदर्भ साहित्य वेगवेगळ्या स्त्रोतांकडून गोळा केल्यावर, संशोधक विद्यार्थ्यांनी प्रकाशनाच्या वर्षानुसार ते व्यवस्थित केले पाहिजे आणि सध्याच्या संशोधनाचा विषय लक्षात घेऊन एकत्रित केलेल्या संपूर्ण साहित्याला अर्थ देण्यासाठी विषयाची मांडणी करणे आवश्यक आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी संबंधित संदर्भ साहित्याकरिता त्याच्या संशोधकांनी वापरलेल्या इतिहास लेखन पद्धती, संशोधनाचे निष्कर्ष इत्यादींच्या आधारे या सामग्रीचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे.

हे संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करत असताना या संदर्भ साहित्यामध्ये कोणत्या सकारात्मक बाबी व कोणत्या नकारात्मक बाबी आहेत याचे मूल्यमापन केले जाते व संशोधक त्या साहित्यासंदर्भात अंतिम निष्कर्ष काढतो यास मूल्यमापन पुनरावलोकन म्हणतात. अन्वेषण पुनरावलोकनामध्ये यासंदर्भात साहित्यातील आपल्या विषयासंदर्भाने उपयुक्त बाबींचा शोध घेतला जातो. साधनात्मक पुनरावलोकन करत असताना यासंदर्भात साहित्यातून आपल्या संशोधनाकरिता कोणती उपयुक्त तंत्र मिळतील याची माहिती

घेतली जाते तर पद्धतशीर पुनरावलोकन करत असताना आपल्या विषयाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे या संदर्भ साहित्यामध्ये प्राप्त होतात काय? किंवा उत्तरे प्राप्त करण्याकरिता कोणते मार्ग मिळतात काय? याची माहिती घेतली जाते.

**संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करण्याकरिता किती जुने साहित्य वापरावे?**

संशोधक विद्यार्थ्यांना संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करण्याकरिता किती जुने साहित्य वापरावे? हा एक मोठा प्रश्न पडतो. परंतु याचे सोपे उत्तर आहे ते म्हणजे आपल्या विषयाच्या अनुषंगाने आपणास जेवढे जास्त संदर्भ साहित्य उपलब्ध होत आहे ते किती जुने अथवा किती नवीन आहे याकडे न पाहता प्राप्त झालेल्या सर्व संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करावे. कारण कितीतरी असे विषय आहेत की काही दशकापूर्वी अथवा शतकापूर्वी या विषयावर अत्यंत मौलिक असे कार्य झालेले आहे. उदाहरणार्थ शिवकालीन इतिहासावर संशोधन करू इच्छित असलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी न्या. म. गो. रानडे, सेतूमाधवराव पगडी, वि. का. राजवाडे, वा. सी. बेंद्रे, जदुनाथ सरकार, अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे यासारख्या इतिहासकारांनी लिहिलेले संदर्भ ग्रंथ वाचणे गरजेचे आहेच परंतु या वाचनाने त्या संशोधक विद्यार्थ्यास आपल्या संशोधन विषयावर अनेक नवी माहिती प्राप्त होऊ शकेल. फक्त ज्यावेळी अतिशय जुने संदर्भ ग्रंथ संशोधक विद्यार्थी पुनरावलोकित करत असेल त्यावेळी त्याने नेहमी सावधगिरी बाळगली पाहिजे कारण काही वेळेस फार जुन्या संदर्भ ग्रंथांमध्ये मांडलेले सिद्धांत पुढील काळात काही वेळेस खोडून काढले गेले असतील तर त्याचीही माहिती आपण घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन प्रक्रिया**

संदर्भ साहित्याच्या आढावा घेत असताना संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या संदर्भाने उपलब्ध संदर्भ साहित्याचा शोध घ्यावा. तदनंतर त्याने त्या संदर्भ साहित्याचे मूल्यमापन करावे आणि त्यातून आपल्या विषयासंदर्भात असलेले स्त्रोत शोधावेत. यानंतर संदर्भ साहित्यात आपल्या विषयाच्या अनुषंगाने असलेला मुख्य आशय कोणता आहे याची निश्चिती करावी. आराखडा तयार करून प्राप्त झालेल्या संदर्भ साधनाचा आढावा लिहावा. ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' या विषयाच्या अनुषंगाने

संदर्भ साहित्य: या अभ्यास क्षेत्राशी संबंधित अनेक संशोधकांनी आपले संशोधन केलेले आहे. डॉ. राजश्री निकम यांनी शिवाजी विद्यापीठात 'कराड नगरपालिकेचा इतिहास' या विषयावर संशोधन केले आहे. प्रा. डॉ. अनिल जगताप यांनी दलित चळवळींवर संशोधन केले आहे. सन २०११ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रा. डॉ. अभय पाटील यांनी 'कराडचा इतिहास' या विषयावर संशोधन केले आहे. 'सातारचे प्रतिसरकार' या विषयावर प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे यांनी संशोधन केले आहे. त्याचप्रमाणे सातारच्या सत्यशोधक चळवळींवर अभ्यास झाला आहे. असे मुख्यत्वे संशोधन झालेले दिसून येते.

**संदर्भ साहित्याचे मूल्यमापन :** स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झालेल्या राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास आजवर खूप संशोधकांनी केला आहे. आजवर बऱ्याच संशोधकांनी दलित चळवळींचा अभ्यास केलेला आहे परंतु हे सर्व काम सन १९५० पूर्वीचे आहे.

**मुख्य आशय :** सन १९६० ते सन २००० हा कालखंड सर्व दृष्टीने महत्वपूर्ण आहे. पुढच्या काळातील विकासाची बीजे याच काळात रूजली गेली. राज्य पातळीवरचा अभ्यास करताना स्थानिक पातळीवरचे राजकारण समजून घेणे आवश्यक आहे. यातूनच स्थानिक पातळीवरील संदर्भ लक्षात येतात. घडलेल्या घटनांची गुंतागुंत समजून येते. केवळ राजकीय चळवळीपुरतीच ही बाब मर्यादित न राहता त्याचा प्रभाव आर्थिक, शेती, व्यापार व औद्योगिक अशा सर्वच बाबींवर होतो.

**संदर्भ साहित्याचा आढावा :** संदर्भ साहित्याच्या आढाव्याचे घटक पुढीलप्रमाणे आहेत. (१) शीर्षक (२) लेखकांची यादी (३) सार (Abstract) (४) प्रस्तावना (५) सामग्री आणि पद्धती (६) पुनरावलोकन लेखाचा मुख्य भाग (७) निष्कर्ष (८) संदर्भ.

संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन विविध स्वरूपांनी संशोधकाची मदत करते. संशोधन विद्यार्थी संशोधन सुरू करत असताना त्यास त्याच्या विषयातील घटक आणि त्या घटकांचा त्याच्या विषयाशी असलेला अंतर संबंध ज्ञात असेलच असे नसते. ज्यावेळी तो संशोधक विद्यार्थी संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करतो त्यावेळी त्यास विविध अंगी वाचन चिंतन करावे लागत असल्याने संशोधन विषयाच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ ज्ञान त्यास मिळत जाते. या विषयातील विविध तथ्ये, नियम आणि सिद्धांताची ओळख त्यास आपोआप होऊन जाते. या सर्व वाचनामुळे त्या संशोधक विद्यार्थ्यास आपल्या विषयाच्या अभ्यासाकरिता योग्य दिशा प्राप्त होते आणि भविष्यात त्याकडून होणाऱ्या चुका टाळल्या जातात.

**१.२.३ स्वयं अध्ययन प्रश्न**

१. संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या अनुषंगाने संदर्भ साहित्याचे ……… करणे हा त्याच्या संशोधनाचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

अ) समानता　ब) पुनरावलोकन　क) लेखन　ड) मागणी

२. पूर्वी झालेल्या संशोधनातील समानता व विरोधाभास संशोधकास ……… केल्याने ज्ञात होते.

अ) संशोधन विचार　ब) संशोधन अभ्यास

क) प्रभाव मूल्य ठरवल्याने　ड) पुनरावलोकन

३. संदर्भ साहित्य जुने अथवा किती नवीन आहे याकडे न पाहता प्राप्त झालेल्या ……… संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करावे.

अ) निवडक　ब) थोडेसे　क) अर्ध्या　ड) सर्व

४. संदर्भ साहित्यात आपल्या विषयाच्या अनुषंगाने असलेला ......... कोणता आहे याची निश्चिती करावी.

अ) मुख्य आशय ब) आर्थिक फायदा क) अनावश्यक विचार ड) भाषा

५. संशोधक विद्यार्थी संदर्भ साहित्याचे पुनरावलोकन करतो त्यावेळी संशोधन विषयाच्या दृष्टीने ......... मिळत जाते.

अ) चुकीचा मार्ग ब) वस्तुनिष्ठ ज्ञान क) काहीच नाही ड) यापैकी नाही

### **१.२.४ उद्दिष्टे व पद्धती** (Objectives and methodologies)

संशोधनातील समस्येचे उत्तर शोधण्यासाठी करावयाच्या प्रयत्नाला /कार्यपद्धतीला योग्य दिशा देण्याचे काम उद्दिष्टे करत असतात. समस्येच्या संभाव्य उत्तराकडे जाण्यासाठी घ्यावयाच्या टप्प्यांचा किंवा प्रश्नांचा विचार उद्दिष्टे लिहिताना करावा लागतो. संशोधनात कशाचा अभ्यास करावयाचा आहे, तो नेमका कसा करणार आहे व त्यामुळे काय साध्य होणार आहे या प्रश्नांची उत्तरे म्हणजेच संशोधनाची उद्दिष्टे.

शास्त्रीय पध्दतीने एखाद्या समस्येच्या उत्तराचा शोध घेणे हा संशोधनाचा हेतू असतो. आजपर्यंत ज्या गोष्टीचा शोध लागलेला नाही आणि जी गोष्ट शोधणे कठीण आहे, त्यामागील सत्याचा शोध घेणे हे संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तथापि प्रत्येक संशोधन अभ्यासाचे स्वतःचे एक शास्त्रीय उद्दिष्ट असते म्हणजे प्रत्येक संशोधनाचे हेतू वेगवेगळे असले तरी काही प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. अस्तित्वात असणारे सिध्दांत व तथ्ये यांची पडताळणी करणे व चाचणी करणे.

२. सत्याचा शोध घेणे व अचूक निर्णय घेण्यास मदत करणे.

३. संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधीची माहिती संकलित करणे, त्यातील घटना, कारणे, परिणाम यांचे पृथ:करण करणे.

४. तत्त्वे व संकल्पनांचे सामान्यीकरण करून भविष्यकालीन अंदाज बांधणे आणि मार्गदर्शन करणे.

५. घडणाऱ्या घटनांची कारणमीमांसा करणे व मानवी व्यवहारासंबंधी सार्वत्रिक सिध्दांत मांडणे.

६. भौगोलिक घटनांचे कारण व परिणाम संबंधातील सुसंबद्ध अभ्यास

७. चालू सिध्दांताच्या संदर्भात गोंधळ असेल, वाद असेल तर त्याचे निराकरण करणे.

८. संशोधनाचा व्यावहारिक उपयोग दाखवून देणे.

९. पर्यावरण व मानवी जीवन यांच्यातील सहसंबंध कार्यकारणभाव अभ्यासणे.

१०. भौगोलिक समस्या समजून घेणे, त्या शास्त्रीय पध्दतीने निष्कर्ष काढणे व योग्य अशा शिफारसी करणे

**संशोधनाची उद्दिष्टे काय आहेत? प्रकार, उदाहरणे आणि ते कसे लिहायचे?**

अचूक आणि सु-परिभाषित संशोधन उद्दिष्टे कोणत्याही यशस्वी संशोधन प्रकल्पाचा पाया घालतात. ही उद्दिष्टे दिशादर्शकाचे काम करतात, संशोधकांना त्यांच्या संशोधन प्रवासात कोणत्या मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे यावर मार्गदर्शन करतात. उद्दिष्टे संशोधकांना संशोधनाची स्पष्टता प्रदान करतात, विस्तृत असणाऱ्या संशोधन क्षेत्रातील त्यांच्या संशोधन प्रश्नाच्या संदर्भाने केंद्रीकृत करण्याचे काम करतात. अर्थात ही उद्दिष्टे एका केंद्रित आणि प्रभावी संशोधन प्रक्रियेस एक स्पष्ट, निःसंदिग्ध दिशा प्रदान करतात व ही प्रक्रिया सुलभ करण्याचे काम करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे काय आहेत?**

संशोधनाची उद्दिष्टे ही त्याच्या अभ्यास विषयाच्या दृष्टीने विशिष्ट व त्यास प्राप्त करता येण्यासारखी असतात. ही उद्दिष्टे संशोधक त्याच्या अभ्यासातून साध्य करण्याचे प्रयत्न करीत असतो. उद्दिष्टे संशोधकाला त्याच्या अभ्यासाच्या दिशेने जाण्याचे मार्गदर्शन करतात आवश्यक असणारे संदर्भ साधने निर्धारित करतात तसेच या संदर्भ साधनांच्या विश्लेषणाकरिता वापरण्यास योग्य असलेल्या विश्लेषणाच्या पद्धती कोणत्या आहेत याचे मार्गदर्शन करतात. याचाच अर्थ असा होतो की संशोधकाला त्याच्या एकूण संशोधनाच्या पूर्णत्वाकडे नेण्याचे कार्य उद्दिष्टे करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे का महत्त्वाची आहेत?**

संशोधन उद्दिष्टांची निर्मिती ही संशोधन प्रक्रियेतील एक महत्त्वाची प्रारंभिक पायरी आहे. हे केवळ अभ्यासाला स्पष्ट दिशा देत नाही तर संशोधनाची एकूण कार्यक्षमता आणि परिणामकारकता देते. संशोधनाची उद्दिष्टे का महत्त्वाची आहेत याची काही कारणे:

स्पष्टता : संशोधनाचे उद्दिष्ट काय साध्य करायचे आहे याची स्पष्ट समज देते.

लक्ष केंद्रित: ते अभ्यासाची व्याप्ती परिभाषित करून संशोधनावर लक्ष केंद्रित करण्यात मदत करतात.

व्यवहार्यता: अभ्यासाचे छोट्या, साध्य करण्यायोग्य कार्यांमध्ये विभाजन करून ते संशोधन व्यवस्थापित करण्यायोग्य असल्याची खात्री करतात.

मूल्यमापन: ते मोजता येण्याजोगे उद्दिष्टे प्रदान करून संशोधन प्रक्रियेचे आणि परिणामांचे मूल्यांकन करण्यास परवानगी देतात.

**संशोधन उद्दिष्टे कशी लिहायची?**

संशोधन उद्दिष्टे विकसित करण्यासाठी, काही प्रमुख पायऱ्यांचे अनुसरण करणे महत्त्वाचे आहे

**१. आपल्या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट सांगणे करिता :**

संशोधनाची उद्दिष्टे तुमच्या अभ्यासाची व्यापकता आणि किंवा महत्वाकांक्षा यांची माहिती देतात. तुम्ही तुमच्या संशोधनातून काय साध्य करू इच्छिता आणि आपले संशोधन पूर्ण झाल्यानंतर अपेक्षित

परिणामांचे विस्तृत विहंगावलोकन दर्शवतात. तुमच्या संशोधनाची दिशा ठरवणे आणि तुमच्या अभ्यासाला सुरुवातीपासून शेवटपर्यंत मार्गदर्शन करणारा आराखडा तयार करणे हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे

**२. विशिष्ट संशोधन उद्दिष्टे काय आहेत?**

ज्यावेळी संशोधक एका विशिष्ट संशोधन उद्दिष्टाची मांडणी करतो त्यावेळी तो त्याच्या एकूण संशोधनातून प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टांचे विभाजन छोट्या छोट्या भागात करून अंतिम संशोधनाच्या दिशेने जाण्याचा प्रवास सुकर करतो. ही लहान उद्दिष्टे संशोधकास लवकरात लवकर साध्य होण्याजोगी असतात. व या संशोधनातून उद्दिष्टांच्या विशिष्ट भागावर लक्ष केंद्रित केले गेल्यामुळे ते साध्य करण्यासाठी एक स्पष्ट मार्ग निर्माण करतात.

**३. आपली संशोधनाची उद्दिष्टे आणि उद्दिष्टे कशी तयार करावीत?**

तुमच्या संशोधनाचे उद्देश आणि उद्दिष्टे तयार करणे हे यशस्वी संशोधन प्रकल्प करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामध्ये संशोधकाने निवडलेल्या विषयाची स्पष्ट, संक्षिप्त मांडणी केल्यामुळे संशोधन विषयाच्या अभ्यासाच्या उद्देशाची रूपरेषा स्पष्टपणे दर्शवली जाते. या उद्दिष्टांमुळे संशोधकाला आपले संशोधन भविष्यात कसे पुढे जाणार आहे याचा अंदाज देतात. संशोधकाने मांडलेले प्रत्येक उद्दिष्ट संशोधन उद्दिष्टाच्या एका विशिष्ट पैलूवर लक्ष केंद्रित करते, त्यामुळे संदर्भ साहित्याचे संकलन, त्याचे परीक्षण आणि विश्लेषण यासह अभ्यासाच्या विविध टप्प्यांवर मार्गदर्शन करते.

**४. संशोधन उद्दिष्टे कशी विकसित करावीत?**

संशोधन विषयाची निश्चित ध्येय काय आहेत व ती साध्य करण्याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी कोणत्या याची माहिती उद्दिष्टे देत असतात. संशोधन उद्दिष्टे तयार करताना, ते SMART – Specific, Measurable, Achievable, Relevant, and Time-bound. विशिष्ट, मोजता येण्याजोगे, साध्य करण्यायोग्य, संबंधित आणि कालबद्ध आहेत याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. या सर्व बाबी संशोधकाला त्यांच्या अभ्यासासाठी स्पष्ट आराखडा विकसित करण्यात मार्गदर्शन करण्यास मदत करतात.

विशिष्ट: संशोधनाची उद्दिष्टे अचूक आणि केंद्रित असावीत. त्यांनी अभ्यासाचा उद्देश स्पष्टपणे परिभाषित केला पाहिजे, ज्यामध्ये कशाचा अभ्यास करायचा आहे आणि का अभ्यास करावयाचा आहे याची स्पष्टता असणे गरजेचे आहे.

प्रगती मोजण्यासाठी: संशोधन उद्दिष्टे तुम्हाला तुमची प्रगती मोजण्यासाठी आणि तुमची संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या मार्गावर आहात की नाही याचे मूल्यांकन करण्याचा मार्ग प्रदान केला पाहिजे.

साध्य करता येण्याजोगे: अभ्यासाची उद्दिष्टे उपलब्ध संसाधने आणि संशोधकाची कौशल्ये वास्तविकपणे प्रतिबिंबित करतात.

संबंधित: संशोधनाच्या प्रश्नांची आणि गृहितकांची उत्तरे देण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टे संबंधित असली पाहिजेत, अभ्यासात असलेल्या समस्येचे निराकरण करण्यात ही उद्दिष्टे मदत करतात.

कालबद्ध: संशोधनाच्या उद्दिष्टांची अंतिम मुदत असणे आवश्यक आहे जेणेकरुन तुम्ही वेळेनुसार प्रगती आणि यशाचे अचूक मोजमाप करू शकता.

**५. संशोधनाची उद्दिष्टे तुमचा अभ्यास कसा केंद्रित करतात?**

संशोधनाची उद्दिष्टे संशोधनास स्पष्ट दिशा आणि चौकट प्रदान करून संशोधकाचे अभ्यासावर लक्ष केंद्रित करतात. ते दिशादर्शक म्हणून काम करतात, संशोधकाची संशोधन पद्धती, विश्लेषण आणि अंतिम निष्कर्ष यांचे मार्गदर्शन करतात. ही उद्दिष्टे तुम्हाला संशोधनाच्या दिशेने वाटचाल करण्यास, संशोधनाच्या उद्दिष्टांपासून विचलित होण्यास प्रतिबंध करण्यात आणि तुमच्या संशोधन समस्येच्या सर्व प्रमुख पैलूंकडे लक्ष देण्याची खात्री करण्यात मदत करतात.

**संशोधन उद्दिष्टे लिहिण्यासाठी काही महत्त्वपूर्ण बाबी :**

संशोधन उद्दिष्टे लिहिणे एक कठीण काम असू शकते, परंतु काही ही प्रक्रिया सुलभ करू शकतात. संशोधन करताना संशोधनाची उद्दिष्टे लिहिण्याच्या काही सर्वोत्तम पद्धती पाहूया :

**१. स्पष्ट हेतू स्थापित करा :** संशोधन उद्दिष्टांचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्याआधी, संशोधन प्रकल्पाचे प्राथमिक उद्दिष्ट आणि हेतू स्पष्टपणे समजून घेणे महत्त्वाचे आहे. हे सुनिश्चित करण्यात मदत करेल की संशोधन प्रश्न योग्य विषयावर केंद्रित आहेत आणि संदर्भ साहित्य संकलन आणि विश्लेषणाद्वारे त्यांची उत्तरे दिली जाऊ शकतात.

**२. लहान विशिष्ट उद्दिष्टांमध्ये विभागणी करा :** उद्दिष्टांचे लहान विशिष्ट उद्दिष्टांमध्ये विभाजन केल्याने संशोधनाच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करण्यात मदत होते आणि सर्व संबंधित माहिती एकत्रित केली जाते याची खात्री करता येते. यामुळे संशोधनाचे मूल्यांकन करणे देखील सोपे होईल, कारण प्रत्येक विशिष्ट उद्दिष्टाचा त्याच्या गुणवत्तेवर न्याय केला जाऊ शकतो.

**३. संक्षिप्त मांडणी करा :** संशोधनाची उद्दिष्टे अचूक आणि संक्षिप्त असावीत. लांबलचक विधाने गोंधळात टाकणारी आणि संशोधनाच्या निश्चित ध्येयापासून दूर करू शकतात. प्रत्येक उद्दिष्ट फक्त एका वाक्यात ठेवा जे संशोधनाचे उद्देश दर्शवते.

**४. मोजता येण्याजोग्या परिणामांवर लक्ष केंद्रित करा :** संशोधन उद्दिष्टे लिहिताना, ते काही प्रकारे मोजले जाऊ शकतात याची खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरून संशोधनाचे मूल्यांकन केले जाऊ शकते. यामध्ये संशोधनातील सर्व बाबी समाविष्ट असू शकतात.

**५. उद्दिष्टे साध्य करता येतील याची खात्री करा :** संशोधन उद्दिष्टे लिहिताना, ते वास्तववादी आणि साध्य करण्यायोग्य असल्याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. उपलब्ध संसाधने, तसेच संशोधनावर परिणाम

करू शकणाऱ्या कोणत्याही मर्यादांबद्दल संशोधकाने जागरूक असणे महत्त्वाचे आहे. हे तुम्हाला तुमची उद्दिष्टे व्यवहार्य आहेत की नाही हे निर्धारित करण्यात मदत करेल. याव्यतिरिक्त, प्रत्येक उद्देश स्पष्ट आणि संक्षिप्त आहे याची खात्री करणे महत्वाचे आहे जेणेकरून संशोधन पूर्ण करत असताना कोणताही गैरसमज होणार नाही.

संशोधन उद्दिष्टे ही विशिष्ट, मोजता येण्याजोगी उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांच्या आधारे संशोधक संशोधनामध्ये काय साध्य करू इच्छितो ते स्पष्ट होते. ते संशोधनाला दिशा देतात आणि ते संशोधन संशोधन विषयाकेंद्रित आणि अपेक्षित परिणाम देत असल्याचे असल्याचे सुनिश्चित करण्यात मदत करतात. संशोधन उद्दिष्टे लिहिताना, ती स्पष्ट परंतु संक्षिप्त आणि संशोधन प्रकल्पाच्या एकूण उद्देशाशी संबंधित असल्याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. संशोधन विषयात कोणते संदर्भ संकलित करणे आवश्यक आहे, तसेच संशोधनाचे योग्य परिणाम प्राप्त होण्याकरिता इतर कोणती माहिती यामध्ये समाविष्ट केली पाहिजे याची माहिती देण्यास मदत करते. संशोधनाचा उद्देश हा व्यापक असतो तर उद्दिष्टे संशोधन काय साध्य करू इच्छिते हे दर्शवतात. संशोधनाची उद्दिष्टे संशोधनाला योग्य दिशा देतात. संशोधन उद्दिष्टे ही ठोस पावले आहेत जी संशोधनाच्या व्यापक उद्देशापर्यंत पोहोचण्यासाठी उचलली जाणे आवश्यक असतात. संशोधनाची उद्दिष्टे लिहीत असताना आपल्या संशोधनाचा उद्देश लक्षात घेणे गरजेचे आहे. ही उद्दिष्टे संक्षिप्तपणे परंतु स्पष्टपणे मांडणे अपेक्षित असते. या उद्दिष्टांच्याद्वारे कोणते संदर्भ संकलित करून त्यावर काम करणे गरजेचे आहे हे लक्षात येते. याचबरोबर संशोधनाची उद्दिष्टे तयार करत असताना ते एकूण संशोधनाशी कशी निगडित आहेत हे लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' या विषयाच्या अनुषंगाने संशोधन विद्यार्थ्यास पुढील प्रमाणे उद्दिष्टे स्वीकारता येतील .

१. सातारा जिल्हयाच्या राजकीय चळवळींचा अभ्यास करणे.

२. सातारा जिल्हयाच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

३. आधुनिक काळातील विविध घटनांचा अभ्यास करणे तसेच राजकीय घटनांचे विश्लेषण करणे.

४. सातारा जिल्हयाच्या राजकीय चळवळी, भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस, आ. भा. शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष यांचा अभ्यास करणे.

५. सातारा जिल्हयाच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

१. शैक्षणिक चळवळ २. ग्रंथालय चळवळ ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी ४. दलित चळवळ ५. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ

६. सातारा जिल्हयातील आधुनिक वाटचालीतील राजकीय नेतृत्वांचा अभ्यास करणे.

१. यशवंतराव चव्हाण २. बाळासाहेब देसाई ३. किसन वीर ४. यशवंतराव मोहिते

७. सातारा जिल्ह्यातील सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.

१. क्रांतिसिंह नाना पाटील २. कर्मवीर भाऊराव पाटील ३. प्रा.डॉ.एन.डी.पाटील ४. डॉ. नरेंद्र दाभोळकर

८. सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीतील घटना, मोर्चा, आंदोलने इ.चा अभ्यास करणे.

९. सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळींच्या अनुषंगाने येणाऱ्या घटना यांचा अभ्यास करणे.

१०. सातारा जिल्हयातील व्यक्तीच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे.

११. सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करणे.

१२. सातारा जिल्हयातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा अभ्यास करणे.

१३. सातारा जिल्हयातील अनुषंगाने येणाऱ्या प्रतिसरकार चळवळींचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

दैनंदिन जीवनामध्ये इतिहास आणि सामाजिक शास्त्रातील संशोधकास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सामाजिक शास्त्रज्ञ आणि संशोधक समस्येतील गुंतागुंत सोडविण्यासाठी विश्वासार्ह्य कृती किंवा समस्या सोडविण्यासाठी आणि चौकशी करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर करतो. संशोधक किंवा सामाजिक शास्त्रज्ञ यांचे पूर्वग्रह अनावश्यकपणे सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टींवर प्रभाव पाडतात. म्हणुन संशोधकाने या गोष्टी करू नयेत. संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संशोधकाने वर्णन, स्पष्टीकरण, पुर्वानुमान यांचा अवलंब करावा यालाच संशोधन पद्धती असे म्हणतात. पद्धतीशास्त्र म्हणजे संशोधन करण्यासाठी पद्धतीचा अभ्यास करणे ज्या ज्ञान देतात व ज्या संशोधनातील माहिती प्रक्रिया याच्याशी संबंधित असतात. त्याला संशोधन पद्धतीशास्त्र असे म्हणतात. संशोधन पद्धती आणि संशोधन पद्धतीशास्त्र यामध्ये फरक केला तर असे म्हटले जाते की, संशोधन पद्धतीमध्ये सर्व पद्धती आणि संशोधक संशोधनासाठी वापरणारी तंत्रे यांचा समावेश होतो.

संशोधन पद्धतीशास्त्र हा संशोधन समस्या पद्धतशीरपणे सोडविण्याचा मार्ग असतो. हे शास्त्र संशोधन शास्त्रीय पद्धतीने कसे करावे याचा अभ्यास करते. या अभ्यासामध्ये अभ्यासक तर्काच्या मदतीने अनेक पायऱ्या वापरतो. म्हणून संशोधकास फक्त संशोधन पद्धती माहिती असून चालत नाही तर त्याला पद्धतिशास्त्राची माहिती असावी लागते. संशोधकास संदर्भसाधने आणि पद्धती यांचे मुल्यमापन व ते समजून घेण्याची पद्धत एवढेच आवश्यक नसून त्याला कोणती पद्धत, कोणती तंत्रे संशोधन करण्यासाठी समर्पक आहेत हे माहीत असावे लागते. संशोधकास गृहितकेसुद्धा माहीत असणे आवश्यक आहे. त्याला कोणत्या समस्यामध्ये कोणती तंत्रे आणि प्रक्रिया यांचा वापर करावा हे सुद्धा ज्ञान असावे लागते. थोडक्यात संशोधकास संशोधन समस्येमध्ये पद्धतिशास्त्राचा आराखडा कसा तयार करावा हे माहीत असावे. समस्येनुसार वेगवेगळे पद्धतीशास्त्र वापरावे लागते.

संशोधकाने मुल्यमापन करण्यासाठी संदर्भ साधनांचा शोध घेणे हे अंमलबजावणी करण्याअगोदर गरजेचे आहे. त्याने एखाद्या निर्णयाप्रत कसे आलो हे स्पष्ट करणे गरजेचे आहे, वरील स्पष्टीकरणावरुन असे सिद्ध

होते की, संशोधन पद्धतिशास्त्राच्या अनेक बाजू असून संशोधन पद्धतीशास्त्राचा हा एक भाग आहे. थोडक्यात संशोधन पद्धतीशास्त्रामध्ये संशोधन पद्धत निवडण्यामागचे तर्क, स्पष्टीकरणासाठी वापरलेले विशिष्ट तंत्र, संशोधन परिणामांचे मुल्यमापन, संशोधन समस्या कशी मांडली आहे, गृहितके कशी तयार केली आहेत, माहिती कोणत्या पद्धतीने व कशी गोळा केली आहे. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी कोणती पद्धत वापरली आहे. हे सर्व प्रश्न व त्यांची उत्तरे संशोधनाशी संबंधीत असतात.

**ऐतिहासिक संशोधन पद्धती**

आपण हे मान्य करतो की, इतिहास हे शास्त्र आहे अशावेळी इतिहास लेखन प्रक्रिया देखील शास्त्रशुद्ध असणे अपेक्षित असते. त्यामुळे काळाच्या ओघात इतिहास संशोधन पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल होत गेलेले आहेत. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा अर्थपूर्ण परस्पर संबंध लावणे हे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचे मुख्य काम असते. इतिहास लेखन पद्धती पूर्णत्वाकडे जाण्याकरिता संशोधन विषय निवडीपासून संशोधन अहवाल लेखनापर्यंत क्रमाक्रमाने पायरी पायरीने अनेक टप्पे पार करावे लागतात. या प्रक्रियेचा आरंभ संशोधना करता विषय निवडीपासून सुरू होतो. संशोधकास आपल्या संशोधनाकरिता कोणता विषय निवडावा याचसाठी अनेक बाबी पाहाव्या लागतात तर नंतर संदर्भ साधनांची जुळवा जुळव करणे अपेक्षित असून मिळालेल्या संदर्भ साधनांचा आढावा घेणे संशोधन आराखड्याची मांडणी करणे कागदपत्रांचे परीक्षण करणे व तदनंतर मिळालेल्या तथ्यांचा वापर करून इतिहास लेखन केले जाते.

ऐतिहासिक संशोधनाच्या पायऱ्या / टप्पे खालीलप्रमाणे -

१. **विषयाची निवड** (Selection of Topic) :

इतिहास संशोधनातील पहिली पायरी म्हणजे विषयाची निवड होय. या संदर्भाने विस्तृत चर्चा पहिल्या मुद्द्यात झालेली आहे.

२. **पूर्व संशोधनाचा (साहित्य) आढावा** (Review of Literature) :

संशोधन विषय निवडत असताना संशोधकाला विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती असणे गरजेचे असते. या संदर्भाने विस्तृत चर्चा झालेली आहे.

३. **गृहीतकांची मांडणी** (Hypothesis) :

विषय निवड पूर्ण झाल्यानंतर स ऐतिहासिक संशोधन पद्धतीतील पुढचा टप्पा म्हणजे गृहीतके होय. यामध्ये संशोधक आपल्या संशोधनाविषयी तात्पुरत्या स्वरूपाचे पूर्वानुमान करतो. यास इंग्रजीमध्ये Hypothesis असेही म्हणतात. संशोधकास पूर्वी ज्ञात असलेल्या म्हणजेच त्याच्या संदर्भात साधनातून संकलित झालेल्या तथ्यांच्या ज्ञानाच्या आधारावर गृहीतकांची मांडणी करतो. ही मांडणी करणे संशोधकास अत्यावश्यक असते कारण गृहीतकेत मांडल्याशिवाय संशोधन कार्य पुढे जात नाही. गृहीतकांशिवाय केलेले संशोधन दिशाहीन ठरते. संशोधकाने गृहीत धरलेली सर्व मते सत्यच ठरतील असे नसते जी गृहीतके

संशोधनांची खोटी ठरतात त्यांची मांडणी इतिहासात होत नाही त्यामुळे संशोधकाने संशोधनास सुरुवात करताना मांडलेली सर्व गृहीतके सत्यच ठरली पाहिजेत असा आग्रह करणे योग्य नाही. ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' या विषयाच्या अनुषंगाने संशोधक विद्यार्थी पुढील प्रमाणे गृहितके तयार करू शकतो.

१. सातारा जिल्हा एक प्राचीन राजकीय व सृजनात्मक वारसा लाभलेला जिल्हा आहे.

२. सातारा जिल्हयात विविध सामाजिक चळवळी घडल्या आहेत.

३. सातारा शहर व जिल्हयात शैक्षणिक चळवळ घडली.

४. सातारा जिल्हा ग्रंथालय चळवळीत एक अग्रेसर असा जिल्हा आहे.

५. सातारा व कराड शैक्षणिक केंद्रे म्हणून उदयास आली.

६. सातारा जिल्हयातील भौगोलिक परिस्थितीचा आर्थिक परिस्थितीवर प्रभाव पडला आहे.

७. सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळीचा जनमानसावर प्रभाव पडलेला आहे.

८. सातारा जिल्हयातील राजकीय व सामाजिक द्रष्टे नेतेमंडळींचा प्रभाव जनमानसावर पडला आहे.

४. **संशोधन आराखडा** (Degine of Research) :

संशोधकाने संशोधन विषय निश्चित केल्यानंतर आणि पूर्व संशोधन संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर संशोधक आपल्या संशोधनाचा आराखडा तयार करतो. निवडलेल्या संशोधन विषयाची आपण कशी मांडणी करणार आहोत ही सांगणारी रूपरेषा म्हणजेच संशोधन आराखडा होय अशी ढोबळपणे संशोधन आराखड्याची व्याख्या करता येते. या आराखड्यामुळे संशोधनाची पुढची दिशा स्पष्ट होते. संशोधकाने हा संशोधन आराखडा तयार केल्याने त्यास संशोधनातील अनेक महत्त्वाच्या बाबींवर नियंत्रण ठेवता येते हा आराखडा संशोधकास त्याच्या संशोधन प्रकल्पात पुढे निर्माण होणाऱ्या अडचणीची माहिती आधीच देतो त्यामुळे संशोधक आपल्या संशोधन कार्यात पुढे येणाऱ्या अडीअडचणींना तोंड देण्याची तयारी सुरुवातीपासून करत जातो आणि त्यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम व निष्फळ होणारा खर्च वाचतो. त्यामुळेच संशोधन आराखड्यास संशोधनाची ब्ल्यू प्रिंट असेही म्हटले जाते.

संशोधन आराखडा तयार करत असताना संशोधकाने आपल्या संशोधन विषयाचे स्पष्ट आणि निश्चित परंतु संक्षिप्त स्वरूपात माहिती देणे अपेक्षित असून या माहितीमध्ये विषय निवडीचे महत्त्व सिद्धांत तयार, अपेक्षित मदत, त्याची कार्यपद्धती, व्यावहारिक महत्त्व आणि त्याच्या विषयाचा समाजास व राष्ट्रास होणार येणारा उपयोग या सर्व बाबींचे माहिती असावी. संशोधन आराखड्यामध्ये आपल्या संदर्भ साहित्याचा आढावा घेणे अपेक्षित असून त्या क्षेत्रातील आजपर्यंतचे झालेले संशोधन व भविष्यात संशोधनाकरिता असलेला वाव याची माहिती देणे अपेक्षित आहे.विषयाच्या अनुषंगाने वाचन करीत असतानाच विषयाशी संबंधित असणाऱ्या ग्रंथाची यादी बनवली जाते. अशा संदर्भ ग्रंथांमधून टिपणही काढली जातात. या सर्व प्रक्रियेतून संशोधक चिंतन, मनन करून संशोधनाची रूपरेषा तयार करतो. ही रूपरेषा संशोधन कोणत्या

स्वरूपाचे आहे? यावर अवलंबून असते. संशोधनाचा विषय कोणत्या कालखंडातील आहे? तसेच तो राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अथवा अन्य प्रकारचा आहे. त्यानुसार माहिती संकलित करण्यासाठी आपण प्रश्नावली, सर्वेक्षण, मुलाखती किंवा इतर कोणत्या पद्धतीचा वापर करणार आहोत याची स्पष्ट कल्पना आराखड्यातून यावी लागते. संशोधकाने आपल्या संशोधन आराखड्यामध्ये गृहीतके मांडावीत, आपल्या विषयाशी संबंधित असलेले संदर्भ साहित्य त्याचप्रमाणे संपूर्ण संशोधन कामाचे टप्पे व लागणारा आवश्यक कालावधी या सर्वांची सुरक्षित मांडणी करून संपूर्ण संशोधन कार्यकर्ता येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रक देखील देणे अपेक्षित असते.

संशोधन आराखड्यामध्ये त्याच्या संशोधनाचे उद्देश, आपल्या संशोधनाची विश्वसनीयता, संशोधनातील सत्यता आणि आपले संशोधनाच्या एकूण कार्यपद्धतीचे संपूर्ण नियोजन करून तयार केलेल्या आराखड्यामुळे संशोधकास निश्चित सिद्धांतापर्यंत पोहोचता येते. संशोधन आराखडा पूर्ण केल्यानंतर संशोधकाने तो आराखडा तपासून पाहून तो बरोबर असल्याची खात्री केली पाहिजे म्हणजे संशोधन आराखडा हा निःसंदिग्ध होतो. संशोधन आराखड्याचे टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. संशोधन विषय : आपल्या संशोधन विषयास समर्पक असणारे परंतु संक्षिप्त असणारे शीर्षक देण्यात यावे

२. संशोधनाची उद्दिष्ट : आपल्या संशोधन विषयाची उद्दिष्टे मांडण्यात यावीत.

३. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा : संशोधनाची व्याप्ती व त्याच्या मर्यादा या ठिकाणी स्पष्ट कराव्यात.

४. संदर्भ साहित्याचा आढावा : आपल्या संशोधनाशी संबंधित असलेल्या आधीच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेणे अपेक्षित आहे.

५. संशोधनाची गृहीतके : संशोधनाची पूर्वानुमाने मांडावी.

६. संशोधन पद्धती : आपण ज्या संशोधन पद्धतींचा वापर आपल्या संशोधनाकरिता करणार आहे त्यांची माहिती येथे अपेक्षित आहे. उदा. ऐतिहासिक संशोधन पद्धती

७. संशोधनाचे महत्त्व: आपल्या संशोधनातून काय अपेक्षित आहे याची माहिती येथे द्यावी.

८. प्रस्तावित प्रकरणे : आपल्या संशोधन कार्याची प्रस्तावित प्रकरण रचना येथे द्यावी.

९. संदर्भसूची: आपल्या संशोधन प्रस्तावात नमूद केलेल्या सर्व संदर्भांची सूची येथे समाविष्ट करावी.

आपल्या विषयासंदर्भातील प्रकरण रचना कशी करावी याची आपणास कल्पना यावी याकरिता आपण निवडलेल्या विषयाची संभाव्य प्रकरण रचना मी या ठिकाणी देत आहे.

संशोधक विद्यार्थी ''सातारा जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास (१९६० ते २०००)'' या विषयाच्या अनुषंगाने संशोधक विद्यार्थी पुढील प्रमाणे प्रस्तावित प्रकरणे तयार करू शकतो.

* प्रकरण पहिले

सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान

✻ प्रकरण दुसरे

सातारा जिल्हयातील राजकीय चळवळी ( १९६० ते २००० )

✻ प्रकरण तिसरे

सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळी ( १९६० ते २००० )

✻ प्रकरण चौथे

सातारा जिल्हयातील सामाजिक आणि राजकीय नेतृत्व

✻ प्रकरण पाचवे

उपसंहार

**५. कागदपत्रांचे संघटन व व्यवस्थापन :**

संशोधकांनी आपला विषय निवडला की त्यानंतर त्या संशोधन विषयाच्या अनुषंगाने तो वाचन करत असतो. यासोबतच आपल्या संशोधनाकरीता आवश्यक संदर्भ त्यास जमा करणे गरजेचे आहे. ही ऐतिहासिक साधनसामग्री कागदपत्रे, ऐतिहासिक वास्तू, मंदिरे, इमारती अशा विविध स्वरूपात असते. या सर्व संदर्भांच्या आधाराने इतिहास संशोधकास भूतकाळाची पुनर्निर्मिती करावयाचे असते. त्यामुळेच कागदपत्राशिवाय इतिहास नाही असे म्हटले जाते. या संदर्भ साधनांची जुळवाजुळव करत असताना दोन मुख्य प्रकारात विभाजित केली जाते. संदर्भ साधनांचे प्राथमिक व दुय्यम असे मुख्य प्रकार आहेत. इतिहास लेखनाकरिता प्राथमिक साधने अत्यंत महत्त्वाचे आहे परंतु ज्यावेळी इतिहासाचे प्राथमिक साधन अपुरेत ठरते तेव्हा तेथे दुय्यम साधनातून महत्त्वाची माहिती मिळू शकते.

**६. साधनांचे वर्गीकरण :**

ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये पुरावा किंवा संदर्भ साधनांना अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. इतिहास लेखनाचा आत्माच संदर्भ साधने आहेत. आजवरच्या मानवी इतिहासाचा धांडोळा घेतला असता या प्रचंड कालखंडामध्ये अतिशय विस्तृत प्रमाणात संदर्भ साधने निर्माण झालेली आहेत. यामध्ये मानवाच्या वाटचालीचा आलेख दडलेला आहे. या साधनांमध्ये मानवी वापराच्या वस्तू, वास्तु, कागदपत्रे व इतर बऱ्याच बाबी असल्याचे दिसून येते. इतिहास संशोधकास आपल्या अभ्यासाच्या सोयीसाठी या सर्व साधनांचे वर्गीकरण करावे लागते हे प्रामुख्याने दोन विभागात होत असते. ते पुढील प्रमाणे प्राथमिक साधने व दुय्यम साधने होय.

**प्राथमिक साधने :**

प्राथमिक साधन म्हणजे असे संदर्भ साधन की, घटना अथवा प्रसंग घडत असताना किंवा घटना घडून गेल्यानंतर लगेचच जे कागदपत्र तयार होते त्यास प्राथमिक साधन असे म्हणतात. प्राथमिक साधनाच्या आधारेच इतिहास लेखन केले जाऊ शकते. याचे लिखित व अलिखित असे दोन प्रकार आहेत. लिखित

साधनांमध्ये प्रामुख्याने कागदपत्रे व हस्तलिखितांचा समावेश होतो तर अलिखित साधनांमध्ये इमारती, स्मारके, शहरे, शिलालेख, आलेख, नाणी त्याचप्रमाणे पुरातत्व उत्खननातून मिळालेल्या साधनसामग्रीचा समावेश होतो.

**दुय्यम साधने :**

ज्याप्रमाणे इतिहास संशोधकास प्राथमिक साधन अत्यावश्यक असते त्याचप्रमाणे संशोधकास दुय्यम साधनही गरजेचे आहे. दुय्यम साधन म्हणजे एखादी घटना घडत असताना ती प्रत्यक्ष न पाहता त्यानंतरच्या कालखंडात त्या घटनेविषयी तयार झालेले कागदपत्र होय. ही प्राथमिक साधनांवर प्रामुख्याने अवलंबून असतात. संशोधक इतिहास संशोधनाकरिता जेव्हा संदर्भ साधनांचे संकलन करतो व एखाद्या बाबी संदर्भात प्राथमिक संदर्भ साधनांचा वापर करत असतो परंतु त्यासोबतच संशोधकास दुय्यम साधनांचाही वापर करणे काही प्रसंगी आवश्यक ठरते. मुख्यत्वे ही दुय्यम साधने लिखित स्वरूपात असलेली आढळतात उदाहरणार्थ बखरी, प्रवास वर्णने, तवारिखा, धार्मिक ग्रंथ, व्यक्तिगत केलेले व्यवहार इ. परंतु अशा प्रकारच्या नोंदी इतिहास लेखनामध्ये स्विकारत असताना त्यातील वस्तुनिष्ठता तपासणे गरजेचे आहे कारण अशा प्रकारचे लेखन हे पूर्णतः ऐकिव माहितीवर असल्याने त्याचा खरे खोटेपणा वादातीत असू शकतो.

**आधुनिक साधन :**

या शिवाय संशोधकास अनेक आधुनिक संदर्भ साधनांची ही मदत संशोधन करत असताना घ्यावी लागते. आधुनिक कालखंडात शासकीय दस्तऐवज, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे खाजगी व सार्वजनिक पत्रव्यवहार, चरित्रे, आत्मचरित्रे, वृत्तपत्रे, मासिके सर्वेक्षण व जनगणनेचे अहवाल, इंटरनेट वेबसाइट्स, मुलाखती इत्यादी साधनांचा समावेश होतो. या सर्व साधनांचा उपयोग आपणास संशोधन कार्य करताना होतो.

**७. कागदपत्राचे परिक्षण :**

संशोधकास प्राप्त झालेल्या साधनांची सत्यासत्यता तपासणे म्हणजे कागदपत्रांचे परीक्षण करणे होय. जेव्हा संशोधक त्याच्या संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्वसाधारणांच्या संकलन करतो त्यानंतर त्या या साधनांचे परीक्षण करणे गरजेचे आहे जेणेकरून या साधनांमध्ये कितपत सत्यता आहे हे त्यास ज्ञात होऊ शकते. परीक्षण करत असताना त्यास ती घटना स्वतःला पाहता येत नाही त्यामुळे त्यास त्या घटनेवर आधारित असलेल्या सर्वसाधारणांचे परीक्षण करावे लागते. संशोधकास मिळालेल्या साधनाच्या खरेपणावरच त्याचे संशोधन अवलंबून असते त्यामुळे संशोधकांनी या साधनांची अतिशय बारकाईने काळजीपूर्वक परीक्षण करणे गरजेचे आहे. त्यामुळेच बी. शेख अली आपल्या 'History : it's Theory and Method' या ग्रंथात म्हणतात की, संशोधन ही एक प्रक्रिया आहे. यामध्ये कागदपत्रांचे परीक्षण केले जाते. ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर मानवी शरीराची चिरफाड करून त्यातील असाधारण असा भाग काढून टाकतो. त्याप्रमाणे इतिहासकार परीक्षणाच्या आधारे पुराव्यातील दोष काढून टाकतो. परीक्षणाचा मुख्य हेतू हाच असतो की आपल्या लेखनातील चुका टाळणे व सत्य जाणून घेणे. प्रोफेसर शेख अली यांच्या वरील मतानुसार

इतिहासकार अथवा संशोधकाला परीक्षणामुळे उपलब्ध पुराव्यामधील दोष टाळून राहिलेल्या सत्य माहितीचा वापर संशोधनामध्ये करता येईल. कागदपत्रांची चिकित्सा अथवा परिक्षणाचे दोन प्रकार पडतात– अ) बाह्य अथवा बहिरंग परीक्षण (External Criticism) ब) अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षण (Internal Criticism) :

**अ) बाह्य अथवा बहिरंग परीक्षण** (External Criticism)

संदर्भ साहित्य परीक्षण प्रक्रियेमध्ये बहिरंग परीक्षण हा पहिला टप्पा होईल. संशोधकास प्राप्त झालेले संदर्भ साहित्य अधिकृत आहे की अनधिकृत, संदर्भ साहित्य खरे आहे की खोटे? त्याचप्रमाणे संदर्भित कागदपत्राचा कालखंड, त्याचा लेखक, त्यातील लिपी, भाषा, अक्षर शैली या सर्व बाबींची तपासणी करण्यास बाह्य परीक्षण असे म्हटले जाते. कागदपत्र लिहिण्याकरिता वापरलेली शाई, संबंधित कागदपत्राचा रंग, धातू किंवा त्याच्यासाठी वापर झालेल्या इतर वस्तूंचा शास्त्रीय अभ्यास करणे या ठिकाणी गरजेचे आहे.

कागदपत्राच्या बाह्य परीक्षणांती घटनेचे सत्य मिळवणे हा हेतू असल्याने माहितीतील फसवेपणा दूर होतो. उदाहरणार्थ एखाद्या कागदपत्राचे परीक्षण करावयाचे झाल्यास ते कागदपत्र अस्सल आहे काय? या कागदपत्राचा लेखक तोच आहे का? या कागदपत्रांमध्ये नोंद झालेले ठिकाण आणि त्याचा कालखंड त्यामध्ये वर्णित केलेलाच आहे का? त्याच पद्धतीने त्या काळात वापरण्यात येत असलेला कागद कोणता होता? लिखाणाकरिता कोणती लिपी आणि शाई वापरली जात होती या गोष्टी अचूकपणे तपासणे गरजेचे आहे. या सर्व तपासणीनंतरच संशोधकास तो कागद आपल्या संशोधनाकरिता वापरता येऊ शकेल.

**ब) अंतर्गत अथवा अंतरंग परीक्षण** (Internal Criticism) :

कागदपत्राचे बाह्य परीक्षण झाल्यानंतर कागदपत्राचे अंतरंग परीक्षणास आरंभ करणे गरजेचे ठरते. हे परीक्षण करताना संशोधकास त्या कागदपत्रातील आशय सत्य आहे का याची तपासणी करावी लागते. कागदपत्रातून मिळत असलेली नोंद तपासून पाहणे हा या परीक्षणाचा मुख्य भाग आहे. याबाबत डॉ. के. एन. चिटणीस म्हणतात, आंतरिक परीक्षणाचा हेतू कागदपत्रांमध्ये आत शिरून त्यांचे विश्लेषण करणे व शेवटी सत्य घटना जगापुढे आणणे हाच असतो. अंतर्गत परीक्षणाचे सकारात्मक (वास्तववादी) परीक्षण (Positive Criticism) आणि नकारात्मक परीक्षण (Negative Criticism) असे दोन भाग पडतात. सकारात्मक परीक्षणामध्ये संशोधक लेखकाचे खरे म्हणणे काय आहे याची माहिती घेतो. हे करत असताना त्यास त्या कालखंडातील भाषा ज्ञात असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी वापरलेले शब्द कोणत्या अर्थाने वापरले आहेत, यातील वाचार्थ व गर्भितार्थ काय आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे.

नकारात्मक परीक्षण करताना संशोधकाने कागदपत्रात उल्लेखित प्रत्येक विधान बाबत शंका घेणे अपेक्षित आहे. हे कागदपत्र लिहिणाऱ्या लेखकाची पात्रता काय होती? त्याने आपल्या निवेदनामध्ये तंतोतंतपणा पाळलेला आहे काय? या कागदपत्रात खरेपणा आहे काय? लेखकाची वैचारिक पार्श्वभूमी काय होती आणि त्याने कोणत्या परिस्थितीमध्ये हे लेखन केलेले आहे? या सर्व बाबींचे परीक्षण नकारात्मक

परीक्षणामध्ये होते. या परीक्षणाच्या शेवटी जे कागदपत्र कसोटीस उतरते त्यातून पुढे इतिहास संशोधकास आपले कार्य करावे लागते.

**८. गृहीतकांची पडताळणी :**

संशोधकाने संशोधन विषय निवड करून त्या संदर्भाने वाचन केल्यानंतर संशोधक काही गृहितके निश्चित करतो. अशा गृहीतकांमध्ये त्याने मांडलेल्या बाबींची खातरजमा होणे म्हणजेच त्या गृहीतकांची पडताळणी करणे आहे. उपलब्ध कागदपत्रांच्या व संदर्भ साहित्याच्या आधारे या गृहीतकामधील काही गृहितके असत्य देखील ठरू शकतात त्याचप्रमाणे सत्य ठरलेल्या गृहीतकातून संशोधक काही सिद्धांत देखील मांडू शकतो. संशोधनासाठी जे संदर्भ साहित्य संशोधकांनी जमा केले आहे त्याच्या आधारे संशोधकास गृहीतकांची पडताळणी करावी लागते.

**९. तथ्य विश्लेषण :**

संशोधकांनी आपल्या संशोधनाकरिता जमवलेल्या संदर्भ साहित्याचे विश्लेषण करणे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. संशोधक जेव्हा त्याला प्राप्त झालेल्या संदर्भ साहित्याचा मूळ अर्थ शोधून काढतो व त्याची खात्री करतो म्हणजेच विश्लेषण करतो. हे केल्याने समजण्यास अवघड असलेल्या घटना साध्या व सरळ स्वरूपात मांडता येतात. संदर्भ साहित्यातील घटनांची पुनर मांडणी अशा पद्धतीने केली जाते की त्याचे विश्लेषण करणे सोपे जाते. हे करत असताना संशोधकाने संदर्भ साहित्यातील साम्यता, वेगवेगळेपणा आणि संशोधनातील नवीन प्रवाह लक्षात घ्यावे. संशोधक आपल्याकडे उपलब्ध असलेल्या बऱ्याच माहितीला या प्रक्रियेतून संक्षिप्त स्वरूपात आणतो व त्या माहितीतील घटनांचे परस्पर संबंध लावण्याचा प्रयत्न करत असतो. हे कार्य संशोधकास स्वतःला करावे लागते कारण उपलब्ध संदर्भात साहित्याची इत्यंभूत माहिती व संशोधन प्रक्रिया या सर्व बाबी त्यास ज्ञात असतात. माहितीच्या विश्लेषणातील तंतोतंतपणा आणि वस्तुनिष्ठता संशोधकामध्ये असलेल्या कौशल्यावरच अवलंबून असतो. संशोधन विषयाची पार्श्वभूमी, संशोधनातील विविध टप्पे आणि संशोधनासाठी माहिती गोळा करण्याची पद्धती यातूनच संशोधकाकडे कौशल्य येवू शकते. विश्लेषणासाठी दर्जेदार पद्धतींचा वापर करुन संशोधनाला दर्जा प्राप्त करून देता येतो.

**१०. संशोधन अहवाल :**

ऐतिहासिक संशोधन पद्धतीचे सर्व सोपस्कार संशोधकाने पूर्ण केल्यानंतर त्यास त्याच्या प्रत्यक्ष प्रबंध लेखनास सुरुवात करावी लागते. त्याचे हे लेखन म्हणजेच संपूर्ण संशोधन प्रक्रियेचे यश असते. त्याच्या लेखन अहवालातील भाषा सर्वसामान्य वाचकास सहज समजावी अशी साधी सोपी व तर्कसंगत असणे आवश्यक आहे. संशोधक करत असलेले विवेचन वस्तुनिष्ठ असावे आणि त्याने मांडत असलेल्या घटना या एकमेकांशी क्रमबद्ध आणि सुसंगत पद्धतीने जुळलेल्या असाव्यात याची त्यांनी काळजी घेणे गरजेचे आहे. अहवाल लेखन करत असताना ज्या भाषेत अहवाल लिहिला जात आहे त्या भाषेच्या व्याकरण व शुद्धलेखनाला महत्त्व देण्यात यावे. सर्वसामान्य वाचकांच्यावर त्याच्या लिखाणाचा प्रभाव पडला पाहिजे. तसेच त्याच्या लिखाणा या विषयातील तज्ञ व्यक्तींचा पाठिंबा म्हणून संशोधकाने ज्या ज्या संदर्भ ग्रंथातून

अथवा संदर्भ साहित्यातून माहिती मिळवली आहे त्यांचे संदर्भ दिले पाहिजेत. जेणेकरून संदर्भ दिल्याने त्याचे लिखाण सत्याच्या कसोटीवर सहज उतरू शकते. अहवाल अथवा प्रबंध लेखनामध्ये ज्या ठिकाणी नकाशा, छायाचित्र आवश्यक आहे त्या ठिकाणी त्याचा नक्कीच समावेश करावा. प्रबंधाची उत्कृष्ट आकर्षक बांधणी करून तो सादर करण्यात यावा. प्रबंध लेखन करीत असताना

अ) संशोधन विषयाचे नाव

ब) संशोधकाचे मनोगत

क) आभार व ऋणनिर्देश

ड) प्रमाणपत्र (मार्गदर्शक, संशोधक विद्यार्थी इत्यादी)

इ) अनुक्रमणिका

उ) प्रबंधातील प्रकरणे

ऊ) उपसंहार किंवा निष्कर्ष

ए) संदर्भ ग्रंथयादी

ऐ) परिशिष्टे

अशा रीतीने आपल्या प्रबंधाची अथवा संशोधन अहवालाची आकर्षकपणे मांडणी करावी.

**११. संदर्भ ग्रंथाची यादी :**

प्रबंध लिहून पूर्ण झाल्यानंतर शेवटी प्रबंधासाठी आपण वापरलेल्या सर्व संदर्भ साधनांची माहिती एकत्रितपणे देतो त्यास संदर्भ ग्रंथाची यादी असे म्हणतात. ही यादी तयार करणे हे एक स्वतंत्र तंत्र आहे. प्रबंधाच्या शेवटी आपण ही संदर्भग्रंथाची यादी दिल्यामुळे संशोधनासाठी किती ग्रंथांचा अभ्यास केला आहे हे वाचकाला समजते व त्यावरून त्या ग्रंथाची विश्वसनीयता आणि दर्जेदारपणा ठरत असतो. संदर्भ ग्रंथाची यादी देत असताना आपण संदर्भ ग्रंथांच्या यादीचा क्रम ठरवावा लागतो. तो पुढीलप्रमाणे–

१. सुरुवातीला प्राथमिक साधन म्हणून वापरलेले ग्रंथ :

(उदा. राजनैतिक दस्तऐवज, सरकारी पत्रव्यवहार, आत्मचरित्रे, हस्तलिखिते, गोपनीय नोंदी इ.)

२. त्यानंतर दुय्यम साधन म्हणून वापरलेले ग्रंथ

(उदा. प्रवाशांचे वृत्तान्त, प्रवासवर्णने, विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, वार्तापत्रे इत्यादी)

३. गॅझेटिअर्स, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी

४. परिशिष्टे, नकाशे, आलेख, कोष्टके, चित्रे इत्यादी

वरील चार गटांमध्ये संदर्भ ग्रंथांच्या यादीचा क्रम ठरवून यादी तयार करावी लागते. यादी तयार करीत असताना यामध्ये आपण भाषेवरून त्याचे उपविभाग तयार करू शकतो. उदाहरणार्थ इंग्रजी ग्रंथ, मराठी ग्रंथ,

उर्दू ग्रंथ, फारशी ग्रंथ, कानडी ग्रंथ इत्यादी अशी स्वतंत्र वर्गवारी करता येते. वाचकांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी. त्यांना संदर्भ ग्रंथ मिळवता यावेत, त्यातील काही संदर्भ पाहता यावेत या उद्देशाने संशोधकाने आपली संदर्भ यादी तयार केली पाहिजे. ही संदर्भ यादी तयार करीत असताना संशोधकाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्यामध्ये ग्रंथाचा संदर्भ देत असताना संशोधकांनी प्रारंभी लेखकाचे आडनाव, नंतर नाव जर लेखक अनुवादक असेल तर तेथे अनुवादक असे लिहिले पाहिजे किंवा जर लेखक संपादक असेल तर संपादक असे लिहिले पाहिजे. त्यानंतर ग्रंथाचे नाव, आवृत्ती क्रमांक, खंड क्रमांक, प्रकाशनाचे वर्ष, ठिकाण, प्रकाशनाचे नाव, तारीख वर्ष लिहावे. प्रत्येक ठिकाणी स्वल्पविराम व शेवटी पूर्णविराम देऊन संदर्भ ग्रंथाची मांडणी करावी. उदा. कोठेकर शांता., इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५.

संशोधकाने वरील सर्व बाबी लक्षात घेऊन संदर्भ ग्रंथांची यादी तयार केली तर निश्चितच प्रबंध दर्जेदार होईल.

**सर्वेक्षण पद्धती**

ऐतिहासिक माहिती संकलनाची सर्वात महत्वाची व संशोधकाला जास्त उपयुक्त ठरणारी पद्धती म्हणजे निरीक्षण किंवा सर्वेक्षण पद्धती होय. इतिहास लेखनामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धती सोबतच आता सर्वेक्षण पद्धतीलाही खूप महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे सर्वेक्षण म्हणजे चिकित्सकपणे केलेली पाहणी असे म्हणता येईल. एखाद्या विशिष्ट प्रश्नाबाबतची चिकित्सक तपासणी करणे, त्या संदर्भातील सर्व तऱ्हेच्या बाबींची विस्तृत माहिती घेणे म्हणजे सर्वसाधारणपणे सर्वेक्षण असे म्हणता येईल.

निरीक्षणात सक्रियता अपेक्षित आहे. सामाजिक संशोधनाची विविध प्रगत तंत्रे अस्तित्वात आलेली असली तरी निरीक्षणाचे महत्व कायम आहे. संशोधकाने केलेले निरीक्षण त्याला कॅमेरा, मोबाईल, टेप रेकॉर्डर यांच्या सहाय्याने ती माहिती जतन करता येणे शक्य होते. मात्र प्रत्यक्षपणे सहेतूक पाहणे ही सामाजिक शास्त्रामधील भूमिका मात्र कायम आहे. इतिहासाला शास्त्राचा दर्जा दिल्यामुळे इतिहास संशोधक प्रत्यक्षपणे घटना बघितल्याशिवाय ऐकिव माहिती करून कोणताही निष्कर्ष काढू शकत नाही. त्यामुळे ही पद्धती इतर पद्धतीपेक्षा इतिहास संशोधकाला महत्वाची वाटते.

प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडातील अनेक विषयांसाठी सर्वेक्षण पद्धती अत्यंत उपयुक्त ठरू शकते. उदाहरणार्थ सर्वेक्षणातून एखाद्या समाजाच्या, धर्माच्या, पंथाच्या विशिष्ट प्रश्नाविषयी सर्वेक्षण करून विस्तृतरित्या माहिती प्राप्त होऊ शकते. ज्या ज्या स्थळी आपल्या संशोधन विषयाला संबंधित माहिती मिळेल. त्या त्या स्थळांना भेट देऊन तेथे सुक्ष्म निरीक्षण करून आवश्यक माहिती संशोधक गोळा करतो. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासाठी ही विशेष महत्त्वाची ठरते. घटना ज्या ठिकाणी घडली तेथे जावे परिस्थीती डोळ्यांनी बघावी. लोक, समाज, निसर्ग, संस्कार आणि चाली रीती बघाव्यात असे वाटते. त्यातून निरीक्षण पद्धती सुरू होते. विशिष्ट गटाचे, समुहाचे आर्थिक वा अन्य प्रकारचे सर्व्हे (survey) करावे. जेणे करून वस्तुनिष्ठता समजेल. तेव्हा सर्वेक्षण पद्धती उपयुक्त ठरते. संशोधक गाव, शहर, जाती, जमाती, वर्ग

अशा कोणत्याही घटकासंबंधी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करू शकतो हे सर्वेक्षण करत असताना तो प्रामुख्याने प्रश्नावली चा वापर करत असतो या प्रश्नावलीच्या माध्यमातून त्यास हवे असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून त्यास प्राप्त करता येते. उदाहरणार्थ अनेक शासकीय योजनांबाबत माहिती घेणे, अनेक राजकीय नेत्यांच्या मुलाखतींची माहिती घेणे, अनेक राजकीय नेत्यांनी मुलाखतीतून दिलेल्या माहितीची सत्यासत्तता समाजातून सर्वेक्षणाच्या माध्यमातून तपासणे, एखाद्या घटनेबाबत जनतेचे काय मत आहे ही पाहण्याची सर्वात चांगली पद्धत म्हणजे सर्वेक्षण होय. परंतु सर्वेक्षण करत असताना प्रश्नावली बिनचूक करणे, परिपूर्ण करणे अत्यावश्यक असते. त्याच्या प्रश्नांमध्ये संधीग्धता आल्यास सर्वेक्षण अपूर्ण होते. ज्यावेळी संशोधक सर्वेक्षण करतो त्यावेळेस त्याच्या नोंदी घाईगडबडीत न करता अतिशय अचूक आणि निर्दोषपणे करणे गरजेचे असते जेणेकरून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण योग्य होईल.

**मुलाखत पद्धत :**

समकालीन इतिहास लेखनाकरिता आणि स्थानिक इतिहास लेखन करण्यासाठी मुलाखत पद्धती अत्यंत उपयुक्त मानली जाते. या पद्धतीमध्ये इतिहास संशोधक अनेक व्यक्तींची मुलाखत घेऊन त्या मुलाखतींमधून प्राप्त झालेल्या माहितीची सत्या सत्यता तपासून इतिहासाचे साधन म्हणून वापर करतो. सामाजिक शास्त्रात एखाद्या घटनेमागील परस्पर संबंध जाणून घेण्यासाठी मुलाखत तंत्राचा वापर केला जातो.

मुलाखत पद्धतीमध्ये मुलाखत देणारा व घेणारा या दोघांच्या परस्पर संवादातून ही प्रक्रिया पुढे जाते. संशोधकाने मुलाखत पद्धती स्वीकारण्यापूर्वी या मुलाखतीची उद्दिष्टे स्वरूप आणि व्याप्ती काय आहे याचा विचार करणे गरजेचे ठरते जेणेकरून संशोधकास या मुलाखती मधून काय प्राप्त होणार आहे मुलाखत कोणाची घेणार आहे तसेच त्या मुलाखतीच्या घेण्यासाठी काही पूर्व तयारी करणे गरजेचे आहे काय याची माहिती मिळते. या मुलाखती घेत असताना मुलाखतीचे स्वरूप खुले अथवा नियंत्रित असणे हे ठरवणे गरजेचे असते मुलाखत घेत असताना मुलाखत नियंत्रित किंवा संरचित तसेच खुली किंवा अनियंत्रित अशी दोन प्रकारे घेतली जाऊ शकते.

नियंत्रित किंवा संरचित मुलाखत पद्धती मध्ये मुलाखत दात्यास कोणते प्रश्न विचारले जाणार आहेत ते प्रथमतः ठरवले जाते. प्रश्न त्याची यादी तयार केली जाते. या यादीस प्रश्नावली असे म्हणतात. या प्रकारामध्ये प्रश्नावली तयार असल्याने त्याच्या बाहेर जाण्याचे स्वातंत्र्य मुलाखत देणारा व घेणारा या दोघांनाही मिळत नाही. यादीमध्ये दिलेल्या प्रश्नाचे संभावित उत्तर होय अथवा नाही असे घेऊन याच्याशिवाय संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो. या प्रकारामध्ये मुलाखतघेणारास माहिती प्राप्त करण्यासाठी वेळ आणि श्रम कमी लागतात परंतु मिळालेल्या माहितीचे सामान्यीकरण करणे सोपे असते. यामध्ये तोटा म्हणजे मुलाखत देणारा आणि घेणारा या दोघांचे स्वातंत्र्य कमी होते.

या उलट खुली किंवा अनियंत्रित मुलाखत घेत असताना मुलाखत घेणारा ठरलेले प्रश्न विचारत नाही किंवा ठरलेल्या उत्तरांपैकी एक उत्तर निवडण्यास सांगत नाही, मुलाखत घेणारा मुलाखत देणारे समोर विषय

मांडतो त्याच्या मुलाखतीमधील उद्दिष्ट स्पष्ट करतो व त्यास मोकळेपणाने बोलण्याची मुभा देतो. यामध्ये प्रश्नावली तयार केलेली नसली तरीही या विषयाचा अभ्यास मुलाखत कराचा झालेला असतो जेणेकरून त्या कोणते प्रश्न विचारावयाचे आहेत याची कल्पना असते फक्त अमुक वेळी अमुकच प्रश्न अमुकच शब्दात किंवा ठरलेल्या क्रमाने विचारले पाहिजेत असे त्याच्यावर बंधन नसते. प्रस्तावना झाल्यानंतर तो मुलाखत देणाऱ्यास मुलाखत सुरू करण्याच्या उद्देशाने एखादा प्रश्न विचारतो व उत्तरांची अपेक्षा करतो. मुलाखत देणारा जर ठरलेल्या विषयाला सोडून बाजूला जात असेल तर योग्य शब्दात त्यास आपल्या विषयास अनुसरून प्रश्न विचारत असतो. या प्रकारामध्ये ठराविक प्रश्न विचारण्याचे बंधन नसल्याने ही मुलाखत फार लवचिक असते व यामुळे मुलाखत देणारा आपली मते अतिशय स्पष्टपणे आणि स्वतःच्या शब्दात मांडू शकतो. या प्रकारातील दोष म्हणजे मुलाखत देणारा हा पूर्वग्रह बाळगून असल्यास त्याचे त्या विषयाचे विश्लेषण त्या पद्धतीनेच होत असते त्यामुळे त्याने दिलेल्या माहितीची इतर माहितीशी तुलना करणे अवघड होऊन जाते. तसेच ही मुलाखत घेत असताना मुलाखत घेणाऱ्याने मुलाखतीस अधिक कौशल्य, वेळ आणि श्रम द्यावे लागते.

मुलाखत तंत्राचा उपयोग इतिहासकार आपल्या इतिहास लेखनासाठी विविध प्रकारे करून घेऊ शकतो.. उदा. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात नागरी, औद्योगिक, हरित, धवल अशा विविध क्रांती झाल्या. समाजात राजकीय सांस्कृतिक धार्मिक बदल झाले या मूलभूत बदलांचा इतिहास लिहिणे आवश्यक आहे. स्वतंत्र भारतात राजकीय उद्देशाने लेखन केलेले अनेक ग्रंथ आपणास पाहता येतील परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडातील भारतीय जातीव्यवस्थेची वास्तविकता दर्शवणारा किंवा त्याची उत्क्रांती मांडणारे इतिहास ग्रंथ फार कमी आहेत. याकरिता समकालीन इतिहास लेखन होणे आवश्यक आहे आणि हे इतिहास लेखन मुलाखतीच्या माध्यमातून शक्य होऊ शकते. आज इतिहास संशोधकाने पारंपारिक साधनांच्या सोबतच अपारंपारिक साधनांचा वापर आपल्या लेखनासाठी करणे गरजेचे ठरते त्यासाठी मौखिक साधने किंवा मुलाखत हे साधन अत्यंत उपयुक्त ठरू शकते जेणेकरून ज्या घटकांचा व्यक्तींचा अथवा वर्गसमूहाचा लिखित स्वरूपातील इतिहास आपणास आज प्राप्त होऊ शकत नाही त्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे कार्य मौखिक साधनांच्या माध्यमातून केले जाऊ शकते.

**प्रश्नावली पद्धत**

एखाद्या समस्येच्या अभ्यास करण्याकरिता संबंधित व्यक्तीकडून, विशिष्ट समूहाकडून, गट अथवा भौगोलिक मर्यादा मध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या माध्यमातून योग्य माहिती मिळवण्याच्या दृष्टीने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली असे म्हणता येते. संशोधनाच्या माहिती संकलन करण्याच्या अप्रत्यक्ष पद्धतीपैकी ही एक पद्धत आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा विविध विषयांच्या संदर्भात प्रश्नावली पद्धत अत्यंत उपयुक्त होते. समकालीन इतिहास लेखन करत असताना व स्थानिक इतिहासाची मांडणी करताना प्रश्नावली पद्धत वापरून माहिती संकलित केली जाते.

**प्रश्नावली पद्धतीचे स्वरूप :**

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रश्नांचा क्रम, लांबी, पर्यायी उत्तरे याबाबत स्पष्टता असणे गरजेचे असते. प्रश्नावलीचे स्वरूप संशोधन विषयाशी निगडीत ठेवले पाहिजे. प्रश्न छोटे, सोपे व सुटसुटीत असावेत. प्रश्न अचूक व काटेकोर शब्दात विचारावेत. प्रश्नाच्या अर्थाबाबत संधिग्ता असता कामा नये. कोणती शंका राहू नये. मुक्त प्रश्न मोजके व आवश्यक तेवढेच असावेत. योग्य उत्तराला बरोबर खूण करण्यास सांगावे. प्रश्नातून उत्तर सूचित होतील असे प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्यास उत्तर देताना आकडेमोड करावी लाग् नये. प्रश्नावलीमध्ये खाजगी प्रश्न विचारताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. गृहितकावर आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

**प्रश्नावली पद्धतीची उपयुक्तता :**

स्थानिक अथवा समकालीन इतिहास लेखानामध्ये साधने प्राप्त करताना अनेक अडचणी येतात. स्थानिक व समकालीन संशोधन विषयावर विपुल प्रमाणात साधने उपलब्ध असतील असे नाही, अशा वेळी संशोधक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधनाला पूरक पुरावे जमा करू शकतो. प्रश्नावली पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. विचारलेल्या प्रश्नातून उत्तरात कमी विसंगती येते. प्राप्त उत्तरांची तुलना आणि विश्लेषण करणे सोपे जाते. प्रश्नावलीतून संशोधन विषयाचा एक दस्ताऐवज तयार होतो. की जो पुढे तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त असतो. संशोधन विषयाशी निगडीत ऐतिहासिक साधन तयार होते.

**प्रश्नावली पद्धतीची मर्यादा :**

प्रश्नावलीचे जसे फायदे आहेत तसेच काही उणिवादेखील आहेत, जसे की प्रश्नावली भरून देणाऱ्याच्या स्वतंत्र विचारला आळा बसलेला असतो. कारण एका ठराविक मर्यादेमध्ये राहून उत्तरे द्यावी लागतात. त्यातूनही दिलेले उत्तर खरे असेलच असे नाही. प्रश्नावलीमधील प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्याची कुवत प्रश्नावली भरून देणाऱ्याकडे असावी लागते. त्याला प्रश्नाची उकल व्यवस्थित न झाल्यास चुकीची अथवा संधिग्ध उत्तरे प्राप्त होवू शकतात. अथवा उत्तरात उणीव राहण्याची शक्यता असते. प्रश्नावली भरून विशिष्ट जाती समूह, धर्म समूह, वर्ग समूह समाजामध्ये रहात असल्याने तो पूर्वग्रहदूषित असण्याची शक्यता असते, यामध्ये वस्तूनिष्ठतेला बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रश्नावलीमध्ये प्रश्नावली भरून देणाऱ्याच्या उत्तरावर विश्वास ठेवावा लागतो, दिलेल्या उत्तराची पडताळणी शक्यत नसते.

**१.२.४ स्वयं अध्ययन प्रश्न**

१. संशोधन ही एक ......... कालीन प्रक्रिया आहे.

अ) दीर्घ　　ब) लघु　　क) मध्यम　　ड) अल्प

२. संशोधन आराखड्याला संशोधन विषयाची ......... असे म्हटले जाते.

अ) ब्लॅक प्रिंट　　ब) रेड प्रिंट　　क) ब्लू प्रिंट　　ड) ग्रे प्रिंट

३. सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व वेल्स मध्ये ......... यांनी केली.

अ) ई. एच. कार ब) जे. बी. ब्युरी क) जॉन हावर्ड ड) कार्ल मार्क्स

४. मुलाखत तंत्रामध्ये .....प्रकार आहेत.

अ) एक ब) तीन क) चार ड) दोन

५. ......... पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो.

अ) ऐतिहासिक संशोधन पद्धती ब) सर्वेक्षण पद्धती

क) मुलाखत पद्धती ड) प्रश्नावली पद्धती

## १.३ सारांश

प्रस्ताव तयार करणे हा इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेतील एक पायाभूत टप्पा आहे, संशोधन प्रवासासाठी ब्लू प्रिंट म्हणून काम करतो. हे संशोधनाची उद्दिष्टे, पद्धतशीर कठोरता, नैतिक विचार आणि अभ्यासाचे महत्त्व यांची स्पष्टता सुनिश्चित करते. एक आकर्षक आणि सुव्यवस्थित प्रस्ताव तयार करून, इतिहासकारांनी भूतकाळाच्या अर्थपूर्ण शोधाचा मार्ग मोकळा केला आणि मानवी इतिहासाच्या सामूहिक आकलनामध्ये योगदान दिले जाते.

* इतिहास लिहिण्याच्या प्रस्तावात समाविष्ट करण्यासाठी येथे मुख्य घटक आहेत:

१. शीर्षक: ऐतिहासिक संशोधनाचे मुख्य लक्ष प्रतिबिंबित करणारे स्पष्ट आणि संक्षिप्त शीर्षक प्रदान

२. परिचय: विषय, त्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि समकालीन विषयाशी त्याची प्रासंगिकता याबद्दल माहिती देणाऱ्या आकर्षक परिचयाने प्रारंभ करा.

३. संशोधन प्रश्न/उद्दिष्टे : मुख्य संशोधन प्रश्न किंवा उद्दिष्टे सांगा. ऐतिहासिक संशोधनाद्वारे तुम्ही काय साध्य करू इच्छित आहात हे स्पष्टपणे स्पष्ट करा.

४. साहित्य पुनरावलोकन: सध्याच्या ऐतिहासिक साहित्यामधील मधील अंतर आणि विवाद हायलाइट करून, निवडलेल्या विषयावरील विद्यमान साहित्याचा सारांश द्या. ऐतिहासिक संदर्भ आणि प्रस्तावित संशोधनाशी त्याची प्रासंगिकता समजून घ्या.

५. कार्यपद्धती: संशोधन प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी तुम्ही वापरत असलेल्या संशोधन पद्धतीचे वर्णन करा. प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर, मौखिक इतिहास मुलाखती, अभिलेखीय संशोधन किंवा इतर संशोधन पद्धती यासारख्या डेटा संकलनाचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

६. स्रोत आणि पुरावे: तुमच्या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांची उपलब्धता आणि प्रासंगिकता यावर चर्चा करा. हे स्रोत निवडलेल्या विषयाच्या आकलनासाठी कसे योगदान देतील ते स्पष्ट करा.

७. आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन: लागू असल्यास, आपण आपल्या संशोधनात समाविष्ट करण्याची योजना आखत असलेल्या कोणत्याही आंतरविषय दृष्टिकोनाचा उल्लेख करा आणि ते ऐतिहासिक विश्लेषण कसे समृद्ध करतील हे स्पष्ट करा.

८. नैतिक विचारः संशोधनाशी संबंधित कोणत्याही नैतिक समस्यांचे निराकरण करा, विशेषतः जर निवडलेल्या विषयामध्ये संवेदनशील किंवा क्लेशकारक ऐतिहासिक घटना किंवा समुदायांचा समावेश असेल.

९. अपेक्षित परिणामः संशोधनाचे अपेक्षित परिणाम स्पष्टपणे सांगा आणि ते ऐतिहासिक ज्ञानात कसे योगदान देईल किंवा ऐतिहासिक शिष्यवृत्तीमधील विद्यमान अंतर दूर करेल.

१०. महत्त्व आणि प्रभाव: संशोधनाचे महत्त्व आणि ऐतिहासिक समज, स्मृती किंवा समकालीन वादविवादांवर त्याचा संभाव्य प्रभाव हायलाइट करा.

११. अर्थसंकल्प आणि निधी: निधी शोधत असल्यास, संशोधनासाठी अंदाजे खर्च, जसे की प्रवास, संग्रहणांमध्ये प्रवेश आणि इतर संबंधित खर्चाची रूपरेषा सांगणारे बजेट समाविष्ट करा.

१२. शैक्षणिक पार्श्वभूमी: तुमची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि निवडलेल्या विषयाशी संबंधित कोणतेही मागील संशोधन किंवा अनुभव थोडक्यात नमूद करा.

१३. निष्कर्ष: प्रस्तावातील मुख्य मुद्दे सारांशित करा आणि संशोधनाचे महत्व पुन्हा सांगा.

१४. ग्रंथसूची: प्रस्तावात नमूद केलेल्या संदर्भाची सूची समाविष्ट करा.

आजवर इतिहासाचे स्वरूप मर्यादित ठेवण्यात आलेले आहे परंतु इतिहास लेखनातील पारंपारिक दृष्टिकोन आता मागे पडून इतिहास म्हणजे फक्त युद्ध आणि तह किंवा राजा आणि राणी एवढेच समीकरण न राहता मानवाच्या सर्वांगीण बदलाची कहाणी म्हणजे इतिहास असा बदल झालेला आहे. या दृष्टिकोनातून आता मानव हा इतिहासाच्या केंद्रस्थानी आलेला आहे त्यामुळे या मानवी जीवनाच्या सर्वांना स्पर्श करणारा व त्यावर चर्चा करणारा इतिहास समाजासमोर येणे आता अपेक्षित आहे व त्या दृष्टिकोनातून इतिहास लेखनात बदल होणे गरजेचे ठरवू लागले आहे. इतिहासात येत असलेल्या नव्या दृष्टिकोन व प्रवाहामुळे इतिहास लेखन दिवसेंदिवस अधिकाधिक प्रगल्भ व समृद्ध होऊ लागले आहे. इतिहास लेखन करत असताना इतिहासासोबतच इतिहासाची आंतरविद्याशाखीय मांडणी होऊ लागली आहे इतिहासात सद्यस्थितीत स्थानिक पातळीवरील आजवर दुर्लक्षित असलेल्या वंचित घटकांचा सर्वांगीण अभ्यास करण्याची संधी नववीच्या संशोधकांना प्राप्त झालेली आहे अशावेळी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहेच परंतु त्यासोबतच सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती आणि मुलाखत पद्धती यांचा वापर करून अधिकाधिक साधनांची उपलब्धता करून या साधनांच्या आधारे इतिहासातील नव्या दृष्टिकोनाची मांडणी करणे गरजेचे आहे.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

| १.२. १ स्वयं अध्ययन प्रश्न | | १.२. २ स्वयं अध्ययन प्रश्न | | १.२. ३ स्वयं अध्ययन प्रश्न | | १.२.४ स्वयं अध्ययन प्रश्न | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर | प्रश्न क्र. | उत्तर |
| १. | क | १. | क | १. | ब | १. | अ |
| २. | क | २. | ड | २. | ड | २. | क |
| ३. | अ | ३. | क | ३. | ड | ३. | क |
| ४. | अ | ४. | अ | ४. | अ | ४. | ड |
| ५. | अ | ५. | ब | ५. | ब | ५. | ड |

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्नः टिपा लिहा?

१. इतिहास लेखन प्रक्रियेतील विषय निवडीची वैशिष्ट्ये

२. सीमांतर्गत/ प्रादेशिक इतिहास

३. संशोधनाची उद्दिष्ट्ये

४. संदर्भ साहित्याचा आढावा

५. बहिरंग परीक्षण

६. अंतरंग परीक्षण

७. संदर्भ ग्रंथाची यादी

८. सर्वेक्षण पद्धती

९. मुलाखत पद्धत

१०. प्रश्नावली पद्धत

प्रश्न : दीर्घोत्तरी प्रश्न?

१. संशोधन प्रकल्प लेखनामधील विषय निवडीचे महत्त्व स्पष्ट करा?

२. संशोधन प्रकल्प लेखनातील कालिक व प्रादेशिक मर्यादांची माहिती द्या?

३. ऐतिहासिक संशोधन पद्धतीची माहिती द्या?

४. मुलाखत पद्धत व व प्रश्नावली यांचा इतिहास लेखनातील होणारा उपयोग स्पष्ट करा?

## १.६ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके


१. Chitins, K. N., Research Methodology in History, Pune, 1979.

२. डॉ. प्रभाकर गद्रे, इतिहास लेखनाच्या परंपरा, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. सातभाई, श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.

४. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्र लेखन, परंपरा, संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, २००७.

५. कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, पाचवी आवृत्ती, नागपूर, २०१६.

६. आठवले, सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

७. डॉ. गोखले शोभना, प्राचीन भारतीय इतिहासाची साधने, प्रकाशक डॉ. उमेश केसकर, कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

८. गाठाळ, साहेबराव, इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१५.

९. राजदरेकर, सुहास इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २०१२.

१०. नाडगोडे, गुरुनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

११. कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

१२. शिंदे, सुखदेव व इतर, इतिहासलेखनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५.

१३. ढेरे, रा. चि., लोकसाहित्य: शोध आणि समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००९

१४. वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे.

१५. खोले, विलास, मराठीतील मौखिक साहित्याचे संकलन, मौखिता आणि लोकसाहित्य (संपा.) वाकोडे मधुकर, करोगल सुषमा, साहित्य अकादमी, २००८

१६. दिक्षित, राजा, इतिहास वाङ:मय, संपादक जाधव, र. ग. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड, ७, भाग तीन, पुणे २०१०

१७. पाटील, अवनीश, स्थानिक इतिहास संशोधांनाची सहाय्यक पद्धती, भारतातील स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक ओळख, नदाफ, हाजी., (संपा.) ज्ञानजोत प्रकाशन, कोल्हापूर, २०२०

१८. भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.

१९. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्र : लेखनपरंपरा, संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, पहिली आवृत्ती, २००६.

२०. राजदेरकर, सुहास इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.


❑❑❑

# घटक २
# पुराभिलेखागारातील साधनांचा उपयोग
(Use of Archival Sources)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ पुराभिलेखागार : अर्थ व महत्त्व (Archives : Meaning and Importance)

२.२.२ पुराभिलेखागारांचे प्रकार (Types of archives)

२.२.३ डिजिटल ऑर्काइव्हची संकल्पना (Concept of Digital Archives)

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

१. पुराभिलेखागाराचा अर्थ स्पष्ट होईल.

२. पुराभिलेखागाराचे महत्त्व लक्षात येईल.

३. पुराभिलेखागारांचे प्रकार माहित होतील.

४. पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे प्रकार समजून घेता येतील.

५. डिजिटल ऑर्काइव्हची संकल्पना स्पष्ट होईल.

## २.१ प्रास्ताविक:

विद्यार्थी मित्रांनो, मागील घटकात आपण इतिहास संशोधनासाठी विषय निवड आणि प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया जाणून घेतली. कोणतेही इतिहास संशोधन हे साधनांच्या शिवाय पूर्ण होत नाही किंबहुना

सुरु देखील होऊ शकत नाही. इतिहास संशोधनासाठी उपयुक्त साधने ही लिखित व अलिखित स्वरुपात उपलब्ध असतात. इतिहास संशोधनासाठी उपयुक्त लिखित साधने ही पुराभिलेखागारांमध्ये उपलब्ध असतात. प्रस्तुत घटकात आपण पुराभिलेखागाराचा अर्थ, पुराभिलेखागारांची उपयुक्तता आणि त्यांचे प्रकार जाणून घेणार आहोत. याशिवाय नव्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरातून अस्तित्वात आलेली 'डिजिटल ऑर्काइव्ह' ही संकल्पना देखील जाणून घेणार आहोत. इतिहास संशोधनाचे कौशल्य प्राप्त करण्याचा पहिला टप्पा हा साधनांचा शोध आणि त्याचा वापर हा असतो. या कामी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या पुराभिलेखागार आणि नव्याने अस्तित्वात येत असलेल्या डिजिटल ऑर्काइव्ह यांची माहिती आपण प्रस्तुत घटकात घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ पुराभिलेखागार : अर्थ व महत्त्व

इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये 'साधने'/'संदर्भ साधने' (Sources) ही अत्यंत महत्त्वाची असतात. संशोधकाला आपल्या संशोधन विषयाशीसंबंधित प्राथमिक व दुय्यम, लिखित व अलिखित, प्रकाशित-अप्रकाशित संदर्भ साधनांचा शोध घ्यावा लागतो. संशोधनासाठी उपयुक्त अशा साधनांना एकत्रित करून त्याची व्यवस्थितरित्या विभागणी करावी लागते. गोळा केलेल्या साधनांची उपयुक्तता तपासून त्याचा उपयोग इतिहास संशोधनासाठी करता येतो.

इतिहास संशोधनासाठी उपयुक्त साधने हमखास मिळण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय. पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वहया, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे व्यवस्थित जतन करून ठेवलेले असते. या साधनांचा उपयोग इतिहास संशोधकाला करता येतो. उपयुक्त आणि दर्जेदार साधनांचा वापर करून केलेले इतिहास लेखन हे उत्तम प्रतीचे मानले जाते.

विभिन्न उद्देशांनी अथवा कामकाजाच्या गरजेपोटी कागदपत्रे निर्माण होत असतात. शासकीय अथवा खाजगी स्वरूपातील ही कागदपत्रे विभिन्न प्रकारच्या माहितीचा स्त्रोत असतात. म्हणून अशी कागदपत्रे ही काही काळ किंवा कायम स्वरूपात जपून ठेवावी लागतात, त्यांना शासकीय परिभाषेत 'अभिलेख' (Records) म्हणतात. 'ऐतिहासिक अभिलेख' (Historical Record) म्हणजे व्यक्ती, स्थान किंवा घटना यांची ऐतिहासिक माहिती देणारे मूळ (Original) कागदपत्रे होय. मो. वि. भाटवडेकर यांच्या मराठी पर्यायी शब्दकोशामध्ये 'अभिलेख' शब्दाचा अर्थ 'इतिहासाचे लिखित साधन, ऐतिहासिक कागदपत्र, ऐतिहासिक महत्वाचा आलेख, ताम्रपट, शिलालेख, सनद' असा दिला आहे. ऐतिहासिक अभिलेखाला सामान्यत: 'पुराभिलेख' म्हणून ओळखले जाते. म्हणजेच इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतील अशा जुन्या कागदपत्रांना 'पुराभिलेख' असे म्हणतात. पुराभिलेख म्हणून ओळखली जाणारी कागदपत्रे ही कोणत्याही शासनाने, राज्यसत्तेने, खाजगी संस्थेच्या माध्यमातून निर्माण झालेली असतात.

'ऐतिहासिक अभिलेख' अथवा 'पुराभिलेख' म्हणून ओळखली जाणारी कागदपत्रे ही 'पुराभिलेखागार' मध्ये ठेवण्यात येतात. 'पुरा' (म्हणजे 'जुने') + 'अभिलेख' (म्हणजे 'कागदपत्रे') + 'आगार' (म्हणजे 'साठविण्याचे ठिकाण') = 'पुराभिलेखागार. ऐतिहासिक दस्तऐवज, राज्यकारभाराची कागदपत्रे, हिशेबाची कागदपत्रे ज्या ठिकाणी जतन करून ठेवली जातात त्या ठिकाणास दप्तरखाना (Record office) किंवा 'पुराभिलेखागार' असे म्हणतात. 'पुराभिलेखागारास' इंग्रजीमध्ये 'Archives' म्हणतात. पुराभिलेखागारामध्ये मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकणारे जे 'पुरावे' म्हणजेच 'साधने' असतात त्यांना 'पुराभिलेखीय साधने' (Archival Sources) असे म्हणतात. ही साधने प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपाची असतात. या साधनांच्या आधारे आपल्याला माहित नसलेल्या आज्ञात इतिहासावर प्रकाश टाकतो येतो. आपल्याला माहित असलेल्या म्हणजे ज्ञात इतिहासामध्ये नव्याने भर टाकता येते. पुराभिलेखागारामधील साधने ही अस्सल, प्राथमिक, अव्वल दर्जाची असतात, त्यामुळे या साधानांच्या आधारे केलेले संशोधन, लेखन हे अत्यंत विश्वसनीय आणि दर्जेदार ठरते.

'हस्तलिखिते' म्हणजे हाताने लिहिलेले लिखाण. कागदाचा शोध लागण्यापूर्वी झाडाच्या सालीपासून विशेषतः शालवृक्षाच्या सालीपासून बनलेल्या ताडपत्रावर लेखन केले जात असे. तथापि तेव्हा लिहीणे ही अत्यंत दुर्मिळ गोष्ट होती. कागदाचा शोध लागल्यानंतर लिहिणे सोपे झाले, तरीही हस्तलिखित एकच प्रत असे. ती पिढ्यांनपिढ्या जतन करून ठेवली जात असे. कालांतराने त्या प्रतीवरून कोणीतरी दुसरी प्रत म्हणजेच नक्कल करून ठेवत असे. त्यामुळे या हस्तलिखित ग्रंथांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पुराभिलेखीय साधने म्हणून अशी हस्तलिखिते जतन करून ठेवली जाऊ लागली. भारतात प्राचीन काळापासून अठराव्या शतकापर्यत लिहिण्यात आलेले धार्मिक ग्रंथ, आत्मचरित्रे, परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने, बखरी यासारखी साधने पुराभिलेखागारांमध्ये जतन करून ठेवण्यात आलेली दिसतात. उदा. कौटिल्याचे अर्थशास्त्र, वैदिक वाङ्ममय, जैन व बौद्ध वाङ्ममय, ज्ञानेश्वरी इत्यादी.

कागदाचा शोध लागल्यानंतर व पुढे छापखान्याचा शोध लागल्यानंतर हस्तलिखिते छापील ग्रंथ स्वरूपात तयार होऊन त्याच्या अनेक प्रति काढल्या जाऊ लागल्या. अशा दुर्मिळ ग्रंथाचे जतनही पुराभिलेखागारांमध्ये केले जाते. पुराभिलेखागारातील कागदपत्रांची रजिस्टरमध्ये नोंद केलेली असते व विशिष्ठ क्रमाने ती रूमालात बांधून ठेवलेली असतात. त्या रूमालांना, विविध खात्याच्या फाईल्सना, दुर्मिळ ग्रंथांना क्रमांक दिलेले असतात. त्यामुळे संशोधकांना रजिस्टर पाहून आपल्या संशोधन विषयाशी संबंधित कागदपत्रे अभ्यासणे सोयीचे होते.

- **पुराभिलेखागारांची स्थापना :**

**(अ) युरोपातील पुराभिलेखागार :** युरोपमध्ये कागदावर लेखन करण्याचा इतिहास ग्रीस आणि रोमन राज्याच्या अस्तित्त्वापासून सापडतो. युरोपमधील दप्तरखान्याची सुरुवात फ्रेंच राज्यक्रांतीपासून झाली. फ्रान्सने आपल्या राष्ट्रीय अभिलेखागाराची स्थापना सन १७८९ मध्ये केली. इंग्लंडमध्ये सन १८३८ मध्ये झालेल्या 'पब्लिक रेकॉर्ड ऑफिस 'ॲक्ट' नंतर शासकीय अभिलेखागार स्थापन करण्यात आले. इंग्लंडप्रमाणेच

युरोपमधील इतर देशातही पुराभिलेखागारांची स्थापना झाली. प्रत्येक देशाच्या सरकारने अभिलेखांचे शास्त्रशुद्ध जतन करून ठेवण्यासाठी शासकीय पुराभिलेखागारांची निर्मिती केली आहे. देशांच्या राजधानीच्या ठिकाणी एक मध्यवर्ती पुराभिलेखागार व अन्य पुराभिलेखागारे देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये स्थापन केलेली दिसून येतात. भारतातही अशा स्वरूपाची पुराभिलेखागारे सुरू करण्यात आली आहेत.

**(ब) भारतातील पुराभिलेखागार :** भारतात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करून ठेवण्याची जाणीव युरोपियन देशांप्रमाणे नव्हती. मध्ययुगीन कालखंडात मोठ्या राजघराण्यांनी शासकीय कागदपत्रांचे जतन केल्याचे आढळते. शासकीय दप्तरखाने मध्ययुगापासून तयार झाले होते. मात्र त्याचे स्वरूप आजच्या सारखे नव्हते. मुघलांनी आपला दप्तरखाना बगदादच्या खलिफाच्या धर्तीवर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे तत्कालीन इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणात आढळतात.

भारतामध्ये ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यानंतर त्यांनी दप्तरखान्याकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली. राज्यकारभाराच्या सोयीसाठी भारताची प्रांतवार विभागणी केली. बंगाल, मद्रास, मुंबई असे प्रांत निर्माण केले. प्रांताचा कारभार मुख्य शहरातून म्हणजेच राजधानीच्या ठिकाणाहून केला जाऊ लागला व तेथेच प्रांतांचे दप्तरखाने सुरू केले. सर्वप्रथम ब्रिटिशांनी मद्रास येथे सन १८१८ मध्ये पहिल्या पुराभिलेखागाराची निर्मिती केली. त्यानंतर लगेचच पुढील वर्षी कलकत्ता येथे दुसरे पुराभिलेखागार सुरू केले. १५ सप्टेंबर, १८२१ रोजी मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना झाली. ब्रिटिशांची सत्ता भारतात अबाधित राहावी, इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या अधिकाऱ्यास भारताबाबतची माहिती व्हावी आणि राज्यकारभार करणे सोयीचे व्हावे यासाठी या पुराभिलेखागारांची निर्मिती केली होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर दिल्ली येथील पुराभिलेखागार हे भारताचे 'राष्ट्रीय पुराभिलेखागार' बनले.

भारताची राजधानी ब्रिटिशांनी सुरुवातीस कलकत्ता ही केली. सन १८९१ मध्ये ब्रिटिशांनी कलकत्ता येथे 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस'ची स्थापना केली. या दप्तरखान्याचे प्रमुख म्हणून डॉ. जी. डब्ल्यू. फॉरेस्ट यांची नेमणूक केली. पुढील काळात अशा स्वरूपाचे दप्तरखाने नागपूर, लाहोर, पाटणा, अलाहाबाद, गोहत्ती, कटक, श्रीनगर याठिकाणी सुरू केले.

भारतात काही नवीन अस्तित्वात आलेल्या राज्यांमध्ये अद्याप पुराभिलेखागारांची स्थापना झालेली नाही. तर काही राज्यामध्ये अभिलेखागारांच्या एकापेक्षा जास्त शाखा आहेत. भारतात केंद्र शासनाच्या पुराभिलेखागाराशिवाय उत्तर प्रदेश २, केरळ २, गुजरात २, महाराष्ट्र ५, मध्यप्रदेश ५, राजस्थान २१ आणि बाकीच्या राज्यात प्रत्येकी एक अभिलेखागार आहे. पत्रसंख्येच्या दृष्टीने राजस्थानचे बिकानेर येथील अभिलेखागार सर्वात मोठे असून याचा वरचा क्रमांक लागतो.

**(क) महाराष्ट्रातील पुराभिलेखागारे :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील राज्यकारभाराच्या कागदपत्रांचे व्यवस्थित जतन करून ठेवले होते. तथापि, सन १६८९ मध्ये रायगड मुघलांच्या ताब्यात गेल्यानंतर त्यांनी रायगडावरील दप्तरखाना जाळून टाकला. जिंजी येथील राजाराम महाराजांच्या दप्तरखान्याची अवस्थाही तशीच झाली (१६९८). शाहू महाराजांच्या सुटकेनंतर राज्याभिषेकानंतर त्यांनी १७०८ मध्ये

सातारा येथे राजधानी करून नवीन सनदा देण्यास सुरूवात केली. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीपासूनची सर्व कागदपत्रे पेशवे दप्तरात किंवा एलिनेशन ऑफिसमध्ये मिळतात. पहिल्या बाजीराव पेशव्याने सन १७२९ मध्ये पुण्यास शनिवारवाडा बांधला तेव्हा दप्तर पुण्यास आणले. तेव्हापासूनची मराठ्यांची कागदपत्रे सुसंगतवार सापडतात. सन १७६४ ते १७९६ या काळात हे दप्तर नाना फडणवीस यांच्या ताब्यात होते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात हे दप्तर पुन्हा शनिवारवाड्यात आणले. सन १८०८ मध्ये शनिवारवाड्यास आग लागल्यानंतर हे दप्तर गोविंदराव काळे व बाजी नाईक बारामतीकर यांच्या घरी ठेवण्यात आले. मराठा सत्तेच्या ऱ्हासानंतर ब्रिटिशांनी हे दप्तर व नाना फडणवीस यांच्याकडील काही दप्तर, इतर ऐतिहासिक घराण्यातील काही कागदपत्रे व रूमाल यांचे एकत्रीकरण केले.

संपूर्ण भारतात ब्रिटिशांचे वर्चस्व निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्रात पुराभिलेखागारांची निर्मिती झाली. १७ व्या शतकापासून मुंबई ब्रिटिशांच्या कारभाराचे प्रमुख केंद्र होते. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यकारभाराची कागदपत्रे मुंबई येथील पुराभिलेखागारामध्ये ठेवलेली आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रात महत्वाच्या शहरांमध्ये पुराभिलेखागारे निर्माण करण्यात आली. त्यामध्ये त्या-त्या भागातील महत्त्वाची कागदपत्रे ठेवण्यात आलेली आहेत. महाराष्ट्रात अनेक पुराभिलेखागारे आहेत. त्यापैकी काही सरकारी, तर काही खाजगी आहेत. महाराष्ट्रातील शासकीय पुराभिलेखागारांमध्ये मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद आणि नागपूर येथील पुराभिलेखागारांचा समावेश होतो. याशिवाय भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर यासारख्या खाजगी सरकारमान्य संस्थांची पुराभिलेखागारे महाराष्ट्रात आहेत.

- **पुराभिलेखागाराचे महत्त्व:**

२१ व्या शतकामध्ये कोणत्याही विषयाशी संबंधित माहिती महाजालाद्वारा (इंटरनेटद्वारा) उपलब्ध होत असली तरी जुन्या कागदपत्रांचे जतन करणारी पुराभिलेखागारे व त्यातील विविध स्वरूपाची साधने आजही तितकीच महत्त्वाची आहेत. अभिलेखागार किंवा दप्तरखाना हा केवळ जुने दप्तर संग्रहित करणारा किंवा जपून ठेवणारा विभाग राहिलेला नाही. तर, अभिलेखागारात संग्रहित केलेल्या साधानांचा अभ्यास केल्याशिवाय प्रशासनाची पुढील वाटचाल करणे अशक्य आहे. शासकीय अधिकारी, संशोधक, सामान्य व्यक्ती यांच्या दृष्टीने पुराभिलेखीय साधने अत्यंत महत्त्वाची ठरतात.

**(१) इतिहास संशोधनासाठी प्रथम दर्जाचे स्त्रोत:** इतिहास संशोधक आणि विद्यार्थी यांना त्यांच्या संशोधन विषयाशीसंबंधीत अभिलेख पुराभिलेखागारात मिळतात. संस्थानकालीन किंवा ब्रिटिशकालीन आणि आधुनिक महाराष्ट्र, आधुनिक भारतासंबंधी कोणत्याही विषयाची माहिती अभिलेखागारात मिळते. ब्रिटिशांनी केलेले सत्ता संपादन किंवा संस्थानातील राज्यकर्ते, त्यांच्या लष्करी हालचाली, दळणवळण, शेती, पाणीपुरवठा, नागरी सुविधा, उद्योगधंदे, बंदरांचा विकास, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, रस्ते, धरणे इत्यादी विषयांची माहिती पुराभिलेखागारात मिळते. येथील माहितीच्या आधाराशिवाय संशोधन पूर्ण होऊ शकत

नाही. अनेक संशोधकांनी आपली संशोधन पुस्तके अभिलेखागारातील रेकॉर्डचा अभ्यास करून लिहिली आहेत. शास्त्रशुद्ध इतिहासाची मांडणी करण्याकरिता पुराभिलेखीय साधने महत्त्वाची आहेत.

**(२) प्राथमिक संदर्भ साधनांची उपलब्धता:** पुराभिलेखागारांमुळे प्राथमिक, अव्वल दर्जाची साधने मिळतात. या साधनांच्या आधारावर केलेले संशोधन, लेखन दर्जेदार, विश्वसनीय ठरते.

**(३) राष्ट्रीय वारशांचे जतन:** कोणत्याही राष्ट्राचा इतिहास दप्तरखान्याच्या आधाराशिवाय लिहिला जाऊ शकत नाही. संस्कृतीचा अमूल्य ठेवा भावी पिढीसाठी जतन करण्याचे कार्य अभिलेखागारे करीत असतात. पुराभिलेखाद्वारा ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो. राष्ट्राचे ऐतिहासिक काळातील जीवन, समाजपद्धती, आर्थिक व्यवहार, शिक्षण, औद्योगिक प्रगती अशा अनेक विषयांची माहिती पुराभिलेखागारात मिळते.

**(४) सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त:** सामान्य माणसांनाही रेकॉर्डची वेळोवेळी गरज भासते. शासनाने घेतलेले विविध निर्णय, जुने कायदे किंवा नियम, शासकीय गॅझेटमधील उतारे, इनाम जमीनविषयक माहिती, वंशावळ यांची गरज काहीवेळा सामान्य माणसाला भासू शकते. अशा प्रती पुराभिलेख विभागाच्या संचालकांनी प्रमाणित करून दिल्यानंतर सदर प्रती न्यायालयात मान्य केल्या जातात. उदा. लग्नानंतर एखाद्या स्त्रीचे बदललेले नाव गॅझेटमध्ये आले असेल तर गॅझेटची संचालकांनी प्रमाणित केलेली प्रतच न्यायालयामध्ये मान्य केली जाते. याप्रकारे सामान्य माणसाच्या हक्काचे साक्षीदार दप्तरखान्यात सुरक्षित असतात.

शासनामार्फत प्रकाशित झालेल्या कोणत्याही प्रकाशनाचे जतन करण्याचे काम पुराभिलेख विभागामध्ये केले जाते. त्यामध्ये केंद्र तसेच राज्य शासनाच्या राजपत्रांचा समावेश आहे. सर्वसामान्य नागरिकांना या राजपत्रांचा खाजगी कामासाठी किंवा त्यांचे हक्क शाबीत करण्यासाठी उपयोग होतो.

**(५) प्रकाशने :** काही पुराभिलेखागारे आपली नियतकालिके प्रसिद्ध करतात. त्यातून संशोधकांना आपल्या संशोधन विषयाशी संबंधित उपयुक्त माहिती मिळते. भारतातील राष्ट्रीय पुराभिलेखागार आपली वार्षिक नियमित प्रसिद्ध करीत असते. तसेच इतर प्रादेशिक लेखागारेही आपली नियतकालिके प्रसिद्ध करतात. याशिवाय आर्काइव्हज ऑफ इंडिया, न्युअल रिपोर्टस् ऑफ नेशन, प्रोसिडिंग्ज ऑफ द इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् यांमधून अभिलेखागारातील कागदपत्रांची अभ्यासकांना माहिती मिळते. त्रिवेंद्रम येथून 'इंडियन हिस्ट्री जर्नल' नावाची संशोधन पत्रिका प्रकाशित होते. कलकत्त्याहून 'एन्शीयट इंडियन हिस्ट्री' व 'इंडियन हिस्टॉरिकल क्वाटर्ली' या संशोधन पत्रिका निघतात. मराठीमध्ये राजवाडे संशोधक मंडळाचे 'संशोधक' हे त्रैमासिक, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्यावतीने प्रसिद्ध होणारे 'इतिहास आणि संस्कृती' हे त्रैमासिक, विदर्भ संशोधन मंडळ व भारत इतिहास संशोधन मंडळाची संशोधन पत्रिका यामधून पुराभिलेखीय साधने प्रकाशित होत असतात, ती संशोधकांना उपयुक्त ठरतात. मुंबई पुराभिलेखागाराने १९८४ पासून प्रकाशन शाखा सुरू केली आहे. मुंबई पुराभिलेखागारात परदेशाविषयी असणाऱ्या अभिलेखांची माहिती संकलित करून 'रेकॉर्ड पर्टेनिंग टू फॉरिन कंट्रीज (आबुधाबी ते पर्शिया भाग-१ व भाग-२)' अशा प्रकारची प्रकाशने प्रकाशित करून परदेशातून येणाऱ्या संशोधकांसाठी अल्पावधीत अभिलेख उपलब्ध करून देण्याची

व्यवस्था केलेली आहे. याप्रमाणे विविध पुराभिलेखांद्वारा प्रकाशित होणारी प्रकाशने संशोधकांसाठी खूप उपयुक्त ठरतात.

**(६) अभिलेखांचे जतन आणि संवर्धन :** पुराभिलेखांमध्ये कागदपत्रांचे शास्त्रीय पद्धतीने जतन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते. कागदपत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी प्रथम ती निर्जंतुक केली जातात. कागदपत्रांचा वाळवी, कीटक यापासून बचाव करण्यासाठी डीडीटी, गॅमेक्झिन नेप्थॅल, थायमॉल, पॅराडायक्लोरेट, बेंझीन इत्यादी किटकनाशके वापरली जातात. निर्वात पोकळीत अभिलेख ठेवून किंवा तीव्र जंतुनाशकाची वाफ देऊन अभिलेख निर्जंतुक केले जातात. कागदपत्रांचे आयुष्य वाढविण्यासाठी पुराभिलेखागारातील हवामान नियमित केलेले असते.

पुराभिलेखागारांमध्ये कागदपत्रे दुरूस्त करण्याचे कामही केले जाते. जीर्ण कागद टिश्यू पेपरच्या सहाय्याने लॅमिनेशन करून त्याचे जतन केले जाते. मोठ्या पुराभिलेखागारांमध्ये जीर्ण कागदपत्रांचे सूक्ष्मपटाच्या साहाय्याने जतन केले जाते. ज्या पुराभिलेखागारात सूक्ष्मपटवाचक यंत्र आहे तेथे जगातील कोणत्याही लेखागारातील लेख त्यांचे सूक्ष्मपट घेतले असता वाचता येतात. यामुळे संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. काही पुराभिलेखागारांमध्ये कागदपत्रांच्या झेरॉक्स किंवा फोटोस्टॅट प्रती पुरविल्या जातात.

**(७) कार्यशाळा व विविध वर्गाचे आयोजन :** मोठमोठ्या पुराभिलेखागारांच्या कामामध्ये तंत्रज्ञानाचा वापर जास्त केला जात असल्याने ते तंत्रज्ञान शिकविण्याचे वर्ग काढून तंत्रज्ञ तयार केले जातात, अभिलेख व्यवस्थापन शास्त्र कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच महाराष्ट्रातील अनेक पुराभिलेखागारांद्वारे मोडी लिपीचे वर्ग घेतले जातात, त्याद्वारे मोडी लिपीचा प्रसार व संवर्धन केले जाते.

- **स्वयं अध्ययन प्रश्न १**

**रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात ब्रिटिशांनी सन १८९१ मध्ये ............. येथे 'इंपिरियल रेकॉर्ड ऑफिस'ची स्थापना केली.
   (अ) दिल्ली (ब) मुंबई (क) मद्रास (ड) कलकत्ता

२. भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार ............. येथे आहे.
   (अ) दिल्ली (ब) मुंबई (क) मद्रास (ड) कलकत्ता

३. भारतात पत्रसंख्येच्या दृष्टीने ............. येथील अभिलेखागार सर्वात मोठे आहे.
   (अ) दिल्ली (ब) मुंबई (क) बिकानेर (ड) भोपाळ

४. ............. राज्यातील पुराभिलेखागारांद्वारे मोडी लिपीचे वर्ग घेऊन मोडी लिपीचा प्रसार व संवर्धन केले जाते.
   (अ) महाराष्ट्र (ब) मध्यप्रदेश (क) गुजरात (ड) छत्तीसगड

५. शासनामार्फत प्रकाशित झालेल्या कोणत्याही प्रकाशनाचे जतन करण्याचे काम............ विभागामध्ये केले जाते.

(अ) दर्शनिका (ब) पुराभिलेखागार (क) प्रसिद्धी (ड) सामाजिक न्याय

### २.२.२ पुराभिलेखागारांचे प्रकार:

पुराभिलेखागर हे शासन, सरकारी संस्था, खाजगी व्यावसायिक-कंपनी, विद्यापीठे, संग्रहालये इत्यादींकडे पुराभिलेखागार आढळते. खाजगी व्यक्ती अथवा कुटुंबे हे देखील पुराभिलेखागार तयार करू शकतात. भूतकालीन घटनांचे संशोधन, विशिष्ट संस्कृती/समाज/कुटुंब/समूह यांच्या विकासाबाबत जाणून घेण्यासाठी या पुराभिलेखागारांचा उपयोग होतो. पुराभिलेखागार स्थापन करणाऱ्या संस्थेच्या स्वरूपाच्या अनुषंगाने पुराभिलेखागाराचे प्रामुख्याने पुढील प्रकार मानले जातात.

**(१) राष्ट्रीय पुराभिलेखागार:** राष्ट्रीय पुराभिलेखागार हे एखाद्या विशिष्ट राष्ट्राच्या प्रशासकीय दस्तऐवज व ऐतिहासिक कागदपत्रे साठवणूक आणि जतन करण्याचे काम करणारी संस्था असते. राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाची कागदपत्रे, नोंदी जपणे हे राष्ट्रीय पुराभिलेखागारांचे मुख्य उद्दिष्ट असते. राष्ट्रीय पुराभिलेखागारात राष्ट्राच्या संविधान विषयक कागदपत्रे, घटनात्मक कागदपत्रे, संसदीय कागदपत्रे, तह-करार विषयक दस्तऐवज, ऐतिहासिक कागदपत्रे, नकाशे, छायाचित्रे, ध्वनीचित्र मुद्रिते व महत्त्वाचे ऐतिहासिक वस्तू यांचे जतन केले जाते. राष्ट्राच्या सामुहिक स्मृती, सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक विकासाच्या नोंदी आणि राष्ट्रीय अस्मिता ही दीर्घकाळ जपण्याची जबाबदारी राष्ट्रीय पुराभिलेखागाराकडे असते.

शासकीय पुराभिलेखागारामध्ये मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकारच्या अखत्यारीतील पुराभिलेखागारांचा समावेश होतो. भारताच्या बाबतीत विचार करता भारतात राष्ट्रीय व प्रांतिक पुराभिलेखागरे अस्तित्वात आहेत. दिल्ली येथील भारताचे राष्ट्रीय पुराभिलेखागार, मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील पुराभिलेखागारे व विविध प्रांतामधील महत्वाच्या शहरांमध्ये असणारी शासकीय पुराभिलेखागारे इत्यादींचा समावेश होतो. शासकीय पुराभिलेखागारांमधून प्राचीन काळापासूनची, विविध राजघराण्यांची, ब्रिटिशकालीन, स्वातंत्र्योत्तर काळातील तसेच सरकारच्या विविध खात्यांची महत्वाची कागदपत्रे व्यवस्थित जतन करून ठेवलेली असतात. या कागदपत्रांचा उपयोग संशोधनासोबतच शासनाची धोरणे ठरविण्यासाठी देखील केला जातो.

**(अ) राष्ट्रीय पुराभिलेखागार, दिल्ली:** दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारात १८५७ च्या उठावापूर्वीची कागदपत्रे व उठावानंतरची कागदपत्रे असे दोन विभाग आहेत. या पुराभिलेखागारात ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटिश सरकार या दोघांचीही कागदपत्रे आहेत. ती कागदपत्रे मुख्यतः फार्सी, उर्दू, हिंदी, मराठी, संस्कृत, बंगाली इत्यादी भाषांमध्ये आहेत. यापैकी फार्सी भाषेतील काही कागदपत्रांची बृहतसूची 'कॅलेंडर ऑफ पर्शियन कॉरेस्पाँडन्स्' या नावाने ११ खंडात प्रकाशित झाले आहेत. याशिवाय फोर्ट विल्यम कॉरेस्पाँडन्स, काही युरोपीय प्रवासवृत्ते, काही भारतीय भाषांतील कागदपत्रांच्या सूची प्रकाशित झाल्या आहेत. जगातील अनेक दप्तरखान्यातून मिळविलेले भारतविषयक सूक्ष्मपट (सुमारे २५०) या पुराभिलेखागारात आहेत. या

राष्ट्रीय अभिलेखागाराची एक शाखा भोपाळ येथे असून त्यामध्ये पूर्वीच्या मध्य प्रांतातील काही कागद आहेत. याशिवाय जयपूर, पाँडेचरी येथेही राष्ट्रीय अभिलेखागाराची शाखा आहे.

**(ब) मुंबईचे शासकीय पुराभिलेखागार:** मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना तत्कालीन मुंबई प्रांताचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेने सन १८२१ मध्ये झाली असून ते एल्फिन्स्टन कॉलेज इमारतीच्या पश्चिम भागात आहे. अत्यंत संपन्न व व्यवस्थित असणाऱ्या या दप्तरखान्यात ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीपासून स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंतच्या वसाहत कालखंडातील, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्व महत्त्वाची शासकीय कागदपत्रे आहेत. येथील कागदपत्रांचे रेसिडेंटचे दप्तर, सचिवालयातील विविध विभागांचे दप्तर, किरकोळ दप्तर, खाजगी दप्तर, छापील दप्तर असे पाच भागात विभाजन करण्यात आलेले आहे. या पुराभिलेखागारातील सर्वात जुना अभिलेख १६३० चा आहे. मराठ्यांचा, ब्रिटिश कालखंडाचा आणि अन्य विषयाचा इतिहास अभ्यासण्यासाठी मुंबईचे पुराभिलेखागार अत्यंत महत्त्वाचे आहे.

**(क) पुणे येथील शासकीय पुराभिलेखागार:** या पुराभिलेखागाराचा उल्लेख पेशवे दप्तर किंवा एलिनेशन ऑफिस असाही केला जातो. मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रांनी समृद्ध असा हा दप्तरखाना आहे. हा दप्तरखाना पुण्याची किंबहुना महाराष्ट्राची शान आहे. या पुराभिलेखागाराची स्थापना १ सप्टेंबर १८९१ रोजी झाली. या दप्तरातील कागदपत्रांचे महत्त्व ओळखून न्या. म. गो. रानडे यांनी ही कागदपत्रे अभ्यासकांसाठी खुली करावीत यासाठी अनेकदा आंदोलन केले होते. त्यास यश येऊन पुढे जदुनाथ सरकार व रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी पेशवे दप्तराचे ४५ खंड प्रसिद्ध केले. सरकारांनी पुण्याच्या रेसिडेन्सीची कागदपत्रे जमवून त्याचे १५ खंड प्रसिद्ध केले. त्यानंतर डॉ. पी. एम. जोशी व डॉ. व्ही. जी. खोबरेकर यांनी पेशवे दप्तरातील इतर कागदपत्रे प्रसिद्ध केली.

पेशवे दप्तरातील कागदपत्रे मोठ्या प्रमाणात मोडी लिपीत आहेत. मोडी कागदांची दप्तरे ३९ हजार असून त्यातील सर्व कागद तीन कोटींच्यावर आहेत. पेशवे दप्तरात कागदपत्रांचे ३६ विभाग आहेत. त्यामध्ये शाहू दप्तर, रोजकीर्द (रोजच्या खर्चाच्या नोंदी), घडणी (आर्थिक व्यवहाराचे दप्तर), प्रांत अजमास (प्रांताच्या हिशेबाचे कागद), पागा, आंग्रे दप्तर यासारख्या विभागांचा समावेश होतो. पेशवे दप्तरात मराठ्यांच्या पराक्रमाच्या इतिहासाची कागदपत्रे आहेत.

**(ड) कोल्हापूर पुराभिलेखागार:** या पुराभिलेखागारात मराठेकालीन मराठी व फारसी कागदपत्रांचा समावेश अधिक आहे. याचे पारसनिशी, निवडी, चिटणीशी, जमेनिशी, हुजूर खाजगी इत्यादी विभाग आहेत. ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीत असून ती सुमारे तीन हजार रूमालात बांधून ठेवली आहेत. यात कोल्हापूर छत्रपतींचा पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीकर, निजाम, पोर्तुगीज, इंग्रज, कर्नाटकचे पाळेगार यांच्याशी झालेला पत्रव्यवहार आहे. गगनबावडा, विशाळगड, इचलकरंजी, तोरगल, कागल इत्यादी संस्थाने विलीन झाल्यावर त्यांच्याकडील कागदपत्रे या दप्तरखान्यात जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. १८४४ ते १९४९ पर्यंतचे अभिलेख या पुराभिलेखागारात आहेत. शिवाजी महाराजांची १० पत्रे येथे आहेत. या पुराभिलेखागारात विविध खातेनिहाय ४० हजार बस्ते आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या काळातील सर्व कागदपत्रे येथे उपलब्ध

आहेत. कोल्हापूर संस्थानच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कलाविषयक इत्यादी अभ्यासासाठी हे पुराभिलेखागार संशोधकांसाठी खूप मोलाचे आहे.

**(२) खाजगी इतिहास संशोधन संस्थांचे दप्तरखाने:**

शासकीय पुराभिलेखागारांशिवाय काही खाजगी इतिहास संशोधन संस्थांदेखील विशिष्ट काळाच्या अथवा प्रदेशाच्या इतिहास संशोधनाच्या उद्देशाने महत्त्वाची कागदपत्रे व वस्तूंचा संग्रह करतात. भारतात विशेष करून महाराष्ट्रात अश्या अनेक खाजगी संस्था ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करतात. तमिळनाडूतील तंजावरचा सरस्वती महाल संग्रह अत्यंत समृद्ध आहे. मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधीत हजारो मोडी कागदपत्रे या संग्रहात आहेत. मद्रास, कलकत्ता, त्रिवेंद्रम येथेही असे संग्रह आहेत. महाराष्ट्रात भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर यासारख्या खाजगी सरकारमान्य संस्थांची पुराभिलेखागारे आहेत.

**(अ) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे:** भारतात अत्यंत नामवंत असलेल्या पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केली. त्यांनी व अन्य संशोधकांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर फिरून, अनेक ठिकाणची दप्तरे शोधून अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे जमा केली. अनेक कागदपत्रांच्या हाताने नकला बनविल्या. या मंडळात काम करणाऱ्या विविध संशोधकांनी जी कागदपत्रे जमा केली ती त्या त्या संशोधकाच्या नावाने ओळखली जातात. उदा. सिकंदरलाल अत्तार संग्रह, श्री. द. वि. आपटे, प्रा. रा. वि. ओतुरकर, प्रा. ग. ह. खरे संग्रह, चंद्रचूड दप्तर इत्यादी.

भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये मराठ्यांच्या इतिहासाची शिवकालीन व पेशवेकालीन, तसेच विविध घराण्यांची, विविध विषयावरील कागदपत्रे आहेत. उदा. चिंचवड संस्थानची कागदपत्रे, चिपळूणकर घराण्याची कागदपत्रे, इचलकरंजीच्या घोरपडे घराण्याची कागदपत्रे, जेजुरी देवस्थानची कागदपत्रे, ज्योतिषविषयक कागदपत्रे, साधारण ५० बखरी, मंडळाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेली त्रैमासिके, इतिवृत्त, स्वीय ग्रंथमाला, पुरस्कृत ग्रंथमाला इत्यादीचा मोठा संग्रह मंडळाकडे आहे. खाजगी दप्तरखान्याचा विचार करता मंडळाकडील कागदपत्रे, रूमाल व ऐतिहासिक वस्तू यांचा संग्रह इतिहासलेखनासाठी महत्त्वाचा आहे.

**(ब) राजवाडे संशोधन मंदिर, धुळे:** पुण्यातील भारत इतिहास संशोधन मंडळातून बाहेर पडल्यानंतर राजवाडे धुळे येथे गेले व तेथे त्यांनी आपले संशोधनाचे कार्य चालू ठेवले. राजवाड्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ धुळ्यामध्ये 'राजवाडे संशोधन मंदिरा'ची स्थापना करण्यात आली. येथे कागदपत्रांच्या संग्रहाबरोबरच दुर्मिळ नाणी, मूर्ती यांचाही चांगला संग्रह आहे. राजवाडे यांनी गोळा केलेली कागदपत्रे पुढे 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या नावाने प्रसिद्ध करण्यात आली. या मंडळातर्फे 'संशोधक' नावाचे त्रैमासिक प्रसिद्ध करण्यात येते. राजवाडे यांचे सर्व प्रकारचे साहित्य प्रसिद्ध करण्याचा मंडळाचा संकल्प असून त्याचे दोन खंड प्रसिद्ध झाले आहेत. दरवर्षी अनेक कागदपत्रांची भर या मंडळात पडते. खानदेशचा सूक्ष्म इतिहास मिळण्याची त्यामुळे शक्यता निर्माण झाली आहे.

**(क) समर्थ वाग्देवता मंदिर, धुळे:** या संग्रहालयात समर्थ रामदासांच्या संदर्भातील अनेक कागदपत्रे आहेत. संत महंतांच्या संदर्भातील काही जुने ग्रंथ येथे आहेत. रामदासांच्या संदर्भातील कागदपत्रांचे चार खंड प्रसिद्ध झाले आहेत. याबरोबरच औरंगाबाद (एकनाथ संशोधन मंडळ), नागपूर (गोदातीर संशोधन मंडळ), नांदेड आणि नगर येथील खाजगी संस्थांचे दप्तरखाने छोटे असले तरी मोलाचे आहेत. या दप्तरखान्यातून त्या त्या भागातील इतिहासाची माहिती मिळते.

**(३) कॉर्पोरेट पुराभिलेखागर :**

व्यवसायविषयक किंवा औद्योगिक पुराभिलेखागारांना 'कॉर्पोरेट आर्काईव्ह' म्हणून देखील ओळखले जाते. ही पुराभिलेखागारे संबधित व्यवसाय अथवा कंपनीची  कागदपत्रे, नोंदी यांचे व्यवस्थापन आणि जतन करण्याचे काम करतात. व्यवसायाला/कंपनीच्या भविष्यकालीन योजनांच्या नियोजनासाठी व कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या उपयोगासाठी ही पुराभिलेखागारे उपयोगी ठरतात. कंपनीच्या कामाची पारदर्शकता दर्शविण्याच्या हेतूने ही पुराभिलेखागारे सामान्य जनतेसाठी उपलब्ध देखील करून दिली जातात. इंग्लंड, अमेरिका, स्पेन यासारख्या देशात व्यवसायिक/औद्योगिक/कॉर्पोरेट पुराभिलेखागारे आहेत. इंग्लंडमध्ये सन १९३४ पासून 'बिझिनेस अर्काइव्हज' चे कार्यालय औद्योगिक इतिहासविषयक संशोधकांना मार्गदर्शन करते. तसेच औद्योगिक कार्यालयांना संशोधनाला प्रवृत्त करून अभिलेखांचे जतन कसे करावे याचे मार्गदर्शन करते.

अमेरिकेच्या राष्ट्रीय पुराभिलेखागाराचे तीन विभाग आहेत. त्यापैकी पहिला विभाग औद्योगिक अभिलेख विभाग आहे. यामध्ये वाहतूक, मजूर यांच्याबाबतचे नियम-कायदे, औद्योगिक कलह, उत्पादनाशी संबंधित असलेले प्रश्न, वितरण यासंबंधीचा पत्रव्यवहार आहे. तसेच अमेरिकेत 'युनियन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' या औद्योगिक संस्थेने अद्यावत पद्धतीने औद्योगिक कागदपत्रांचे जतन केले आहे. तर व्हर्जिनिआ विद्यापीठाने लोखंड-उद्योगाचा दप्तरखाना उभा केला आहे, मिशीगन विद्यापीठाने लाकूड उद्योग, लुसिआना विद्यापीठाने बागायत उद्योग, न्यू बारी ग्रंथालयाने रेल्वे दप्तर आणि बोस्टन विद्यापीठाने 'बिझिनेस हिस्टॉरिकल रेकॉर्ड' गोळा केली आहेत. भारतामध्ये गोदरेज कंपनीचे स्वत:चे पुराभिलेखागर आहे.

**(४) धार्मिक पुराभिलेखागर:**

धार्मिक परंपरा, धार्मिक संस्था, धार्मिक स्थळ, विशिष्ट धार्मिक पंथ, इत्यादींशी संबधित कागदपत्रांचे जतन आणि संवर्धन करणारे पुराभिलेखागार हे 'धार्मिक पुराभिलेखागार' या प्रकारात मोडतात. ही पुराभिलेखागारे सामान्य जनतेसाठी उपलब्ध असतात किंवा काहीवेळा फक्त संबंधित संस्थेच्या/धर्माच्या सदस्यांनाच उपलब्ध असतात. मठ, मंदिर, चर्च किंवा विहारांतील संग्रहातून मिळणाऱ्या कागदपत्रांतून धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश पडतो. एखाद्या गावातील देवस्थानचा किंवा गावाचा धार्मिक इतिहास अभ्यासताना त्या देवस्थानची व्यवस्था पाहणाऱ्या समितीची सर्व कागदपत्रे, किंवा त्यांना राजदरबारकडून मिळालेल्या देणग्या, जमिनी याची माहिती देवस्थानच्या दप्तरातून मिळते. उदा. कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिराचा इतिहास अभ्यासायचा असेल तर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचा दप्तरखाना उपयुक्त

ठरू शकतो. युरोपातील अनेक चर्चमध्ये कागदपत्रांचे पुराभिलेखागार तयार करून जतन करण्यात आले आहे.

**(५) विद्यापीठ स्तरावरील पुराभिलेखागारे:**

भारतातील व राज्यातील काही विद्यापीठांमध्ये 'पुराभिलेख विभाग' कार्यरत आहेत. विद्यापीठ स्तरावरील पुराभिलेखागारामध्ये कोल्हापूरातील शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभाग (Archival Cell) संशोधकांसाठी महत्त्वाचा आहे. सन १९८८ मध्ये या विभागाची स्थापना झाली असून महाराष्ट्रात केवळ शिवाजी विद्यापीठातच हा विभाग कार्यरत आहे. या विभागास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता आहे. या विभागामध्ये ५०,००० दुर्मिळ ग्रंथ, १०,००० हस्तलिखिते, अन्य ऐतिहासिक कागदपत्रे, मोडी कागदपत्रे, वस्तू, नाणी, नियतकालिके यांचा संग्रह असून संशोधकांसाठी तो खूपच उपयुक्त आहे. हंटर, राष्ट्रवीर, अखंड भारत, दिनमित्र, दिनबंधू, समता, जनता, बहिष्कृत भारत इत्यादी वृत्तपत्राच्या फाईल्स येथे आहेत. या विभागास विविध मान्यवर व्यक्तींनी आपल्याकडील दुर्मिळ ग्रंथांचा, कागदपत्रांचा संग्रह देणगी दिलेला आहे. त्या-त्या देणगीदारांची नावे त्या संग्रहांना दिलेली आहेत. उदा. धनंजय कीर संग्रह, माधवराव बागल संग्रह, खासेराव सावंत संग्रह, इतिहासभूषण बाबासाहेब देशपांडे संग्रह, बॅ. पी. जी. पाटील संग्रह, डॉ. ए. सी. टिकेकर संग्रह, राजवैद्य जगताप संग्रह (कोल्हापूरच्या राजघराण्याचे राजवैद्य यांचा आयुर्वेदावरील ग्रंथांचा संग्रह), वाकसकर संग्रह (बडोद्याचे इतिहासकार), कॉम्रेड गोविंदराव पानसरे संग्रह. येथील कागदपत्रांवरून कोल्हापूरच्या इतिहासाची, ब्राह्मणेतर चळवळीची माहिती मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या संग्रहातदेखील काही हस्तलिखिते आहेत.

**(६) महाविद्यालयीन स्तरावरील पुराभिलेखागारे:**

काही महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये त्यांची अशी स्वत:ची पुराभिलेखागारे आहेत. उदा. ब्रिटिशकाळात स्थापन झालेल्या पुण्याच्या डेक्कन कॉलेजचा ऐतिहासिक संग्रह व अभिलेखागारही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ही संस्था प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती यांचे प्रगत अध्ययन केंद्र म्हणून ओळखली जाते. येथे मराठ्यांच्या इतिहासाचे एक मोठे संग्रहालय व दप्तरखाना आहे. या संग्रहालयात १०१ मोडी कागदपत्रांचे रूमाल आहेत. त्यामध्ये १७५० ते १८५० या काळातील कागदपत्रे आहेत. शिवाय विविध भाषातील भूर्जपत्रे, हस्तलिखिते, दानपट, ताम्रपट, दुर्मिळ ग्रंथ, नकाशे, चित्रे, मायक्रोफिल्मस् आहेत. नाना फडणवीसाचा मेणवली येथील दप्तराचा काही भाग आहे. धावडशी व ग्वाल्हेर येथील पत्रसंग्रह, बाळाजीपंत नातू याची ११ पत्रे, खर्ड्याच्या लढाईची ६८२ पत्रे, हरिपंत फडके यांची अस्सल ६८४ पत्रे, नागपूरकर भोसले यांच्या संदर्भातील ५७ कागदपत्रांच्या फाईल्स, दौलतराव शिंदे यांच्या संदर्भातील १७९४ ते १७९८ या काळातील ४४३ पत्रे, पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाची ८१५ कागदपत्रे या दप्तरखान्यात आहेत. त्याचबरोबर परराष्ट्र व्यवहारासंबंधी काही कागदपत्रे आहेत. त्यामध्ये पोर्तुगीजांची १०, फ्रेचांची ६०, इंग्रजांची ७७५ कागदपत्रे आहेत.

डेक्कन कॉलेजमधील कागदपत्रांवरून १८ व्या शतकातील शेवटच्या व १९ व्या शतकातील सुरूवातीच्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक घडामोडींची माहिती मिळते. तसेच केतकर, मोहिते, घाटगे, निंबाळकर, खेमसावंत, महाडिक, प्रतिनिधी, चिकुर्डेकर, देशमुख, होळकर इत्यादी राजघराण्यातील कागदपत्रे या संग्रहालयात आहेत. बखरी, प्रवास वर्णने, भूगोलविषयक पुस्तके, १४ व्या व १५ व्या शतकातील दुर्मिळ अशी ४० पुस्तके आहेत. रंगीत चित्रे व छायाचित्रे १२५ आहेत. नाण्यांचा संग्रह, ताम्रपट, सनदा आहेत. अशाप्रकारे डेक्कन कॉलेजचा दप्तरखाना व संग्रहालय अत्यंत संपन्न असून इतिहास संशोधकांना त्याचा संशोधनासाठी खूप उपयोग होतो.

**(७) फिल्म संग्रहालय** (Film Archives) :

चित्रपट, माहितीपट, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे संकलन व जतन करणे यासारख्या बाबी फिल्म संग्रहालयामार्फत केल्या जातात. 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म अर्काइव्हज' मध्ये ७७ देशातील १५० पेक्षा जास्त संस्था समाविष्ट आहेत. भारताच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला ५ डिसेंबर २०१८ रोजी देश-विदेशातील विविध विषयांवरील ७० वर्षापूर्वीच्या २२०० लघुपटाचा दुर्मीळ ठेवा मिळाला आहे.

- **पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे (रेकॉर्डचे) प्रकार:**

पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वह्या, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे जतन करून ठेवलेले असते. ही साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

**(१) शासकीय कागदपत्रे :** शासकीय कागदपत्रे ही इतिहासाच्या अभ्यासाची अस्सल साधने असतात. यामध्ये त्या त्या काळात सत्तेवर असलेल्या राजा, राजवंश, राष्ट्रपती, पंतप्रधान यांनी केलेला पत्रव्यवहार, राज्यकारभार यासंबंधी कागदपत्रे असतात. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात किंवा नंतर ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात नव्या प्रकारची प्रशासन व्यवस्था निर्माण झाली. ब्रिटिशांनी सरकारी कागदपत्रे रेकॉर्ड रूममध्ये सुरक्षित ठेवली, केंद्रीय पुराभिलेखागार उभारले, कागदपत्रांच्या गुप्ततेचा कायदा केला. या कायद्यानुसार सरकारी कागदपत्रे तीस वर्षेपर्यंत गुप्त व सरकारी मानली जातात. तीस वर्षानंतर या कागदपत्रांची छाननी होते. महत्वाची ऐतिहासिक कागदपत्रे प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय, कारागृहे, डी. एस. पी. कार्यालय, जिल्हा पातळीवरील शासकीय कार्यालयातून प्रांत सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या अभिलेखागारात पाठविली जातात. त्या कागदपत्रांचा इतिहासलेखनासाठी उपयोग होतो. १७ व्या शतकापासून शासकीय पुराभिलेखागारात ही कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळातील महत्त्वाची सरकारी कागदपत्रे, ब्रिटिशांच्या विविध योजना, निर्णय याविषयीच्या मूळ हस्तलिलिखत फाईल्स दिल्लीच्या राष्ट्रीय पुराभिलेखागारात व लंडन येथील इंडिया ऑफिस संग्रहालयात आहेत. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या फाईल्सही येथे आहेत. त्याबरोबरच १७ व्या शतकापासून ते १९ व्या

शतकापर्यंतच्या भारतातील वाटचालीची असंख्य कागदपत्रे येथे आहेत. वा. सी. बेंद्रे यांनी लंडनमधील कागदपत्रांच्या आधारेच छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडीत कागदपत्रांचे पुनर्मूल्यांकन केले.

याशिवाय भारतातील प्रत्येक राज्याच्या राजधानीत पुराभिलेखागार आहेत व 'पुराभिलेख संचालनालय' नावाचे स्वतंत्र खाते आहे. मुंबईचे राज्य पुराभिलेखागार, तसेच मद्रास व कलकत्ता येथील पुराभिलेखागारे आधुनिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. कोल्हापूर संस्थानचा किंवा संस्थानातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इतिहासाचा अभ्यास करताना, संस्थानातील एखाद्या गावाचा इतिहास अभ्यासताना कोल्हापूर पुराभिलेखागारातील कागदपत्रे उदा. जिल्हा गॅझेट, प्रशासकीय अहवाल, हुजूर ठराव बुक इत्यादी कागदपत्रे अत्यंत उपयुक्त ठरतात.

**(२) राज्यकारभारविषयक पत्रे :** कोणत्याही राज्य किंवा राष्ट्राचे प्रशासन चालवत असताना वरिष्ठ अधिकारी हे कनिष्ठ अधिकाऱ्यांना पत्रे पाठवित असतात, राज्यकारभारविषयक मार्गदर्शन करीत असतात. तसेच कनिष्ठ अधिकारी देखील आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना राज्यकारभाराचे अहवाल पाठवित असतात. अशा कागदपत्रांतून मिळणारी माहिती राज्यकारभाराची दिशा स्पष्ट करते व ती अतिशय विश्वसनीय असते.

**(३) खाजगी संस्था व संघटनांची कागदपत्रे :** एखाद्या खाजगी संस्थेचा किंवा संघटनेचा, त्या संस्थेतील एखाद्या व्यक्तीच्या कार्याचा इतिहास अभ्यासताना त्या त्या संस्थेचा दप्तरखाना किंवा कार्यालयीन कामाकाजाचे दप्तर अत्यंत उपयुक्त ठरते. त्या-त्या संस्थांचे वार्षिक अहवाल, जमाखर्चाच्या नोंदी, पत्रव्यवहार, चरित्रग्रंथ इत्यादी कागदपत्रे उपयुक्त ठरतात.

**(४) धार्मिक सनदा, दानपत्रे :** राज्यकर्त्यांकडून दिल्या जाणाऱ्या धार्मिक सनदांतून त्यांचे धार्मिक धोरण समजते. एखादा प्रदेश जिंकल्यानंतर तेथील जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अथवा एखादया आनंदाच्या प्रसंगी साधू, संत, मठ, मंदिरे, मशिदी यांना धार्मिक सनदा दिल्या जात होत्या. या सनदांमधून राज्यकर्त्यांच्या धार्मिक दृष्टीकोनाबरोबरच तत्कालीन सामाजिक-धार्मिक, सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. उदा. कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक देवस्थानच्या दिवाबत्तीची सोय करण्यासाठी दिलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून देवस्थानचा खर्च वजा जाता राहिलेले उत्पन्न शैक्षणिक कार्यासाठी वापरण्याचा आदेश दिलेला दिसतो. याची माहिती कोल्हापूर पुराभिलेखागारात मिळते. पेशवे काळातील काशी, मथुरा, त्र्यंबकेश्वर, नाशिक, वाशी, पंढरपूर इ. धार्मिक स्थळांचा पत्रव्यवहार पेशवे दप्तरात उपलब्ध आहे. अशा पत्रव्यवहारातून त्या धार्मिक स्थळाचे महत्त्व, जतन, आर्थिक व्यवहार इत्यादीची माहिती मिळते. पेशव्यांनी मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण पुरोहितांना धार्मिक सनदा व दानपत्रे दिली आहेत, ती इतिहासाची अस्सल साधने म्हणून उपयोगी आहेत.

**(५) जमाखर्चाच्या नोंदी :** खाजगी किंवा स्वयंसेवी संस्था, विविध संस्थानिक, काही इतिहासप्रसिद्ध घराणी, राज्ये किंवा राष्ट्रे यांची जमाखर्चाची कागदपत्रे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्वाची ठरतात. विविध शैक्षणिक, सामाजिक संस्था, नगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांच्या जमाखर्चाच्या नोंदी त्या त्या संस्थांचा अभ्यास करताना प्राथमिक साधन म्हणून खूपच उपयुक्त ठरतात. जमाखर्चाची कागदपत्रे दररोज

समकालीन पुराव्याच्या आधारे तयार होत असतात व त्यात बदल करता येत नाही. या कागदपत्रांतून सरकारचा सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक बाबीवर होणारा खर्च व त्यासंबंधी सरकारचे धोरण काय होते याची कल्पना येते.

**(६) वृत्तपत्रे:** पुराभिलेखागारांमध्ये काही वृत्तपत्रांच्या फाईल्स करून ठेवलेल्या असतात. संशोधकांना त्या उपयुक्त ठरतात. आधुनिक कालखंडाचा अभ्यास करीत असताना वृत्तपत्रे साधन म्हणून उपयोगी पडतात. वृत्तपत्रांतातून त्या त्या ठिकाणची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक जीवन यांची, तसेच एखादी व्यक्ती किंवा संस्था यांची माहिती मिळते. जेव्हा अन्य प्राथमिक साधने उपलब्ध होत नाहीत, तेव्हा वृत्तपत्रांतून मिळणारी माहिती उपयुक्त ठरते. परंतु वृत्तपत्रांतील माहिती ही काही वेळा एकांगी, अतिशयोक्तीपूर्ण असू शकते. त्यामुळे अनेक वृत्तपत्रांतील माहिती घेऊन, अन्य साधनांतून त्याची सत्यता तपासून इतिहासलेखन करावे लागते. उदा. कोल्हापूर संस्थानच्या उत्तरार्धाचा अभ्यास करताना 'हंटर', 'विजयी मराठा', 'गरूड', 'समाज', 'सत्यवादी', 'पुढारी' यासारखी तत्कालीन वृत्तपत्रे अत्यंत उपयुक्त ठरतात. यापैकी काही वृत्तपत्रांच्या फाईल शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभाग' येथे आहेत, कोल्हापूर पुराभिलेखागारात १९७० नंतरच्या दैनिक पुढारीच्या फाईल आहेत. मुंबई पुराभिलेखागारात अनेक दुर्मीळ मराठी, हिंदी व इंग्रजी वृत्तपत्रे आहेत. यामध्ये 'बॉम्बे समाचार' (१८३१), 'दर्पण' (१८३२), 'मॉर्निंग स्टार्ट' (१८३६), 'बॉम्बे कुरिअर' (१७९७-१८४६), 'हरिजन' (१९४२) यासारख्या वृत्तपत्रांचा समावेश होतो.

**(७) नकाशे:** भारतात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ नकाशे काढण्याबाबत राज्यकर्ते गंभीर नव्हते. संपूर्ण देशाचा किंवा प्रांताचा नकाशा तयार न करता आवश्यक तेवढाच नकाशा तयार केला जात असे. त्यामध्ये नमूद केलेल्या ठिकाणांचे अंतर न लिहिता केवळ दिशा दर्शविण्याचा प्रयत्न केलेला असे. नकाशाच्या अभ्यासावरून गतकाळातील लढायांची व भौगोलिक स्थितीची माहिती मिळते. काही पुराभिलेखागारात लहान मोठे नकाशे असतात. त्यांचाही इतिहास संशोधनासाठी उपयोग होतो. मुंबई पुराभिलेखागारात सुमारे ६ हजार नकाशे आहेत. दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारात १५ हजार नकाशे आहेत.

**(८) धार्मिक ग्रंथ:** पुराभिलेख साधनांपैकी सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे धार्मिक ग्रंथ होत. 'ऋग्वेद' हा सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. वैदिक वाङ्मय, रामायण, महाभारत ही महाकाव्ये, उपनिषदे, ब्राह्मण्ये, आरण्यके हे ग्रंथ, दीपवंश व महावंश ही बौद्ध महाकाव्ये हे महत्त्वाचे पुराभिलेखीय पुरावे आहेत. यानंतरच्या काळातही अनेक धार्मिक ग्रंथांचे लेखन झाले. या सर्व ग्रंथातून विविध धर्म व पंथाची वाटचाल रेखाटली आहे. अजूनही हजारो ग्रंथ मठ-मंदिरांमध्ये दडलेले आहेत. त्या सर्वातून अज्ञात बाबींवर प्रकाश पडू शकतो. हे सर्व पुरावे पुराभिलेखागारात उपलब्ध होतात.

**(९) व्यक्तिगत पत्रव्यवहार :** भारतात होऊन गेलेल्या विविध राज्यकर्त्यांचा त्यांच्या जहागिरदार, वतनदारांशी झालेला पत्रव्यवहार हा हस्तलिखित स्वरूपातील सर्वात विश्वसनीय पुरावा होय. मराठा, रजपूत

सरदारांच्या वाड्यात, सामान्य शिपायांकडे, किल्लयांमध्ये, गढीमध्ये हा पत्रव्यवहार उपलब्ध झाला व अजूनही उपलब्ध होऊ शकतो. त्यातून तत्कालीन परिस्थिती, लढाया यांची माहिती मिळते. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे मराठ्यांच्या इतिहासाचा अनमोल असा पुराभिलेखीय पुरावा आहे.

ब्रिटिश कालखंडातील निरनिराळ्या गव्हर्नर जनरल व व्हॉईसरॉयचा पत्रव्यवहार लंडन येथील इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयात ठेवलेला आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अनेक बाबींची माहिती लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. आंबेडकर यांच्या पत्रव्यवहारातून मिळते. मोठमोठ्या नेत्यांची पत्रे राष्ट्रीय पुराभिलेखागारात अभ्यासण्यास मिळतात. तथापि, सामान्य व्यक्तिंचे चळवळीतील योगदान त्या व्यक्तीच्या संग्रही असणाऱ्या कागदपत्रांतून मिळू शकते. हैद्राबादच्या कॉंग्रेस कार्यालयाने, औरंगाबादच्या स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेने अशा व्यक्तींची कागदपत्रे संकलीत केली आहेत. ती कागदपत्रे इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात. याशिवाय प्राचीन काळापासून आजपर्यंत लिहिण्यात आलेले विविध चरित्रग्रंथ, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, बखर वाड्मय, नाटक, कथा, कादंबरी, तवारिखा, करिना, शकावल्या, तह किंवा करार, ताम्रपट, चित्रे यासारखी साधने पुराभिलेखागारामध्ये आढळतात. ही सर्व साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

- **स्वयं अध्ययन प्रश्न २**

**रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

१. राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाची कागदपत्रे, नोंदी जपणे हे ............ पुराभिलेखागारांचे मुख्य उद्दिष्ट असते.

(अ) खाजगी (ब) स्थानिक (क) प्रांतीय (ड) राष्ट्रीय

२. ............ हे खाजगी संस्थांच्या पुराभिलेखागाराचे उदाहरण आहे.

(अ) पेशवा दफ्तर (ब) मुंबई पुराभिलेखागर

(क) कोल्हापूर पुराभिलेखागर (ड) राजवाडे संशोधन मंदिर, धुळे

३. भारतातील व राज्यातील काही विद्यापीठांमध्ये ............ कार्यरत आहेत.

(अ) पुराभिलेख विभाग (ब) जुनी कागदपत्रे विभाग

(क) पोथी विभाग (ड) शिलालेख विभाग

४. धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातर्फे ............ हे त्रैमासिक प्रसिद्ध करण्यात येते.

(अ) मराठ्यांच्या इतिहासाची साधने (ब) संशोधक

(क) इंडियन हिस्ट्री जर्नल (ड) इतिहास आणि संस्कृती

५. ............ च्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील 'दुर्मिळ ग्रंथ विभाग' (Archival Cell) ची स्थापना १९८८ मध्ये झाली.

(अ) मुंबई विद्यापीठ, मुंबई (ब) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

(क) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे (ड) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## २.२.३ डिजिटल ऑर्काइव्हची संकल्पना

- **डिजिटल ऑर्काइव्ह म्हणजे काय ?**

कोणत्याही प्रकारच्या इतिहास संशोधनासाठी ऐतिहासिक साधने ही संशोधकांना उपलब्ध असणे आवश्यक असते. इतिहास संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते. सबब, प्रत्येक इतिहास संशोधकास मूळ साधनांचा अभ्यास आवश्यक असतो. इतिहासाची मूळ साधने ही वर्षानुवर्षे संशोधकांच्या अनेक पिढ्यांना उपलब्ध रहावीत म्हणून त्याचे जतन करणे आवश्यक ठरते. सदर आवश्यकतेतून 'पुराभिलेखागार' ची संकल्पना विकसित झाली. इतिहास संशोधनासाठी लागणारी दुर्मिळ प्राथमिक साधने उदा. जुनी हस्तलिखिते, पत्रव्यवहार, ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी दफ्तर, पोथ्या, चोपड्या, वृतपत्रे, मासिके, दुर्मिळ ध्वनीमुद्रिते आणि फिल्म्स इत्यादींच्या संग्रह आणि मुख्यत: त्यांचे संरक्षण करण्याचे काम 'पुराभिलेखागार' करत असतात. ही पुराभिलेखागारे शासकीय अथवा खाजगी मालकीची असतात. पुराभिलेखागरांच्या मध्ये देखील ग्रंथालयांच्या प्रमाणे दुर्मिळ ग्रंथ असतात. मात्र, ग्रंथालयाचे प्राथमिक कार्य हे उपयोगासाठी ग्रंथ उपलब्ध करून देणे हे असते. मात्र, पुराभिलेखागाराचे प्राथमिक कार्य त्या दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण करणे हे असते.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे. माहितीचा साठा करण्याच्या सर्व्हरच्या क्षमतेत प्रचंड वाढ झाली आहे. इंटरनेटमुळे जगभरातील सर्व्हर आणि संगणक हे एकमेकांशी जोडले गेले आहेत. त्याचप्रमाणे इंटरनेटद्वारे माहिती अपलोड आणि डाऊनलोड करण्याच्या वेग देखील वाढला आहे. त्यामुळे डिजिटल माहितीचे प्रमाण देखील वेगाने वाढत आहे. ज्या प्रमाणे पुराभिलेखागार आणि ग्रंथालय यांच्या ग्रंथांचे संरक्षणाला दिलेल्या प्राथमिकतेमुळे मोठा फरक असतो, तितका मोठा फरक डिजिटल ऑर्काइव्ह आणि डिजिटल लायब्ररी यांच्यात असत नाही. डिजिटल माहिती ही ग्रंथ अथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही, त्यामुळे त्यांच्या भौतिक संरक्षणाची गरज नसते.

डिजिटल लायब्ररी ही डिजिटल माहिती एकत्र करते आणि ती माहिती लोकांना उपलब्ध करून देते. डिजिटल लायब्ररीद्वारे ही गोळा केलेल्या माहितीचा साठा आणि त्या माहितीची उपलब्धता दीर्घकाळासाठी अस्तित्वात राहील की नाही याची खात्री देता येत नाही. माहिती साठवण्याच्या व्यवस्था बंद पडूच नये अशी व्यवस्था डिजिटल लायब्ररीद्वारे केली असते किंवा नसते.

याउलट, डिजिटल ऑर्काइव्ह स्थापन करण्यामागे आणि त्यांची जपवणूक करण्यामागे दोन उद्देश असतात. पहिला उद्देश हा मौल्यवान डिजिटल माहितीचा कोणत्या ही प्रकारे ऱ्हास न होऊ देता भावी पिढ्यांसाठी संरक्षित करणे. तर दुसरा उद्देश हा सुव्यवस्थितरित्या निर्माण केलेल्या डिजिटल ऑर्काइव्हमध्ये कोणत्याही पद्धतीचा तांत्रिक दोष निर्माण होऊ नये याची उपाययोजना केलेली असते.

डिजिटल माहितीचा साठा करणे आणि त्यांचे संरक्षण या कामासोबतच कच्च्या स्वरूपातील अथवा प्राथमिक स्वरूपातील डिजिटल माहितीचा अन्वयार्थ लावण्याची सोय देखील डिजिटल ऑर्काइव्हमध्ये केली

जाते. डिजिटल लायब्ररी या डिजिटल ऑर्काइव्हमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. कोणती माहिती गोळा करायची, कोणती माहिती साठवायची, कोणती माहिती दीर्घकाळासाठी संरक्षित करायची आणि कोणती माहिती सोडून द्यायची या गोष्टी ठरवताना डिजिटल लायब्ररी या डिजिटल ऑर्काइव्ह बनवताना मदत करू शकतात. कोणती माहिती निवडायची आणि कोणती सोडून द्यायची याचा निर्णय अतिशय कौशल्याने घ्यावा लागतो. डिजिटल ऑर्काइव्ह नेमके कोणत्या उद्देशासाठी बनवले आहे, त्यावरून कोणती माहिती तेथे साठवायची याचा निर्णय घेतला जातो.

डिजिटल ऑर्काइव्हमध्ये पुराभिलेखागाराप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रुपांतर केले जाते. याद्वारे त्या ऐतिहासिक कागदपत्रांचे आणि ऐतिहासिक वस्तूंचे डिजिटल माहितीच्या रुपात जतन करता येते. डिजिटल ऑर्काइव्हमध्ये जतन केलेली माहिती इतिहास संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध करून दिली जाते.

- **डिजिटल ऑर्काइव्हचे प्रकार आणि स्वरूप :**

**डिजिटल ऑर्काइव्ह हे मुख्यत :** तीन प्रकारच्या गटांमध्ये विभागले जातात. पहिल्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागारे, ग्रंथालये, विद्यापीठे, संग्रहालये, शासकीय संस्था (स्थानिक, प्रादेशिक अथवा राष्ट्रीय), इतिहासविषयक अथवा सांस्कृतिक मंडळ इत्यादींच्या द्वारे चालवले. या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह बहुतांश मोफत वापरासाठी उपलब्ध असतात किंवा नाममात्र शुल्क आकारले जाते. नवी दिल्ली येथील भारताच्या नॅशनल ऑर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी केलेला प्रकल्प या गटात मोडतो. 'अभिलेख पटल' या नावाने सुरु केलेल्या वेबसाईटवर नॅशनल ऑर्काइव्हद्वारा डिजिटलाईझ केलेले ऐतिहासिक दस्तावेज काही शुल्क भरून संशोधकांसाठी उपलब्ध केले जाते. अशाच प्रकारचे डिजिटल ऑर्काइव्ह पुणे येथील भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूटद्वारे देखील सुरु करण्यात आले आहे.

दुसऱ्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे कोणत्यातरी एका व्यक्तीद्वारे, लोकांच्या छोट्या समूहाद्वारे, स्वयंसेवी संस्थाद्वारे निर्माण केले जातात. या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे विशिष्ट आणि सामुहिक गरजेनुसार बनवले जातात. उदा. एखाद्या ऐतिहासिक घराण्याच्या किंवा एखाद्या संशोधकाच्या किंवा संशोधन संस्थेच्या संग्रहातील दस्तावेज हे डिजिटल ऑर्काइव्हच्या रुपात जतन केले जातात. महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातील ऐतिहासिक दस्तावेज हे डिजिटलाईझ करून मंडळाच्या वेबसाईटवर संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तिसऱ्या गटातील डिजिटल ऑर्काइव्ह हे प्रकाशक अथवा व्यवसायिक संस्थांच्याद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना आणि ग्रंथालयांना सशुल्क उपलब्ध करून दिले जातात. अशा प्रकारचे छोट्या स्वरूपातील डिजिटल ऑर्काइव्ह हे व्यक्तिगत संशोधकांना उपलब्ध करून दिले जात असले तरी मोठ्या प्रमाणातील ऑर्काइव्ह हे फक्त विद्यापीठे, ग्रंथालये तत्सम संस्था यांनाच उपलब्ध करून दिले जातात. या परिस्थितीत संशोधक व्यक्ती विद्यापीठ, ग्रंथालय तत्सम संस्थांच्या माध्यमातून ऑर्काइव्ह वापरू शकते.

डिजिटल ऑर्काइव्हमुळे दुर्मिळ ग्रंथ आणि दस्तावेजांचे खात्रीलायक रित्या जतन करता येते. सुव्यवस्थित पद्धतीने आयोजित डिजिटल ऑर्काइव्ह संशोधकाला अत्यंत उपयोगी ठरते. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संशोधकाला होणाऱ्या फायद्याचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे डिजिटल ऑर्काइव्ह होय.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**रिकाम्या जागा भरण्यासाठी योग्य पर्याय निवडा.**

(१) ............. च्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर खूप वाढला आहे.

(अ) वृत्तपत्र (ब) भ्रमणध्वनी (क) संगणक (ड) माहिती तंत्रज्ञान

(२) डिजिटल माहिती ही ऱ्हास न होऊ देता ............. साठी संरक्षित केली जाते.

(अ) भावी पिढी (ब) जनता (क) राज्यकर्ते (ड) वाचक

(३) भारताच्या नॅशनल ऑर्काइव्हने डिजिटल स्वरुपात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्यासाठी ............. हा प्रकल्प सुरु केला आहे.

(अ) अभिलेख (ब) इतिहास पटल (क) पुराभिलेख (ड) अभिलेख पटल

(४) धुळे येथील कोणत्या संस्थेत डिजिटल ऑर्काइव्ह सुरु करण्यात आले आहे?

(अ) भारत इतिहास संशोधक मंडळ (ब) राजवाडे संशोधन मंडळ

(क) भांडारकर संस्था (ड) मराठी संशोधन मंडळ

(५) डिजिटल ऑर्काइव्ह हे मुख्यत: ............. प्रकारच्या गटांमध्ये विभागले जातात.

(अ) दोन (ब) तीन (क) चार (ड) पाच

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **पुराभिलेखागार:** जुने दस्तऐवज किंवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण
- **अभिलेख :** दस्तऐवज किंवा कागदपत्रे
- **पेशवे दप्तर:** पुणे येथील शासकीय पुराभिलेखागारास पेशवे दप्तर संबोधले जाते.
- **रेसिडेंट:** ब्रिटिश प्रतिनिधी
- **मोडी लिपी :** मराठी भाषेतील मजकूर जलद गतीने लिहिण्यासाठी १२ व्या शतकापासून २० व्या शतकापर्यंत वापरात असलेली लिपी.
- **भूर्जपत्रे:** 'भूर्ज' या वृक्षाच्या सालीवर केलेले लिखाण.

- **सूक्ष्मपट:** ३५ मिमी. फिल्मवर पाहिजे असलेल्या कागदपत्रांची छायाचित्रे घेतली जातात व सूक्ष्मपटवाचक यंत्राच्या साहाय्याने ती वाचली जातात. अन्य पुराभिलेखागारातील पाहिजे असलेली कागदपत्रे सूक्ष्मपटाच्या सहाय्याने आणली जातात.
- **डिजीटल पुराभिलेखागार :** मौल्यवान डिजिटल माहितीचे भावी पिढ्यांकरिता जतन करणारी व्यवस्था
- **मायक्रोफिल्मस् :** छोट्या फिल्मच्या स्वरूपात संरक्षित कागदपत्रे

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्न १**

  १. (ड) कलकत्ता  २. (अ) दिल्ली  ३. (क) बिकानेर

  ४. (अ) महाराष्ट्र  ५. (ब) पुराभिलेखागार

- **स्वयं अध्ययन प्रश्न २**

  १. (ड) राष्ट्रीय  २. (ड) राजवाडे संशोधन मंदिर, धुळे  ३. (अ) पुराभिलेख विभाग

  ४. (ब) संशोधक  ५. (ब) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न ३**

  (१) (ड) माहिती तंत्रज्ञान (२) (अ) भावी पिढी (३) (ड) अभिलेख पटल

  (४) (ब) राजवाडे संशोधन मंडळ  (५) (ब) तीन

## २.५ सारांश

शास्त्रशुद्ध इतिहासलेखनासाठी प्राथमिक व अव्वल दर्जाची संदर्भ साधने अत्यंत महत्त्वाची असतात व ती मिळण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय. पुराभिलेखागारामध्ये हस्तलिखिते, जुने ग्रंथ, राजसत्तांची कागदपत्रे, हिशेबाच्या वह्या, शासकीय कागदपत्रे, आत्मचरित्रे, अहवाल, गॅझेट, वृत्तपत्रे इत्यादी साधनांचे जतन करून ठेवलेले असते. ही साधने इतिहास संशोधनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

पुराभिलेखागाराचे शासकीय पुराभिलेखागारे, खाजगी संस्थांची पुराभिलेखागारे, विद्यापीठ किंवा महाविद्यालयांमधील पुराभिलेखागारे, मठ, मंदिर या ठिकाणी असणारी पुराभिलेखागारे, औद्योगिक पुराभिलेखागारे, डिजिटल पुराभिलेखागारे इत्यादी विविध प्रकार आहेत. राष्ट्राचे ऐतिहासिक काळातील जीवन, समाजपद्धती, आर्थिक व्यवहार, शिक्षण, धार्मिक स्थिती, औद्योगिक प्रगती अशा अनेक विषयांची माहिती या विविध पुराभिलेखागारांतून मिळते.

सध्याच्या काळात कोणत्याही विषयाशी संबंधित माहिती महाजालाद्वारा (इंटरनेटद्वारा) उपलब्ध होत असली तरी जुन्या कागदपत्रांचे जतन करणारी पुराभिलेखागारे व त्यातील विविध स्वरूपाची साधने आजही

तितकीच महत्त्वाची आहेत. अभिलेखागारात संग्रहीत केलेल्या साधानांचा अभ्यास केल्याशिवाय प्रशासनाची पुढील वाटचाल करणे अशक्य आहे. शासकीय अधिकारी, संशोधक, सामान्य व्यक्ती यांच्या दृष्टीने पुराभिलेखीय साधने अत्यंत महत्त्वाची ठरतात.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

(अ) टिपा लिहा.

१. पुराभिलेखागाराचे प्रकार

२. पुराभिलेखागाराचा अर्थ

३. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील पुराभिलेखागार

४. शासकीय कागदपत्रे

५. डिजिटल ऑर्काइव्ह

(ब) सविस्तर उत्तरे लिहा.

१. पुराभिलेखागाराचा अर्थ सांगून त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

२. पुराभिलेखागारातील कागदपत्रांचे प्रकार लिहा.

३. खाजगी संस्थांच्या पुराभिलेखागारांची माहिती लिहा

४. डिजिटल ऑर्काइव्हची संकल्पना स्पष्ट करून त्याचे प्रकार लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्र : लेखनपरंपरा, संशोधन आणि अध्यापन, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, पहिली आवृत्ती, २००६.

२. पेडणेकर, रामचंद्र, महाराष्ट्र पुरालेखागार अभिलेखाची मार्गदर्शिका, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२.

३. खोबरेकर, वि. गो., महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९८८.

४. डॉ. उज्वला भिरूड (नेहेते) आणि डॉ. पंकजकुमार प्रेमसागर, पुराभिलेखागार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१९.

५. धाटावकर, भास्कर, महाराष्ट्रातील शासकीय पुरालेखागारांची निर्मिती आणि कार्य, चेतन प्रकाशन, मुंबई, २०१०.

६. राजदेरकर, सुहास इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.

७. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील शफीक देसाई यांच्याकडून दि. ०८.०६.२०२१ रोजी मिळालेली माहिती.

८. मराठी विश्वकोश – https:/vishwakosh.marathi.gov.in

९. शिंदे, सुखदेव व इतर इतिहासलेखनशास्त्र, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५.

१०. गाठाळ साहेबराव, इतिहासलेखनशास्त्र व इतिहासकार, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९९.

११. मुल्ला, जुबेदा व खोत नमिता, अभिलेखांचे वर्गीकरण, नवज्योत इंटरनॅशनल इंटरडिसीप्लीनरी रिसर्च जर्नल, (सं.) रवींद्र भणगे, हौसा पब्लिकेशन, कोल्हापूर

(https://www.researchgate.net/publication /343182265)

❑❑❑

# घटक ३
# क्षेत्र भेट पद्धती
(Field Methods)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ सर्वेक्षण (Survey)

    ३.२.२ प्रश्नावली (Questionnaire)

    ३.२.३ मुलाखत तंत्र: (Interview)

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वय-अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनसाठीची पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

१. ऐतिहासिक संदर्भ साधनांच्या क्षेत्रीय पद्धती सांगता येतील.

२. क्षेत्रीय पद्धतीचे प्रकार व स्वरूप स्पष्ट करता येईल.

३. क्षेत्रीय पद्धतीने कशा प्रकारे संदर्भ प्राप्त करता येतील याची माहिती होईल.

४. इतिहास लेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण, प्रश्नावली याची पद्धती काय आहे ते समजून घेता येईल.

५. इतिहास लेखांनाचे एक माध्यम म्हणून मुलाखत तंत्राचे आकलन होईल.

## ३.१ प्रस्तावना :

इतिहासलेखन प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय लिहिलेल्या कोणत्याही इतिहास ग्रंथाला 'इतिहास' ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. कोणत्याही राष्ट्राचा अथवा कोणत्याही कालखंडाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लिहिण्यासाठी पुरावा म्हणून संदर्भ साधनांचा आधार द्यावा लागतो. इतिहास लेखनासाठी वापरलेल्या पुराव्यांना साधन, पुरावा

अथवा संदर्भ असे म्हणतात. एखादा लेखक स्वतःच्या कल्पना शक्तीच्या जोरावर ललित लेखन करू शकतो. कारण तिथे सत्य घटनांचा प्रश्न नसतो. इतिहासलेखनास मात्र हा नियम लागू होत नाही. कारण 'इतिहासलेखन म्हणजे मानवी जीवनात घडून गेलेल्या सत्य घटना असतात.' कल्पनाशक्तीच्या जोरावर त्या लिहिल्या जाऊ शकत नाहीत अथवा लिहिल्यास तो इतिहास होऊ शकत नाही. एखादी घटना जशी घडली तशीच लिहिण्यासाठी पुरावा द्यावा लागतो. म्हणून इतिहासलेखनात संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

इतिहासलेखन संपूर्णतः भूतकालीन अवशेष व साधनांच्यावर आधारित असते. कारण इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. इतिहासामधून म्हणजेच संदर्भ साधनांच्यामधून आपणास भूतकालीन घडामोडीची सुसंगतवार माहिती मिळते. ऐतिहासिक संशोधनांचे मूल्य त्या संशोधकाने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत त्याच्यावर अवलंबून असते. अस्सल/प्राथमिक साधने हीच इतिहासलेखनांची पायाभूत साधने असतात. म्हणून इतिहासामध्ये 'No Documents, No History' असे म्हटले जाते. संदर्भ साधनाशिवाय इतिहास म्हणजे एक प्रकारची कथा असे मानले जाते. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये आपण इतिहासलेखनासाठी आवश्यक वाङ्मययीन व पुरातत्वीय साधने, साधंनांचे प्रकार, स्वरूप, इत्यादी संबंधी अभ्यास करणार आहोत. त्याच बरोबर सदर घटकामध्ये साधनांचे संकलन कशा प्रकारे करतात, त्यामध्ये पुराभिलेखीय साधने कोणती, सर्वेक्षण पद्धती, प्रश्नावली पद्धती, वर्तमानपत्रे व इंटरनेटचा वापर संशोधनात कशा प्रकारे करावा इत्यादी पद्धती संदर्भात माहिती घेणार आहोत. याशिवाय इतिहासलेखनात मौखिक साधने कशी उपयुक्त आहेत, त्याचा संदर्भ आणि महत्व आणि मुलाखत पद्धती या संबंधी या घटकात चर्चा करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ सर्वेक्षण अथवा क्षेत्रभेट (Survey)

**१) सर्वेक्षण पद्धतीची संकल्पना :**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखनाचे महत्वाचे माध्यम म्हणून सर्वेक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. सर्वेक्षण म्हणजेच चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण, अथवा एखाद्या विशिष्ट प्रश्नासंबंधीची चिकित्सक पाहणी करणे व तत्संबंधी सर्व तऱ्हेची विस्तृत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण अशी सर्व साधारण व्याख्या केली जाते. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जावू शकतो. उदा. प्राचीन, मध्ययुगीन शिल्पस्थापत्य, शिलालेख, पुरातत्वीय स्थळे, मंदिरे इत्यादीसंबंधीच्या संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरावी लागते. सर्वेक्षण पद्धतीनुसार प्राप्त अवशेषांची सविस्तर माहिती नोंदवून त्या अवशेषांची व्याप्ती, भौगोलिक विस्तार, सीमा लक्षात घ्यावी लागते. याशिवाय राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी स्थानिक किंवा समकालीन इतिहास लेखनासाठी सर्वेक्षण पद्धती उपयोगी ठरते. सर्वेक्षण पद्धतीला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणून उल्लेख देखील ओळखले जाते. एका विशिष्ट भू-भागावर अथवा भौगोलिक ठिकाणी

राहणाऱ्या विशिष्ट व्यक्तीसमूह अथवा जाती, धर्म, पंथ समुदायाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची विस्तृत माहिती सर्वेक्षण पद्धतीच्या माध्यमातून प्राप्त करू शकतो. सामाजिक सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते. सर्वेक्षणातून माहिती संकलित करून विश्लेषण केल्यानंतर विशिष्ट निवडलेली समस्या अथवा प्रश्नासंबंधी निश्चित स्वरूपाची मांडणी करता येते.

**२) सर्वेक्षण पद्धतीची पार्श्वभूमी :**

सर्वेक्षण पद्धती प्राचीन कालखंडापासून वापरत असल्याच्या नोंदी मिळतात. इ. स. पू. ३०० मध्ये हिरोडोटसने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता. ११ व्या शतकात इंग्लंडमध्ये काही सामाजिक प्रश्नांसाठी पाहणी हाती घेतल्याची नोंद आहे. सर्वेक्षणाची सुरुवात इंग्लंड व वेल्समध्ये जॉन हॉवर्ड यांनी तुरुंगाची पाहणी करून केली. कैद्यांची स्थिती व त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी ते स्वत: तुरुंगात कैद्यांसमवेत राहिले होते. अमेरिकेमधील जेकोब राईस यांने सन १८९० मध्ये झोपडपटीमधील लोकांचे आर्थिक जीवनमान पाहण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते. त्यानंतर सन १९०९ मध्ये पॉल केलांगने सर्वेक्षण केले, आधुनिक समाजावरील आधुनिकीकरणाचे व नागरीकरणाचे परिणाम हा त्यांचा अभ्यासविषय होता.

भारतामध्ये सामाजिक सर्वेक्षणाची सुरुवात प्राचीन कालापासून झाली असल्याचे विविध उल्लेख सापडतात. कौटिल्याकृत 'अर्थशास्त्र' आणि अकबराच्या 'ऐन-ई-अकबरी' मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजीने आर्थिक धोरण पाहणीवरून ठरविले होते. शेरशहाने जमिनी विषयक पाहणी करून आपले करविषयक धोरण निश्चित केलेले होते असे दिसते. मात्र, भारतासारखा प्रचंड आकाराचा देश, सर्वेक्षणासाठी होणारा प्रचंड खर्च, लोकांमध्ये संशोधनासंबंधीची उदासीनता, बहुसंख्यांचे खेड्यातील वास्तव्य आणि भाषेची विविधता यामुळे अपेक्षित यश मिळू शकलेले नाही.

**३) सर्वेक्षण पद्धतीची व्याप्ती :**

सर्वेक्षणाच्या माध्यमातून गाव, शहर, कुटुंब, कुल, जान, जमात, वर्ग, समूह अशा कोणत्याही घटक संबंधी अथवा लोकांची अगर संशोधन संबंधी प्रश्नाशी निगडित माहिती पद्धतशीरपणे प्राप्त करण्याचे सर्वेक्षण हा महत्वाचे माध्यम आहे. लोकांची सामाजिक परिस्थिती, त्यांचे परस्परसंबंध, त्यांच्यापुढील प्रश्न, त्यांच्यातील होत असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, दिशा व गती इत्यादी बाबींची तपशीलवार आणि विस्तृत माहिती सर्वेक्षणाने घेता येते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, व आर्थिक इत्यादी विषयाशी निगडीत संशोधन स्थानिक किंवा समकालीन परिप्रेक्षातून करता येते. कोणत्याही भागातील समाजाच्या जीवनासंबंधी सविस्तर माहिती मिळतेच पण त्या समाज पुढचे प्रश्न समजतात व त्यांचे निराकरण कसे करावे यासंबंधी उपाय-योजना सुचविणे सामाजिक सर्वेक्षणाने शक्य होते.

### ४) सर्वेक्षणाचे प्रकार :

सर्वेक्षणाची उद्दिष्टे ज्याप्रकारे वेगवेगळी असतात त्याप्रमाणे माहिती प्राप्त करण्याचे मार्ग आणि पद्धती व तंत्रे यामध्येही विविधता आढळते. यावरून सर्वेक्षणाचे प्रकार पाडता येतात.

१) सर्वसामान्य सर्वेक्षण

२) विशिष्ट सर्वेक्षण

३) नियमित सर्वेक्षण

४) नैमित्तिक सर्वेक्षण

५) प्रारंभिक सर्वेक्षण

६) अंतिम सर्वेक्षण

७) वैश्विक सर्वेक्षण

८) नमूना सर्वेक्षण इत्यादीचा यामध्ये समावेश होतो.

### ५) सर्वेक्षण आणि प्रश्नावली :

सर्वेक्षण करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावलीचा वापर केला जातो. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाला हवी असणारी माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करता येते. वृत्तपत्रामधील बातम्या, सरकारकडून जाहीर केली जाणारी माहिती, शासकीय योजना, राजकीय नेत्यांच्या मुलाखती, इ. माहिती सर्वेक्षणातून ताडून पाहता येते. एखाद्या घटनेबद्दल जनसामान्यांचे मत समजावून घ्यावयाचे असेल तर ही सर्वात चांगली पद्धत आहे. सर्व्हेक्षणासाठी वापरली जाणारी प्रश्नावली साधी सोपी व सुटसुटीत असावी. अशा प्रश्नावलीतील प्रश्न संदिग्ध नसावेत व प्रश्नावली परिपूर्ण असावी. त्यामुळे मिळणारी माहिती परिपूर्ण व उपयुक्त मिळते.

### ६) सर्वेक्षण करताना कोणती खबरदारी घ्यावी :

सर्वेक्षण करताना काही मूलभूत स्वरूपाची खबरदारी संशोधकाने घेणे जरूरी असते. ती खालील प्रमाणे

१) सर्वेक्षणासाठी तयार केलेली प्रश्नावली जास्तीत जास्त अचूक आणि परिपूर्ण असावी.

२) संशोधकास जी माहिती हवी आहे त्याची मांडणी स्पष्ट शब्दात केलेली असावी, संदिग्ध प्रश्न विचारू नयेत.

३) सर्वेक्षणामधील मुद्दे सोपे, स्पष्ट आणि सुटसुटीत असावेत.

४) सर्वेक्षणातून प्राप्त माहिती हा पूरावा असल्याने त्याच्या नोंदी घाईगडबडीने न करता त्या अचूक व निर्दोष करव्यात.

५) सर्वेक्षणामधून प्राप्त महितीचे चिकित्सकपणे विश्लेषण करणे गरजेचे असते. चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा दुसरा टप्पा असून प्राप्त माहिती विश्वासार्ह आहे का? नवीन माहिती मिळते का? अथवा नव्या पैलूवर प्रकाश पडतो का? या दृष्टीकोणातून विचार करणे गजेचे असते.

६) बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त व्यापक स्वरूपाचे असणे गजचे आहे.

**७) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा :**

स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखानाचे सर्वेक्षण हे प्रभावी साधन असले तरी त्याच्या काही मर्यादा अथवा उणिवा आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे.

१) सरकारी, निम सरकारी, व्यावसायिक आणि वैयक्तीक पातळीवर केले जाते.

२) संशोधकाने संशोधनासाठी इतरांनी सर्वेक्षण करून गोळा केलेल्या माहितीवर आधारीत स्वत:चे निष्कर्ष काढवयाचे असतील तर, कोणाचे सर्वेक्षण निश्चित करायचे आणि त्याचे निष्कर्ष कसे घ्यायचे हे जिकरीचे आहे.

३) संशोधक ज्या तंत्र पद्धतीचा उपयोग करीत आहे याचा संशोधकाने विचार केला पाहिजे. मुळात सर्वेक्षण ही खर्चीक बाब आहे. याला वेळ आणि पैसा अधिक लागतो. सर्वेक्षणातून मिळालेली तथ्ये एकसारखी असतीलच अस नाही. मिळालेल्या तथ्य संकलनाची विश्वसनीयता सांगता येत नाही. विशिष्ठ लोकसमुदायचा एका विस्तृत भौगोलिक पार्श्वभूमीवर सखोल अभ्यास करणे कठीण असते, कारण यासाठी निवडलेले नमुने एकसारखे, समान आणि खात्रीशीर माहिती प्रदान करतील याची शक्यता नसते.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) रिकाम्या जागा भरा:

१) चिकित्सकपणे केलेली पाहणी, अथवा समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले निरीक्षण म्हणजे काय.

अ) सर्वेक्षण ब) प्रश्नावली क) मुलाखत ड) चित्रीकरण

२) कोणत्या सर्वेक्षणाने समाजाच्या कोणत्याही प्रश्नाविषयीची व्यवस्थित माहिती मिळविता येते.

अ) सामाजिक ब) राजकीय क) धार्मिक ड) सांस्कृतिक

३) इ. स. पू. ३०० मध्ये ............ ने इजिप्तमधील लोकसंख्येची पाहणी करण्याचा विचार मांडला होता.

अ) हिरोडोटस ब) पॉलिबियस क) लिव्ही मॅकीयावेली

४) सर्वेक्षणाची सुरुवात जॉन हॉवर्ड यांनी कोणत्या देशात केली.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) अमेरिका ड) भारत

५) अकबराच्या काळातील ........मधील माहिती सामाजिक पाहण्यावरच आधारलेली दिसून येते.

अ) ऐन-ई-अकबरी ब) बाबरनामा

क) तुजुक-ए- बाबरी ड) यापैकी नाही

६) सर्वेक्षणाचे किती प्रकार पाहावयास मिळतात.

अ) २ ब) ४ क) ६ ड) ८

७) बिनचूक निष्कर्ष काढण्यासाठी सर्वेक्षण जास्तीत जास्त कोणत्या स्वरूपाचे असणे गजचे आहे.

अ) व्यापक ब) मर्यादित क) संकुचित ड) अमर्यादित

८) चिकित्सक विश्लेषण हा सर्वेक्षणचा कोणता टप्पा आहे .

अ) पहिला ब) दुसरा क) तिसरा ड) चौथा

९) मध्ययुगीन काळात कोणी आर्थिक धोरण पाहणीवरून ठरविले होते.

अ) अल्लाउद्दीन खिलजीने ब) अकबर

क) शेर शहा सुरू ड) यापैकी नाही

१०) अमेरिकेमध्ये जेकोब राईस यांनी कोणत्या वर्षी झोपडपटीमधील लोकांचे आर्थिक जीवनमान पाहण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते.

अ) १८७० ब) १८८० क) १८९० ड) यापैकी नाही

### ३.२.२ प्रश्नावली : (Questionnaire)

स्थानिक अथवा समकालीन संशोधांनासाठी विशिष्ट समूह, वर्ग, गट अथवा विशिष्ट भौगोलिक मर्यादेमध्ये प्रश्नावलीचा उपयोग करून माहिती प्राप्त करता येते. संशोधन कामी माहिती संकलित करण्याची प्रश्नावली ही अप्रत्यक्ष पद्धत आहे. ''विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्या समस्येबाबत माहिती मिळविण्याच्या हेतूने तयार केलेल्या प्रश्नांच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात''. अथवा सर्वेक्षणाचा अर्थ कोणत्याही वस्तूंचे वा घटनांचे सूक्ष्म निरीक्षण व परीक्षण होय. कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करुन घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी सर्वेक्षणाचा आधार घ्यावा लागतो. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी निगडीत संशोधनाकामी प्रश्नावली पद्धत वापरुन माहितीचे संकलन केले जाते. स्थानिक आणि समकालीन इतिहासलेखनासाठी या पद्धतीचा प्रभावीपणे वापर केला जातो. स्थानिक अथवा समकालीन इतिहासलेखन करीत असताना संशोधक विशिष्ट अभ्यास समूहाचे उत्तम निरीक्षण करू शकतो, मात्र केवळ निरीक्षणाने त्यांच्या वर्तनामागील प्रेरणा, भावना, श्रद्धा अथवा विचार, मते काय? व कोणत्या असतात? हे कळत

नाही. व्यक्तीचे वर्तन पाहून संशोधक वस्तुस्थिती रेखाटू शकतो. मात्र पण त्याची वैयक्तिक मते, त्यामागील प्रेरणा अभ्यासण्यासाठी प्रत्यक्ष व्यक्तीशी संपर्क साधून, त्याला प्रश्न विचारूनच ती ही माहिप्राप्त होवू शकते.

**१) लिखित प्रश्न व लिखित उत्तर :**

संशोधनविषयाची विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक लिखित प्रश्नांची यादी तयार करतो. प्रश्नांची स्वरूप, आखनी आणि क्रमवारी पद्धतशीरपणे केलेली असते. संशोधक अभ्यास विषयाशी संबंधित असणाऱ्या निवेदकांना लिखित प्रश्न संशोधक प्रत्यक्षपणे विचारू शकतो, किंवा जे निवेदक दूर असतात त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावली पोस्टाद्वारे पाठवली जाते आणि त्यांच्याकडून लिखित प्रश्नांची लिखित उत्तरे प्राप्त केली जातात.

**२) प्रश्नावलीचे प्रकार :**

संशोधन विषयाच्या हेतुनुसार प्रश्नावलीचे अनेक प्रकार पाडतात. संशोधन विषयाचे स्वरूप, प्रश्नांचे स्वरूप, रचना इत्यादी घटकावर आधारित प्रश्नावलीचे अनेक प्रकार येतात मात्र प्रामुख्याने पुढील दोन प्रमुख प्रकारांचा समावेश होतो.

अ) संरचित प्रश्नावली: (Structured Questionnaire)

ब) असंरचित प्रश्नावली: (Unstructured Questionnaire)

**अ) संरचित प्रश्नावली :**

संशोधक या प्रकारात आपला विषय, हेतू, व्याप्ती आणि संशोधांनाची खोली विचारात घेवून प्रश्न व प्रश्नांचा क्रम निश्चित करतो. सर्वसामान्यपणे प्रश्नावलीतील प्रश्न आणि त्याचा क्रम निश्चित झाल्यानंतर संशोधक पर्यायी उत्तरेही देतो व उत्तरदात्यास आपल्या पसंतीचे उत्तर निवडण्यास सांगतो. अशा प्रकारची प्रश्नावली छापून पोष्टाने किंवा मुलाखतकाराबरोबर पाठवितो त्याला बंदिस्त प्रश्नावली असे म्हणतात. ज्या प्रश्नांची पर्यायी उत्तरे दिलेली नसतात. उत्तरदात्याकडून त्याच्या शब्दामध्ये उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते. त्याला मुक्त प्रश्नावली असे म्हणतात.

**ब) असंरचित प्रश्नावली :**

संशोधकाने संशोधनविषय निश्चित केलेला असला तरी संशोधनविषयाची संपूर्ण माहिती संशोधकाला असेलच असे नाही. यावेळी नेमके कोणते प्रश्न विचारावयाचे व त्यांची पर्यायी उत्तरे कोणती यासंबंधी संशोधकाच्या मनात शंका असते. साहजिकच संशोधन विषयासंबंधी काही स्थूल प्रश्न उभे करून लोकांची मते, प्रतिक्रिया, नवे दृष्टिकोण समजून घेण्यासाठी असंरचित प्रश्नावलीचा वापर केला जातो. या प्रश्नावलीमध्ये ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी असंरचित प्रश्नावलीचा उपयोग केला जातो.

### ३) प्रश्नावली पद्धतीचे स्वरूप :

प्रश्नावली तयार करताना संशोधकाने विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रश्नांचा क्रम, लांबी, पर्यायी उत्तरे याबाबत स्पष्टता असणे गरजेचे असते. प्रश्नावलीचे स्वरूप संशोधन विषयाशी निगडीत ठेवले पाहिजे. प्रश्न छोटे, सोपे व सुटसुटीत असावेत. प्रश्न अचूक व काटेकोर शब्दात विचारावेत. प्रश्नाच्या अर्थाबाबत संधिग्ता असता कामा नये. कोणती शंका राहू नये. मुक्त प्रश्न मोजके व आवश्यक तेवढेच असावेत. योग्य उत्तराला बरोबर खूण करण्यास सांगावे. प्रश्नातून उत्तर सूचित होतील असे प्रश्न विचारू नयेत. उत्तरदात्यास उत्तर देताना आकडेमोड करावी लागू नये. प्रश्नावलीमध्ये खाजगी प्रश्न विचारताना शब्दांची निवड काळजीपूर्वक करावी. गृहितकावर आधारलेले प्रश्न विचारताना काळजी घ्यावी.

### ४) प्रश्नावलीची पद्धतीची उपयुक्तता :

स्थानिक अथवा समकालीन इतिहास लेखनामध्ये साधने प्राप्त करताना अनेक अडचणी येतात. स्थानिक व समकालीन संशोधन विषयावर विपुल प्रमाणात साधने उपलब्ध असतील असे नाही, अशा वेळी संशोधक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधांनाला पूरक पुरावे जमा करू शकतो. प्रश्नावली पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. विचारलेल्या प्रश्नातून उत्तरात कमी विसंगती येते. प्राप्त उत्तरांची तुलना आणि विश्लेषण करणे सोपे जाते. प्रश्नावलीतून संशोधन विषयाचा एक दस्ताऐवज तयार होतो. की जो पुढे तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त असतो. संशोधन विषयाशी निगडीत ऐतिहासिक साधन तयार होते.

### ५) प्रश्नावली पद्धतीची मर्यादा :

प्रश्नावलीचे जसे फायदे आहेत तसेच काही उणिवादेखील आहेत, जसे की प्रश्नावली भरून देणार्याच्या स्वतंत्र विचारला आळा बसलेला असतो. कारण एका ठराविक मर्यादेमध्ये राहून उत्तरे द्यावी लागतात. त्यातूनही दिलेले उत्तर खरे असेलच असे नाही. प्रश्नावलीमधील प्रश्नांचा अर्थ समजावून घेण्याची कुवत प्रश्नावली भरून देणाऱ्याकडे असावी लागते. त्याला प्रश्नाची उकल व्यवस्थित न झाल्यास चुकीची अथवा संधिग्ध उत्तरे प्राप्त होवू शकतात. अथवा उत्तरात उणीव राहण्याची शक्यता असते. प्रश्नावली भरून विशिष्ट जाती समूह, धर्म समूह, वर्ग समूह समाजामध्ये रहात असल्याने तो पूर्वगृहदूषित असण्याची शक्यता असते, यामध्ये वस्तूनिष्ठतेला बाधा येण्याची शक्य नाकारता येत नाही. प्रश्नावलीमध्ये प्रश्नावली भरून देणाऱ्याच्या उत्तरावर विश्वास ठेवावा लागतो, दिलेल्या उत्तराची पडताळणी शक्य नसते.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

१) कोणत्याही प्रश्नाचा पूर्ण परीचय करून घेण्यासाठी किंवा त्या प्रश्नांचे निदान करुन त्यावर व्यवहार्य तोडगा काढण्यासाठी .......... चा आधार घ्यावा लागतो.

अ) सर्वेक्षण  ब) प्रश्नावली  क) मुलाखत  ड) वरील सर्व

२) सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी निगडीत संशोधनाकामी ........ पद्धत वापरुन माहितीचे संकलन केले जाते.

अ) सर्वेक्षण ब) प्रश्नावली क) मुलाखत ड) वरील सर्व

३) स्थानिक आणि समकालीन इतिहासलेखनासाठी ......... या पद्धतीचा प्रभावीपणे वापर केला जातो.

अ) सर्वेक्षण ब) प्रश्नावली क) मुलाखत ड) वरील सर्व

४) संशोधन विषयाच्या हेतुनुसार प्रश्नावलीचे ......... प्रकार पाडतात.

अ) दोन ब) चार क) सहा ड) आठ

५) संशोधक कोणत्या प्रकारात आपला विषय, हेतू, व्याप्ती आणि संशोधांनाची खोली विचारात घेवून प्रश्न व प्रश्नांचा क्रम निश्चित करतो.

अ) संरचित ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

६) .........संशोधन विषयासंबंधी काही स्थूल प्रश्न उभे करून लोकांची मते, प्रतिक्रिया, नवे दृष्टिकोण समजून घेण्यासाठी कोणत्या प्रश्नावलीचा वापर केला जातो.

अ) संरचित ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

७) ज्या संशोधनविषयाची फारशी माहिती उपलब्ध नाही, निश्चित प्रश्न किंवा पर्याय देता येत नाहीत अशा वेळी ......... प्रश्नालीचा उपयोग केला जातो.

अ) संरचित ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

८) ज्या प्रश्नांची पर्यायी उत्तरे दिलेली नसल्यास उत्तरदात्याकडून त्याच्या शब्दामध्ये उत्तर देण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते त्याला ......... प्रश्नावली म्हणतात.

अ) मुक्त ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

९) संशोधनविषयाची विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधक ......... प्रश्नांची यादी तयार करतो.

अ) लिखित ब) अलिखित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

१०) ........... पद्धती मध्ये संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो.

अ) सर्वेक्षण ब) प्रश्नावली क) मुलाखत ड) वरील सर्व

### ३.२.३ मुलाखत : (Interview)

मुलाखत ही तथ्य संकलनाची अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा (दाता) यात प्रत्यक्ष समोरासमोरचा संवाद प्रस्थापित होतो. मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते. स्थानिक व समकालीन इतिहासलेखनाचे एक साधन म्हणून मुलाखतीला विशेष महत्त्व आहे. सामाजिकशास्त्र संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. मुलाखत पद्धतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप,

व्याप्तीचा विचार संशोधकाने करणे गरजेचे असते. मुलाखतीच्या माध्यमातून संशोधकाला कोणती माहिती प्राप्त करवयाची आहे, मुलाखत कोणाची घ्यावयाची आहे, मुलाखतीचे स्वरूप कोणते असावे, किती लोकांच्या मुलाखती घेणे अपेक्षित आहे, याचा संशोधकाने विचार करणे गरजेचे असते.

**१) मुलाखत तंत्राची व्याख्या :**

एखाद्या प्रश्नाबाबत माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने सहाकार्य देणाऱ्या व जाणकार निवेदकाबरोबर मुलाखतकाराने केलेला संवाद म्हणजे मुलाखत होय. अशी सर्व साधारण व्याख्या केली जात असली तरी समाजशास्त्रीय संशोधनातील माहिती संकलनाचे एक महत्वपूर्ण तंत्र असलेल्या या पद्धतीची अनेक संशोधकांनी/विचारवंतांनी व्याख्या केली आहे.

त्यापैकी काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१) पॉलिन यंग :** ''मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर डोकावत असतो.''

**२) हॅडर आणि लिंडमन :** ''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो''.

वरील व्याख्यांवरुन मुलाखत म्हणजे संशोधक स्वत: निवेदकांना भेटून संशोधना विषयाशी संबंधित प्रश्न विचारतो व माहिती संकलीत करतो. मुलाखत हे माहिती संकलनाचे सोपे तंत्र आहे.

**२) मुलाखत तंत्राची वैशिष्ट्ये**

ब्लॅक आणि चँपीयन यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१) संशोधक व निवेदक (मुलाखत दाता) यांच्यात प्रत्यक्ष संवाद असतो.

२) संशोधक प्रत्यक्ष प्रश्न निवेदकाला विचारुन माहिती घेतो यातून संवाद होतो.

३) संशोधक व निवेदकाचे संबंध तात्पुरते असतात.

४) संशोधकाने प्रत्यक्ष संवाद साधल्याने संशोधन विषयाची सखोल माहिती प्राप्त होते.

५) तथ्यांचे सुव्यवस्थित संकलन प्राप्त होते.

६) अनावश्यक माहिती टाळता येते.

७) मुलाखतीचा मुख्य हेतू विश्वसनीय माहितीचे संकलन करणे हा असतो.

**३) मुलाखत तंत्राचे वर्गीकरण :**

मुलाखत तंत्राचा व्यापक उपयोग आणि वापर लक्षात घेता सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये विविध समाजशास्त्रज्ञांनी मुलाखतीचे खालील प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

**अ) लुंडबर्ग :** लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे तीन प्रकार सांगितलेले आहे, यामध्ये

१) वस्तुनिष्ठ तथ्यांचे संकलन करणे.

२) अभिवृत्ती निर्धारण व मापन करणे.

३) सामाजिक संघटन व संस्थांची माहिती करुन घेणारी, इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**ब) पी. व्ही. यंग :** पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे चार प्रकार सांगीतलेले आहेत, यामध्ये

१) संस्था सर्व्हेक्षण

२) निरीक्षण

३) मूल्यांकन

४) दस्तऐवज इत्यादी प्रकारांचा समावेश होतो.

**४) मुलाखत तंत्राचे प्रकार** :

**अ) संरचित किंवा आकारीक मुलाखत**

संरचित मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जात असल्याने संशोधकाचे काम सोपे होते. प्रश्नांची यादी अगोदरच तयार केल्याने मुलाखतदात्याला प्रश्नांच्या बाहेर जाता येत नाही, म्हणून मुलाखतीला संरचित किंवा आकारीक मुलाखत असे म्हणतात. यामध्ये प्रश्नाबरोबर संभाव्य उत्तरेही त्यांना दिली जातात. प्रश्न व उत्तरांची यादी छापून घेतलेली असते. संशोधक मुलाखतदात्याला प्रश्न विचारून पर्यायी उत्तरापैकी कोणते उत्तर निवेदकास द्यावयाचे आहे ते विचारतो व उत्तराबरोबर बरोबरची खूण करतो. पर्यायी उत्तरापैकी कोणत्याही उत्तराशी संशोधक सहमत होत नसेल तर मुलाखतदात्याच्या उत्तराशी अधिकाधिक साम्य असणाऱ्या उत्तरासमोर तो वरील प्रमाणे खूण करतो. जर निवेदकास संपूर्णपणे वेगळे उत्तर द्यावयाचे असल्यास ते उत्तर मुलाखतकार पूर्णपणे लिहून घेतो.

**ब) असंरचित किंवा मुक्त मुलाखत :**

मुक्त मुलाखतीमध्ये संशोधक मुलाखतदात्यासमोर मुलाखतीचा विषय मांडतो. मुलाखतीमधील त्याचा हेतू स्पष्ट करून मुलाखतदात्याला मुक्तपणाने आपली मते मांडण्याची परवानगी देतो. संशोधकाने विषयाचा अभ्यास केला असल्याने कोणते प्रश्न विचारावयाचे याचा त्याने विचार केलेला असतो. संशोधक कोणताही प्रश्न केव्हाही विचारू शकतो. प्रश्न व उत्तरे दोन्हीही पूर्वनियोजित नसल्यामुळे मुलाखतीचे स्वरूप अनिश्चित असते. मुलाखतदात्याला व काही प्रमाणात संशोधकाला मुक्त स्वातंत्र्य असते हे या मुलाखतीचे वैशिष्टय असते. मुलाखतीमध्ये मुलाखतदाता आणि संशोधक यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याने मुलाखतीमध्ये लवचिकता येते. मुलाखतदाता आपली मते स्पष्टपणे व स्वत:च्या शब्दात मांडू शकतो. संशोधकाकडे अधिक कौशल्य लागते.

**क) केंद्रित मुलाखत :**

केंद्रीत मुलाखत हा अनिर्देशित अथवा मुक्तमुलाखतीचा प्रकार आहे. यामध्ये संशोधक मुलाखतदात्याच्या विशिष्ट अनुभवावर व त्याच्यावर झालेल्या परिणामावर आपले लक्ष केंद्रित करतो. अशा प्रकारच्या मुलाखती रेडिओ, टी.व्ही, चित्रपटामध्ये पहायला मिळतात.

**ड) पुनरावृत्ती किंवा फेरमुलाखत :**

एखाद्या घटनेबाबत व्यक्तीची मते कायमचीच राहतात असे नाही. त्या घटनेबाबतचा त्याच्या दृष्टीकोनात अथवा विचारात बदल होत राहतात. अशा प्रकारच्या मुलाखती एखाद्या सामाजिक, मानसशास्त्रीय, आर्थिक किंवा राजकीय प्रश्नाबाबत लोकांचे दृष्टीकोनात कसा बदल होत गेला याचा अभ्यास करण्यासाठी होतो.

**इ) निदानोपचारात्मक मुलाखत :**

निदानोपचारात्मक मुलाखतीत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो. केंद्रित मुलाखतीप्रमाणेच यामध्ये विशिष्ट वर्तनाचा अथवा अनुभवाच्या प्रेरणा कोणत्या आहेत जाणून घेण्यासाठी होतो. मुलाखतीची पूर्व तयारी असते. मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे व कोणत्या क्रमाने हे संशोधक ठरवत असतो.

वरील मुलाखत प्रकाराशिवाय औपचारिक, अनौपचारिक, व्यक्तीगत, सामूहिक, गुणात्मक, परिणामात्मक, उपचारात्मक, संशोधनात्मक असे अनेक प्रकार मुलाखतीचे आहेत.

**५) मुलाखतीची पूर्व तयारी :**

मुलाखत ही एक तांत्रिक गोष्ट असल्यामुळे ती जितकी कौशल्याने हाताळता येईल तेवढी अधिक परिणामकारक ठरते. ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे त्याची इत्यंभूत माहिती मुलाखत घेणाऱ्याकडे असायला हवी. मुलाखत देणारा आणि मुलाखत घेणारा यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक असते. विसंवाद झाल्यास मुलाखत देणारा माहिती देणे थांबू शकतो अथवा योग्य माहिती मिळवण्यास अडथळा येऊ शकतो. मुलाखत सुरु करण्याआधी, मुलाखत देणाऱ्याला, विषयाची आधीच माहिती देणे गरजेचे असते, तसे न केल्यास गोंधळ होण्याची शक्यता असते. मुलाखत घेणाऱ्याने, मुलाखत देणाऱ्याच्या मनात, स्वत:बद्दल विश्वास निर्माण करायला हवा. त्यामुळे मुलाखत देणारा त्याला संवेदनशील वाटणारी माहिती देखील मुलाखत घेणाऱ्याला सांगू शकतो. मुलाखतीदरम्यान अथवा नंतर, मुलाखतीची टिपणे काढून, ती मुलाखत देणाऱ्याकडून तपासून मजकूर खरा असल्याची त्याच्याकडून खात्री करून, त्याची स्वाक्षरी घ्यावी. मुलाखतीची ध्वनीमुद्रण अथवा ध्वनिचित्रफिती बनवल्यास मुलाखतीचा सगळाच मजकूर दीर्घकाळासाठी उपयोगात आणता येतो. मुलाखत घेणे हे एक तंत्र असून ते कौशल्याने हाताळावे लागते. मुलाखत घेताना जर चूक झाली तर मुलाखतीचा हेतू साध्य होत नाही. मुलाखतीमधून हवी असणारी माहिती प्राप्त न झाल्याने

संशोधक निराश अथवा हताश होवू शकतो. मुलाखतीची पूर्वतयारी करणे आवश्यक असते. मुलाखतीची पूर्वतयारी करताना पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.

१. प्रथम मुलाखतदात्याची सर्व इत्यंभूत माहिती घेणे गरजेचे असते. यामध्ये नाव, टोपण नाव, वय, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक व राजकीय दर्जा, सांस्कृतिक पातळी इत्यादीचा समावेश होतो. वरील माहिती वरुन त्या व्यक्तीची माहिती पुरविण्याची बौद्धिक क्षमता याचा अंदाज येतो.

२. मुलाखत घेणारा व देणारा यांच्यामध्ये संवाद निर्माण झाला तरच मुलाखत यशस्वी होवू शकते, अन्यथा अपेक्षित माहिती प्राप्त होत नाही.

३. मुलाखतददात्याची मानसिकता, आवड-निवड, मते, विचार पद्धती याची माहिती जमा केल्यास संशोधकाला हवी ती माहिती प्राप्त करता येते, संवादामध्ये अडथळा येत नाही.

४. संशोधकाने मुलाखतददात्याला स्वत:ची ओळख व मुलाखतीचा स्पष्ट हेतू सांगितला पाहिजे, त्यामुळे संशोधनाविषयी कोणतीही शंका न राहता संवाद मोकळेपणाने होतो.

**६) मुलाखत देणारी व्यक्ती**

एखाद्या व्यक्तीचे चरित्रलेखन करत असताना त्याची स्वत:ची, जवळच्या व्यक्ती, परिवारातील व्यक्ती, व्यवसायिक सहकारी आणि विरोधक इत्यादींच्या मुलाखती घेणे गरजेचे असते. संशोधन विषयाशी संबंधीत व्यक्तीशी थेट संबंध नसलेले, मात्र त्यांच्या संबंधीची माहिती असलेल्या त्रयस्थ व्यक्तींची देखील मुलाखत घेणे महत्वाचे ठरते. चरित्रनायकाचे सहकारी अथवा विरोधकांकडून मिळणारी माहिती ही आत्मनिष्ठ असते. अशावेळी त्रयस्थ आणि चौकसबुद्धीच्या व्यक्तीची मुलाखत बऱ्याच प्रमाणात वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास उपयोगी ठरते. आंदोलन, चळवळ, राजकीय पक्ष, संस्था यांच्याशी संबंधित विषयांवर मुलाखती घेताना त्रयस्थ व्यक्तींच्या मुलाखती अत्यंत उपयुक्त ठरतात.

**७) मुलाखतीमधील प्रश्न**

मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न हे थेट, मुद्देसूद आणि वस्तुनिष्ठ असावेत. असे प्रश्न विचारल्यास मुलाखतदात्याचा गोंधळ उडत नाही. मुलाखतदात्याला संशोधकाच्या व्यक्तीनिष्ठेची अथवा पूर्वग्रह दूषितपणाची शंका आल्यास तो अपेक्षित मोकळेपणाने माहिती देणार नाही. शक्यतो मुलाखत देणाऱ्याला न दुखावता त्याच्या कडून व्यक्ती, घटना यांच्याविषयीची त्याची मते हळुवारपणे काढून घ्यावीत.

**८) मुलाखतीमधील प्रश्नांचे स्वरूप**

मुलाखतदात्याला आपला विषय कथन केलल्यानंतर संबंधीत विषयावर बोलण्याची मुभा दिली जाते. संशोधकाला आवश्यकता वाटल्यास मुलाखतदात्याला काही प्रश्न विचारावे लागतात. योग्य उत्तरे प्राप्त करण्यासाठी खबरदारीने प्रश्न तयार करावे लागतात. प्रश्न सरळ, नि:संदिग्ध, मुद्देसुद व सुटसुटीत असल्यास उत्तरे देताना मुलाखतदात्याचा गोंधळ होणार नाही. प्रश्न मुद्देसूद असले की उत्तरेही मुद्देसूद मिळतात.

### ९) मुलाखतीचा उपयोग आणि मर्यादा :

सामाजिक शास्त्र अथवा स्थानिक/समकालीन इतिहासलेखनामध्ये तथ्य संकलनाचे प्रभावी साधन म्हणून मुलाखत सर्वमान्य आहे. मुलाखत तंत्र हे मुलाखतदात्याकडून अभ्यासविषय अथवा समस्येविषयीची माहिती संकलित करण्याचे प्रत्यक्ष तंत्र आहे. आज सामाजिक संशोधनात मुलाखत तंत्राचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, त्याची ज्या प्रकारे उपयुक्तता आहे त्याप्रमाणे त्याच्या काही उणिवादेखील आहेत.

**अ) मुलाखत तंत्राचा उपयोग :**

१) संशोधक व मुलाखतदाता यांच्यातील सुसंवाद हा पारंपारिक व प्रेरणात्मक स्वरुपाचा असल्याने मुलखातीमधून मिळणारी माहिती यथार्थ व व्यापक स्वरुपाची असते.

२) मुलाखतदात्याशी प्रत्यक्ष संवाद होत असल्याने सखोल संशोधनासंबंधी सखोल माहिती मिळते.

३) संशोधनासंबंधी असलेले प्रश्न ताठर स्वरुपाचे नसतात. त्यात लवचिकता असल्याने माहिती घेणे सोपे जाते.

४) समोरा समोर प्रश्न विचारत असताना मुलाखतदात्याच्या भावना जाणून घेता येतात.

५) माहितीची विश्वसनियता राहते.

६) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये औपचारिक संबंध असले तरी बोलण्याच्या ओघात संशोधकाला इतर पूरक माहिती प्राप्त होते.

७) मुलाखतदात्या कडून प्राप्त माहिती संशोधक पडताळणी करू शकतो.

८) मुलाखतीमुळे पूर्वगृह कमी होण्यास मदत होते.

**ब) मुलाखत तंत्राच्या मर्यादा :**

संशोधनासाठी मुलाखतीचे अनेक उपयोग असले तरी काही मर्यादासुद्धा आहेत, त्या पुढीलप्रमाणे.

१) मुलाखत ही खर्चिक आणि वेळखावू स्वरुपाची पद्धती आहे.

२) पूर्वगृहयुक्त प्रतिक्रिया मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) मर्यादित क्षेत्रात तथ्य संकलन होते, संशोधकाला सहकार्य मिळवण्यात अडचणी येतात.

४) संशोधकाकडे प्रचंड सहनशीलता असणे आवश्यक असते.

५) संशोधक आणि मुलाखतदाता यांच्यातील आंतरक्रिया पूर्णपणे परस्पर विश्वासावर आवलंबून असते.

६) मुलाखत घेण्याचे वैयक्तीक कौशल्य सर्वांनीच आत्मसात केलेले असते असे नाही.

वरील मर्यादा गृहीत धरल्या तरी सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखत तंत्राचा वापर अधिक प्रमाणात केला जातो. एक विश्वसनिय तंत्र म्हणून याकडे पाहिले जाते.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) कोणाशी प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित झाल्याने त्याच्या भावना व मनोवृत्तीचे क्रमबध्द संशोधन केले जाते.

अ) मुलाखतदा ब) मुलाखतकर्ता क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

२) कोणत्या संशोधनपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात मुलाखत तंत्राचा वापर केला जातो.

अ) सामाजिकशास्त्र ब) वाणिज्यशास्त्र क) विज्ञानशास्त्र ड) यापैकी नाही

३) मुलाखत ही अशी सुव्यवस्थित पध्दतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर डोकावत असतो' ही व्याख्या ............. ची आहे.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर क) लिंडमन ड) ब्लॅक

४) ''मुलाखतीत दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखिक प्रतिसाद असतो'' ही व्याख्या ............. ची आहे.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर आणि लिंडमन

क) ब्लॅक आणि चँपीयन ड) यापैकी नाही

५) ................ यांनी मुलाखतीची पुढील वैशिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

अ) पॉलिन यंग ब) हॅडर आणि लिंडमन

क) ब्लॅक आणि चँपीयन ड) यापैकी नाही

६) मुलाखत तंत्रामध्ये संशोधक व निवेदकाचे संबंध ........ असतात.

अ) तात्पुरते ब) कायम क) नेहमी ड) यापैकी नाही

७) लुंडबर्ग यांनी मुलाखतीचे .............. प्रकार सांगितलेले आहे.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

८) पी. व्ही. यंग यांनी मुलाखतीचे ............. प्रकार सांगीतलेले आहेत.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

९) .............. मुलाखतीमध्ये पुर्वनियोजित व साचेबंद प्रश्न विचारले जातात.

अ) संरचित ब) असंरचित क) अ व ब दोन्ही ड) यापैकी नाही

१०) ........... मुलाखत संशोधक मुलाखतदात्याचा अनुभव, प्रेरणा, इ. विषयी माहिती घेण्यासाठी करतो.

अ) निदानोपचारात्मक ब) फेरमुलाखत क) केंद्रीत मुलाखत ड) वरील सर्व

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

सूक्ष्म : सूक्ष्म घटक अथवा भाग अथवा प्रसंग अथवा घटना.

सबाल्टर्न : वंचित, तळागाळातील व्यक्ती अथवा समूह.

मौखिक : पाठांतराच्या माध्यमातून परंपरेने चालत आलेले.

मुलाखत : तोंडी पद्धतीने माहिती प्राप्त करण्याचे तंत्र.

सर्वेक्षण : समस्येचे शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले परीक्षण.

भौतिक साधने : पुरातत्वीय अवशेष

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्न व प्रश्नांची उत्तरे

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १) अ) सर्वेक्षण | २) अ) सामाजिक | ३) अ) हिरोडोटस | ४) अ) इंग्लंड |
| ५) अ) ऐन-ई-अकबरी | ६) ड) ८ | ७) अ) व्यापक | ८) ब) दुसरा |
| ९) अ) अल्लाउद्दीन खिलजीने | | १०) क) १८९० | |

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १) अ) सर्वेक्षण | २) ब) प्रश्नावली | ३) ब) प्रश्नावली | ४) अ) दोन |
| ५) अ) संरचित | ६) ब) असंरचित | ७) ब) असंरचित | ८) अ) मुक्त |
| ९) अ) लिखित | १०) ब) प्रश्नावली | | |

* स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १) मुलाखतदात्या | २) सामाजिकशास्त्र | ३) पॉलिन यंग | ४) हॅडर आणि लिंडमन |
| ५) ब्लॅक आणि चँपीयन | ६) तात्पुरते | ७) तीन | ८) चार |
| ९) संरचित | १०) निदानोपचारात्मक | | |

## ३.५ सारांश

इतिहासलेखन प्रक्रियेत 'No Documents No History' हे प्रा. लॉजीलॉस व प्रा. सिईनबॉस यांचे विधान यथार्थ आहे. इतिहास हा संदर्भसाधनांच्या आधारे लिहिला जातो. तसे न केल्यास त्यास इतिहास ही संज्ञा प्राप्त होत नाही. इतिहासलेखन जास्तीत जास्त वास्तव, वस्तूनिष्ठ व सत्य लिहिण्यासाठी साधनाची नितांत आवश्यकता असते. इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये लिखित अलिखित, पुरातत्वीय मौखिक साधनाचा आधार घेतला जातो. लिखित साधनाच्यामध्ये प्राथमिक संदर्भ साधनाना अधिक महत्व असते. प्राथमिक संदर्भ साधनामधील पोकळी भरून काढण्याचे काम दुय्यम संदर्भ साधने करतात. लिखित संदर्भ साधन ज्या प्रसंगी मिळत नाहीत खास करून प्राचीन कालखंडाचा अभ्यास करताना संशोधकास भौतिक संदर्भ साधनाचा म्हणजे पुरातत्वीय साधनाचा आधार घ्यावा लागतो. पुरातत्वीय साधने जरी बोलकी नसली किंवा त्यामधून

प्रत्यक्षदर्शी पुरावा पटकन ती समोर येत नसला तरी त्या साधनांना बोलते करण्याचे काम संशोधक करतो. त्यामुळे ही साधनेही महत्वाची आहेत. लिखित अथवा पुरातत्वीय संदर्भ साधनांच्या पलिकडे जावून काही ऐतिहासिक घटना किंवा तथ्य आपणास मौखिक साधननाच्यामधून ही मिळतात. पिढ्यान पिढ्या एकाकडून दुसऱ्याकडे आलेले मौखिक साहित्य अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यास मदत करते. इतिहासलेखनामध्ये साधने खूप महत्वाची असतात. मग ती कोणत्याही स्वरूपातील असोत. संदर्भ साधनांचे महत्व स्पष्ट करताना थ्युसिडीज हा इतिहासकार असे म्हणतो की, ''ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, ततोतंत वर्णन करणे महत्वाचे असते. त्यासाठी योग्य साधने जमविणे आवश्यक असते की, ज्या पासुन भविष्यकाळात मानवाला काही बोध व धडा मिळू शकेल.''

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा:

१) सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा

२) मुलाखत तंत्राची वैशिष्ठ्ये

३) असंरचित प्रश्नावली

ब) खालील प्रश्नांची सविस्तर चर्चा करा.

१) इतिहासलेखनाचे साधन म्हणून सर्वेक्षण पद्धतीची माहिती द्या.

२) इतिहासलेखनाचे साधन म्हणून प्रश्नावली पद्धतीची माहिती द्या.

३) इतिहासलेखनाचे साधन म्हणून मुलाखत तंत्राची माहिती द्या.

## ३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके


१) नाडगोडे, गुरुनाथ., सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८६.

२) कुंभोजकर, ग. वि., संशोधन पद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

३) कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५

४) वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन

५) टिकेकर, अरुण., (संपा.) शहर पुणे: एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड पहिला, निळुभाऊ लिमये फौडेशन, पुणे, २०००

६) भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७६.


❑❑❑

## घटक ४
# संशोधन : तंत्र आणि सादरीकरण
(Tools and Presentation of Research)

**अनुक्रमणिका**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४.१ टिपणे काढणे (Note-taking)

४.४.२ तळटिपा अंतटिपा, शब्द कोश, परिशिष्ट, सूची (Footnotes and Endnotes, Glossary, Appendix and Index)

४.४.३ संदर्भ ग्रंथ यादी (Bibliography)

४.४.४ अहवाल लेखन (Report Writing)

४.४ सारांश

४.५ परिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.६ स्वयंअध्ययन प्रश्न, उत्तरे

४.७ संदर्भ आणि अधिक वाचनासाठी ग्रंथ

## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

१. टिपणे काढण्याच्या विविध पद्धतीचा परिचय होईल.

२. तळटिपा म्हणजे काय व त्या देण्याची पद्धती त्यांचे उपयोग लक्षात येतील.

३. संशोधन लेखन करत असताना शब्दकोशांचे महत्त्व लक्षात येईल.

४. संशोधन लेखनाअंती द्यावयाच्या परिशिष्टाची ओळख होईल.

५. संशोधन लेखनाअंती द्यावयाच्या सूचीचा परिचय होईल.

६. संदर्भ ग्रंथ यादी म्हणजे काय व त्याचे महत्त्व लक्षात येईल.

७. संशोधनाअंती अहवाल लेखन कसे करावे याची याचा परिचय होईल.

## ४.२ प्रास्ताविक

इतिहास संशोधन पद्धती आणि इतिहास लेखन प्रक्रिया हे एक शास्त्रीय पद्धती आहे इतिहास संशोधन आणि लेखन करत असताना इतिहास संशोधकाला विविध टप्प्यातून जावे लागते. ते टप्पे कोणते आहेत याचा अभ्यास इतिहास संशोधकांनी करणे आवश्यक आहे. तसेच इतिहास संशोधन समाजापुढे मांडत असताना त्या मांडण्यासंदर्भामध्ये सुद्धा काही शास्त्रशुद्ध व रचनात्मक पद्धतीने नियमावली आहे. त्या पद्धतीनेच इतिहास मांडला पाहिजे. यासाठी संशोधकाकडे काही विशिष्ट कौशल्य असणे गरजेचे आहे उदाहरणार्थ संदर्भ साधन गोळा करणे, त्याचे वर्गवारी करणे. टिपणे काढणे, तळटिपा देणे, शब्द कोश, परिशिष्ट, सूची, संदर्भ ग्रंथ यादी, अहवाल लेखन इत्यादी. ही सर्व कौशल्ये संशोधकाने आत्मसात केली पाहिजेत. अशी कौशल्ये संशोधकाच्या अंगी अनुभवाने जास्तीत जास्त परिपक्व होत जातात.

## ४.३ विषय विवेचन

### ४.३.१ टिपण घेणे किंवा काढणे

संशोधन प्रक्रियेचे विशिष्ट तंत्र असते त्याचा योग्य वापर केल्यास संशोधन सुकर होते. संशोधन करत असताना संशोधकाला प्राथमिक व दुय्यम अशा अनेक प्रकारची संदर्भ साधने संकलित करून वापरावी लागतात ही संदर्भ साधने एकत्रित न वापरता त्या संदर्भ साधनांमधून आपल्याला आवश्यक असणाऱ्या आपल्या विषयासंबंधी माहितीची वेगळी टिपणे काढावी लागतात. तरच संशोधन लेखन करत असताना ते सोयीचे होते.

संदर्भ ग्रंथ अथवा संदर्भ साधने वाचत असताना किंवा त्यांचा अभ्यास करत असताना स्वतःच्या संशोधन विषयासाठी आवश्यक अशी माहिती लिहून घेऊन एकत्रित करणे त्याला टिपण घेणे असे म्हणतात. हे काम अतिशय काळजीपूर्वक व कौशल्यपूर्ण आहे यामध्ये जर दोष निर्माण झाला तर संशोधनामध्ये मोठा दोष निर्माण होण्याची शक्यता असते. नोट्स काढणे याबद्दल काही शिष्ट संमत पद्धती आहेत. टिपण काढण्याच्या पद्धती या ज्याला ज्या सोईच्या वाटेल त्या त्याने अवलंबलेल्या आहेत. संशोधक नवका असेल किंवा अनुभवी असेल त्यानुसार तो टिपण काढण्याच्या पद्धती वापरत असतो. कोणी कोणती पद्धत वापरावी या संदर्भात निश्चित नियम नाही पण काही आडाखे, ठोकताळे ठरलेले आहेत. त्यानुसार संशोधन काढण्यासाठी टिपणे काढण्याच्या काही पद्धती पुढील प्रमाणे –

**१. नोटबुक पद्धत** – संशोधक हा नोट्स काढण्यामध्ये फारसा सराईत नसतो तेव्हा तो नोटबुकचा वापर करतो. संशोधक आपल्या संशोधनाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये एका मोठ्या वहीत आपल्या विषयाची टिपणी काढत असतो. काही वेळा संदर्भ इतका सविस्तर व महत्वाचा वाटतो कि त्याची संक्षिप्त नोंद करणे कठीण होते.तेंव्हा माहितीचा तपशील सविस्तर घेतला जातो. नवीन संशोधकालाही पद्धत उपयोगी पडते. त्यामुळे एका वहीमध्ये सर्व मुद्दे एकत्रित करता येतात. हा या पद्धतीचा फायदा आहे. पण एकाच नोटबुक मध्ये अनेक मुद्दे घेतले जाऊन कोणता मुद्दे कोठे आहे हे लक्षात येण्यास विलंब लागतो. तसेच काही वेळा मुद्दे

घेत असताना पाठीमागे पुढे होतात. त्यामुळे घटनाक्रम चुकण्याची शक्यता असते. एका वहीत अनेक टिपण घेतल्याने नोंदीच्या असंख्य वह्या तयार होतात व या वह्या म्हणजे परत संक्षिप्त पुस्तके होतात त्यामुळे लेखनाच्या वेळी अशा टिपणा मधून नेमके संबंधित मुद्दे अगर तपशील शोधून काढणे जिकीरीचे होते. कोणता मुद्दा कोणत्या वहीमध्ये घेतलेला आहे याचा गोंधळ होतो त्यामुळे वेळेचा व श्रमाचा अपव्य होण्याची शक्यता असते. पण याच पद्धतीमध्ये संशोधक एका संदर्भ ग्रंथाची एका वहीत टिपणी न काढता संशोधन विषयाच्या प्रकरणानुसार एका वहीत टिपणी काढतो तेंव्हा तपशिलात टाचण तयार करता येते. मुख्य म्हणजे विषयाच्या एका घटकावर अगर प्रकरणानूरूप टाचण तयार केल्यामुळे प्रकरणे लिहीत असताना आवश्यक ती माहिती एकत्र मिळते. फारसा गोंधळ  होत नाही. नवीन संशोधकाला ही पद्धत उपयोगी आहे. तसेच तज्ञ संशोधक ही या पद्धतीचा उपयोग चांगल्या पद्धतीने करू शकतो.

**२. फाईल पद्धत** – काही संशोधक आपल्या संशोधनासाठी फाईल्स चा वापर करतात. या फाईल मध्ये फुल स्केप कागदावर घटक, उपघटक लिहून टिपणे काढली जातात. अशा फाइल्स वेगवेगळ्या प्रकरणांनुसार, उपविभागानुसार तयार केल्या जातात. फाईल मध्ये प्रत्येक कागद स्वतंत्र असल्यामुळे तो कोणत्याही वेळी त्यामधून घेता येतो. फाईल पद्धतीमुळे एकाच विषयावरील विविध साधनांमधून घेतलेली टिपणे एकत्रित घेता येतात. त्यांची घटक उपघटकानुसार जुळवाजुळव करता येते. त्यामुळे सर्व संदर्भ साधने एकाच वेळी एकत्रित येतात. पण या पद्धतीचा दोष असा की काही वेळा नेमका जो मुद्दा पाहिजे तो कोठे आहे हे कळत नाही. संशोधनाच्या दिशेमध्ये, क्रमामध्ये किंवा टप्प्यामध्ये बदल होऊ शकतो. अशा वेळी घटक उपघटकानुसार जुळवाजुळव करणे अवघड होते. संशोधकाचा गोंधळ उडण्याची शक्यता असते.

**३. स्लीप पद्धत (कार्ड पद्धत)** – नोटबुक पद्धत किंवा फाईल पद्धतीपेक्षा स्लीप पद्धत किंवा कार्ड पद्धत ही प्रगत आहे. कारण पहिल्या दोन पद्धतीमध्ये आपणाला जो मुद्दा पाहिजे त्याच्याशिवाय इतरही अनेक मुद्दे त्या नोट्स मध्ये असतात. तसा दोष स्लिप पद्धतीमध्ये होण्याची शक्यता कमी असते. या पद्धतीमध्ये वरील दोन्ही पद्धतीचे लाभ मिळतात. तपशीलवार टाचणे तयार होतात. ती स्वतंत्र असल्यामुळे अन्वयार्थ लावत असताना त्यांची जुळवाजुळव करणे सोपे होते. प्रत्येक प्रकरणानुसार उपप्रकरणांनुसार एका स्लीपवर एकच मुद्दा घेतलेला असतो. एका मुद्द्यावर जितके संदर्भ घेतले असतील तितक्या सर्व स्लिप्स एकत्र घ्यावयाच्या असतात त्यामुळे प्रत्येक प्रकरणांमध्ये प्रत्येक विषयानुसार टिपणे तयार होतात. अशी टिपणे तयार झाल्यानंतर ही सर्व टिपणे प्रकरणानुसार व घटनाक्रमानुसार लावून घ्यावी लागतात. तरीही एका ठिकाणी असलेले टिपण सहजपणे दुसऱ्या ठिकाणी हाताळता येते.

या पद्धतीमध्ये स्लीप किंवा कार्ड कशा प्रकारचे असावे यासंबंधी दोन शिष्टसंमत पद्धती आहेत त्या पुढील प्रमाणे

१. चार बाय सहा आकाराचे कार्ड.　　　　　२. आठ बाय सहा आकाराचे कार्ड

प्रत्येकाचा वापर करत असताना पुढील दक्षता घेणे आवश्यक आहे –

१. कार्डाच्या मध्यभागी वरच्या कडेजवळ प्रकरणाचे नाव, विभाग व उपविभाग यांचा उल्लेख असावा.

२. कार्डाच्या उजव्या कोपऱ्यावर घटना ज्या साली घडली ते साल लिहावे. जर घटनेचे साल किंवा तारीख माहिती नसेल तर त्या ठिकाणी काही मजकूर घेऊ नये.

३. कार्डाच्या मध्यभागी महत्त्वाचा मुद्दा लिहावा हा मुद्दा अगदी मोजक्या शब्दात असावा.

४. कार्डाच्या खालच्या डाव्या कोपऱ्यात लेखकाचे नाव लिहावे. जर एकाच पुस्तकातील अनेक संदर्भ असतील तर फक्त पहिल्या कार्डावर ग्रंथकाराचे संपूर्ण नाव लिहावे व नंतर ज्यावेळी संदर्भ येईल त्यावेळी त्या ग्रंथकर्त्याचे फक्त आडनाव दिले तरी चालते.

५. कार्डाच्या खालच्याकडे जवळ मध्यभागी संदर्भ ग्रंथाचे नाव लिहावे.

६. उजव्या खालच्या कोपऱ्यात त्या संदर्भ ग्रंथातील पानाचा क्रमांक लिहावा.

**कार्डाच्या बाबतीत घ्यावयाची दक्षता –**

प्रत्येक टिपणे स्वतंत्र स्लीपवर किंवा कार्डावर असले पाहिजे. घेतलेली नोंदी पूर्ण बिनचूक असावी. नोंद घेताना आणखीन कोणती माहिती मिळवणे आवश्यक आहे हे त्या ठिकाणी लिहून ठेवावे.

**टीपण / नोटस् काढताना पाळावयाची पथ्य –**

कोणत्याही प्रकारचे टिपण घेत असताना संशोधकांनी पुढील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ग्रंथाचा मथळा, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे आणि खंड असतील तर खंड क्रमांक, आवृत्ती असल्यास आवृत्ती क्रमांक इत्यादींची नोंद ठेवणे आवश्यक आहे. टिपण मुद्देसूद विषयानुसार केलेले असावे. आवश्यक तेथे त्याच्या संदर्भाचाही निर्देश असावा. एखाद्या मुद्द्याची नोंद करत असताना पृष्ठ क्रमांकची नोंद अत्यावश्यक असते. संदर्भ ग्रंथातील एखादे विधान विशेष मार्मिक वाटल्यास व पुढे अवतरणासाठी त्याचा वापर करतयेईल असे वाटत असेल तर वाक्य मुळात जसे आहे तसे नोंदवून घ्यावे त्यात कोणताही बदल करू नये.

**टिपणे काढण्याच्या अथवा घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर –**

आधुनिक कालखंडात नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. त्याचा वापर करूनही आपण टिपणे काढू शकतो. फोटो, मायक्रो फिल्म, झेरोक्स, अल्ट्रा फक्स मशीन, व्हिडिओ इत्यादीचा वापर केला जात आहे. विशेषता आज संगणक (कोम्पुटर) व भ्रमणध्वनी (मोबाईल) यांच्या अनुषंगाने वापरले जाणारे आंतरजाल (नेट) यांचा वापर करून निवडक माहिती संकलित करणे शक्य झाले आहे. काही संदर्भ साधनांचे मूळ स्थितीत स्कॅन करून ती वापरू शकतो. पण ही साधने वापरत असताना त्यांच्या सत्यतेबद्दलची पडताळणी करणे आवश्यक असते.

### ४.४.२ तळटिपा, शब्द कोश, परिशिष्ट, सूची –

#### ४.४.२.१ तळटिपा

संशोधनामध्ये तळटीप या तंत्राला फार महत्त्व आहे. संशोधन अहवालामध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रत्येक पृष्ठावर, प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी अथवा ग्रंथाच्या शेवटी संशोधनातील निवेदनाबद्दल ज्यादा अथवा सविस्तर माहिती अथवा वेगळा संदर्भ दिला जातो त्याला 'तळटीप' म्हणतात.

**तळटीप देण्याचे उद्देश किंवा कारणे पुढील प्रमाणे –**

**१. लेखकाच्या लेखनाला जबाबदारी व्यक्तीचा पाठिंबा आहे हे दाखवून देणे –** आपल्या लिखाणाला एखाद्या अधिकारी व्यक्तीचा किंवा संदर्भ साधनाचा पुरावा देणे आवश्यक असते. लेखकाने एखादा विचार एखादा मुद्दा एखाद्या ग्रंथातून घेतला असेल तर त्याचा उल्लेख तळटीपेमध्ये देणे आवश्यक आहे. संशोधकाला असे वाटते की त्याच्या एखाद्या विधानाबद्दल वाचकाच्या मनात संदेह निर्माण होईल तेव्हा त्यांने तळटीप देण सोयीचे आहे. ज्यावेळी एकाच साधना मधून अनेक संदर्भ घेतले जातात तेव्हा सोयीच्या दृष्टीने तळटीप दिल्या जातात.

**२. लिखाणाचा ओघ थांबून नये –** लेखकाच्या लिखाणाचा ओघ खंडित होतो तो होऊ नये म्हणून तळटीप दिल्या जातात. निवेदनामध्ये विषयासंबाधित जादा संदर्भ अथवा अनुषंगिक माहिती दिल्यास लिखाणाचा ओघ खंडित होतो. काही संशोधकांना वारंवार संदर्भ देण्याची सवय असते. असे संदर्भ दिल्याने त्याचे ज्ञान व पांडित्य प्रसिद्ध होते याबद्दल संशय नाही परंतु वाचताना वाचाकाचाही ओघ खंडित होऊ शकतो. तो होऊ नये म्हणून तळटिपामध्ये जादा संदर्भ अथवा अनुषंगिक माहिती दिल्यास ज्याला जे संदर्भ हवे असतील तो ते वाचू शकतो परंतु ज्याला नको असतील त्याच्या वाचनामध्ये खंड पडणार नाही. त्याच विषयावर अधिक माहिती वाचकाला तळटिपामध्ये दिली तर त्याच्या ज्ञानामध्ये भर पडते.

**३. आपल्या लिखाणाचे विरोधात काय लिहिले आहे हे वाचकांना समजावे –** एखाद्या मुद्या संदर्भामध्ये परस्परविरोधी मते असू शकतात. विविध विचारप्रवाह सुद्धा असू शकतात. संशोधक एखाद्या विचाराप्रवाहाचा असेल आणि विरोधकांना त्या विरुद्प्रवाह अस्तित्वात असतील तर त्याची माहिती देणे सुद्धा आवश्यक असते अशा वेळेला तळटीप दिली जाते.

अशा अनेक कारणांनी तळटीपा दिल्या जातात.

**तळटीपाचे प्रकार –**

तळटीपाचे प्रमुख दोन प्रकार सांगितले आहेत. ज्या वेळेला लेखकाला आपल्या मुद्दा स्पष्ट करावयाचा असतो तेव्हा तो मध्येच एखादी तळटीप देऊन हा मुद्दा स्पष्ट करतो. असा संदर्भ देण्यामध्ये त्याचा उद्देश आपल्या मताचे स्पष्टीकरण करणे हाच असतो. दुसऱ्या प्रकारामध्ये संशोधक एखादा अस्सल पुरावा आपल्या विधानाच्या समर्थनासाठी देत असतो अर्थातच अशा प्रकारामुळे वाचकाच्या ज्ञानामध्ये भर पडते.

**तळटीप कोठे द्याव्यात –** तळटीप देत असताना लिखित नियम नाहीत परंतु परंपरेने काही संकेत रूढ झाले आहेत. त्यानुसार तळटीप द्याव्यात. छापील रेषेवरच निदर्शनाचा आकडा लिहावा. निदर्शनाचे आकडे उजव्या बाजूला लिहावेत. ज्या ठिकाणी आकडा द्यावयाचा असेल तेथील शब्द व आकडा यामध्ये अंतर असू नये. ज्यावेळी टंकलिखित लेखन असते तेव्हा एक दोन तीन असे आकडे लिहावेत.तळटीप प्रत्येक पानावर द्याव्यात आणि जर असे शक्य नसेल तर प्रकरणाच्या शेवटी द्यावेत आणि हेही जर शक्य नसेल तर ग्रंथाच्या शेवटी प्रत्येक प्रकरणानुसार द्यावेत. तळ टिपांना द्यावयाचे आकडे हे एका विशिष्ट पद्धतीनेच द्यावेत. ही पद्धत संपूर्ण ग्रंथात सातत्याने वापरावी. उदाहरणार्थ प्रत्येक पृष्ठ, प्रकरण अथवा ग्रंथाच्या शेवटी. एखाद्या परिच्छेदाच्या (उतारा) शेवटी तळटिपेचा आकडा टाकावा. कोणत्याही शीर्षकाला तळटीप देऊ नये. ज्यावेळी एका पेक्षा जास्त संदर्भ एकाच वाक्यात दिलेले असतात त्यावेळी जिथे पहिला संदर्भ असेल त्या अक्षरावर किंवा शब्दावर लगेच आकडा टाकला पाहिजे आणि नंतरच्या शब्दावर किंवा अक्षरावर पुढील आकडा टाकला पाहिजे या दोन्ही आकड्यांच्या संदर्भात येताना स्वल्पविरामाचा वापर करावा.

**तळटिपाचे फायदे** – तळटिपा ग्रंथाच्या शेवटी देण्याची पद्धत सहसा अवलंबली जात नाही. बहुतेक वेळा ती प्रत्येक पानावर दिले जाते, त्यामुळे वाचकाला सहजासहजी संदर्भ समजतो. प्रकरणाच्या शेवटी तळटिपा दिल्यामुळे वाचकाच्या वाचनात खंड पडत नाही.

**तळटिपाचे दुरुपयोग** – सामान्य वाचकास तळटिपाचा फारसा फायदा होत नाही त्याचे मन विचलीत होण्याची शक्यता असते. काही वेळा हस्तलिखित तयार होत असताना तळटिपा दिल्या जात नाहीत नंतर तळटिपा दिल्या जातात त्यामुळे आकडे व तळटीप याची माहिती यामध्ये समन्वय न राहता गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते.

**तळटिपा कशा द्याव्यात –**

तळटिपा देत असताना साधारण पुढील नियम विचारात घेतले जातात –

१. सुरुवातीला लेखकाचे नाव नंतर ग्रंथाचे नाव नंतर प्रकाशनाचे नाव नंतर प्रकाशनाचे वर्ष व शेवटी ज्या पानावरून संदर्भ घेतला असेल त्या पानाचा आकडा द्यावा. उदा. डॉ. पाटील सुवर्णा, मिरज शहराचा इतिहास, सांगली जिल्हा इतिहास संशोधन मंडळ, सांगली, सन २०१५, पृष्ठ क्र. ५१

२. तळटीपेमध्ये खंडाचा क्रमांक देत असताना तो रोमन लिपीमध्ये द्यावा. खंडाचे नाव इटालिक्स मध्ये द्यावे. पानाचा क्रमांक अरेबिकमध्ये द्यावा. ज्यावेळी एखाद्या संपूर्ण प्रकरणाचा संदर्भ दिला जातो तेव्हा रोमन किंवा अरेबिकमध्ये संदर्भ दिला पाहिजे.

३. तळटीपेमध्ये लेखकाचे नाव देत असताना सुरुवातीला त्याचे नाव त्याचे आडनाव नंतर द्यावे. एखाद्या संदर्भ साधनांची जर सविस्तर माहिती दिली असेल आणि त्यानंतरचा संदर्भ त्याच संदर्भ साधनातून घेतला असेल तर पुन्हा सर्व संदर्भ न देता 'ibid' अशी खूण करावी व त्याच्यापुढे पान क्रमांक द्यावा उदा.

उदा. १. डॉ. पाटील सुवर्णा, मिरज शहराचा इतिहास, सांगली जिल्हा इतिहास संशोधन मंडळ, सांगली, सन २०१५, पृष्ठ क्र. ५१

२. 'ibid' पृष्ठ क्र. १२५ .

'ibid' हा शब्द लॅटिन शब्दापासून आला आहे लॅटिन भाषेत 'ibid' म्हणजे मिनिंग द सेम असा अर्थ होतो. एकदा 'ibid' चा वापर केला की त्याच पानावर किंवा सलग दोन पानावर संदर्भ असेल तरच वापर करावा.

४. काही वेळा 'Op. Cit' या खुणेचा वापर करतात 'Op. Cit' म्हणजे 'Opera Citato' हा शब्द लॅटिन भाषेतून घेतला असून त्याचा अर्थ In the work cited' असा आहे. असे जरी असले तरी गोंधळ होऊ नये म्हणून लेखकाचे नाव घेणे आवश्यक ठरते. दोन वेळा 'Op. Cit' खुणेचा वापर करावा तर दुसऱ्यावेळी 'Op. Cit' न म्हणता 'Loco Citato' म्हणावे. 'Loc. Cit' चा अर्थ 'Loco Citato' म्हणजे 'In the place cited." असा आहे.

५. जर एखाद्या वेळेस अस्सल साधनाचा आधार दिला असेल तर दुय्यम साधनांचा संदर्भ देण्याचे कारण नाही.

**तळटीपांची संक्षिप्त रूपे –** तळटीपा देत असताना काही संक्षिप्त रूपे वापरावी लागतात. काही महत्वाची संक्षिप्त रूपे पुढीलप्रमाणे –

1. bk , bks - book , books
2. vol, vols - volume , volumes
3. ed, eds - editor , editors
4. ed, eds - edition, editions
5. chap, chaps - chapter, chapters

अशाप्रकारे तळटीपा हे इतिहास संशोधानासाठी अत्यंत आवश्यक असणारे महत्वाचे तंत्र आहे. तसेच ते कौशल्य देखील आहे. याशिवाय संशोधान पूर्ण होऊ शकत नाही. त्याला उच्च दर्जा देण्यासाठी तळटीपा आवश्यकच आहेत.संशोधकाला सरावाने ते सहज साध्य होईल.

**४.४.२.२. शब्द कोश –**

'शब्दकोश' हे इतिहास संशोधन प्रक्रियेमध्ये आवश्यक असणारे महत्त्वाचे कौशल्य व तंत्र आहे. भूतकाळातील घटनांचा इतिहास मांडत असताना तो पुराव्यावर आधारित मांडला जातो. हे पुरावे लिखित स्वरूपाचे असतील तर त्या लिखित संदर्भ साधनांमधील शब्दांना अचूक अर्थ देणे आवश्यक असते. संदर्भ साधन लेखकाने ज्या अर्थाने लिहिलेले आहे त्याचा तोच अर्थ इतिहास संशोधकांनी काढणे अपेक्षित आहे. जर चुकीचा अर्थ काढला गेला तर संदर्भ साधनाचा तसेच इतिहासाचा चुकीचा अन्वयार्थ लावला जाऊ

शकतो व हे इतिहास संशोधनाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून शब्दांना अचूक अर्थ देण्यासाठी किंवा शब्दांच्या अर्थाचे ज्ञान होण्यासाठी 'शब्दकोश' उपयोगी पडतात. म्हणून शब्दकोश हे इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये एक महत्त्वाचे तंत्र आहे.

इतिहास संशोधनांमध्ये संशोधनाअंती शब्दकोश देणे महत्त्वाचे आहे कारण संशोधनामध्ये संशोधकांने ज्या काही विशिष्ट संकल्पना, शब्द वापरलेले आहेत तोच अर्थ संकल्पना वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी शब्दकोशाची मदत होते.

**'शब्दकोश' अर्थ –** शब्दांचे अर्थ, व्युत्पत्ती (शब्दांची उत्पत्ती), उच्चार, वाक्यांत त्यांचा उपयोग आणि त्यांची व्याकरणिक श्रेणी याबद्दलची सखोल माहिती देणाऱ्या शब्दसंग्रह ग्रंथास 'शब्दकोश' म्हणतात. 'शब्दकोश' विद्यार्थ्यांपासून ते संशोधकांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त ठरतात.

**'शब्दकोशा'ची उत्पत्ती** – शब्दकोशांचा इतिहास खूप जुना आहे. सुरुवातीला माणसांनी शब्दांच्या अर्थाची माहिती देण्यासाठी पोटप्रकरणे आणि सूची तयार केल्या होत्या. भारतीय उपखंडात प्राचीन काळात संस्कृत शब्दांच्या अर्थांचा संग्रह ''निघंटू'' म्हणून ओळखला जात होता. ग्रीक आणि रोमन संस्कृतींमध्येही शब्दकोशांचा वापर केला जात होता, त्यामध्ये लेखकांनी शब्दांचे अर्थ आणि त्यांची उत्पत्ती स्पष्ट केली होती.आधुनिक शब्दकोशांची संकल्पना १५ व्या आणि १६ व्या शतकात उदयास आली, जेव्हा छापखाने आले आणि मुद्रित साहित्याचा प्रसार झाला. या कालावधीत अनेक विद्वानांनी भाषा आणि शब्दांची यादी तयार करण्यास सुरुवात केली. इंग्रजी भाषेतील पहिला शब्दकोश १६०४ साली रॉबर्ट कॉड्रेय यांच्याकडून प्रकाशित झाला, ज्याचे नाव "A Table Alphabeticall" होते. या शब्दकोशात साधारणतः ३,००० शब्दांचे अर्थ समाविष्ट होते.युरोपात १७ व्या आणि १८ व्या शतकात अनेक शब्दकोश प्रकाशित झाले. यापैकी सॅम्युएल जॉन्सन यांचा "A Dictionary of the English Language" (१७५५) हा शब्दकोश विशेषतः प्रसिद्ध आहे, कारण त्याने इंग्रजी भाषेतील शब्दांचे पहिले प्रमाणबद्ध यादीकरण केले. हा शब्दकोश आजही एक महत्त्वपूर्ण मानक म्हणून ओळखला जातो.

भारतात प्रारंभिक शब्दकोश निर्मिती अमरकोशासारख्या संस्कृत ग्रंथांपासून झाली. ब्रिटिश काळात विल्यम जोन्सने सन १७८६ मध्ये इंग्रजी-हिंदी शब्दकोश तयार केला. यानंतर रजनीकांत गुप्ता यांचा बंगाली शब्दकोश तयार केला. संकर्षणकुमार देव व मंडळींचा 'बृहत् हिंदी कोश' देखील महत्त्वाचा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रघुनाथपंत हणमंते यांच्याकडून 'राज्यव्यवहार कोश' तयार करून मराठी भाषेचे राज्यकारभारात पुनरुज्जीवन केले होते. शब्द कोशाच्या इतिहासातील ही महत्वाची बाब आहे. आधुनिक महाराष्ट्रात शब्दकोश निर्मितीची परंपरा १९ व्या शतकात सुरू झाली. बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिला मराठी शब्दकोश तयार केला. यानंतर विश्वकोश निर्मितीचे कार्य महर्षि धोंडो केशव कर्वे व आचार्य प्र. के.अत्रे यांनी पुढे चालवले. पांडुरंग सदाशिव साने (साने गुरुजी) यांनी ''मराठी विश्वकोश'' तयार केला, ज्याने मराठी भाषेचे समृद्ध दस्तावेजीकरण केले.

**इतिहास संशोधनामध्ये शब्दकोशाचे महत्व –**

इतिहास संशोधनामध्ये शब्दकोशाचे महत्व अत्यंत मोठे आहे. इतिहासातील विविध कालखंडांतील शब्दांच्या अर्थाचा अभ्यास करून संशोधक त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय परिस्थितीचा अधिक चांगल्या प्रकारे अभ्यास करू शकतात. काही शब्दांच्या अर्थाचा बदल कसा झाला हे समजल्यास भाषेतील आणि समाजातील बदलांचा मागोवा घेता येतो. तसेच, जुन्या दस्तावेजांचे भाषांतर किंवा विश्लेषण करताना शब्दकोशाची मदत आवश्यक असते, ज्यामुळे त्या कालखंडाचे नेमके अर्थ आणि संदर्भ स्पष्ट होतात. एकूणच, शब्दकोश इतिहासाच्या सखोल अभ्यासासाठी एक महत्त्वाचे साधन आहे.

**शब्दकोशाचे प्रकार –** शब्दकोश विविध प्रकारचे असू शकतात, आणि प्रत्येक प्रकाराचे वेगवेगळे उद्दिष्ट असते. शब्दकोशाचे काही प्रमुख प्रकार दिले आहेत:

१. सर्वसाधारण शब्दकोश: सामान्य शब्दांचे अर्थ देणारा शब्दकोश.

२. व्याकरण शब्दकोश: व्याकरणाच्या नियमांचे वर्णन करणारा शब्दकोश.

३. तांत्रिक शब्दकोश: विशेष तंत्रज्ञानातील शब्दांची व्याख्या करणारा शब्दकोश.

४. संज्ञा शब्दकोश: फक्त संज्ञा शब्दांच्या व्याख्या असलेला शब्दकोश.

५. अनुवाद शब्दकोश: दोन किंवा अधिक भाषांमध्ये शब्दांचा अर्थ देणारा शब्दकोश.

**शब्दकोशाचा उपयोग** – शब्दकोशाचा मुख्य उद्देश म्हणजे शब्दांचे अर्थ आणि त्यांची उत्पत्ती समजावून देणे. याशिवाय, त्याचा वापर विविध प्रकारच्या लेखनासाठी आणि भाषाशिक्षणासाठी होतो.

१. शब्दांचे अर्थ शोधणे – शब्दकोशाचा सर्वात महत्त्वपूर्ण उपयोग म्हणजे अज्ञात शब्दांचे अर्थ शोधणे. उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीला ''छत्रपती'' हा शब्द माहित नसेल, तर तो शब्दकोशात त्याचा अर्थ, त्याचा उपयोग आणि त्याची व्युत्पत्ती शोधू शकतो.

२. उच्चार समजणे – अनेक शब्दांचे उच्चार स्पष्ट करणे कठीण असते, विशेषतः इंग्रजीसारख्या भाषांमध्ये. शब्दकोश उच्चारांसाठी फोनेटिक वर्णन प्रदान करतो, जे वापरकर्त्याला योग्य उच्चार शिकण्यासाठी मदत करते.

३. शब्दांची उत्पत्ती समजणे – शब्दकोश हे शब्दांचे व्युत्पत्ती स्पष्ट करतात, म्हणजे शब्दाचा मूळ अर्थ, तो कसा विकसित झाला, आणि त्याचा वर्तमान काळातील अर्थ कसा बनला. उदाहरणार्थ, ''कंप्यूटर'' हा शब्द "Computer" म्हणजे गणना करण्याच्या क्रियापदावरून आला आहे.

४. व्याकरणिक माहिती – शब्दकोशात शब्दांचे व्याकरणिक श्रेणीकरण केलेले असते, जसे की क्रियापद, नाम, विशेषण, इत्यादी. यामुळे शब्दांचा योग्य वापर कसा करावा हे शिकणे सोपे होते.

५. लेखन सुधारणा – बऱ्याचदा शब्दांचे योग्य शब्दांकन लक्षात येत नाही. शब्दकोशात शब्दांचे योग्य शब्दांकन दिलेले असते, ज्यामुळे लेखनात चुका कमी होतात.

शब्दकोश हे एक अमूल्य साधन आहे जे भाषेच्या सर्व पैलूंवर प्रकाश टाकते. त्याचा उपयोग केल्यामुळे केवळ शब्दांच्या अर्थांचे ज्ञान वाढत नाही, तर भाषेचे गहन आणि सखोल आकलन देखील विकसित होते. त्यामुळे, शब्दकोशाचा नियमित वापर विद्यार्थ्यांपासून ते संशोधकांपर्यंत सर्वांना फायदेशीर ठरतो.

### ४.४.२.३ परिशिष्ट

परिशिष्ट हा एक महत्त्वाचा तांत्रिक घटक आहे, जो अनेक शैक्षणिक आणि संशोधनात्मक लेखनप्रकारांमध्ये वापरला जातो. हा घटक लेखनाच्या मुख्य मजकुराच्या शेवटी जोडला जातो आणि लेखनाच्या मुख्य भागाशी संबंधित अतिरिक्त माहिती, आकडेवारी, तक्ते, चित्रे, आणि इतर तांत्रिक बाबींचा समावेश करण्यात येतो. परिशिष्टाचा मुख्य उद्देश म्हणजे वाचकाला लेखाच्या मुख्य मजकुराशी संबंधित अधिक माहिती देणे, ज्यामुळे विषयाचा सखोल अभ्यास करणे शक्य होते.

इतिहास संशोधनात परिशिष्ट हे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, जे संशोधनाची सखोलता वाढवण्यासाठी वापरले जाते.

**'परिशिष्ट' अर्थ –** परिशिष्ट म्हणजे मुख्य लेखनाच्या शेवटी जोडलेला असा विभाग असतो, ज्यामध्ये लेखनातील मुख्य मुद्द्यांशी संबंधित अतिरिक्त माहिती दिली जाते. परिशिष्टामध्ये तक्ते, आकडेवारी, आकृत्या, नकाशे, दस्तावेज, पत्रव्यवहार, किंवा इतर पूरक सामग्रीचा समावेश असतो, जी लेखाच्या मुख्य भागात समाविष्ट केल्यास लेखनाची प्रवाहीता बिघडू शकते. परिशिष्टाचा उद्देश वाचकाला अधिक संदर्भ आणि तपशीलवार माहिती पुरवणे असतो, ज्यामुळे त्यांना विषयाचा सखोल अभ्यास करता येतो. त्यामुळे परिशिष्ट हे लेखनाचे एक महत्त्वपूर्ण पूरक साधन मानले जाते

**परिशिष्टाचे इतिहासासाठी महत्त्व:**

इतिहास संशोधनात परिशिष्ट हे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, जे संशोधनाची सखोलता वाढवण्यासाठी वापरले जाते. परिशिष्टामध्ये मुख्य लेखनातून वगळलेली, परंतु महत्वाची माहिती दिली जाते, जसे की तक्ते, आकृत्या, नकाशे, दस्तावेज, पत्रव्यवहार, मुलाखती, आणि इतर पुरावे. ही माहिती मुख्य मजकुरात समाविष्ट केल्यास लेखनाची प्रवाहीता बिघडू शकते, परंतु परिशिष्टामध्ये समाविष्ट केल्याने वाचकाला त्या माहितीचा लाभ घेता येतो. उदाहरणार्थ, एखाद्या ऐतिहासिक कालखंडाचा अभ्यास करताना, त्या कालखंडाशी संबंधित मूळ दस्तावेज, शासकीय अहवाल, किंवा विशिष्ट व्यक्तींशी संबंधित पत्रव्यवहार परिशिष्टात समाविष्ट केले जाऊ शकतात. हे दस्तावेज वाचकाला त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय स्थितीचा अधिक चांगला अंदाज लावण्यास मदत करतात.

परिशिष्टामुळे इतिहास संशोधन अधिक विश्वसनीय आणि प्रमाणिक ठरते, कारण वाचकाला पुरावे तपासण्याची संधी मिळते. संशोधनाच्या मुख्य निष्कर्षांचे समर्थन करण्यासाठी या माहितीचा वापर होतो,

ज्यामुळे संपूर्ण संशोधनाची गुणवत्ता वाढते. यामुळे, परिशिष्ट हे इतिहास संशोधनात अनिवार्य घटक आहे, जे संशोधनाच्या संपूर्णतेची आणि प्रमाणिकतेची खात्री देते

परिशिष्टाचा उपयोग मुख्यतः मोठ्या संशोधन प्रबंध, निबंध, पुस्तकं, किंवा इतर शैक्षणिक लेखनप्रकारांमध्ये केला जातो. लेखनाच्या मुख्य भागात आवश्यक असलेल्या मुद्द्यांवर अधिक स्पष्टता आणण्यासाठी परिशिष्ट हे लेखनाचे पूरक साधन आहे. परिशिष्टामध्ये अशा माहितीचा समावेश केला जातो ज्यामुळे वाचकाला लेखाच्या संपूर्णपणे समजण्यास मदत होते,

**परिशिष्टाचे स्वरूप:**

परिशिष्ट हे संशोधन लेखाच्या शेवटच्या भागात येते आणि त्याची रचना स्पष्ट आणि सुव्यवस्थित असावी लागते. प्रत्येक परिशिष्ट स्वतंत्रपणे क्रमांकित केलेले असते, उदा. ''परिशिष्ट A", ''परिशिष्ट B", इत्यादी. परिशिष्टाच्या प्रत्येक विभागाचे शीर्षक असते, जे त्या विभागाच्या सामग्रीची संक्षिप्त माहिती देते.

परिशिष्टात समाविष्ट करावयाच्या बाबी –

**परिशिष्टामध्ये अनेक प्रकारच्या माहितीचा समावेश करता येतो –**

**१. सांख्यिकी आणि तक्ते :** मुख्य मजकुराशी संबंधित अधिक तपशीलवार आकडेवारी परिशिष्टामध्ये दिली जाते. उदाहरणार्थ, जर एखाद्या संशोधन लेखात एखाद्या राजाच्या विशिष्ठ काळाचा उल्लेख असेल, तर त्याचा विस्तृत सनावळीसह जीवनपट परिशिष्टात दिला जातो .

**२. चित्रे आणि आकृत्या :** संशोधनाच्या मुख्य भागात संदर्भित केलेली चित्रे किंवा आकृत्या परिशिष्टामध्ये समाविष्ट करता येतात. यामुळे लेखन अधिक स्पष्ट आणि समजण्यास सोपे होते. उदा. सिंधू संस्कृतीमधील सापडलेल्या अवशेषांची चित्रे.

**३. अतिरिक्त दस्तावेज :** एखाद्या विषयाच्या सखोल अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या इतर पुरावे किंवा दस्तावेजांचा समावेश देखील परिशिष्टामध्ये केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ संशोधन विषयातील एखाद्या व्यक्तीचे हस्तलिखित पत्र.

**४. सर्वेक्षणे आणि मुलाखती:** एखाद्या संशोधनासाठी जर सर्वेक्षणे किंवा मुलाखती घेतल्या असतील, तर त्यांचे संपूर्ण प्रश्न आणि उत्तरे परिशिष्टात दिले जातात.

**परिशिष्टाचा उपयोग –**

परिशिष्ट हे एक पूरक साधन आहे जे इतिहास संशोधनामध्ये मुख्य भागातील माहितीची सुस्पष्टता आणि सखोलता वाढवते. वाचकाला मुख्य विषय अधिक चांगल्या प्रकारे समजण्यासाठी परिशिष्टाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुख्य मजकुरात न मांडता आलेली विस्तृत माहिती परिशिष्टामध्ये समाविष्ट केल्याने लेखन अधिक प्रभावी बनते.

परिशिष्टाचा वापर तेव्हा करावा जेव्हा मुख्य मजकुरातील माहिती विस्तृत स्वरूपात मांडणे गरजेचे असते, परंतु लेखनाची प्रवाहीता बिघडण्याची शक्यता असते. हे वाचकाला अधिक संदर्भ देऊन त्याचा अभ्यास करण्याची संधी देते, ज्यामुळे वाचकाची लेखाशी जुळलेली रसपूर्णता कायम राहते.

परिशिष्ट हे इतिहास संशोधनात्मक लेखनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. हे वाचकाला अधिक माहिती आणि संदर्भ उपलब्ध करून देण्यासाठी वापरले जाते.

**४.४.२.४ सूची –**

इतिहास लेखन पद्धतीमध्ये सूची हा महत्त्वाचा भाग आहे. कोणत्याही संशोधनाला सूची जोडल्याशिवाय परिपूर्णता लाभत नाही. संशोधन प्रक्रियेमध्ये संशोधकाला अनेक कारणासाठी सूची फार महत्त्वाची असते. सूची म्हणजे आपण ज्या विषयावर संशोधन करणार आहोत किंवा जे संशोधन पूर्ण झाले आहे त्याचा आरसा असतो

**'सूची' अर्थ –** ''सूची'' म्हणजे एक अशी यादी जी विविध गोष्टींच्या किंवा घटकांच्या क्रमवार किंवा वर्णनात्मकपणे सादर केलेली असते. सूचीचा वापर माहितीची व्यवस्था, आयोजन, किंवा विश्लेषण करण्यासाठी केला जातो.

आधुनिक काळामध्ये ज्ञानाच्या कक्षा विस्तारत आहेत नवीन नवीन विषयावर संशोधन होत आहे. अशा संशोधनातूनच विशेषीकरण होत आहे. एखादा विशिष्ट विषय घेऊन त्यातच सखोल संशोधन करणे इतकेच नव्हे तर त्या विषयातील एखादाच पैलू निवडून त्याचे विशेष संशोधन करणे अशा पद्धतीने सध्याचे संशोधन सुरू असते. जरी विषयाचे विशेषीकरण झालेले असले तरी एका विषयाचा दुसऱ्या विषयाशी कसा संबंध आहे हे दाखवण्याचा प्रयत्न चालू असतो. या प्रक्रियेला आंतरविद्याशाखीय संबंध असे म्हणतात. इतिहास संशोधन मुख्यतः ऐतिहासिक साधनांद्वारे केले जाते. ऐतिहासिक साधने खूप असतात त्यातून आपल्या संशोधन विषयाला अनुसरून माहिती गोळा करणे अतिशय कष्टाचे काम असते व अशावेळी सूचीचे महत्व लक्षात येते.

**सूचीचे प्रकार –**

**१. स्थळ सूची –**

इतिहास संशोधन प्रक्रियेमध्ये भूगोलाला अतिशय महत्त्व आहे. राज्याच्या राजधान्यांची ठिकाणे, लढाया त्यांच्या जागा, दळणवळणाचे मार्ग, वेगवेगळ्या वस्तू निर्माण होण्याची ठिकाणे इत्यादीची माहिती आवश्यक असते अशा माहितीचा उपयोग संशोधक आपल्या सोयीप्रमाणे करून घेत असतो. त्यावरून विविध प्रकारचे नकाशे बनविता येतात. उदाहरणार्थ प्रोफेसर इरफान हबीब यांनी तयार केलेला 'दि मोघल ॲटलास'. अशा सूचीमध्ये वर्णानुक्रमे पृष्ठसंख्या दिलेली असते त्यावरून ज्या ठिकाणची आपल्याला माहिती हवी असते ती एकत्रित मिळते. उदाहरणार्थ सांगली जिल्हा गॅझेटीअर मध्ये सांगलीचा अथवा मिरजेचा उल्लेख कोणत्या पानावर आहे हे दिलेले असते. उदा. २०, ३० ४०, ५०, १०० इत्यादी पानावर असल्याचे

आढळून येते.  या ग्रंथात असणारी सागरेश्वर संबंधीची माहिती चटकन एकत्रित मिळू शकते अशा स्थळसूची मुळे संशोधकाचा वेळ,  श्रम व पैसा यांची बचत होते. शिवाय त्याच्या संशोधनाचा उत्साह टिकून राहण्यास मदत होते

**२. व्यक्ती सूची –**

स्थळसूचीप्रमाणेच व्यक्तीसूची ही सुद्धा महत्त्वाची असते. आपल्याला ज्या व्यक्तीच्या कार्यकर्तुत्वाचा अभ्यास करावयाचा आहे त्या व्यक्तीसंबंधी संबंधित ग्रंथांमध्ये कोठे कोठे उल्लेख आलेला आहे हे समजून घेण्यासाठी व्यक्तीसूचीचा उपयोग होतो. उदाहरणार्थ 'मिरज शहराचा इतिहास' या ग्रंथामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख कोणत्या पानावर आहे हे व्यक्तीसूचीमुळे एकत्रित मिळू शकते. अशा सूचीमुळे स्थलसूची प्रमाणेच फायदे होतात स्थळसूची व व्यक्ती सूची किंवा एखाद्या विषयानुसार दिलेल्या ग्रंथातून संशोधकाला आवश्यक ती माहिती चटकन उपलब्ध होते. अशा रीतीने स्थळ व व्यक्ती यांची संबंधित ग्रंथातील सूची वरून आपल्याला माहिती मिळते.

**३. ग्रंथसूची –**

वरील दोन सूचीपेक्षा ग्रंथ सूची किंवा व्हॉल्युम इंडेक्स हा प्रकार थोडा वेगळा आहे. ज्याचे संशोधन उच्च टप्प्यावर गेलेले आहे अशा संशोधकांना ग्रंथसूचीचा बहुमोल उपयोग होतो. या सूचीमुळे पुढील प्रश्न उपस्थित केले जातात आपण निवडलेल्या विषयाचा अभ्यास पूर्वी कोणी केलेला असेल का? आणि या अभ्यासासाठी कोणती पुस्तके लागतील? ती कोठे आणि कशी शोधावीत? ग्रंथ सूची मधून संशोधकाला आवश्यक असणाऱ्या ग्रंथांची ग्रंथ विषयांची व ग्रंथ लेखकांची सामग्री एकत्रित मिळू शकते. उदा. डॉ. आप्पासाहेब पवार (शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू) यांनी लेखन व संपादन केलेल्या ऐतिहासिक ग्रंथाची सूची असेल तर त्यांच्या ग्रंथाचे नाव, प्रकाशनाचे वर्ष, प्रकाशनाचे ठिकाण, आवृत्ती क्रमांक यांची माहिती एकत्रितपणे मिळू शकते. संशोधकाला अशा ग्रंथसूचीचा खूप उपयोग होतो.

### ४.४.३ संदर्भ ग्रंथ यादी –

प्रत्येक शोध प्रबंधाला संदर्भ ग्रंथ यादी जोडलेली असते. संदर्भ ग्रंथाची यादी तयार करणे हे एक स्वतंत्र तंत्र आहे. संदर्भ ग्रंथ यादी म्हणजे संशोधकाने कोणते ग्रंथ उपयोगात आणले आहेत याची यादी होय. यादी देण्याची गरज का आहे तर सर्वसाधारणपणे संशोधक ज्यावेळी अशा प्रकारची यादी देतो तेव्हा त्याला आपण किती ग्रंथांचा मागोवा घेतला आहे हे दाखवायचे असते. त्याचबरोबर काही शंका उपस्थित होण्यासारखे असतील तर त्याचे निरसन करण्यासाठी कोणती संदर्भ साधने वापरणे आवश्यक आहे याचे मार्गदर्शन या यादीतून केले जाते.

**संदर्भग्रंथ यादीचे चार प्रकार –**

संदर्भ ग्रंथ यादीचे खालील प्रकार आहेत –

१. ज्यामध्ये महत्त्वाचे व निवडक संदर्भ साधने आहेत.

२.	ज्यामध्ये सर्व ग्रंथांची नोंद केली आहे.

३.	ज्यामध्ये सर्व ग्रंथांचा मागोवा घेतला आहे.

४.	विषयाशी संबंधित अशा सर्व ग्रंथांची यादी.

५.	संशोधनासाठी प्रत्यक्ष पणे वापरलेल्या ग्रंथांची यादी.

वरील प्रकारच्या संदर्भ ग्रंथ यादीचे पुन्हा दोन प्रकारात वर्गीकरण करता येते –

१.	सर्वसाधारण आणि

२.	सटीक

सर्वसाधारण संदर्भ ग्रंथाच्या यादीवर टीकाटिप्पणी करण्याचे कारण असत नाही पण सटीक संदर्भ ग्रंथाच्या यादीमध्ये मात्र काही ना काही टीका करणे आवश्यक असते. वर दिलेल्या प्रकारापैकी पहिल्या प्रकाराला निवडक संदर्भ ग्रंथाची यादी असे म्हणतात तर चौथ्या प्रकाराला सर्वसमावेशक संदर्भ ग्रंथाची यादी असे म्हणतात .

**संदर्भसाधनांचे वर्गीकरण –**

संदर्भ ग्रंथाची वर्गवारी करण्यापूर्वी त्याची विभागणी प्राथमिक संदर्भ साधने व दुय्यम संदर्भ साधने अशी केली जाते. नंतर या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांची पुन्हा वर्गवारी प्राथमिक प्रकाशित व प्राथमिक व प्रकाशित असे करतात. आणि दुय्यम प्रकाशित अशा प्रकारे केली जाते. अशा रीतीने संदर्भ साधनाची ढोबळ वर्गवारी केल्यानंतर आपल्या विषयाला अनुसरून पुन्हा त्याची वर्गवारी करणे आवश्यक असते. महसुलानंतर जर न्यायदानाचे प्रकरण असेल तर त्यामध्ये सुद्धा प्राथमिक व दुय्यम व प्रकाशित असे भाग पाडावे लागतात. त्यानंतर ही सर्व संदर्भ साधने एकाच भाषेतील असतील तर प्रश्न नाही परंतु साधने जर वेगवेगळ्या भाषेत उपलब्ध असतील तर भाषेनुसार स्वतंत्र संदर्भ यादी करणे आवश्यक आहे. उदा. मराठ्यांच्या महसूल व्यवस्थेवरील इंग्रजीत, मराठी, संस्कृत साधने बऱ्याच वेळा संदर्भ साधने व लिखित स्वरूपाचे असतात तेव्हा अशा साधनांचे सुद्धा वर्गवारी करावी लागते. नियतकालिकांची विषयानुसार यादी करणे आवश्यक असते.

अशा रीतीने जी यादी तयार केली जाते तिला 'डिक्शनरी कॅटलॉग' असे म्हणतात. ही यादी संशोधाकामध्ये जिज्ञासा निर्माण करते. काही वेळा सर्वसामान्य संदर्भ ग्रंथ सूची या नावाखाली देतात यावेळी त्याचा उद्देश अभ्यास लोकांमध्ये उत्साह निर्माण करावा हाच असतो. त्यामध्ये मात्र अद्याक्षराची अट पाळलेली नसते.

**संदर्भ ग्रंथाची यादी देत असताना पाळावायचे तंत्र –**

१. संदर्भ ग्रंथाची यादी तयार करीत असताना सुरुवातीला लेखकाचे आडनाव, नंतर नाव, जर लेखक हा अनुवादक असेल तेथे अनुवादक असे लिहावे. जर लेखक हा संपादक असेल तर संपादक असे लिहावे.

त्यानंतर पुस्तकाचे नाव लिहावे व स्वल्पविराम द्यावा. त्याच्यापुढे आवृत्तीचा क्रमांक, खंड क्रमांक, प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाचे नाव, व शेवटी प्रकाशनाची तारीख द्यावी व शेवटी पूर्णविराम द्यावा.

२. लेखकाचे नाव देत असताना सर्वसामान्य अडचण येते की काही वेळा महाराष्ट्रीयन प्रमाणे संपूर्ण नाव लिहिण्याची पद्धत इतर प्रांतीयांची नसते. त्यामुळे गोंधळ उडण्याची शक्यता असते. दक्षिण भारतीय आपले आडनाव लिहित नाहीत तर सुरुवातीला गावाचे नाव नंतर आजोबांचे नाव नंतर वडिलांचे नाव व स्वतःचे नाव लिहितात. उदा. इरापल्ली अनंत श्रीनिवास प्रसन्न यापैकी इरापल्ली हे गावाचे नाव आहे काही वेळा फक्त आजोबा व पिता यांचे नाव देऊन स्वतःचे नाव लिहिण्याची पद्धत आहे. अशा स्थितीत सावधगिरीने यादी तयार करणे आवश्यक आहे.

३. ज्यावेळी दोन लेखक असतात तेव्हा फक्त पहिल्या लेखकाचे आडनाव पहिल्यांदा लिहावे. परंतु दुसऱ्या लेखकाचे नाव जरी पहिल्यांदा लिहिले तरी चालते. ज्यावेळी तीन लेखक एकत्र असतात तेव्हा पहिल्याचे आडनाव देऊन नंतर दुसऱ्याचे नाव आडनाव द्यावे आणि त्याच्यापुढे अँड अशी खून करून तिसऱ्याचे नाव व आडनाव द्यावे.

४. ज्यावेळी एखाद्याने ग्रंथाचे संपादन केले असते तेव्हा त्याचे आडनाव नंतर स्वल्पविराम मग नाव नंतर कंसात संपादक अशी खूण करावी.

५. ज्यावेळी एखाद्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती निघत नाही परंतु तो ग्रंथ एकापेक्षा जास्त खंडामध्ये लिहिलेला असतो तेव्हा ग्रंथाच्या नावानंतर खंडाचा क्रमांक लिहावा जर आवृत्तीचा नंबर व खंडाचा नंबर नसेल तर लगेच ग्रंथाच्या नावानंतर प्रकाशनाच्या ठिकाणाचे नाव द्यावे.

संदर्भग्रंथाची यादी तयार करण्याचे जे तंत्रज्ञान वर दिलेले आहे ते साधारणतः भारतामध्ये प्रचलित आहे. याबद्दल डॉ. के. एन. चिटणीस म्हणतात की, संदर्भ ग्रंथाच्या नोंदी देण्याची जी पद्धत भारतामध्ये सर्रास वापरली जाते तिच्यामध्ये काही सुधारणा आधुनिक काळानुसार करून दिल्या आहेत. पूर्वी अशी पद्धत होती की, प्रकाशनाचे ठिकाण व तारीख याचीच नोंद केली जात असे. अलीकडील काळात प्रकाशकाचे नाव घालण्याची पद्धत सुरू झाली आहे. भारतामध्ये ही पद्धत नव्यानेच सुरू झाली आहे संदर्भ ग्रंथाचे यादी तीन नोंदी असतात. लेखक, ग्रंथाचे नाव, व प्रकाशनाचा तपशील. भारतीय पद्धतीने नुसार प्रत्येक ठिकाणी स्वल्पविराम देण्याची पद्धत आहे.

**Bibliographical Software**

वर्तमान परिस्थितीमध्ये तंत्रज्ञानामध्ये मोठी प्रगती झालेली आहे. त्यामुळे या प्रगतीचा संशोधकाला सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये उपयोग होतो. संदर्भग्रंथसूची संदर्भामध्ये सुद्धा Softwares आलेली आहेत. Bibliographical Software म्हणून ही Software ओळखली जातात. संदर्भग्रंथ सूची तयार करण्यासाठी संशोधकाला याची मदत होते. अशा प्रकारचे काही Softwares बद्दल थोडक्यात माहिती –

सॉफ्टवेअर संशोधकाला त्याच्या संदर्भाची व्यवस्थितपणे जुळणी करण्यास मदत करते. विषयवार, विभागवार, संदर्भाची जुळवणी करणे आणि संदर्भाना जोडणे सोपे होते. हे सॉफ्टवेअर संशोधकांसाठी संदर्भ ग्रंथ सूची आणि तळटिपा बनवते. त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतीने संदर्भ ग्रंथ सूची अथवा तळटिपा द्यावयाच्या असल्या तरी या सॉफ्टवेअरच्या मदतीने त्या तात्काळ देता येतात. हे सॉफ्टवेअर संशोधकाला त्यांच्याजवळ माहितीच्या साठवण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. संशोधकाला त्या माहितीच्या साठ्यात स्वतःची माहिती साठवता येते. त्यामुळे संशोधकाला इंटरनेट द्वारे जगात कुठेही असताना त्याचे संदर्भ वापरता येतात.

Endnote and End Note Web, Mendeley, Ref. Works, Zotero ही काही प्रचलित संदर्भग्रंथ सूचीचे सॉफ्टवेअर आहेत.

संदर्भ ग्रंथाची यादी कोणत्या तंत्राच्या आधाराने केली जाते याची समग्र माहिती वरील विवेचनावरून येऊ शकते संदर्भ ग्रंथाची यादी सतत वाढत असते आणि ज्या संशोधनाचे काम पूर्ण होईल त्याचवेळी ही यादी पूर्ण झाली असे म्हणावयास हरकत नाही अन्यथा संदर्भ ग्रंथाची यादी दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे.

**४.४.४ अहवाल लेखन :–**

**अहवाल लेखन :–**

विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक यांना संशोधन पूर्ण झाल्यानंतर अहवाल लेखन करणे गरजेचे आहे. अहवाल लेखन करण्यासाठी विद्यार्थी संशोधकाकडे उच्च विद्वत्ता असली पाहिजे. कल्पकता, विश्लेषण कौशल्य, प्रतिभा संपन्नता असली पाहिजे. अहवाल लिहीत असताना अभ्यासकाने वस्तुनिष्ठ असले पाहिजे. अहवाल पुरेसा व्यवस्थित आणि सत्यतेला कोणतीही बाधा न आणणारा असावा याची काळजी घेणे गरजेचे आहे. अहवाल कालक्रमानुसार, अभ्यास घटकाचे, वास्तूंचे अथवा सांस्कृतीक घटकांचे यथार्थ विश्लेषण करून निष्कर्ष काढले पाहिजेत. अहवाललेखनाची भाषा फार रुक्ष, अनाकर्षक असू नये आणि फार अलंकारिकही असू नये. तर लेखनात यथार्थता व स्पष्टता हवी.

**अहवालाचे प्रमुख घटक :–** संशोधन पूर्ण झाल्यानंतर अहवाल लेखन केले जाते त्याची विभागणी काही विशिष्ट घटकांमध्ये करणे आवश्यक आहे.

**१. प्रस्तावना :–** अहवालाच्या अथवा संशोधन लेखनाच्या प्रस्तावनेमध्ये आपण केलेल्या संशोधानासंदर्भात अथवा निवडलेल्या विषयासंदर्भात थोडक्यात माहिती देणे आवश्यक आहे. विषय निवडण्याचे हेतू स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**२. उद्देशः–** अहवालामध्ये लेखकाने संशोधनाचे उद्देश स्पष्ट करणे आवश्यक आहे. संशोधनाचा हेतू म्हणजेच उद्देश स्पष्ट केला पाहिजे.

**३. संशोधन घटकाचे क्रमवार मुद्देसूद विवेचन:–** क्रमवार आणि मुद्देसूद मांडणी करणे आदर्श अहवाल लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. संशोधना नंतर काढलेले निष्कर्ष घटना क्रम, कालानुक्रम स्थळ, व्यक्ती, प्रसंग इत्यादीची योग्य पद्धतीने मांडणी करणे हा अहवाल लेखनाचा मुख्य भाग आहे.

**४. विश्लेषण :–** अहवालामध्ये मुद्देसूद मांडणी केल्यानंतर आपल्याला ज्ञात असलेल्या माहितीबद्दलचे ऐतिहासिक पद्धतीने निरपेक्ष दृष्टिकोनातून विश्लेषण करणे आवश्यक आहे, हे विश्लेषण वास्तव असले पाहिजे, त्यामध्ये विषयांतर अथवा कल्पनाविलास असणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. निष्कर्ष, मांडणी व विश्लेषण केल्यानंतर अभ्यासक काही निष्कर्ष पर्यंत पोहोचतो. अभ्यासांती येणारे निष्कर्ष अहवालामध्ये महत्त्वाचे असतात. किंबहुना उपक्रमाचे ते अंतिम फलित असते. हे निष्कर्ष पुराव्यासह तसेच कार्यकाल संबंधाचे स्पष्टीकरण करून प्रस्तुत केले गेले पाहिजेत.

**५. अहवालाचे आकर्षक स्वरूप :–** अहवाल आकर्षक स्वरूपात तयार केला पाहिजे. अहवालासाठी वापरलेला कागद उत्तम प्रतीचा असावा. अलीकडे तंत्रज्ञानाच्या युगात तो हस्तलिखितपेक्षा संगणकावर छपाई केलेला असावा. अहवाल अधिक आकर्षक व प्रभावी करण्याकरिता आकर्षक शिर्षके, चित्रे, फोटो इत्यादीचा उपयोग करणे आवश्यक आहे. वर्तमान काळात आधुनिक तंत्रज्ञान वापरून आकर्षक आहवाल करता येतात. संगणकावर विविध साधने (Apps) वापरली जातात. अशा प्रकारचे अहवाल संशोधनासाठी, सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त व महत्त्वाचे असतात. अहवालामध्ये महत्त्वाच्या सूचना, उपाय यांचा समावेश असतो, हे अहवाल अभ्यासक संशोधक यांच्याबरोबर शासन, सामाजिक संस्था सामान्य लोकांनाही उपयुक्त असतात. सर्वांच्या ज्ञानात वृद्धी होण्यास मदत करतात.

### Presentation / सादरीकरण

इतिहासाच्या जतन व संवर्धनाच्या प्रक्रियेमध्ये अनेक उपक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये सामाजिक जाणीव जागृती मोहीम, सर्वेक्षण, प्रकल्प, प्रबोधन फेरी, प्रदर्शन, व्याख्याने, चित्रपट, जयंती, स्मृतिदिन, हेरिटेज वॉक म्हणजेच वारसा फेरी इत्यादीचा समावेश होतो. या उपक्रमामुळे विद्यार्थी अभ्यासक, संशोधक, पर्यटक, सामान्य लोक सहभागी होत असतात. यापैकी विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक यांना विविध उपक्रमाच्या सहभागानंतर अहवाल लेखन करावे लागते. तसेच संबंधित अहवाल विविध पद्धतीने, विविध ठिकाणी सादर करावे लागतात. हे अहवाल सादर करत असताना अनेक बाबी लक्षात घ्याव्या लागतात. अहवाल लेखन, सादरीकरण या परस्परपूरक बाबी आहेत. उदा. एखादे वारसा स्थळ, कला, सांस्कृतिक घटक याबाबतीत अभ्यासांअंती अहवाल तयार करून तो प्रचार, प्रसार, संवर्धन, जतन इत्यादी हेतूने सादर करता येतो. तेव्हा तो विविध प्रकारे सादर करता येतो.

**१. मौखिक सादरीकरण :–** स्थानिक इतिहास, वारसा स्थळ, सांस्कृतिक, कला, कौशल्य इत्यादी बाबतीत केलेला अहवाल मौखिक पद्धतीने म्हणजे व्याख्यान अथवा कथन पद्धतीने सादर करता येतो.

**२. चित्रफीत, प्रतिकृती इत्यादी द्वारे सादरीकरण :–** अहवाल लेखनाच्या आधारे चित्रे, प्रतिकृती इत्यादीद्वारेही अहवाल सादर करता येतो उदा. एखाद्या गडकोटास भेट दिली असेल तर त्याच्या विविध अवशेषासंदर्भात म्हणजेच माची, तटबंदी, इमारती, बालेकिल्ला इत्यादी. संबंधित चित्रकृती तयार करून सादरीकरण करता येते. एखादी वास्तू असेल तर प्रतिकृती तयार करून वैशिष्ट्यसह सादरीकरण करता येते.

**३. आधुनिक विविध तंत्रज्ञानाच्या आधारे सादरीकरण :-** एखाद्या वारसा स्थळ अथवा स्थानिक ऐतिहासिक स्थळास भेट दिल्यानंतर एखाद्या सांस्कृतिक घटकाचे उदा. नृत्य, वेशभूषा, विविध कला, इत्यादींचे निरीक्षण, अवलोकन, अभ्यास करत असताना आधुनिक विविध तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. छायाचित्र (फोटोग्राफ), चित्रफित (व्हिडिओ) संगणकाच्या आधारे तयार केलेले पॉवर पोईंट प्रेझेंटेशन इत्यादी कौशल्याच्या आधारे सादरीकरण करता येते. ते संग्रहित करून ठेवणे सहज शक्य आहे. तसेच वितरण ही सहज करता येते.

**सादरीकरण करत असताना घ्यावयाची दक्षता :-**

कोणत्याही प्रकारचे सादरीकरण करत असताना काही गोष्टींची दक्षता घेणे गरजेचे आहे.

१. **भाषा :-** सादरीकरणाची भाषा सहज सोपी सर्वांना समजेल अशी असावी.

२. **वस्तुनिष्ठता :-** सादरीकरण करत असताना त्यामध्ये जास्तीत जास्त वस्तुनिष्ठता आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

३. **नि:संदिग्धता:-** सादरीकरण करत असताना निवेदनामध्ये नि:संदिग्धता म्हणजे स्पष्टता असावी.

४. **नेमकेपणा :-** स्पष्टीकरण नेमके व थोडक्यात असावे. विनाकारण लांबवलेले व पाल्हाळीक नसावे.

५. **साध्यता :-** सादरीकरणाचा नेमका हेतू साध्य झाला पाहिजे. ज्या हेतूने ज्यांच्यासाठी सादरीकरण केली आहे नेमका तो हेतू साध्य झाल्याची खात्री सादर करताना करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे योग्य पद्धतीने अहवाललेखन व सादरीकरण केले तर स्थानिक इतिहासाच्या जतन व संवर्धनास त्याचा निश्चित फायदा होईल. आपल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौतिक वारसा वर्तमान पिढीकडून भविष्यकालीन पिढीपर्यंत पोहोचवणे सहज शक्य होणार आहे.

## ४.४ सारांश

इतिहास संशोधन प्रक्रिया ही अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे इतिहास संशोधन करत असताना अनेक तंत्र व कौशल्य संशोधकास माहीत असणे आवश्यक आहे. या तंत्रज्ञान व कौशल्याच्या आधारे संशोधक इतिहास संशोधन यशस्वीरित्या पूर्ण करू शकतो. या कौशल्यामध्ये टिपण काढणे, तळटिपा देणे, शब्दकोश, परिशिष्ट, सूची इत्यादींची माहिती इतिहास संशोधकास असणे आवश्यक आहे. संदर्भ ग्रंथ यादी हीसुद्धा इतिहास संशोधन प्रक्रियेतील एक महत्त्वाची बाब आहे. संशोधन पूर्ण झाल्यानंतर इतिहासाची मांडणी करणे किंवा अहवाल लिहिणे हा अंतिम पण महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

संशोधनासाठी विषय निवडल्यानंतर संदर्भ साधने गोळा केली जातात. या संदर्भ साधनांचे मूल्यमापन करून या संदर्भ साधनांमधून संशोधकाला टिपणे काढावी लागतात. टिपणे काढण्यासाठी नोटबुक, फाईल पद्धत, स्लीप पद्धत किंवा कार्ड पद्धत इत्यादी पद्धती वापरल्या जातात. संशोधक अनुभवी असेल तर त्याला कोणत्याही पद्धतीने नोट्स काढणे सोपे जाते पण नवख्या संशोधनास कार्ड पद्धत जास्त उपयुक्त ठरू शकते.

संशोधन लेखन करत असताना त्यामध्ये संशोधकाला तळटिपा द्याव्या लागतात. तळटीप म्हणजे संशोधकाने प्रत्येक पृष्ठावर प्रकरणाच्या शेवटी अथवा ग्रंथाच्या शेवटी संशोधनातील नवीन माहिती बद्दल ज्यादा अथवा सविस्तर दिलेली माहिती होय. तळटिपा देण्याचे अनेक उद्देश आहेत तसेच तळटीप देण्याची विशिष्ट पद्धतसुद्धा आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने दिलेल्या तळ टिपांचा संशोधकास तसेच वाचकास उपयोग होऊ शकतो.

'शब्दकोश' हा सुद्धा इतिहास संशोधन प्रक्रियेमध्ये अत्यंत उपयुक्त असा भाग आहे. इतिहास संशोधनामध्ये जी संदर्भ साधने वापरली जातात त्यामधील भाषा, शब्द, त्या शब्दांचे अचूक अर्थ काढण्यासाठी संशोधकाला शब्दकोशाचा उपयोग होतो. शब्दकोशामुळे शब्दाचे उत्पत्ती अर्थ, उच्चार वाक्यात उपयोग, व्याकरनिक श्रेणी याबद्दलची सखोल माहिती उपलब्ध होते. शब्दकोश इतिहासाच्या सखोल अभ्यासासाठी एक महत्त्वाचे साधन आहे.

संशोधनाच्या मुख्य लेखनाच्या शेवटी जोडलेला जो विशेष भाग असतो त्याला 'परिशिष्ट' म्हणतात. लेखनातील मुख्य मुद्द्यांशी संबंधित अतिरिक्त माहिती या परिशिष्टामध्ये दिली जाते. उदाहरणार्थ तक्ते, आकडेवारी, आकृत्या, नकाशे, दस्ताऐवज, पत्रव्यवहार इत्यादी. या परिशिष्टामुळे संशोधकाच्या लेखनाला विशेष दर्जा प्राप्त होतो तसेच परिशिष्टामुळे वाचकाला देखील अधिक संदर्भ आणि तपशीलवार माहिती मिळणे शक्य होते. इतिहास लेखन पद्धतीमध्ये 'सूची' हा एक महत्त्वाचा भाग आहे. कोणत्याही संशोधनाला सूची जोडल्याशिवाय ते संशोधन पूर्ण होत नाही सूची म्हणजे अशी एक यादी जी विविध गोष्टींच्या किंवा घटकांच्या क्रमवार किंवा वर्णनात्मकपणे सादर केलेली असते. सूचीचा वापर माहितीची व्यवस्था, आयोजन किंवा विश्लेषण करण्यासाठी केला जातो. स्थळ सूची, व्यक्ती सूची, ग्रंथसूची असे सूचीचे प्रमुख तीन प्रकार आहेत. ग्रंथसूची पेक्षा थोडा वेगळा प्रकार म्हणजेच 'संदर्भग्रंथ यादी' होय. संशोधकाने आपल्या संशोधनासाठी कोणते संदर्भ वापरलेले आहेत याची यादी संशोधक संदर्भ ग्रंथ यादी म्हणून संशोधनाच्या शेवटी देत असतो. संदर्भ ग्रंथ यादी तयार करण्यासंदर्भामध्ये आधुनिक काळात बिबल्याग्रफिकल सॉफ्टवेअर्स उपलब्ध झालेली आहे त्याचाही वापर संदर्भ ग्रंथ यादी तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. विविध तंत्र व कौशल्य वापरून संशोधन पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल सादर करणे आवश्यक आसाते, तसेच हा अहवाल कशा पद्धतीने लिहावा त्याची एक शिष्ट संमत पद्धत आहे. त्या पद्धतीने प्रभावी अहवाल लिहून तो संबंधितांपुढे सादर केला पाहिजे किंवा संशोधनाअंती येणारे निष्कर्ष इतिहास रूपाने समाजापुढे मांडले पाहिजेत. हा इतिहास संशोधनाचा अंतिम आणि महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

## ४.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :-

**१. जतन व संवर्धन** - ऐतिहासिक वारश्याचे आहे त्या स्थितीत प्रयत्न पूर्वक संरक्षण करणे म्हणजे जतन करणे होय तर एखाद्या ऐतिहासिक किंवा संस्कृती स्थळाचे मानवी प्रभाव आणि मानवी गैरवापरापासून संरक्षण करणे मानवी क्रिया कलापांचे नियमन करून ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचे संरक्षण आणि देखभाल करणे.

२. **वस्तुनिष्ठता** – वस्तुनिष्ठता म्हणजे वैयक्तिक पूर्वग्रह, दृष्टीकोन, भावना इत्यादी दृष्टिकोनापासून मुक्त होऊन सत्य आणि वास्तविक विवेचन करणे होय.

३. **सूची** – यादी

४. **संदर्भासाधने** – कागदपत्रे अथवा पुरावे

५. **शिष्टसंमत** – सर्वमान्य

६. **अवतरण** – जसाच्या तसा उल्लेख

७. **स्लीप** – विशिष्ट आकाराचा कागदाचा तुकडा अथवा कार्ड

८. **सॉफ्टवेअर** – संगणकामध्ये एखादी गोष्ट करण्यासाठी केलेली विशिष्ट पद्धतीची कार्यप्रणाली

९. **निष्कर्ष** – संशोधनानंतर एखाद्या बाबीबद्दल काढलेले मत अथवा विचार

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्न, उत्तरे

प्रश्न १. रिकाम्या जागा भरा.

१. टिपणे काढण्यासाठी कार्ड पद्धतीमध्ये ४ x ६ आणि ..... x ६ आकाराची कार्ड वापरली जातात.

अ. ५ ब. ८ क. ३ ड. ९

२. संशोधकाचा वेळ व श्रम वाचवण्यासाठी टिपणे काढण्यासाठी ............. पद्धत अत्यंत उपयुक्त आहे.

अ. नोटबुक ब. कार्ड क. फाईल ड. यापैकी नाही

३. तळटीपाचे ............. प्रकार आहेत.

अ. पाच ब. चार क. दोन ड. तीन

४. तळटीप देत असताना टिपेचा निदर्शनाचा आकडा ............. बाजूला द्यावेत.

अ. वरच्या ब. खालच्या क. डाव्या ड. उजव्या

५. संशोधकास सूचीचा वापर ............. सारखा होतो.

अ. नकाशा ब. आरशा क. दाखल्या ड. होत नाही

६. सूचीचे सर्वसाधारण ............. प्रकार आहेत.

अ. पाच ब. चार क. दोन ड. तीन

७. ............. म्हणजे संशोधकाने कोणते ग्रंथ उपयोगात आणले आहेत याची एक यादी होय.

अ. नोटबुक ब. सूची क. संदर्भ ग्रंथ यादी ड. यापैकी नाही

८. संदर्भ ग्रंथ यादीमध्ये लेखकाचे आडनाव ............. असते.

अ. शेवटी ब. सुरुवातीला क. सांकेतिक ड. गुप्त

९. शब्दांच्या अचूक अर्थ, उत्पत्ती, उच्चार या संदर्भामध्ये माहिती देणाऱ्या साधनास ............ म्हणतात.

अ. शब्दकोश ब. सूची क. तळटीप ड. संदर्भग्रंथ यादी

१०. ............ या कलेचा शोध लागल्यानंतर शब्दकोश निर्माण करण्याची परंपरा मोठ्या प्रमाणात सुरू झाली.

अ. मुद्रण कला ब. चित्रकला क. भाषांतर ड. संचार

११. 'ए डिक्शनरी ऑफ दि इंग्लिश लैंग्वेज' हा शब्दकोश ............ यांनी तयार केला आहे

अ. सॅम्युएल जॉन्सन ब. रॉबर्ट मेल क. संकर्षणकुमार देव ड.विल्यम जोन्स

१२. छत्रपती शिवाजी महाराजांनी ............ यांच्याकडून 'राज्यव्यवहारकोश' तयार करून घेतला.

अ. मोरोपंत ब. म. रा. चिटणीस क. कृष्णाजी सभासद ड. रघुनाथपंथ हणमंते

१३. मराठी मध्ये पहिला शब्दकोश ............ यांनी तयार केला.

अ. बाळशास्त्री जांभेकर ब. महर्षी कर्वे क. आचार्य अत्रे ड. साने गुरुजी

१४ Bibliographical Software वापरून ............ तयार करतात.

अ. संदर्भग्रंथ सूची ब. विश्वकोश क. सूची ड. अहवाल

१५. ............ हा इतिहास संशोधन प्रक्रियेचा अंतिम टप्पा आहे.

अ. निष्कर्ष ब. अन्वयार्थ क. विषय निवड ड. अहवाल लेखन

**उत्तरे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) ब, | २) ब, | ३) क, | ४) क, |
| ५) ब, | ६) ड, | ७) क, | ८) ब, |
| ९) अ, | १०) अ, | ११) अ, | १२) ड, |
| १३) अ, | १४) अ, | १५) ड | |

प्रश्न २ रा. टिपा लिहा

१. टिपणे काढणे

२. तळटिपा

३. शब्दकोश

४. संदर्भ ग्रंथ यादी

५. अहवाल लेखन

६. परिशिष्ट

७. सूची

प्रश्न ३. रा. सविस्तर उत्तरे लिहा.

१. टिपणे काढणेच्या विविध पद्धती सांगा.

२. तळटीपा म्हणजे काय सांगून त्या देण्याचे उद्देश व कशा द्याव्यात ते स्पष्ट करा.

३. शब्दकोश म्हणजे काय सांगून त्याची सविस्तर माहिती लिहा.

४. संदर्भग्रंथयादी कशी तयार करावी ते सांगून त्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करा.

५. परिशिष्ट म्हणजे काय सांगून त्याचा इतिहास संशोधनांमध्ये कशाप्रकारे उपयोग होतो सविस्तर लिहा.

६. सूची म्हणजे काय सांगून सूचीचे प्रकार स्पष्ट करा.

७. इतिहास संशोधनांमध्ये अहवाल लेखनाचे महत्त्व सांगा

८. अहवालाचे प्रमुख घटक स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


- कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५
- लोहारम.अ.(संपा), मराठेकालीन समाज जीवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००७
- आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००
- राउत गणेश (संपा), दत्तक गावांचा इतिहास, खंड १,२,३, पुणे विद्यापीठ, पुणे, १९९९
- वांबूरकर जास्वंदी, इतिहास लेखनातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे, २०१५.
- प्रा. पाटील एन. डी. थोरात, पवार, इतिहासाचे उपयोजन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१६.
- प्राचार्य गायकवाड, प्रा.देसाई, प्रा. हनमाने, इतिहासलेखनशास्त्र
- डॉ. देव प्रभाकर, इतिहासशास्त्र
- डॉ. सरदेसाई बी. एन., इतिहास लेखन परिचय, फडके प्रकाशन कोल्हापूर, २०१२
- डॉ. सरदेसाई बी. एन., इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, २००२
- डॉ. शिंदे, मासाळ, गव्हाणे, इतिहासलेखनशास्त्र, एज्युकेशन पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१५.


❑❑❑